
राजाराम... वत यांचे
निवडक साहित्य



म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २०५८

खंड ६

REFBK-0022698

# ...तावना खंड

लेखिका

दुर्गा भागवत

संदर्भ शाखा

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना:**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. प.)

राजारामशास्त्री भागवत- निवडक साहित्य

खंड ६ वा

# प्रस्तावनाखंड

लेखिका : दुर्गा भागवत

REFBK-0022698

वरदा बुक्स

'वरदा' सेनापती बापट मार्ग पुणे १६

प्रकाशक :

ह. अ. भावे
' वरदा बुक्स '
' वरदा ', सेनापती बापट मार्ग
पुणे ४११ ०१६.

सर्व हक्क स्वाधीन

आवृत्ती पहिली : जुलै १९७९

मुखपृष्ठ : सालकर

किंमत : तीस रुपये

मुद्रक :

प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ७ |
| | प्रास्ताविक १९४७) | १० |
| १ | जीवनकथा | १३ |
| २ | आठवणी | ३७ |
| ३ | शास्त्रीबोवांची सामाजिक मते | ५४ |
| ४ | धर्मविषयक लेख | ६० |
| ५ | वाङ्मयसेवा | ७१ |
| ७ | संशोधनात्मक लेख | १०० |
| ८ | समारोप | ११४ |


## परिशिष्ट–१


शास्त्रीबोवांचे ग्रंथरुपाने प्रसिद्ध झालेले
वाङमय व व्याख्याने पृष्ठ १२१ ते १२५


## परिशिष्ट–२


नियतकालिकातील लिखाण आणि
शास्त्रीबुवांच्या लेखनावर आलेले टीकालेख पृष्ठ १२७ ते १७६

निबंध
२२६१८
२७५८

कै. राजारामशास्त्री भागवतांस–

विक्षिप्त तुला म्हणोत कोणी, करो कुणी हेळणा
ढोंग, रुढिचा नाश ह्याच ना विक्षिप्तांच्या खुणा ?
विचारक्रान्ति इथे आढळे हृदयांतील वेदना
करांत कर घालुनी चालल्या बुद्धि आणि भावना

–सोपानदेव चौधरी

# प्रस्तावना

राजारामशास्त्री भागवत यांच्या सर्व महत्वाच्या लिखाणाचे एकसंघ प्रकाशन आज पूर्ण होते आहे हे पाहून मला निरतिशय आनंद झाला आहे. श्री. ह. अ. भावे यानी अंगावर घेतल्याने हे अवघड काम पूर्ण झाले. याबद्दल श्री. भावे यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच आहेत. या कामाला सरकारी अनुदान घ्यायचे नाही, या तत्त्वानुसार काम तडीस गेले हा योग फार भाग्याचा आहे. या कामाला सरकारी टिळा लागण्याचा संभव होता. पण नियतीने हे काम साहित्य अकादमी कडून पुरे न होता स्वतंत्रपणे सिद्ध व्हावे अशी योजना केली आणि आज ते यशस्वी तऱ्हेने प्रकाशित होते आहे हा मोठा अपूर्व योग आहे.

आता साहित्य अकादमीच्या कारभाराविषयी थोडेसे सांगते. अकादमीने राजारामशास्त्र्यांच्या निवडक लिखाणाविषयी विचारले आणि मी हो म्हटले. अकादमीला साडेतीनशेंपर्यंत पृष्ठांचे पुस्तक हवे होते. पण शास्त्रीबोवांविषयीचे माझे तेवढ्याच पानाचे साहित्य दोन पुस्तकांत अगोदरच प्रसिद्ध झालें होते. तेव्हा तेच पुनर्मुद्रित करून देणे मला अयोग्य वाटले. शास्त्रीबोवांच्या लिखाणामागे कोणतीही प्रकाशन संस्था अगर सांस्कृतिक संस्था, राजवाडे– प्रकाशनाच्या मागे उभी आहे तशी नव्हती. तेव्हा त्यांचे होईल तेवढे महत्वाचे लिखाण अकादमीनेच अपवाद करून प्रसिद्ध करावे असे मी म्हटले. त्यावरही भवती न भवती झाली. १९७०-७१ च्या सुमारास मी त्याचे लिखाण 'विविधज्ञान विस्तारा'तून उतरवून घेतले. नंतर १९७२ मध्ये ग्रंथ पूर्ण झाला असे पाहून मी तो अकादमीकडें पाठवला. तो ग्रंथ हजार-बाराशे पानांचा झाला असता. त्यावरही फिरून पृष्ठसंख्येबद्दल चर्चा झाली. मी 'आहे तसे घ्या नाही तर परत करा' असे सांगितले. पण

१९७४ साली अकादमीने प्रस्तावना परत तपासून द्या असे सांगितले. ते मी केले. त्याप्रमाणे मुंबईच्या श्री. वैद्यबाई यांना २६–८–१९७४ ला पत्रही पाठवले. त्यानंतर अकादमीने मला या कामाबद्दल पाचशे रुपये द्यायचे ठरवले होते. मी ते मान्यही केले होते. वास्तविक कॉपी वगैरे करण्यात माझा आठशे रुपयांपर्यंत खर्च झाला होता. ते असो. अकादमीने १९७४ साली चारशे रुपये पाठवले आणि उरलेले शंभर प्रुफे वगैरे तपासल्यानंतर द्यायचे ठरवले. अर्थात माझे पुस्तक मोठे असले तरी ते अकादमीने स्वीकारले असे मला वाटले. पुढे आणीबाणीच्या काळी तुरुंगात असताना १९७६ मध्ये अकादमीचे फिरून पत्र आले की नियमाप्रमाणे पुस्तकाची पृष्ठसंख्या साडे-तीनशेपर्यंत करून द्यावी.

मी सुटल्यावर यापुढे या सरकारी संस्थांशी संबंध नको असे योजले होतेच. पण हा आणीबाणीपूर्व व्यवहार असल्याने 'आहे तसे छापा नाही तर लिखाण परत करा' असे कळवले. ३–३–७८ रोजी मी साहित्य अकादमीने मला दिलेले चारशे रुपये चेकने परतही केले. ते पोचल्याची फक्त पोस्टाची नोंद आहे. चिटणिसांनी दोन ओळींचे पत्रही त्याबद्दल मला लिहिले नाही. पुढे मी ग्रिन्डले बँकेकडे चौकशी केल्यानंतर तो चेक वटला गेल्याचे कळले. मात्र चेकचा परिणाम असा झाला की वैद्य बाई स्वतः आल्या व माझे हस्तलिखित परत करून गेल्या. तेच हस्तलिखित आज अधिक भर घातलेल्या स्वरूपात पाच खंडात प्रसिद्ध होत आहे.

तत्पूर्वी प्रा. वसंत बापट यांच्याशी माझे मार्च १९७८ च्या पहिल्या आठ-वड्यात बोलणे झाले. तेव्हा तुमच्या अटी मान्य केल्यास अकादमीने छापले तर चालेल का असे त्यांनी विचारले. मी 'नाही' म्हणून सांगितले. वैद्यबाईंनीही खेद प्रदर्शित करून तोच प्रश्न विचारला. मी 'नाही' असेच त्यांनाही सांगितले. माझ्याकडून हस्तलिखित पोचण्याबद्दल पावतीही न घेता वैद्यबाई निघून गेल्या. पण आनंद हा की हस्तलिखित परत मिळाले. ज्या राजारामशास्त्र्यांनी शाळेलासुद्धा सरकारी मदत घेतली नाही त्यांचे लिखाण अकादमीपर्यंत पोचून फिरून स्वतंत्र रिंगणात येऊन प्रकाशित झाले हा तर केवढा भाग्याचा योग.

१९४७ साली 'स्वस्तिक' प्रकाशनाने 'राजारामशास्त्री भागवत' हे

हे पुस्तक काढले. त्यातला मजकूर अधिक भर घालून या खंडात दिला आहे. पुढे १९५० मध्ये अभिनव प्रकाशनाने राजारामशास्त्र्यांचा 'निवडक लेख-संग्रह' प्रसिद्ध केला. त्यातला भाग पाचव्या खंडात व या खंडाच्या प्रस्तावनेत अंतर्भूत आहे. अर्थात यातही 'संस्कृत भाषेची विचिकित्सा, यातल्या आणि 'रत्नाकर अष्पा कुलकर्णी' वगैरे लेखनाची भर पडली आहेच.

'विविध विस्तारातून हा मजकूर उतरून काढण्यास श्री. सुनील कर्णिक यानेही मेहनत घेतली तिचे विस्मरण मला होणे शक्य नाही. शिवाय आता 'ब्राह्मण आणि ब्राह्मणी धर्म' हे दुर्मिळ पुस्तक मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. टिकेकर यांनी वापरायला दिले. शिवाय आणखीही बहुमोल साहाय्य केले. फर्ग्युसन कॉलेजच्या वॉडिया लायब्ररीचे ग्रंथपाल श्री. माडीवाले यांच्या साहाय्यामुळे रत्नाकर अण्णा कुलकर्णी, प्राकृतभाषेची विचिकित्सा, संस्कृत भाषेची विचिकित्सा' हे लिखाण उपलब्ध झाले. श्री. भावे यांनी तर हे ओझे प्रथम पासून शिरावरती घेतले आहे. त्यामुळे माझे श्रम केवळ नाममात्र झाले. 'केले कार्य परंतु यात मम हो संबंध काही नसे' असे उद्गार काढण्या-जोगे हे काम आपले म्हणून तडीस केले आहे या बद्दल मी कृतज्ञ आहे.

—दुर्गा भागवत

जव्हेरी व्हिला
गिल्डर लेन मुंबई–८
—३१ मे. १९७९.

१९७४ साली अकादमीने प्रस्तावना परत तपासून द्या असे सांगितले. ते मी केले. त्याप्रमाणे मुंबईच्या श्री. वैद्यबाई यांना २६–८–१९७४ ला पत्रही पाठवले. त्यानंतर अकादमीने मला या कामाबद्दल पाचशे रुपये द्यायचे ठरवले होते. मी ते मान्यही केले होते. वास्तविक कॉपी वगैरे करण्यात माझा आठशे रुपयांपर्यंत खर्च झाला होता. ते असो. अकादमीने १९७४ साली चारशे रुपये पाठवले आणि उरलेले शंभर प्रुफे वगैरे तपासल्यानंतर द्यायचे ठरवले. अर्थात माझे पुस्तक मोठे असले तरी ते अकादमीने स्वीकारले असे मला वाटले. पुढे आणीबाणीच्या काळी तुरुंगात असताना १९७६ मध्ये अकादमीचे फिरून पत्र आले की नियमाप्रमाणे पुस्तकाची पृष्ठसंख्या साडे-तीनशेपर्यंत करून द्यावी.

मी सुटल्यावर यापुढे या सरकारी संस्थांशी संबंध नको असे योजले होतेच. पण हा आणीबाणीपूर्व व्यवहार असल्याने 'आहे तसे छापा नाही तर लिखाण परत करा' असे कळवले. ३–३–७८ रोजी मी साहित्य अकादमीने मला दिलेले चारशे रुपये चेकने परतही केले. ते पोचल्याची फक्त पोस्टाची नोंद आहे. चिटणिसांनी दोन ओळींचे पत्रही त्याबद्दल मला लिहिले नाही. पुढे मी ग्रिन्डले बँकेकडे चौकशी केल्यानंतर तो चेक वटला गेल्याचे कळले. मात्र चेकचा परिणाम असा झाला की वैद्य बाई स्वतः आल्या व माझे हस्तलिखित परत करून गेल्या. तेच हस्तलिखित आज अधिक भर घातलेल्या स्वरूपात पाच खंडात प्रसिद्ध होत आहे.

तत्पूर्वी प्रा. वसंत बापट यांच्याशी माझे मार्च १९७८ च्या पहिल्या आठ-वड्यात बोलणे झाले. तेव्हा तुमच्या अटी मान्य केल्यास अकादमीने छापले तर चालेल का असे त्यांनी विचारले. मी 'नाही' म्हणून सांगितले. वैद्यबाईंनीही खेद प्रदर्शित करून तोच प्रश्न विचारला. मी 'नाही' असेच त्यांनाही सांगितले. माझ्याकडून हस्तलिखित पोचण्याबद्दल पावतीही न घेता वैद्यबाई निघून गेल्या. पण आनंद हा की हस्तलिखित परत मिळाले. ज्या राजारामशास्त्र्यांनी शाळेलासुद्धा सरकारी मदत घेतली नाही त्यांचे लिखाण अकादमीपर्यंत पोचून फिरून स्वतंत्र रिंगणात येऊन प्रकाशित झाले हा तर केवढा भाग्याचा योग.

१९४७ साली 'स्वस्तिक' प्रकाशनाने 'राजारामशास्त्री भागवत' हे

हे पुस्तक काढले. त्यातला मजकूर अधिक भर घालून या खंडात दिला आहे. पुढे १९५० मध्ये अभिनव प्रकाशनाने राजारामशास्त्र्यांचा 'निवडक लेख-संग्रह' प्रसिद्ध केला. त्यातला भाग पाचव्या खंडात व या खंडाच्या प्रस्तावनेत अंतर्भूत आहे. अर्थात यातही 'संस्कृत भाषेची विचिकित्सा, यातल्या आणि 'रत्नाकर अष्पा कुलकर्णी' वगैरे लेखनाची भर पडली आहेच.

'विविध विस्तारातून हा मजकूर उतरून काढण्यास श्री. सुनील कर्णिक यानेही मेहनत घेतली तिचे विस्मरण मला होणे शक्य नाही. शिवाय आता 'ब्राह्मण आणि ब्राह्मणी धर्म' हे दुर्मिळ पुस्तक मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. टिकेकर यांनी वापरायला दिले. शिवाय आणखीही बहुमोल साहाय्य केले. फर्ग्युसन कॉलेजच्या वॉडिया लायब्ररीचे ग्रंथपाल श्री. माडीवाले यांच्या साहाय्यामुळे रत्नाकर अण्णा कुलकर्णी, प्राकृतभाषेची विचिकित्सा, संस्कृत भाषेची विचिकित्सा' हे लिखाण उपलब्ध झाले. श्री. भावे यांनी तर हे ओझे प्रथम पासून शिरावरती घेतले आहे. त्यामुळे माझे श्रम केवळ नाममात्र झाले. 'केले कार्य परंतु यात मम हो संबंध काही नसे' असे उद्गार काढण्या-जोगे हे काम आपले म्हणून तडीस केले आहे या बद्दल मी कृतज्ञ आहे.

—दुर्गा भागवत

जव्हेरी व्हिला
गिल्डर लेन मुंबई—८
—३१ मे. १९७९.

# प्रास्ताविक

## ( १९४७ )

मराठी साहित्यातील मिरासदारी सर्वांच्या माहितीची आहे. महाराष्ट्र शारदेच्या दरबारातील नवे जुने मानकरीही आता कुणाला फारसे अज्ञात राहिलेले नाहीत. मानाची ही वतनदारी परंपरेने अधिकाधिक भव्य होत चालली आहे. पण महाराष्ट्राच्या वाङ्मयक्षेत्रात निष्ठेने व निरपेक्ष वृत्तीने हमाली केलेल्या साहित्यिकाची कोणाला माहिती आहे? आपले सारे आयुष्य मराठी भाषेसाठी कष्ट करण्यात घालविलेल्या या सेवकाचा वारसा उचलण्यास कोणते साहित्यिक पुढे सरसावले? लेखणी, वाणी आणि करणी पणाला लावून कोणत्या कार्याचा पाया त्यांनी घातला ह्याची नोंद कोणी ठेवली आहे? ह्या प्रामाणिक साहित्यिक 'मजुरात' कै. राजारामशास्त्री भागवत हे एक नाव घेण्यासारखे लेखक व समाजसुधारक होऊन गेले. दलितांच्या दुःखाबद्दल आत्यंतिक कळवळा, अज्ञानाने ओढवलेले सर्व तऱ्हेचे दैन्य पाहून आलेला उद्वेग, रूढीच्या ढोंगामुळे उत्पन्न झालेल्या सामाजिक विकृतीबद्दल मनस्वी चीड आणि त्याबरोबरच जिवापाड श्रम आणि प्रयत्न केल्यास कधी तरी तांबडे फुटेल हा दुर्दम्य आशावाद, ह्या सर्वांचे मिश्रण होऊन शास्त्रीबोवांचे लिखाण तयार झाले. मी साहित्याचा, समाजाचा हमाल आहे, असे ते अत्यंत अभिमानाने सांगत. सेवाभावाची तीव्र जाणीव अंतःकरणात सदैव जागृत असल्यामुळे शास्त्रीबोवांनी मेहनतीचा कधी कंटाळा केला नाही, मानाची हाव धरली नाही, धनाला कस्पटासमान लेखले. काम करायचे, पुढे जायचे एवढेच त्यांना माहीत होते.

सेवेतून उत्पन्न झालेल्या कष्टांच्या प्रेरणेतून शास्त्रीबोवांच्या लेखनाचा

जन्म झाल्यामुळे, आत्यंतिक प्रांजलपणा आणि निर्भयता हे दोन गुण त्यांच्या लेखनात काठोकाठ भरलेले दिसतात. ह्या दोन गुणांनी त्यांचे असामान्य व्यक्तिमत्त्व प्रगट झाले. पण त्यामुळे टीकेच्या प्रचंड वावटळी त्यांच्या भोवती सतत उठत राहिल्या.

कै. बा. ना. देव ह्यांनी शास्त्रीबोवांचे काही उद्‌गार त्यांच्या चरित्रात दिले आहेत. शास्त्रीबोवांच्या मनाची सत्यप्रिय आणि मोकळी ठेवण त्यावरून चांगली दिसून येते. ते उद्‌गार असेः— 'हे लेख हंगामी, चालू काळाच्या कामाचे म्हणून लिहिले. ते सर्व काळाकरिता नाहीत. लेखकाचा तसा हेतू नाही. सत्यशोधक बुद्धीने ते लिहिले जात, पण निर्भेळ सत्यच नेहमी त्यात सापडेल अशी खात्री नाही. प्रासंगिक व आगंतुक कारणाची ते संतती होत. चालू वादविषयावर त्यात चर्चा असे. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' या तत्त्वानुरोधाने खरे वाटले ते बेधडक त्यात सांगण्यास मागे पुढे पाहिले नाही.'

मजुराच्या ह्या पेशाला शोभेल इतका जाडाभरडा आणि साधा पोषाख ते घालीत. छानछोकीच काय पण ठाकठीकीसुद्धा त्यांच्या पोषाखात क्वचित दिसे. भाषासुद्धा ते साधीच वापरीत. त्यांच्या भाषेत इंग्रजी शैलीची झाक क्वचितच दिसते. संस्कृत शब्दसुद्धा अवघड आणि बहुजनसमाजाच्या आवाक्याच्या बाहेरचे म्हणून ते अगदी बेताने वापरायचे असा त्यांचा बाणा असे. ज्ञानेश्वरीतली भाषा त्यांना आवडे. 'उजू' यासारखा ज्ञानेश्वरीतला शब्द त्यांनी ठिकठिकाणी आपल्या लेखनात वापरला आहे.

मराठी बाणा त्यांच्या लेखनात ओतप्रोत भरला आहे. मराठी बोलणारा प्रत्येक मनुष्य पहिल्यांदा मराठा आहे, मग त्याची जात आणि धर्म कोणताही असो, हे त्यांचे मत होते.

मराठी भाषेच्या निबंधकारात शास्त्रीबोवांचे स्थान स्वतंत्र आणि अढळ आहे; इतकेच नव्हे तर ते उच्चही आहे. शास्त्रीबोवांची विचाराची भरारी थोड्यांनाच साध्य असते. शास्त्रीबोवांची विचार करण्याची पद्धत आणि भाषेची मांडणीसुद्धा अनुकरण करता येण्यासारखी नाही. त्यामुळे ते हयात असेपर्यंत त्यांच्या मताबद्दल सर्वत्र बोलबाला झाला असला तरी लोक-प्रियता त्यांच्या वाटणीस आली नाही. आणि मृत्यूमुळे त्याचे असामान्य

# प्रास्ताविक

## ( १९४७ )

मराठी साहित्यातील मिरासदारी सर्वांच्या माहितीची आहे. महाराष्ट्र शारदेच्या दरबारातील नवे जुने मानकरीही आता कुणाला फारसे अज्ञात राहिलेले नाहीत. मानाची ही वतनदारी परंपरेने अधिकाधिक भव्य होत चालली आहे. पण महाराष्ट्राच्या वाङ्मयक्षेत्रात निष्ठेने व निरपेक्ष वृत्तीने हमाली केलेल्या साहित्यिकाची कोणाला माहिती आहे? आपले सारे आयुष्य मराठी भाषेसाठी कष्ट करण्यात घालविलेल्या या सेवकाचा वारसा उचलण्यास कोणते साहित्यिक पुढे सरसावले? लेखणी, वाणी आणि करणी पणाला लावून कोणत्या कार्याचा पाया त्यांनी घातला ह्याची नोंद कोणी ठेवली आहे? ह्या प्रामाणिक साहित्यिक 'मजुरात' कै. राजारामशास्त्री भागवत हे एक नाव घेण्यासारखे लेखक व समाजसुधारक होऊन गेले. दलितांच्या दुःखाबद्दल आत्यंतिक कळवळा, अज्ञानाने ओढवलेले सर्व तऱ्हेचे दैन्य पाहून आलेला उद्वेग, रूढीच्या ढोंगामुळे उत्पन्न झालेल्या सामाजिक विकृतीबद्दल मनस्वी चीड आणि त्याबरोबरच जिवापाड श्रम आणि प्रयत्न केल्यास कधी तरी तांबडे फुटेल हा दुर्दम्य आशावाद, ह्या सर्वांचे मिश्रण होऊन शास्त्रीबोवांचे लिखाण तयार झाले. मी साहित्याचा, समाजाचा हमाल आहे, असे ते अत्यंत अभिमानाने सांगत. सेवाभावाची तीव्र जाणीव अंतःकरणात सदैव जागृत असल्यामुळे शास्त्रीबोवांनी मेहनतीचा कधी कंटाळा केला नाही, मानाची हाव धरली नाही, धनाला कस्पटासमान लेखले. काम करायचे, पुढे जायचे एवढेच त्यांना माहीत होते.

सेवेतून उत्पन्न झालेल्या कष्टांच्या प्रेरणेतून शास्त्रीबोवांच्या लेखनाचा

जन्म झाल्यामुळे, आत्यंतिक प्रांजलपणा आणि निर्भयता हे दोन गुण त्यांच्या लेखनात काठोकाठ भरलेले दिसतात. ह्या दोन गुणांनी त्यांचे असामान्य व्यक्तिमत्त्व प्रगट झाले. पण त्यामुळे टीकेच्या प्रचंड वावटळी त्यांच्या भोवती सतत उठत राहिल्या.

कै. बा. ना. देव ह्यांनी शास्त्रीबोवांचे काही उद्गार त्यांच्या चरित्रात दिले आहेत. शास्त्रीबोवांच्या मनाची सत्यप्रिय आणि मोकळी ठेवण त्यावरून चांगली दिसून येते. ते उद्गार असेः– 'हे लेख हंगामी, चालू काळाच्या कामाचे म्हणून लिहिले. ते सर्व काळाकरिता नाहीत. लेखकाचा तसा हेतू नाही. सत्यशोधक बुद्धीने ते लिहिले जात, पण निर्भेळ सत्यच नेहमी त्यात सापडेल अशी खात्री नाही. प्रासंगिक व आगंतुक कारणाची ते संतती होत. चालू वादविषयावर त्यात चर्चा असे. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' या तत्त्वानुरोधाने खरे वाटले ते बेधडक त्यात सांगण्यास मागे पुढे पाहिले नाही.'

मजुराच्या ह्या पेशाला शोभेल इतका जाडाभरडा आणि साधा पोषाख ते घालीत. छानछोकीच काय पण ठाकठीकीसुद्धा त्यांच्या पोषाखात क्वचित दिसे. भाषासुद्धा ते साधीच वापरीत. त्यांच्या भाषेत इंग्रजी शैलीची झाक क्वचितच दिसते. संस्कृत शब्दसुद्धा अवघड आणि बहुजनसमाजाच्या आवाक्याच्या बाहेरचे म्हणून ते अगदी बेताने वापरायचे असा त्यांचा बाणा असे. ज्ञानेश्वरीतली भाषा त्यांना आवडे. 'उजू' यासारखा ज्ञानेश्वरीतला शब्द त्यांनी ठिकठिकाणी आपल्या लेखनात वापरला आहे.

मराठी बाणा त्यांच्या लेखनात ओतप्रोत भरला आहे. मराठी बोलणारा प्रत्येक मनुष्य पहिल्यांदा मराठा आहे, मग त्याची जात आणि धर्म कोणताही असो, हे त्यांचे मत होते.

मराठी भाषेच्या निबंधकारात शास्त्रीबोवांचे स्थान स्वतंत्र आणि अढळ आहे; इतकेच नव्हे तर ते उच्चही आहे. शास्त्रीबोवांची विचाराची भरारी थोड्यांनाच साध्य असते. शास्त्रीबोवांची विचार करण्याची पद्धत आणि भाषेची मांडणीसुद्धा अनुकरण करता येण्यासारखी नाही. त्यामुळे ते हयात असेपर्यंत त्यांच्या मताबद्दल सर्वत्र बोलबाला झाला असला तरी लोकप्रियता त्यांच्या वाटणीस आली नाही. आणि मृत्यूमुळे त्याचे असामान्य

व्यक्तित्व दृष्टिआड होताच जनतेस त्यांच्या कार्याचे विस्मरण पडले.

समाजसुधारक म्हणूनदेखील शास्त्रीबोवांची योग्यता फार मोठी आहे. शास्त्रीबोवांची मते म्हणजे जळती मशाल. विध्वंसक रूढीला आग लावून विधायक कार्याचा मार्ग सतत उजळून ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या मतात आणि कृतीत होते. इतकेच नव्हे तर अव्वल दर्जाच्या समाजसेवकास अवश्य असलेला एक अमोल गुण पण त्यांच्यामध्ये होता. तो गुण म्हणजे भविष्यकाळाची नाडी ओळखण्याची शक्ती. दलितवर्गाचे पांढरपेशावर झालेले ऋण, इंग्रजी सरकाराच्या क्लृप्तीला बळी पडलेल्या आमच्या शिक्षणसंस्था, पुढे होणारी पदवीधरांची हलाखी, स्त्रियांचा समान दर्जा इत्यादी विषयावर त्यांची मते आजच्या काळीही अगदी ताजी वाटतात. मानवतेच्या अंतरंगाचा ठाव घेऊ पाहणारांनाच ही कला साध्य होते.

□

## (१)

# जीवनकथा

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥ [१]

१८९६ चे साल. मे महिना. पुण्यास वसंतव्याख्यानमालेतर्फे व्याख्यानांचा सोहळा चालला होता. त्या दिवशी 'मराठी समाजास सूचना' हा विषय लागला होता. लोकमान्य टिळक अध्यक्षस्थानी होते. एक वक्ता बोलत होता... 'नृत्य किंवा संगीत नको असे नव्हे. आणि कलावंतिणीपाशी ह्या कला आहेत म्हणून मी त्यांना तुच्छ समजतो असे नव्हे. पण समाजाच्या हिताची कळकळ ज्यांना आहे, त्यांनी देवळात आणि लग्नमंडपात कलावंतिणीचे नाचगाणे करू नये. कलावंतिणी दुराचरणात दुर्लभ नरदेहाची धूळधाण करून टाकतात म्हणून त्यांची खरी कीव ज्यास येत असेल व त्यांनी सुधारावे अशी ज्यांची मनापासून इच्छा असेल त्यांनी कलावंतिणीच्या मुलीस चांगले शिक्षण देऊन सुना कराव्या. नाहीतर ही केवळ वरपांगी कळकळ असे म्हणण्यास सवड राहाते.' भोवतालचा श्रोतृवर्ग उघड विरोधी मताचा होता. कसलेल्या व्याख्यात्याचीही हुर्रेवडी करण्याबद्दल त्याची ख्याती होती. तरी पण वक्ता आवेशयुक्त वाणीने बोलत होता. त्याच्या दांडग्या आवाजाचे सभेवर असे काही दडपण पडले होते, की सर्व व्याख्यान

---

१. राजारामशास्त्री भागवत ह्यांचा अत्यंत आवडता श्लोक. हा श्लोक भवभूतीचा आहे.

ओतप्रोत निर्भीड असूनसुद्धा, गडबड न होता पार पडले. राजाराम रामकृष्ण भागवत हे त्या वक्त्याचे नाव.

सुमारे ऐंशी वर्षापूर्वी महाराष्ट्रांत जी विद्वानांची पिढी झाली, तिच्यात राजाराम रामकृष्ण उर्फ राजारामशास्त्री भागवत यांचा दर्जा फार श्रेष्ठ आहे; किंबहुना व्यासंग, ज्ञान आणि कल्पकता ह्या तिहीची कसोटी लावून पाहिली, तर पुष्कळ प्रसंगी त्याना अग्रेसरत्वाचा मान द्यावा लागेल. शास्त्रीबोवांचा कुठलाही लेख घ्या, नाविन्याने आणि ओजाने भरलेला दिसून येईल. अव्वल दर्जाच्या विद्वानालाही आश्चर्याने स्तिमित करील व विचारांस प्रवृत्त करील असे काही ना काही तरी त्यांच्या लेखात आढळून आले नाही, असे व्हावयाचेच नाही, परंतु मराठीच्या ह्या निस्सीम साहित्यिकाची त्याच्या पश्चात् जी आबाळ विद्वानांच्या हातून आणि सामान्य जनतेकडून, काहीशी जाणूनबुजून व काहीशी काही अपरिहार्य कारणामुळे झाली, तशी दुसऱ्या कोणत्याही साहित्यिकाची झाली नाही. एवढेच काय पण १९३८ साली मुंबईस जे मराठी साहित्यसंमेलन झाले, त्यात देखील स्वागताध्यक्षांनी मुंबईतील 'एकूणएका' साहित्यसेवकाचा गौरवपूर्ण उल्लेख केला– पण त्यात एक नाव मात्र अजिबात गाळण्यात आले– अर्थात् ते नाव राजारामशास्त्री भागवतांचे होते ! नाही म्हणावयाला ज्ञानकोशकार मात्र शास्त्रीबोवांना विसरले नाहीत. चार ओळीत का होईना, पण त्यांनी शास्त्रीबोवांच्या संशोधनात्मक लिखाणाचा गौरवपूर्ण उल्लेख करून, त्यात गणदोष दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. शास्त्रीबोवांच्या मृत्यूनंतर वर्षं दीडवर्षाच्या अवधीत, श्री. बाळकृष्ण नारायण देव, श्री. माधव हणमंत घोरपडे, आणि श्री. वामन वासुदेव नवरंगे ह्यांनी लिहिलेली त्रोटक चरित्रे, अनुक्रमे विविधज्ञानविस्तार, ज्ञानप्रकाश, आणि इंडिअन सोशल रिफॉर्मर ह्यामध्ये आली होती. ह्या तिन्ही चरित्रात व्यक्तिदर्शन बरे साधले आहे. क्वचित् प्रसंगी त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल व तदनुषंगिक लिखाणाबद्दल देखील थोडी चर्चा आहे. पण शास्त्रीबोवाचे खरे वैशिष्ट्य ज्या त्यांच्या ऐतिहासिक व वैदिक विषयावरील उद्बोधक लिखाणात दिसून येते, त्याबद्दल ओझरती सुद्धा चर्चा कुठे झालेली नाही. वरील तिन्ही लेखकांना त्यांच्या संशोधनाबद्दल आदर असूनसुद्धा त्या विषयाचा त्यांचा व्यासंग नसल्यामुळे त्याबद्दल

त्याना काहीच लिहिणे शक्य झाले नाही व त्यामुळे ती सर्व चरित्रे अपुरी वाटतात. ह्याशिवाय गोविंदाग्रजानी 'भागवतांची धराच हिंमत' म्हणून शास्त्रीबोवांच्या निर्भय वृत्तीची जाणीव महाराष्ट्रीय जनतेस करून दिली आहे. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी आपले 'सुदाम्याचे पोहे' ह्या 'महाराष्ट्रातील कर्त्या सुधारकांच्या अग्रणी'स अर्पण केले आहेत. श्री. भा. वि. वरेरकरांनी 'गोदू गोखले' ह्या कादंबरीत शास्त्रीबोवांचे ओझरते पण सुंदर स्वभावचित्र रेखाटले आहे. झाली! एवढीच काय ती मराठी साहित्यात रुजू झालेली शास्त्रीबोवांची स्मृतिचिन्हे! एरवी सर्वसाधारण जनतेत शास्त्रीबोवा हे एक, 'बायकांच्या मुंजी करा म्हणणारे विक्षिप्त सुधारक होते', असाच समज सगळीकडे पसरलेला दिसतो.

शास्त्रीबोवांचा जन्म कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील कशेळी गावी ११ नोव्हेंबरला १८५१ साली झाला. शास्त्रीबोवांचे वडील. रा. रामकृष्ण हरि भागवत हे नोकरीनिमित्त मुंबईस राहत असत. अर्थात् शास्त्रीबोवांचे सर्व शिक्षण मुंबईसच झाले. लहानपणापासून शास्त्रीबोवांची स्मरणशक्ती फार तरतरीत असे. आणि कुठलींही गोष्ट चौकसपणे, अगदी मुळापासून समजून घेतल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. सांगितले ते ऐकले व ऐकले ते मानले, असे त्यास मुळीच पसंत नसे. सत्यप्रियता व जिज्ञासा, हे आदर्श विद्यार्थ्यास भूषणावह असणारे गुण, त्यांच्यामध्ये पहिल्यापासून होते. ह्या गुणांखेरीज बाळपणाचे दुसरेही काही संस्कार त्यांच्या अंगी कायमचे खिळून राहिले होते. ते म्हणजे थोडासा एककल्लीपणा व करीन ती पूर्व हा बाणा. शास्त्रीबोवा वडीलाचे एकुलते एक चिरंजीव व आई अगदी लहानपणी वारलेली, यामुळे अर्थातच लाडात वाढल्यामुळे त्यांचा स्वभाव लहरी व एककल्ली बनला होता. त्याचप्रमाणे लहानपणी ते फार हूड होते. 'राजा हा मी मेल्यावर तरी नीट वागणार आहे का?' असे त्यांच्या वडीलांनी नेहमी वैतागाने म्हणावे. पण अर्थातच वाढत्या वयाबरोबर व उद्योगाबरोबर त्यांचा हा हूडपणा आपोआपच कमी झाला. पुढे त्याचे पर्यवसान दृढनिश्चय व बाणेदार वृत्तीत झाले. पण स्वतःचे मत प्रतिपादन करण्याची रीत मात्र विशेषेकरून व्याख्यान देताना– पूर्वीचीच, चिडखोर राहिल्यामुळे, त्यांनी जी काही अमोल व सुंदर तत्त्वे, वेळोवेळी अत्यंत निरपेक्ष भावाने प्रतिपादन

केली, त्यांचा विपर्यास होत गेला; आणि विक्षिप्तपणावरच तेवढे वेळोवेळी कोरडे ओढले गेले. वाङमयाची आवड व लेखनकला हे गुण वडिलांपासूनच शास्त्रीबोवांना मिळाले. त्यांच्या वडीलांनी, 'सायुज्य सदन' नावाचे एक नाटक लिहिले आहे. आध्यात्मिक वाङमयाची गोडी शास्त्रीबोवात आनुवंशिक होती. तिला विवेचक स्वरूप त्यांचे चुलते कै. भास्कर हरि भागवत ह्यांच्या सहवासाने मिळाले असावे असे वाटते.

शास्त्रीबोवा प्रवेशपरीक्षा एल्फन्स्टन् हायस्कूलमधून १८६७ साली उत्तीर्ण झाले व त्यांनी ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश केला. ह्या वेळी डॉक्टरलोक फार थोडे होते व जे होते त्यास साहजिकच खूप प्राप्ती व समाजात मोठा मान मिळत असे. अर्थातच शास्त्रीबोवांच्या वडिलांना आपल्या मुलाबद्दल त्यावेळी किती आशा वाटत असेल हे सांगायला नकोच! पण तीन वर्षे मेडिकल कॉलेजमध्ये काढूनही शास्त्रीबोवांना त्या धंद्याविषयी आपुलकी वाटली नाही. डॉक्टर होऊन खूप पैसा मिळवण्याचा मोह, किंवा भूतदयेने प्रेरित होऊन रुग्णशुश्रूषा करण्याची आवड, शास्त्रीबोवांच्या मनाला शिवली नाही. त्यांच्या ठिकाणी भूतदया होती, पण ती वेगळ्या तऱ्हेची. ती पुढे अगदी निराळ्याच रीतीने कशी विकास पावली, हे त्यांच्या चारित्राच्या उत्तरार्धावरून चांगले दिसून येते. शस्त्रविद्येचा तर त्यांना मनस्वी कंटाळा. ती शिकण्याकरता प्रेतांची चीरफाड करावी लागे, त्याची शास्त्रीबोवांना इतकी किळस आली, की त्यांनी वैद्यकी हा आपला धंदा नव्हे, अशी मनाशी खूणगाठ बांधून, मेडिकल कॉलेजला राम राम ठोकला! त्या वेळी त्यांची पुष्कळांनी समजूत केली; पण व्यर्थ. त्यांनी केला तो निश्चय कायमचाच. डॉक्टरचा पेशा सोडून शिक्षकाचा गरिबीचा धंदा स्वीकारल्याबद्दल, त्यांना कधीही विषाद वाटल्याचे दिसून आले नाही. ह्याच सुमारास त्यांचे वडील वारले.

मेडिकल कॉलेज सोडल्यानंतर शास्त्रीबोवांनी आपल्या आवडत्या विषयाचा संस्कृतचा– अभ्यास एकाग्रतेने एका विद्वान् शास्त्रीबोवांच्या हाताखाली सुरू केला व तीन वर्षांत त्या विषयात त्यांनी प्राविण्य मिळविले. येथपासूनच शास्त्रीबोवांच्या बौद्धिक जीवितक्रमास सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही.

१८७५ सालापासून त्यांनी रॉबर्ट मनी स्कूलमध्ये शिक्षकाचे काम करण्यास सुरुवात केली व तेव्हापासूनच विद्यार्थ्यांस विचारप्रवण करण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे त्यांस वाटू लागले. निशेषतः स्वधर्म, स्वभाषा व इतिहास ह्याविषयी शिक्षित वर्गातही जे औदासीन्य व अज्ञान त्यांना आढळून आले, ते पाहून त्यांनी ह्या तिन्ही विषयांचा सांगोपांग अभ्यास करण्याचा व स्वतःला जे आवडले, जे सत्य म्हणून वाटले, ते कोणाचीही पर्वा न करता अगदी बाळबोध मराठीत लिहून काढण्याचा चंग बांधला. त्यांची ज्ञानार्जनाची व ज्ञानदानाची हौस काही विलक्षणच होती. स्वतःला जे काही येत असेल, ते कुणालाही विनामूल्य, जरासुद्धा चोरून न ठेवता शिकविण्याची त्यांच्या-सारखी आवड क्वचितच आढळून येते. एवढेच नव्हे, तर अगदी अक्षर-शत्रूलादेखील साक्षरतेचे पहिले धडे देण्यात आपल्या विद्वत्तेचा अपव्यय होतो, असे त्यांना कधी वाटले नाही. त्याचप्रमाणे उपनिषदे, तुकाराम व मोरोपंताचे वेचे देखील त्यांनी आपण होऊन किती जणांना तरी शिकवले असतील. ह्या बाबतीत कै. बाळशास्त्री जांभेकरांबद्दल त्यांनी जे उद्गार काढले आहेत, ते त्यांस स्वतःस तंतोतंत लागू पडतात. ते असे– ‘ विद्यादेवीचा तो निःसीम भक्त होता. विद्यादेवीच्या निरंतर व आस्थापूर्वक उपासनेने निष्पन्न होणारी सद्‌वृत्ती शास्त्रीबोवांमध्ये पूर्णपणे झळकत होती. ज्ञान-प्राप्तीची अनिवार तृष्णा त्यांची कधीच तृप्त झाली नाही. बुद्धीची ज्ञानजन्य विशालता त्यांच्या ठायी पूर्णपणे वसत होती. ज्याप्रमाणे त्यांचा विद्याव्यासंग कधी खळला नाही, त्याप्रमाणे विद्यादान करण्याच्या कामी अपूर्व उत्साह-बुद्धी त्यांची कधी खळली नाही.’

१८७७ साली त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजांत संस्कृतच्या अध्यापकाची जागा स्वीकारली. त्या वेळी त्या कॉलेजात स्वार्थत्यागी वृत्तीचे विद्वान् जर्मन प्रोफेसर बरेच होते. त्यांची साधी राहणी व त्यागी वृत्ती ह्यांचा शास्त्रीबोवांच्या मनावर परिणाम झाला. असे म्हणतात की काही वर्षांनी जेव्हा त्यांच्या पगारात वाढ करावी, असे प्रिंसिपालने सुचवले. त्याना तीस रुपये वेतन मिळत असे. ते तीनशे रुपये असावे असे ठरवून त्याना पगाराच्या दिवशी ते देण्यात आले. शास्त्रीबोवानी तीस रुपये ठेवून घेऊन बाकीचे परत केले. तेव्हा त्यांनी मिळते त्यापेक्षा जास्त वेतनाची

आपल्यास मुळीच जरूर नाही, असे सांगितले व मरेपर्यंत त्याच वेतनावर काम केले. त्यांचा व्यासंग, निस्पृहपणा व करारी बाणा, ह्यांच्या योगाने सर्व अध्यापकवर्गात त्यांना फार मान असे. विद्यार्थीवर्गहि त्यांना फार वचकून असे. संस्कृतचेच नव्हेत, तर इतर सर्व विद्यार्थीदेखील त्यांच्यापुढे अदबीने वागत. कॉलेजच्या सर्व अध्यापकवर्गाकडून एकजात, केवळ निर्मल चारित्र्य व विद्वत्ता ह्यांच्या जोरावर मान मिळवणारे, शास्त्रीबोवांसारखे अध्यापक फार विरळा.

कॉलेजात शास्त्रीबोवांच्या वर्गात कधीही गडबड, गोंधळ नसे. नित्याच्या व विद्यापीठाने नेमलेल्या अभ्यासक्रमाखेरीज, त्या त्या विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे म्हणून ते फार झटत. त्यांचे वाचन अफाट, स्मरणशक्ती तीव्र व ग्रहणशक्ती पण विपुल असल्यामुळे, केवळ नेमलेल्या पुस्तकातच बुचकळचा मारीत बसण्याने बुद्धीची कुचंबणा कशी होते, ह्याचा त्यांना अनुभव होता व म्हणून स्वतःची बुद्धी नित्य नवे ज्ञान मिळवून परजून ठेवण्यात ते जितके तत्पर असत, तितकाच स्वतःच्या विद्यार्थ्यांच्या– मग ते विद्यार्थी शाळेतील कोवळचा बुद्धीची मुले असोत, की कॉलेजातील प्रौढ तरुण असोत–बुद्धीला तरतरी आणून त्यांची ज्ञानलालसा वाढविण्याचा त्याचा अखंड प्रयत्न असे. हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. ते गाठण्यासाठी त्यांनी अपरंपार कष्ट केले. हे ध्येय गाठण्याचा त्यांनी दोन तऱ्हांनी प्रयत्न केला. त्यापैकी एक अयशस्वी व दुसरा यशस्वी झाला.

पहिला प्रयत्न म्हणजे ऐतिहासिक व धार्मिक विषयावर ते वर्गात व्याख्यान देत. पण एक तर वक्तृत्व त्यांना असावे तितके साध्य नव्हते; व दुसरे म्हणजे पुष्कळ वेळा ते आपल्या अज्ञान विद्यार्थ्यांस इतक्या गहन विचारण्यात घेऊन जात, की त्या बिचाऱ्यास त्यासंबंधाने विचार करणे तर दूरच राहिले, पण हे सर्व प्रवचन कशाबद्दल आहे, हेहि कळेनासे होई. उत्साहाच्या भरात शास्त्रीबोवांच्या लक्षात राहत नसे; व त्यांचे ज्ञानसत्र तसेच काही वेळ चालू राही. थोडचा वेळाने. ते आपण सांगितलेले विद्यार्थ्यांना कितपत कळले आहे, त्याची चाचणी करण्याकरता मधून मधून प्रश्न विचारीत. अर्थातच उत्तर देण्याशिवाय गत्यंतर नसल्याने, एखादा विद्यार्थी साहजिकच काही तरी तारे तोडी; व मग शास्त्रीबोवांच्या संतापाचा पारा झटकन

चढून, ते तारस्वराने फिरून व्याख्यानाला सुरुवात करीत. पण ह्या वेळी मात्र सारा रंग पालटे. त्या मठ्ठ विद्यार्थ्यांच्या डोक्यात प्रकाश पडावा, म्हणून शास्त्रीबोवा आपले म्हणणे अगदी अस्खलित व सोप्या भाषेत एकामागून एक मांडीत, मग ते विद्यार्थ्यांस कळले आहे की नाही, ते पाहत. ह्या वेळी मात्र, ते काय म्हणतात, ते कोणाला समजले नाही, असे होत नसे. केवळ परीक्षेकरता अभ्यास करावयाचा, म्हणून करावयाचा, अशा वृत्तीच्या विद्यार्थ्यांना मात्र ही एक शिक्षा वाटे.

शिकविण्याची दुसरी तऱ्हा, म्हणजे क्रमिक व इतरही पाठ सुलभ लेखनाच्या द्वारे शिकवीत, ही होय. उदाहरणार्थ, त्यांची शिवाजी, संभाजी, राजाराम, अहिल्याबाई होळकरीण इत्यादी छोटी छोटी ऐतिहासिक चरित्रे, मराठी भाषेचे व्याकरण, संस्कृत भाषेचे व्याकरण, वामनी व मोरोपंती वेचे इत्यादि चिमुकली पुस्तके. ही पुस्तके अत्यंत सोप्या भाषेत, पण फार विवेचक बुद्धीने लिहिलेली असून, शिकवणाराला व शिकणारालाही सहजसाध्य होतील, अशी आहेत. ही पुस्तके लिहिताना, शास्त्रीबोवांना विद्यार्थ्यांच्या अडचणींची, उणीवांची, पूर्णपणे जाणीव असे. विशेषत: व्याकरणासारखा रुक्ष व कठीण विषयसुद्धा, इतक्या सोप्या भाषेत व भरपूर माहितीसकट हाताळलेला, इतर ठिकाणी क्वचितच पाहावयास मिळेल. आपली ही छोटी पुस्तके शास्त्रीबोवा मुक्त हस्ताने विद्यार्थ्यांना वाटीत.

झेवियर कॉलेजमध्ये त्यांनी सतत तीस वर्षे निरलसपणे काम केले. ह्या तीस वर्षांत त्यांनी एकदाही रजा घेतली नाही; हे त्यांच्या कर्तव्यबुद्धीचे व निकोप प्रकृतीचे उत्तम निदर्शक आहे. अध्यापकाचे काम करीत असतानाच ते कालवश झाले; आणि मरेपर्यंत अध्ययन व अध्यापन पुऱ्या दमाने व हौसेने करण्याची त्यांची मनीषा पुरी झाली.

शास्त्रीबोवा वर्णाने बरेच सावळे असून त्यांची शरीरयष्टी भव्य होती परंतु खांदे वाकवून चालण्याच्या त्यांच्या सवयीमुळे, त्यांच्या शरीरात बांधेसूदपणा दिसत नसे. त्यांची चर्या भव्य व उग्र असल्यामुळे पाहणाऱ्याला त्यांच्याविषयी एकदम वचक वाटे. ' त्यांची राहणी साधी व पोशाख साधा पण विशिष्ट तऱ्हेचा असे. त्यांचा तो रुमाल, बंद मोकळे सोडलेला अंगरखा विचारमग्न असल्याची ती साधुचर्या, ते मान वेळीत आणि खांदे उडवीत व

हात वर करीत चालणे, ही कित्येक वर्षे त्यांच्या परिचित लोकांच्या लक्षात राहतील.' असे ' बालबोधा 'ने उद्‌गार काढले आहेत, ते खरोखरच योग्य आहेत. त्याचप्रमाणे ' सुबोधपत्रिके 'त देखील असे म्हटले आहे, की ' त्यांच्या मृत्यूमुळे झालेले नुकसान भरून येणे शक्य नाही. कारण त्यांचे सर्वच काही विशेष होते. त्यांची भाषा, त्यांचे विचार, त्यांची बोलण्याची ढब, त्यांची आपले विचार प्रदर्शित करण्याची रीत, त्यांचा पोशाख,– फार काय त्यांची चाल– सर्व काही विशेष होते.'

त्यांचा स्वभाव अबोल आणि तापट होता. त्यातल्या त्यात ते प्रसिद्धी-विमुख असल्यामुळे, त्यांचे मित्रमंडळ फार थोडे होते. परंतु वरून रूक्ष दिसणारे शास्त्रीबोवा, अंतर्यामी फार प्रेमळ व साध्या वृत्तीचे होते, ही गोष्ट त्यांच्या स्नेहाचा व सहवासाचा लाभ ज्यांना घडला होता, त्यांनी अनेकवार बोलून दाखविली आहे. कै. बाळकृष्ण नारायण देव, कै. वा. वा. नवरंगे व श्री. घोरपडे, या तिघांनीही आपल्या चरित्रात शास्त्रीबोवांच्या निष्कपट व प्रेमळ वृत्तीची ग्वाही दिलेली आहे. त्यांचा स्वभाव निर्मत्सर होता. शत्रूच्या देखील भाग्याचा त्यांना कधी हेवा वाटला नाही. वैषम्याचे बीज त्यांच्या स्वभावातच नसल्यामुळे, ते अंतर्यामी संतुष्ट असत.

त्यांच्या गंभीर स्वभावामुळे, त्याचप्रमाणे त्यांची राहणी अंतर्बाह्य एकाच स्वरुपाची असल्यामुळे त्यांचे खाजगी जीवन किंवा विचार, त्यांच्या अगदी निकटच्या आप्तांनासुद्धा कधी पूर्णपणे कळले नाहीत. शास्त्रीबोवा स्वतःच्या बाबतीत मूकवृत्ती धारण करून असतच; सर्व वेळ उद्योगात निमग्न राहत; हेही ह्या त्यांच्या अलिप्तपणाचे एक कारण असू शकेल.

त्यांचे लेखन अफाट व उद्योग अविरत असूनदेखील, त्यांचे जीवन विशेष घडामोडीने भरलेले नव्हते. त्यामुळे सांगण्यासारखे प्रसंग त्यांच्या आयुष्यात फार थोडे आले. ते जातिवंत विद्यार्थी होते; व विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांचा आयुष्यक्रम शेवटपर्यंत अगदी साधा व व्यवहारापासून जरा अलिप्त असा राहिला. शास्त्रीबोवांच्या आयुष्यात बिकट असे प्रसंग फार थोडे. पैशाची त्यांनी कधी पर्वा केली नाही. तरीपण दारिद्रच अगर वाण अशी त्यांना कधीच भासली नाही. त्याच्या आयुष्यात जे काही बिकट प्रसंग आले, ते अप्तांच्या मृत्यूचेच होते. त्यापैकी त्यांस सर्वांत मोठा धक्का, १८९७ साली,

त्यांच्या एकुलत्या एक मुलीच्या मरणाचा बसला. तिच्यावर त्यांची फार आशा होती. दुसरा तितकाच मोठा धक्का, १९०७ साली पुत्रसमान मानलेल्या चुलतभावाच्या मृत्यूचा बसला. ह्यानंतर एकाच वर्षात म्हणजे १९०८ साली ते कालवश झाले. संततिसुख वजा केल्यास कौटुंबिक स्वास्थ्य शास्त्रीबोवांस चांगल्या प्रकारचे लाभले होते. त्यांची पत्नी सुंदराबाई प्रेमळ, कष्टाळू व पतिपरायण अशी होती. स्वतःचा कौटुंबिक पसारा असा काहीच नसतानादेखील सुंदराबाई आपल्या मातृहीन चुलत दिरा-नंणदांची आई झाली. ह्या मोठ्या कुटुंबाचा भार वाहण्यात तिला धन्यता वाटे. शास्त्रीबोवांनी व सुंदराबाईने अशा तऱ्हेने आपले अपत्यविरहाचे दुःख गिळून टाकले आणि प्रपंचाचा गाडा शेवटपर्यंत धीराने चालविला. शास्त्रीबोवांच्या मृत्यूनंतर एका तपानंतर सुंदराबाई वारल्या.

शास्त्रीबोवांस प्रसिद्धीची लालसा मुळीच नसे. कॉलेजातदेखील कुणावर ‘ छाप मारण्याचा ’ ओझरतासुद्धा प्रयत्न त्यांनी केला नाही. कॉलेजात काही झाले की फोटो काढण्याची वहिवाट असते; पण शास्त्रीबोवांना त्याचा तिटकारा असे. उभ्या एकतीस वर्षांत केवळ एकदाच व तोही प्रिन्सिपालच्या तीन वर्षांच्या आग्रहानंतर, ग्रूपमध्ये आपला फोटो त्यांनी काढू दिला. त्यांच्या मृत्यूनंतर टाईम्सने ह्या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केला होता.

मुंबई विद्यापीठाशी त्यांचा निकटचा संबंध होता. विद्यापीठात त्यांना १९०२ साली ‘ विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चरर ’ म्हणून नेमले होते. ही त्यांची व्याख्याने फार प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे ते कित्येक वर्षे इंटरचे संस्कृतचे परीक्षक होते. परीक्षेची प्रश्नपत्रिका केवळ विद्यार्थ्याने किती पोपटपंची केली आहे, ते पाहण्याचे साधन नसून त्याला स्वतः होऊन चौकसपणाने कितपत विचार करता येतो, त्याचे क्रमिक पुस्तकांबाहेरचे ज्ञान कितपत आहे, ते अजमावण्याचे मुख्य साधन आहे, असे त्यांचे मत होते. अर्थात अशा प्रकारची प्रश्नपत्रिका काढली, म्हणजे साहजिकच घोकंपट्टीला आळा बसून विद्यार्थ्यांचे ज्ञानक्षेत्र आपोआपच वाढत जाईल, अशा विचाराने त्यांनी निराळ्या वळणाची, विद्यार्थ्यांच्या विवेचक वृत्तीला उत्तेजन मिळेल अशा तऱ्हेची, प्रश्नपत्रिका काढण्यास सुरुवात केली. तिचे परिणत स्वरूप

आज दृष्टीस पडत आहे.

'उमेदवारांची साडेसाती' हा बी. ए. च्या विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन लिहिलेला त्यांचा लेख, फार महत्त्वाचा व उद्बोधक आहे. बी. ए. च्या कार्यक्रमात इतिहास व भाषाविषय– नुसते संस्कृतच नव्हे प्राकृतदेखील– ह्यावर अधिक भर द्यावा, कारण ते विषय विद्यार्थ्यांच्या संस्कृतीस अधिक पोषक आहेत, असे त्यांनी प्रतिपादिले आहे, ते योग्य आहे; पण त्याबरोबरच अर्थशास्त्र व भौतिकशास्त्र याबद्दल त्यांनी जो कटाक्ष दाखविला आहे, तो अर्थातच आज काल कोणास पसंत पडण्यासारखा नाही.

'आमची देशी भाषा विद्यापीठी शोभण्यासारखी आहे की नाही ?' ह्या त्यांच्या लेखाने त्या वेळी मुंबईच्या विद्वत्वर्गात फार खळबळ उडवून दिली होती. कै. डॉ. श्रीधरपंत भांडारकर ह्यांनी देशी, ह्मणजे मराठी भाषेचा विद्यापीठाच्या कार्यक्रमात इन्कार केला होता. त्याला आव्हान, म्हणून शास्त्रीबोवांनी प्रार्थनासमाजात जाहीर व्याख्यान देऊन सदर लेख प्रसिद्ध केला.

केवळ दुसऱ्याच्या संस्थेत पगारी शिक्षक म्हणून काम करणे, शास्त्रीबोवांना प्रशस्त वाटत नव्हते. दुय्यम शिक्षणाकडे त्यांचे अधिक लक्ष्य असे. बाळपण व तारुण्य ह्यांच्या मध्यावस्थेत मुलांच्या मनावर होणारे संस्कार बरेच चिरस्थायी असतात. क्रमिक अभ्यासक्रम संभाळूनदेखील उत्तम चारित्र्यवान् आणि मनापासून ज्ञान मिळविण्याची खटपट करणारे विद्यार्थी तयार करून दाखवावयाचे, ह्या उद्देशाने त्यांनी स्वतःची एक शाळा काढण्याचे ठरविले.

शास्त्रीबोवांच्या डोक्यात एखादी कल्पना आली, कीं तिला मूर्त स्वरूप येण्यास विशेष अवधी लागत नसे. ते व कै. नारायण व्यंकाजी खोत, ह्या दोघांनी मिळून १८८४ मध्ये 'बॉंबे हायस्कूल' नावाची संस्था काढली; पण थोडेच दिवसांनंतर ह्या दोन चालकाचे पटेनासे होऊन शास्त्रीबोवांनी त्याचा संबंध कायमचा तोडून टाकला. त्यानंतर फिरून खटपट करून, १८८६ मध्ये त्यांनी 'मराठा हायस्कूल' नावाची शाळा सरकारी मदतीची अपेक्षा न करता स्वतःच्या हिंमतीवर चालू केली.

शास्त्रीबोवा जरी नेमस्तपक्षाचे होते, तरी सरकरी नोकरी करणे किंवा शाळेला मदत घेणे, त्यांना मुळीच पसंत नव्हते. सरकारी मदत घेतल्यास

शाळा सर्वस्वी दुसऱ्याच्या तंत्राने चालवावी लागेल, व आपल्याला पाहिजे त्या तऱ्हेचे प्रयोग करून पाहण्यास मुळीच सवड सापडणार नाही, हे ते ओळखून होते. शिवाय स्वतःच्या कर्तृत्वावर त्यांचा भरवसा होता. त्याप्रमाणे त्यांनी स्वतःसारखेच निःस्पृह पण उत्साही असे शिक्षक मदतीस घेतले व शाळा चालू केली. त्यांच्या त्या वेळच्या शिक्षकवर्गात प्रो. धोंडो केशव कर्वे हे एक होते.

ह्या शाळेसाठी शास्त्रीबोवांनी अविश्रान्त मेहनत घेतली. इतिहास, व्याकरण व चरित्र ह्या विषयावर त्यांनी स्वतः पुस्तके तयार केली; व त्या योगाने विद्यार्थ्यांच्या बुद्धिविकासाला इतर शालेय पुस्तकांपेक्षा अधिक मदत होते हे सप्रमाण सिद्ध करून दिले. थोड्याच अवधीत ही शाळा इतकी नावारूपाला आली, की ती बरीच वर्षे एल्फिस्टन हायस्कूलसारख्या जुन्या नामांकित संस्थेची प्रतिस्पर्धी समजण्यात येत होती.

शास्त्रीबोवांनी त्या वेळी तयार केलेल्या विद्यार्थ्यांपैकी बरेचजण पुढे प्रसिद्धीस आले. रँग्लर परांजपे हे त्यापैकीच एक होत. शास्त्रीबोवाच्या मते, शाळेच्या अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव होणे जरूर होते; व त्याप्रमाणे त्यांनी शाळेत तुकाराम, एकनाथ इत्यादि मराठी संतांच्या पुण्यतिथी दरवर्षी साजऱ्या करण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. त्यांची छोटी चरित्रे लिहून, ती आपल्या विद्यार्थ्यांना ते शिकवू लागले; आणि त्यांच्या काव्याची गोडी व भागवत धर्माची तत्त्वे, ते मुलांना समजावून देऊ लागले. ह्या त्यांच्या उपक्रमाबद्दल त्यांच्या प्रतिपक्षातील लोकांनीही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

शास्त्रीबोवांच्या शैक्षणिक कार्याविषयी सर्वांचे एकमत व तेही आदरपूर्ण असेच आहे. शास्त्रीबोवांच्या सामाजिक कार्यांच्या बाबतीत मात्र त्यांच्याविषयी, अगदी परस्परविरुद्ध व तीव्र स्वरूपाची दोन मते आढळून येतात. 'सुधारका'त विशेषतः ब्राह्मणेतरात, त्यांच्याविषयी निरतिशय आदर दिसतो, उलट जहालमतवादी व सामाजिक सुधारणेस विशेष विशेष अनुकूल नसलेल्या कंपूने, त्यांची वारंवार टर उडविण्याचा व ब्राह्मणमंडळीत त्याचे वजन पडू न देण्याचा, आटोकाट पयत्न केलेला पाहायला सापडतो. शास्त्रीबोवा जरी ब्राह्मणेतरांचे कैवारी होते, तरी त्यांचा कोणत्याही क्षेत्रात गट असा नव्हता.

त्यामुळे त्यांच्यावर आक्षेप घेणारे अनेक, व उत्तर देणारे ते एकटेच, असे बहुतेक होई. एकांडच्या शिलेदारासारखी त्यांची अवस्था होती. म्हणूनच ते वारल्यानंतर प्रतिपक्षाचे बोल बराच काळपर्यंत जनतेच्या मनावर बिंबले व शास्त्रीबोवा लोकमताची पर्वा न करणारे, कीर्तीस तुच्छ लेखणारे असे होते, म्हणून त्यांचा कंपू असा राहिला नाही. त्यांच्या मरणानंतर, त्यांची बाजू जशीच्या लोकापुढे मांडणारा कोणी प्रभावशाली शिष्य किंवा मित्र त्यांना नव्हता; आणि त्यामुळे त्यांच्या कार्याचे विस्मरण जनतेस फार लवकर पडले.

शास्त्रीबोवांनी सामाजिक चळवळीकडे लक्ष्य पुरविण्यास सुरुवात केली, तो काळ संक्रमणाचा होता, राजकीय आंदोलनांना ह्याच वेळी अधिक मूर्त स्वरूप येऊ लागले होते. पण राजकारणाची मुळे समाजकारणाइतकी खोल गेलेली नव्हती. विशेषतः समाजसुधारणेची खरीखरी कळकळ बाळगणारी बहुतेक मंडळी नेमस्त मताची, सरकारी नोकरीत शिरलेली, किंवा सरकारशी सहानुभूती बाळगणारी, अशी होती. ह्या मंडळींत साधारण साहेब लोकांबद्दल विशेष आदर असे. इंग्रजी भाषा काय ती महत्त्वाची व देशी भाषा कुचकामाच्या, अशीही त्या काळच्या बऱ्याच सुधारणावादी तरुणांची समजूत होती. परंतु ह्या वेळेस ही सर्व मंडळी सरसकट पाश्चिमात्य राहणीकडे, विशेषतः धर्माकडे, जी साहजिक झुकली असती, ती न झुकण्यास दोन-तीन कारणे झाली. ती म्हणजे प्रार्थनासमाजाची स्थापना व भरभराट; आणि राजकीय जागृतीची सुरुवात. प्रार्थनासमाजाच्या संस्थापकात न्यायमूर्ती रानडे डॉ. भांडारकर, परमानंद, भागवत इत्यादि मंडळी प्रमुख होती. आणि त्यांनी ख्रिस्ती व भागवतधर्माची सांगड घालून नवीन तऱ्हेने, मूर्तिपूजाविरहित उपासना करण्यास सुरवात केली. सामाजिक सुधारणा, हे ह्या पक्षाचे मुख्य ध्येय होते. ह्या सुधारणेची सूत्रे (१) बालविवाहप्रतिबंध, (२) विधवाविवाह, (३) स्त्रीशिक्षण, (४) जातिभेदाचे उच्चाटन, व (५) शिक्षणाचा प्रसार, ह्यावर मुख्यत्वे अवलंबून होती. रानडे वगैरे सुधारकांनी इंग्रजी राजवटीच्या रूपाने आलेले नव्या यांत्रिक व प्रगतीपर संस्कृतीचे आव्हान जाणले. व त्याचा स्वीकार करताना इंग्रजांचे राज्य ही अटळ परंतु चांगली नियती आहे असे मानले.

शास्त्रीबोवांची मते प्रारंभी जुन्या वळणाची होती; परंतु जसजसे त्यांचे वाचन वाढू लागले, आणि त्यांचा संस्कृत ग्रंथांशी परिचय जास्त होऊ लागला, तसतशी त्यांची विवेचक बुद्धी जागृत होऊ लागली; आणि त्या-बरोबरच सुधारक चळवळीकडे त्यांचे चित्त जास्त ओढ घेऊ लागले. ह्या त्यांच्या स्थित्यंतराला व त्यांच्या लेखनाला एकदमच प्रारंभ झाला. त्यामुळे त्यापूर्वीची त्यांची मनोभूमिका फारच थोडचा जणास माहीत आहे.

शास्त्रीबोवांचे मन सुधारणेकडे वळण्यास, व तेथे कायमचे स्थिर होण्यास, दुसराही एक घरगुती संबंध कारणीभूत झाला. तो म्हणजे त्यांचे चुलते कै. भास्कर हरि भागवत ह्यांचा सहवास होय. कै. भास्करराव भागवत हे मुंबईचे त्या काळाचे एक अबोल पण कर्ते व प्रमुख सुधारक होते. प्रार्थना-समाजाच्या आद्य संस्थापकांपैकी ते एक असून त्यांच्यामुळेच शास्त्रीबोवांचा न्यायमूर्ती रानडचांशी अधिक निकटचा संबंध जुळून आला. रानडचांविषयीं शास्त्रीबोवांना आदर असे. मराठी भाषा बघावी तर रानडचांची, समाज सुधारणेची कळकळ रानडचांची, व राजकीय मते रानडचांची, असे ते म्हणत.

' रानडे ' कंपू 'बद्दल त्यांना फार आदर व अभिमान वाटत असे; परंतु खरे पाहिले असता, शास्त्रीबोवांच्या व रानडेप्रभृति प्रार्थनासमाजाच्या मंडळीच्या, सामाजिक व धार्मिक दृष्टिकोणात कितीतरी फरक आहे. रानडचांना ते गुरूस्थानी मानीत असले, तरी प्रार्थनासमाजाची बरीच तत्त्वे त्यांना मान्य नसत, व ते ते स्पष्टपणे बोलून दाखवीत.

प्रार्थनासमाजाच्या तत्त्वांशी दोन बाबतीत त्यांचा मुख्यत्व मतभेद होता. पहिला धार्मिक बाबतीत; समाज कोणताही ग्रंथ अगर वचन, प्रमाण म्हणून मानावयास तयार नव्हता. त्याचप्रमाणे समाजाची सहानुभूती, तुकाराम वगैरे काही संत सोडले तर, बहुतेक पाश्चात्य वळणाकडे झुकलेली असे. शास्त्रीबोवांस हे पसंत नव्हते, त्यांची वैदिक धर्मावर, विशेषतः उपनिषदांवर अचल श्रद्धा असे. गायत्रीमंत्र व पर्यायाने सूर्योपासना, आत्मिक बळ वाढविण्यास कारणीभूत होते, असा त्यांचा अखेरपर्यंत भरवसा होता. त्यांचा वैदिक संस्कृतीवर विश्वास असल्याने, उपनयन, विवाह इत्यादी संस्कार, केवळ वैदिक मंत्रांनीच यथायोग्य करता येतात, असे त्यांचे मत होते.

पाश्चात्यांच्या अनुकरणाबद्दल त्यांना तिटकारा असे. प्रार्थनासमाजाच्या धोरणावर टीका करताना, एकदा ते असे म्हणाले, की 'जर प्रार्थनासमाजाचे मंदिर खरोखर सार्वजनिक मराठ्यांचे व्हावे अशी तुमची इच्छा असली, तर ब्रह्मद्वेषाची बिंगे काढून टाका. अस्सल मराठ्यांचा धर्म प्रार्थनासमाजात सुरू करा. रामाचे किंवा विठोबाचे नाव गाळून टाकणे, व मराठ्यांच्या देवतांची टर करून मूर्तिपूजा पाप समजणे, ह्यात निदान आम्हास तरी काही शहाणपण दिसत नाही.' तीच गोष्ट विधवाविवाहाची. विधवाविवाहाला प्रतिकूल असे एक पुस्तक त्यांनी १८८६ मध्ये प्रसिद्ध केले; तेव्हापासून प्रार्थनासमाजातील कित्येक जणांच्या सहानुभूतीला ते मुकले. तरी पण प्रार्थनासमाजाचे व त्यांचे नाते शेवटपर्यंत सलोख्याचे होते. 'सुबोधपत्रिके'त त्यांचे कित्येक लेख आले आहेत.

नंतर इंग्रज सरकारचे राज्य दयाळू आहे असे शास्त्रीबोवानी रानडे-प्रणीत सुधारक मतप्रणालीला धरून अनेक ठिकाणी लिहिलेले त्यांच्या वाङमयात आढळते. त्यांचा आणि टिळकांचा विरोध येण्यास ते एक मोठे कारण होते. परंतु इंग्रज इथले लोक सुधारलेसे पाहून एक दिवस आपण होऊन राज्य हिंदुस्तानच्या लोकांच्या हाती देऊन निघून जातील. तोवर आपण शिवछत्रपतींनी घालून दिलेले उत्तम राज्यकारभाराचे उदाहरण विसरलो होतो ते फिरून आत्मसात करू व आधुनिक जगताच्या विज्ञानविषयक शास्त्रात प्रगती करून आपले राज्य चालवू असा विश्वासही त्यांनी ठायी ठायी प्रगट केला आहे.

स्त्रीशिक्षणाबद्दल शास्त्रीबोवास फार सहानुभूती असे. बौद्धिक दालनात स्त्री-पुरुष असा भेद करणे अनुचित आहे, असे त्यांचे मत होते. आपल्या नात्यातील कित्येक विधवास, स्वतःपुरते लिहितावाचता यावे, म्हणून त्यांनी शिकविले. तसेच घरातल्या मुली, सुना ह्यांनाही ते नेमाने मराठी– संस्कृत वगैरे शिकवीत परंतू शिक्षण घेऊन पुरुषांशी स्पर्धा करण्याच्या दृष्टीने, स्त्रीने आर्थिक क्षेत्रात प्रवेश करावा, हे त्यांस तितकेसे पसंत नसे. विधवा स्त्रियांनी, किंवा ध्येयवादी कुमारिकांनी, समाजहिताप्रीत्यर्थ संस्थेत काम करावयास त्यांची आडकाठी नसे. संयमशील पतिव्रता व विद्येच्या द्वारे तत्त्व ओळखणारी आर्य स्त्री, शास्त्रीबोवांना आदर्शवत् वाटे. गार्गी, मैत्रैयी,

सावित्री वगैरे स्त्रियांबद्दल त्यांस निरतिशय आदर वाटे; आणि स्त्रियांत शिक्षणाचा फैलाव झाल्याखेरीज सीता-सावित्रीसारख्या स्त्रिया निपजणार नाहीत, अशी त्यांची भावना होती.

मोरोपंतांच्या नलोपाख्यानावर 'पुणेवैभवात' त्यांनी एक विवेचक लेखमाला सुरू केली होती. त्यात नलाने त्याग केल्यानंतर दमयंतीची जी स्थिती झाली, तिचे करुण वर्णन मोरोपंतानी केले आहे, ते शास्त्रीबोवांना अत्यंत आवडे. पतिव्रतेचा आदर्श असावा तर दमयंतीसारखा; स्वयंवरांत स्वतः पती पसंत करण्याची, इतकेच काय पण नलाने सोडल्यानंतर दुसरे लग्न करण्याची, पूर्ण मुभा असून देखील दमयंतीने सुखाची पर्वा न करता, पतीच्या बाबतीत जी त्यागी वृत्ती व एकनिष्ठता दाखविली आहे, ती स्त्रियांनी कित्ता गिरविण्याजोगी आहे, असे शास्त्रीबोवांचे म्हणणे होते. ह्याच वेळी त्यांनी थोडया शिक्षणाने चढून जाणाऱ्या व पाश्चात्य देखाव्या-वर भुलून सुखाच्या मागे धावणाऱ्या आधुनिक स्त्रियांवर ताशेरे झाडले आहेत. नटूनथटून राहणाऱ्या सुखासीन स्त्रियांबद्दल, शास्त्रीबोवांस विलक्षण तिटकारा वाटे. त्याचप्रमाणे प्रेमचेष्टात गर्क होणाऱ्या तरुणीबद्दल त्यांचे मत फार वाईट असे. कालिदासाच्या सर्वच नायिका (नायक पण) त्यांना छचोर व तिरस्करणीय वाटत. संधी मिळाली पुरे की शकुंतलेवर त्यांनी झोड उठवली नाही असे झालेच नाही.

ध्येय व कर्तव्य ह्यापुढे श्रृंगारसुख अगदी हीन मोलाचे आहे, अशी त्यांची भावना होती, व म्हणूनच पुनर्लग्नाबद्दल मग ते पुरुषाचे असो वा स्त्रीचे त्याचे प्रतिकूल मत होते. स्वतःची पत्नी असून वामसंबंध करणारा पुरुष, अगर काडीमोड करून पुन्हा संसार करणारी स्त्री पशुतुल्य होत, असे ते वारंवार प्रतिपादीत. संस्कृत ग्रंथांच्या अध्ययनाने त्यांच्या ह्या मताना अधिकच पुष्टी मिळाली, व त्या ग्रंथांच्या आधारावर त्यांनी विधवाविवाह अशास्त्र आहे, असे प्रसिद्ध केले. ते बहुतेक पुनर्विवाहाचे कैवारी डॉ. राम-कृष्णपंत भांडारकर ह्यांना उत्तर असावे.

ह्या त्यांच्या लेखाने, सुधारक मंडळीत बरीच खळबळ उडाली. वाद-विवादात काय किंवा लेखात काय, शास्त्रीबोवांनी आपलेच म्हणणे खरे आहे, असे धोरण ठेवले. व ते ह्या बाबतीत अधिकच जहाल मताचे बनले.

जातिभेदाप्रमाणेच पुनर्विवाहाचा प्रश्नदेखील त्या वेळी बरीच वर्षे चिघळत राहिला होता. त्यामुळे एक फायदा झाला, की विचारी माणसांस प्रत्यक्ष उदाहरणे पाहून, पुनर्विवाहाविषयी विचारांती अनुकूल किंवा प्रतिकूल मत ठरविण्यास, भरपूर सवड मिळाली. शास्त्रीबोवांच्या बाबतीतही तसेच झाले.

१८८६ च्या वादळानंतर, काही वर्षे त्यांनी ह्या विषयावर महत्त्वाचे लेखन, किंवा जाहीर भाषण वगैरे केले नव्हते. १९०१ सालापासून पुन्हा त्यांचे लक्ष ह्या प्रश्नाकडे वळले. पण ह्या काळातील त्यांचे लेख संदिग्ध आहेत. उदाहरणार्थ, 'एक विधवागृह हवे आहे,' हा त्यांचा 'सुबोध पत्रिके'तील लेख फार महत्त्वाचा आहे. ह्यात विधवांच्या शिक्षणासाठी, व त्यांचे विवाह सुलभ रीतीने जमून येण्यासाठी, प्रत्येक जातीने पुण्या-मुंबई-सारख्या शहरात विधवागृहाची स्थापना करावी, व त्या त्या समाजातील पुढाऱ्यांनी ह्या बाबतीत अधिक लक्ष पुरवावे, असे म्हटले आहे. परंतु त्या लेखातील 'मांडवशोभा' ह्या एका शब्दाने, हा लेख पुनर्विवाहाची टर करण्याच्या उद्देशाने लिहिला आहे, की खऱ्याखुऱ्या कळवळ्याने लिहिला आहे, हे समजत नाही. संस्कृत शब्दांची हकालपट्टी करून, त्या जागी अस्सल मराठी वळणाचे शब्द वापरण्याचे, शास्त्रीबोवांचे जे हमखास प्रयत्न ह्या काळात चालू होते, त्यामुळे देखील त्यांनी 'मांडवशोभा' हा शब्द वापरला असावा. कारण वरपासून खालपर्यंत छद्मी व उपरोधिक लिहिण्यापेक्षा, जे लिहावयाचे ते एकदम, एक घाव की दोन तुकडे असे लिहिणे त्याना अधिक पसंत असे; व पुढे दोन-चार वर्षांच्या अवधीत त्यांच्या मतात जे परिवर्तन झाले त्यावरून लेख औपरोधिक नसावा, असे वाटते.

१९०३ साली 'सुधारका'त 'विवाह व लग्न' आणि 'विधवाविवाह' म्हणून जे त्यांचे दोन लेख आले आहेत त्यावरून विवाहाचे वैदिक मंत्र कुमारिकेच्या लग्नालाच उद्देशून म्हटले आहेत, विधवेच्या नव्हेत, असे त्यांनी प्रतिपादन केले आहेः तरी पण विधवाविवाहाला श्रुतीत आधार आहे, असे त्यांनी उदाहरणे देऊन दाखविले आहे. अर्थात् विधवाविवाह त्यांना जरी अजून पूर्णपणे मान्य नव्हता तरी त्यांची त्या बाबतीतली वृत्ती, बरीच सहिष्णू झाली होती, असे वाटते.

१९०५ साली मात्र ग्रंथांच्या खोल अभ्यासाने व सामाजिक निरीक्षणाने, त्यांच्या पूर्वीच्या मतात पूर्ण पालट झाला. व त्यानी पुण्यात एक विद्वत्ता-प्रचुर व अतिशय सुंदर व्याख्यान दिले. त्यात त्यांनी विधवाविवाह सशास्त्र आहे, इतकेच नव्हे तर विधवास शिक्षणाची किंवा वाटल्यास विवाहाची, सवलत मिळण्यासाठी विधवागृहाची आवश्यकता आहे, असे अत्यंत कळ-कळीने प्रतिपादन केले. नारदस्मृतीच्या आधाराने विधवाविवाह सशास्त्र, इतकेच नव्हे तर योग्य आहे असे सांगून ते म्हणाले, की 'एकदा लग्न झालेलीचे पुन्हा लग्न करताना निषेध करणे, हे पाखंड आहे; ब्राह्मण म्हण-विणारांनी ते झुगारून द्यावे; आणि मनापासून विधवाविवाहाचा प्रचार करावा.' हे व्याख्यान जसेच्या तसे 'ज्ञानप्रकाशा'त छापून आले होते. पण दुर्दैवाने बऱ्याचशा सुधारक मंडळीचे त्याकडे जावे तसे लक्ष गेले नाही; आणि त्यामुळे शास्त्रीबोवा पुनर्विवाहास प्रतिकूल होते, हा त्याच्याविषयीचा गैरसमज अद्यापि कायम आहे.

स्त्रियांच्याविषयी शास्त्रीबोवांस फार आदर असे. संसारात व धर्माच्या बाबतीत, स्त्री-पुरुषांच्या दर्जात विषमता असावी, हे त्यांना बिलकूल पसंत नव्हते आणि म्हणूनच आत्मिक विकासाकरिता उपनयनाची पुरुषाइतकीच स्त्रीला पण जरूर आहे, तो तिचा हक्क आहे, असे ते वारंवार प्रतिपादन करीत. ह्या बाबतीत त्यांना खूपच विरोध सहन करावा लागला. आपल्या मुलीची ते मुंज करणार होते; पण तिच्या अकाली निधनाने त्यांचा बेत सफल झाला नाही. दोन मराठा मुलींच्या मुंजी त्यानी लावल्या असे मला कळले. पण नावे व अधिक पुरावा मिळाला नाही. स्त्रियांच्या बाबतीत वपनासारखे जे अत्याचार व इतर गांजणूक होत असे, त्याबद्दल त्यांना मोठी चीड येई; पण इतके मात्र खरे, की एकंदर स्त्रियांच्या प्रश्नाला, आगरकर व कर्वे, ह्यांच्याइतके महत्त्व त्यांनी दिले नाही.

ब्राह्मणेतरांचा प्रश्न शास्त्रीबोवांना फार जिव्हाळ्याचा वाटे. त्यांच्या समाजातील अज्ञान, दारिद्र्य व वरिष्ठ जातीकडून होणारी त्याची उपेक्षा, ह्यांबद्दल त्यांना चीड येई. कै. ज्योतिबा फुले याच्या मृत्यूनंतर, ब्राह्मणे-तरांच्या चळवळीची सूत्रे हलवून, त्या समाजात जागृती करण्याचे काम जर कोणी अत्यंत निःस्पृहपणे केले असेल, तर ते शास्त्रीबोवांनीच. फार

काय पण ‘ ब्राह्मणेतर ’ हा शब्द देखील त्यांनीच प्रथम रूढ केला.

जातिभेदावर त्यांचा मोठा कटाक्ष असे; परंतु वैदिक वर्णाश्रमधर्मावर त्यांचा विश्वास होता. ‘ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ’ हे गीतेतले वचन सार्थ आहे. असे त्यांनी ‘ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ’ ह्या आपल्या लेखात म्हटले आहे. मूळचे वर्ण व हल्लीच्या जाती एक नव्हते, असे त्यांचे म्हणणे होते. गुण व कर्म ह्यांच्यावर वर्ण उभारलेले होते. जात ही केवळ जन्मावर अवलंबून असते, व त्यामुळे उच्चनीच भेद बळावून गुणांचे चीज होत नाही, असे ते म्हणत. त्यातल्या त्यात अस्पृश्यतेवर तर त्यांचा मोठा दात असे. वेदात अस्पृश्यतेला काडीमात्र आधार नाही. बौद्ध व जैन धर्मानंतर पौराणिक काळात खरा ब्राह्मणी किंवा वैदिक धर्म लोपून, बौद्ध व जैन धर्मांवर आधारलेला हल्लीचा ‘ भिक्षुकी ’ भटी किंवा ‘ हिंदु धर्म वा अधर्म ’ हा उदयास आला व ह्याच विषवृक्षाची कडू फळे आज आमच्या समाजास भोवत आहेत, असे त्यांचे मत होते. मूळचे ब्राह्मण उपनिषदांतील व महाभारतकालीन ऋषी ज्ञानाचे भोक्ते, सत्यप्रिय आणि निरिच्छ होते. ते खरे ब्राह्मण. पौराणिक काळातील नावाचे ब्राह्मण केवळ पुजारी, ज्ञानीपणाचे सोंग आणणारे, लोभी आणि मंद बुद्धीचे होते. स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांनी ‘ स्नान-सुतका ’सारख्या खुळचट कल्पना लोकात पसरवून दिल्या; आणि त्यामुळे सर्वत्र धर्मभोळे-पणाचे वेडे पीक माजले, असे त्यांनी नेहमी म्हणावे. क्षत्रियांबद्दल ते असे म्हणत, की त्यांची पायरी ब्राह्मणांच्या वरची आहे. ह्या आपल्या म्हणण्यास ते जनक, शंतनू वगैरे राजांची उदाहरणे देत.

ह्या बाबतीत त्यांचे दुसरे असे एक मत असे, की महाराष्ट्रात ब्राह्मणा-पासून तो महारापर्यंतचे लोक, एकाच खाणीचे आहेत. महाराष्ट्राचे रहिवासी मूळचे गवळी कोळी, महार, इत्यादि ‘ कृष्णवर्णी ’ लोक हेच होते. ह्याच कोळी व गवळी लोकांतून व्यास, गोपालकृष्ण व अर्जुनास गीता सांगणारा कृष्ण, हे महापुरुष उदयास आले. ह्याबद्दल बहुतेक सुशिक्षित व अशिक्षित लोकांचा त्यांच्यावर कटाक्ष असे. उदाहरणार्थ, ‘ वार्ताहरा ’त, ‘ भुकेलेल्या भटाने ’ ह्याबद्दल जे उद्‍गार काढले आहेत, ते मजेचे आहेत. महाराष्ट्रधर्मा-वर १८९५ साली, शास्त्रीबोवांचे व्याख्यान झाले; त्यावर टीका करताना प्रथम त्यांच्या सोडावॉटर व इराणी सरबत पिण्याच्या सवयीवर, आणि पर्यायाने त्यांच्या ब्राह्मणत्वावर, शिंतोडे उडवून ‘ भुकेलेला भट ’ म्हणतो:

' राजारामपंतांची छाती भक्कम व कंठही ठणठणीत– ब्राह्मण पाया पाडणारा कृष्ण, हा आमच्या राजारामपंतांनी गवळ्याचा बच्चा ठरवला, व्यास कोळिणीचा बच्चा ठरवला, आणि अर्जुन दोन बापांचा बच्चा, म्हणजे व्यभिचारापासून झालेला ठरविला. राजारामपंतांचे सगळेच बोलणे व करणे उफराटे. गोलंकार झाला म्हणजे वर्णसंकार बंद पडला, गोलंकार जर चालला नाही तर वर्णसंकर चालला, ही राजारामपंतांची सरणी. न्यायमूर्ती रानड्यानी कान फुंकले, आणि राजारामपंतांस हे वळण लागले, अशी शंका येते.' संशोधनात्मक लिखाण भुकेलेल्या भटासारख्या खोलात शिरण्याची कुवत नसलेल्या, किंवा ' बाबावाक्यं प्रमाणम् ' म्हणणाऱ्या विद्वानांच्या देखील हाती पडल्यास, त्याची काय अवस्था होते, ह्याचे हे उत्तम उदाहरण आहे. ह्या अशाच प्रकारच्या लिखाणाबद्दल, त्यांना वर सांगितलेल्या टीकाकारांकडून ' उपजत खरडा ' ही पदवी मिळाली होती.

अर्थातच ह्या त्यांच्या मतांबद्दल सर्वसाधारण ब्राह्मणसमाजात, विशेषतः पुण्याच्या ' केसरी ' ब्राह्मणमंडळात, त्यांच्याविषयी फार रोष असे. शास्त्रीबोवांनी आर्यसंस्कृतीच्या चिंधड्या उडवल्या आहेत, असे त्यांचे म्हणणे होते. दुर्दैवाने शास्त्रीबोवांना विरोध करणाऱ्या ह्या साऱ्या मंडळींत, विष्णुशास्त्री चिपळूणकरासकट, एकहीजण त्यांच्याइतका व्यासंगी किंवा स्वतंत्र बुद्धीने विचार करणारा नव्हता. पक्षभेदाचे वारे त्या वेळी फार जोराने वाहत होते, व म्हणून शास्त्रीबोवांचे जात, पक्ष ह्यांच्याबाहेरचे सुद्धा जे केवळ संशोधनात्मक वेचक लिखाण आहे, त्याची समतोल छाननी त्यांच्या समकालीन एकाही महाराष्ट्रीय विद्वानाकडून झाली नाही.

१९०७ साली, मृत्यूपूर्वी काही दिवस, ब्राह्मणेतरांत जागृती करून त्यांची संघटना करण्यासाठी, त्यांनी वऱ्हाडात दौरा काढला होता. त्या वेळेस मराठासमाजाने त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले. त्यांच्याइतका सन्मान दुसऱ्या कोणत्याही ब्राह्मण पुढाऱ्याचा अजून ब्राह्मणेतराकडून झालेला नाही. शास्त्रीबोवा खरे ज्ञानी व त्यागी ब्राम्हण आहेत, अशी त्या वेळच्या सर्व ब्राह्मणेतर पत्रांनी, एकमुखाने ग्वाही दिली होती. जातीभेदाला आपण मुळीच जुमानीत नाही, हे दाखविण्यासाठी, ते ठाकुरद्वारला रस्त्यात उभे राहून इराण्याचा चहा व पाव खात, महाराकडे फराळ करीत. हातात पैसा ठेवून झाडूवाल्याला ' तू हा माझ्या हातावरून उचलून ने ' असे म्हणत. एकनाथषष्ठीच्या

दिवशी ते महारांच्या मुलांना स्वतः खाऊ वाटीत व पुस्तके देत. त्यांच्या लेखनाने नसेल त्याच्या शतपट, जुन्या मंडळींचे ह्या प्रकाराने पित्त खवळे; व ते पाहून शास्त्रीबोवांना संतोष होई.

शास्त्रीबोवांची धर्माबद्दलची काही मते, पूर्वीच ओझरती येऊन गेली आहेत; पण त्यांचे थोडे अधिक स्पष्टीकरण होणे, जरूर आहे. आधुनिक हिंदुधर्माची ते नेहमी टिंगल करीत; त्याला ते चक्क अधर्म मानीत. ' कैसरकडून सुलतानाकडे ' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत, Is Hinduism a Religion, ' ' ब्राह्मणी धर्म व भटी धर्म, ' ' कोणत्या कर्मकांडाशी ब्राह्मणांचा उभा दावा ' इत्यादी लेखात, केवळ पुराणग्रंथ व रूढी आधारभूत मानणाऱ्या ह्या नकली धर्माची, त्यांनी खूपच रेवडी उडवली आहे. वैदिक धर्म हाच खरा ब्राह्मणांचा धर्म; त्यात भेद, लोभ, असत्य व अज्ञान ह्यांना थारा नाही, असे ते मानीत. गायत्रीमंत्र हा स्त्रीला व पुरुषाला, त्याचप्रमाणे ब्राह्मणाला व शूद्राला मिळण्याचा सारखाच अधिकार आहे, असे त्यांचे मत होते; व म्हणून व्रात्यस्तोमावर स्वतंत्र लेख लिहून, उपनयनाचा संस्कार जातीभेदातीत आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

शास्त्रीबोवांची ईश्वरावर अचल श्रद्धा असे. त्यांच्यामध्ये व आगरकरांमध्ये हा मोठा फरक होता. आगरकर देवधर्म काही मानीत नसत, तर शास्त्रीबोवांना धार्मिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचे वाटे; व नास्तिकांचा त्यांना मोठा राग येई. आगरकर निरीश्वरवादी असूनदेखील, त्यांनी आपल्या मुलांच्या मुंजी जुन्या पद्धतीने थाटामाटात केल्या, म्हणून त्यांच्या प्रतिपक्षाने त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. परंतु शास्त्रीबोवांच्या बाबतीत तशी संधी, त्यांच्या टीकाकारांस कधी सापडली नाही. ' म्हटले ते केले,' हे त्यांचे ब्रीद होते. निदान ब्राह्मणांच्या पोटजातीची एकी विवाहाने केली पाहिजे, असे त्यांचे मत होते; व महाराष्ट्रात असे विवाह भागवत घराण्यातच प्रथम घडून आले. उदाहरणार्थ, गोविंद कृष्णाजी काळे व वेणू बाळाजी भागवत आणि सदाशिवराव परांजपे व वत्सला भास्कर भागवत यांचे विवाह. तसेच लग्नांत व मुंजीत वैदिक विधीपेक्षा इतर सटरफटर गोष्टींनाच अधिक महत्त्व देण्यात येते, व त्यामुळे वायफळ खर्च व त्रास मात्र होतो, तो वाचविण्यासाठी त्यांनी वैदिक वाङ्मयाचे व गृह्यसूत्रांचे परिशीलन करून, केवळ

आवश्यक तेवढेच वैदिक मंत्र व विधी निवडून, ‘विवाह व उपनयन–सार्थ प्रयोग’ हे छोटेसे पुस्तक तयार केले; व त्याप्रमाणे केवळ दोन-तीन तासात लग्न (हे लग्न रामचंद्र भास्कर भागवत यांचे) व (मुंज माझे वडील नारायण बाळाजी भागवत यांची) व तीही अगदी कमी खर्चात, उरकता येतील अशी खात्री करून, त्याप्रमाणे दोनही विधी त्यांनी आपल्याच घरी सातारला प्रथम केले. त्या वेळी पुन्हा एकदा मोठी खळवळ झाली, व शास्त्रीबोवांना बहिष्काराचा धाक घालण्यात आला. परंतु शास्त्रीबोवांनी त्याला मुळीच जुमानले नाही. शास्त्रीबोवांच्या मृत्यूनंतर, आज सहासष्ट वर्षांनी, तोच वैदिक विधी अधिक संक्षिप्त व सुधारलेल्या पद्धतीत, महाराष्ट्रात सर्वत्र रूढ झाला आहे; पण ज्याने ही प्रथा प्रथम अस्तित्वात आणली, त्याचे नावही आता कुणाच्या लक्षात नाही !

आंतरजातीय विवाहाबद्दल त्यांचे मत उत्तरोत्तर अधिक प्रगत होत गेले. त्या दिवशी पेशव्यांची मुलगी ग्वाल्हेरच्या शिंद्यांच्या घरी येईल तो दिवस सोन्याचा असे ते म्हणत असत.

वैदिक धर्माइतकेच, शास्त्रीबोवांना महाराष्ट्रधर्माबद्दल किंवा भागवत-धर्माबद्दल प्रेम वाटे. भक्तीचा जिवंत ओलावा त्यांना फार आवडे. महाराष्ट्र-धर्माची मुहूर्तमेढ ‘मराठमंडळा’तील संतांनी रोविली. मुकुंदराय त्याचे आद्यजनक, ज्ञानदेव संस्थापक आणि एकनाथ, रामदास, तुकाराम त्याचे प्रचारक, असे त्यांनी म्हटले आहे. भक्तिमार्गात जातिभेद, लिंगभेद ह्यांना थारा नाही, संस्कृतविद्येची शेखी नाही. प्राकृत भाषेचा उत्कर्ष व सामान्य जनतेच्या मनाचे प्रतिबिंब संतांच्या वाङमयात दिसून येते, असे शास्त्री-बोवांचे मत होते.

हिंदुधर्माप्रमाणेच बौद्ध व जैन धर्मांबद्दल शास्त्रीबोवांचे मत चांगले नव्हते, हे त्यांच्या ‘बौद्धधर्मही काळोखच’ ह्या लेखावरून चांगले कळून येते. त्यांनी कुराण व बायबल ह्यांचाही चांगला अभ्यास केला होता. बायबल त्यांना आवडे. पुष्कळ वेळा गीता, ज्ञानेश्वरी बायबलचेही पाठ ते आपल्या श्रोत्यांना ऐकवीत. ह्या बाबतीत एकदा मोठी मौज झाली. ती अशी : १९०३ सालची मेची पंधरा तारीख. शास्त्रीबोवांचे व्याख्यान होते. व्याख्यानात शास्त्रीबोवांनी ग्रहणांतल्या सुतकविटाळ असल्या खुळचट

समजुतीस मुळीच आधार नाही, ग्रहण हा एक नैसर्गिक देखावा आहे, असे प्रतिपादन केले; व ब्राह्मण भिक्षुकावर खूप तोंडसुख घेतले. त्याबरोबर शास्त्रीबोवांचे एक प्रतिस्पर्धी, प्रो. जिनसीवाले उठून म्हणाले की, ही धार्मिक रूढी आहे, व ती 'पोपच्या शब्दा'इतकी आम्हास वंद्य आहे. झाले. पोप ह्या शब्दाने शास्त्रीबोवांच्या डोक्यात निराळीच कल्पना आली. दुसरे दिवशी बायबल घेऊन ते व्याख्यानाच्या जागी गेले, व त्यांनी ते शिकविण्यास सुरुवात केली. श्रोत्यात विरोधकच जास्त असल्यामुळे, 'बायबल नको' म्हणून गिल्ला झाला. शास्त्रीबोवांनी मते घेतली; तेव्हा बायबलच्या विरुद्ध बरेच हात वर झाले. 'डुकरापुढे मोती' असे पुटपुटत, शास्त्रीबोवा व्यासपीठावरून खाली उतरले. ते उद्‌गार प्रो. जिनसीवाल्यांनी ऐकले; व 'आम्ही डुकर' 'आम्ही डुकर' म्हणून ओरडत त्यांनी काठी आपटली. त्याबरोबर शास्त्रीबोवांना स्फुरण चढले; व ते 'बायबल नको म्हणून गडबड करणारी मंडळी अर्थातच तशी' असे म्हणाले. झाले. त्याबरोबर सभेत गोंधळ व गडबड ह्यांना पारावार राहिला नाही. काही दिवस जिनसीवाले तर सारखे संतापातच होते. शेवटी एका स्नेह्याने ह्या पोरकट भांडणात काही अर्थ नाही, असे सांगून शास्त्रीबोवांना आपले म्हणणे मागे घ्यायला लावले व मग जिनसीवाले शान्त झाले. परंतु ह्यानंतरही शास्त्रीबोवांचे बायबलबद्दल व सभेतल्या श्रोत्यांबद्दल मत होते तेच राहिले.

ईश्वर व ध्येय ह्या बाबतीत शास्त्रीबोवांचे जे मत होते, ते त्यांच्याच शब्दांत सांगितलेले बरे. ते असे. 'जशी मानवी सृष्टीच्या खाली पाशवी सृष्टी आहे, तशी मानवी सृष्टीच्या वर दैवी सृष्टी आहे. मानवी सृष्टी जशी शरीरधारी व संकुचितचित्तधारी आहे, तशी दैवी सृष्टी नाही. दैवी सृष्टी आहे ती वायुमय व स्वेच्छाविहारी आहे. याप्रमाणे दैवी सृष्टी जरी काही गुणांनी विशिष्ट आहे, तरी सर्वज्ञ नाही. जशी मानवी सृष्टी अल्पज्ञ आहे, तशी दैवी सृष्टीही अल्पज्ञच आहे. तरी मानवी सृष्टीच्या ज्ञानापेक्षा दैवी सृष्टीचे ज्ञान निःसंशय अधिक आहे. मानवी व दैवी सृष्टी देवास शरण जाते. देव करुणेचा सागर व परार्थ झिजणारा आहे.'

ध्येयासंबंधी ते म्हणतात– 'स्वार्थावर लाथ मारून, विविध लोकांच्या बोलण्याकडेस यत्किंचितही लक्ष न पोचवता, केवळ परार्थासाठी देह झिजविणे

ही इहलोकातील सद्गतीची पराकाष्ठा होय.'

तसेच एकनाथाच्या चरित्रात ते म्हणतात– 'भ्यायचे कोणास किंवा पर्वा कोणाची करावयाची ? तर एका देवास किंवा देवाची...मनात चांगले वाटते, पण जनात बरे न दिसल्यामुळे हातून होत नाही, असे साक्षात् सांगणारा, किंवा स्वतःच्या सार्वत्रिक वृत्तीवरून लोकांच्या मनात भरविणारा पुरुष, लौकिकदृष्टचा कितीही उच्चपद पावलेला असला, किंवा कितीही श्रेष्ठ जातीत त्यांचा जन्म झालेला असून, उक्तीमध्ये जेव्हा तेव्हा नाव झळकवणारा असला, तरी तो निःसंशय देवावर भरवसा ठेवणारा नव्हे.'

ह्या त्यांच्या उक्तीवरून शास्त्रीबोवांच्या निर्भयतेचे आणि स्पष्टवक्ते-पणाचे बीज कशात होते, ते सहज कळून येते. त्याचप्रमाणे अंधश्रद्धा नव्हे, तर डोळस, व पारखून आपलीशी केलेली धर्मभावना, ही शास्त्रीबोवांच्या नैतिक बळाचे कारण होती, हे सहज दिसून येते.

मूर्तीपूजेच्या बहिष्काराबद्दल, त्यांनी जरी प्रार्थनासमाजावर तोंडसुख घेतले असले, तरी ते स्वतः त्या मार्गात फारसे नसत. गायत्रीचा जपच त्यांना अधिक मोलवान वाटे.

पैशाच्या आशेने लिहिलेले लिखाण फुकट होय. ज्ञानाच्या लोभाने, व विद्यादानाच्या हौसेने केलेले वाङमय चिरस्थायी होते, असे शास्त्रीबोवांचे मत होते. अशा निःस्पृह माणसाची लेखणी, तरवारीपेक्षा तिखट व विजे-सारखी अनिरुद्ध असावी, ह्यात काही नवल नाही. लिहितांना ते अगोदर विचार करून, ठरवून, लिहीत नसत. त्यांच्या डोक्यात नेहमी नाना तऱ्हेचे प्रश्न घोळत असायचे, व जी कल्पना मनात येईल, ती झरकन् लिहून मोकळे व्हावयाचे, असा त्यांचा शिरस्ता असे. बहुतेक लेखन कागदाच्या कपटचांवर व तेही वर विषयाचे नाव वगैरे, अगर पुष्कळ वेळा अनुक्रमही, न घालता लिहिलेले असायचे; व पुष्कळ वेळा ते कपटे तसेच छापखान्यात जावयाचे. शास्त्रीबोवांना ते फिरून वाचून, जुळवून, लिहून काढायला फुरसत नसे. त्यामुळे त्यांच्या मोठचा लेखांत विसंगती आणि पुनरावृत्ती पुष्कळ वेळा आढळते. ह्याशिवाय स्वतःची काही मते, उदाहरणार्थ, पौराणिक काळात उत्पन्न झालेली व अद्याप वाङमयात टिकून राहिलेली भिक्षुकी वृत्ती, इत्यादि प्रसंग पडेल तेथे घालून देण्याची त्यांची सवय असल्यामुळे, त्यांचे लेख वाचकांस काहीसे कंटाळवाणे वाटतात.

राजारामशास्त्री भागवत ह्यांच्या लेखनाचा पसारा फार अफाट आहे.

त्यांचे लेखन फार भराभर व पस्तीस वर्षे अखंड चालू होते. तसेच त्यांचे वाचन फार विस्तृत व कल्पनाशक्ती आणि धारणा तीव्र असल्यामुळे, त्यांचे लेखनाचे विषय विविध असत. वैदिक वाङमयापासूनन तो थेट सोवळ्या-ओवळ्याच्या थोताण्डापर्यंत, वाटेल त्या गहन किंवा अगदी क्षुल्लक दिसणाऱ्या विषयांवरही, ते सारख्याच गंभीरपणाने व ठासून लिहीत असत. अर्थात् लहानपणापासून थोरापर्यंत कोणीही वाचावे, व अर्थातच त्यावर आपल्या कुवतीप्रमाणे बरीवाईट टीका करावी, असे त्यांच्या लेखनाच्या बाबतीत होई; आणि लोकविलक्षण मते हे त्यांचे वैशिष्टच असल्यामुळे, बराच काळ-पर्यंत लोकांची करमणूक त्यांच्या लेखांनी केली, हेही खरे. परंतु त्यांचे जे खरे गंभीर व विचारपूर्वतक लेख आहेत, त्यांचे मर्म फारच थोड्यास कळले; किंवा फारच थोड्या जणांनी वाचून, समजून घेण्याचा प्रयत्न केला; असे म्हटले असता अतिशयोक्ती होणार नाही.

त्यांचे लेख गंभीर स्वरूपाचे व भरीव असत; पण ते लिहिताना त्यांची विद्वानाच्या किंवा संशोधकाच्या भूमिकेशी जुळणारी तटस्थ वृत्ती नसे, तर त्यामागे आनंदाची, त्वेषाची किंवा अभिमानाची भावना, ठळकपणे दिसून येत असे. मराठ्यांच्या प्राचीन इतिहासासंबधाने किंवा प्राकृत व मराठी भाषेसंबंधी लिहितांना, त्यांना अभिमानाचे भरते येत असे. पुराण आणि कालिदासादिक रंगेल कवींची काव्ये, यांच्याबद्दल ते अत्यंत त्वेषाने आणि तुच्छतेने लिहीत. व्युत्पत्तीसारखा रूक्ष, पण त्यांच्या अत्यंत आवडीचा विषय, ते नाजूकपणे हाताळीत; आणि सामाजिक अन्याय आणि खुळचट चाली, ह्यांच्यावर टीका करताना ते उपहासाचे शस्त्र मुक्त हस्तने चालवीत. वैदिक वाङमयाची छाननी मात्र ते पुष्कळ वेळा स्वतःच्या भावना एकीकडे सारून, आपली सारी कल्पकता खर्च करून लिहीत. त्यांच्या बुद्धीची चमक आणि कुशाग्रता, ह्या लेखात जशी दिसून येते, तशी इतर ठिकाणी, इतक्या उत्कटपणे, आढळून येत नाही. हे लेख वाचताना, वाचकालाही बुद्धीची चांगलीच कसरत करावी लागते. शास्त्रीबोवांच्या लिखाणाचा हा संशोधना-त्मक भाग फार महत्त्वाचा आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेवरचे त्यांचे लेखन महत्त्वाचे आहे. मराठी लोक, मराठी भाषा आणि जातींचे एक वळण त्यांनी चागले मांडले आहे. □

( २ )

# आठवणी

राजारामशास्त्री भागवत ह्यांचा सर्व कारभार व्यवहारापासून जरा अलिप्त असे. त्यांची वृत्ती अंतर्मुख व मन नेहमी विचारांत गढलेले असे. राहणी फार साधी, गबाळीच म्हणाना; स्वभाव अबोल. चर्या उग्र त्यामुळे त्यांचा मित्र-परिवार मोजका असे. लहानांना त्यांची भीती वाटायची. त्यामुळे त्यांच्या-पाशी बसून खेळीमेळीने बोलायला, बरोबरीने वागायला फारच थोडी माणसे धजत. शास्त्रीबोवांचे समवयस्क स्नेही आज ह्या जगात नाहीत. शास्त्री-बोवांच्या मृत्यूलाही आता जवळ जवळ सत्तर वर्षे लोटली आहेत. त्यामुळे काळाच्या उदरात गडप न झालेल्या अशा फारच थोड्या आठवणी शिल्लक आहेत. पण आहेत त्या मात्र अगदी वेचक व मजेदार आहेत. त्यावरून त्यांच्या स्वभावाच्या व जीवनाच्या विविध छटा स्पष्ट उठून दिसतात. शास्त्रीबोवांची सगळी पुस्तके सगळी व्याख्याने, सगळे लेख वाचून जो परिणाम होतो, त्याच्या किती तरी पटीने ह्या चारच गोष्टी पण मनाला वेधून घेतात. त्यांचा विक्षिप्तपणा, त्यांचा गंभीरपणा, एकाग्रता, कळकळ सगळे, काही जसे समोरच घडते आहे, असे डोळ्यासमोर उभे रहाते.

शास्त्रीबोवा रॉबर्ट मनी स्कूलमध्ये काम करीत असताना, शाळेचे प्रिन्सि-पॉल त्यांच्याविषयी बोलताना अभिमानाने व किंचित् थट्टेने म्हणायचे की ‘शास्त्रीबोवा म्हणजे एक पैलू न पडलेला हिरा आहे.’ शास्त्रीबोवांच्या ह्या गोष्टी ऐकणाराच्या तोंडूनही न कळत हेच उद्‌गार बाहेर पडतात.

शास्त्रीबोवांसंबंधी ज्या काही गोष्टी माझ्या वाचण्यात व ऐकण्यात आल्या,

या मी शक्य तितक्या साध्या शब्दांत आणि पदरची पुस्ती न जोडता दिल्या आहेत. प्रस्तावना जोडल्याने त्याचे स्वारस्य कदाचित् नाहीसे होईल असे मनात आले. त्यामुळे त्या खुलवून लिहिण्याचा मोह आवरून थोडक्यात दिल्या आहेत.

**काही व्यक्तीविशेष** :– शास्त्रीबोवांचे बोलणे, चालणे, पोषाख सर्वच काही विशेष होते. त्यांच्या बारीक सारीक खोडीबद्दल लिहावयाचे म्हटल्यास एक रामायण होईल, इतक्या त्या विलक्षण आहेत. त्यांचा पोषाख म्हणजे शुद्ध स्वदेशी असायचा. ठाणा मिल खेरीज दुसरे कापड त्यांनी वापरले नाही. धोतर जाडेभरडे, गुडघ्याखाली जेमतेम आलेले आणि पुढे सोगे सोडलेले असायचे. वर बाराबंदी, पण तिचे बंद कधी लावलेले नसायचे. बडोद्याच्या महाराजांना भेटावयास शास्त्रीबोवा गेले तेव्हा मात्र आयुष्यात पहिल्यादा त्यांनी बंद बांधले. त्या राजघराण्याचा हा मान आहे असे ते बंद बांधतांना म्हणाले. डोकीला ते मोठा काळा ठिपक्यांचा रूमाल टोक लोंबत ठेवून बांधीत. कधी कधी तुर्की टोपी पण ते घालीत. पायात काळे टोकदार चढाव घालीत.

त्यांचे कपडे पुष्कळ वेळा बाहेर जाताना मळके असत. घरात मात्र त्यांचे धोतर व गंजिफ्राक स्वच्छ असे. ते म्हणत की, बाहेर धूळ असते, एवीतेवी कपडे मळतातच. घरात मात्र सर्व निर्मळ असले पाहिजे. दुसरी त्यांची एक सवय म्हणजे ते थंडीत गार पाण्याने व उन्हाळ्यात कढत पाण्याने स्नान करीत. ‘उन्हाळ्यात अंगावर मळ फार असतो, तो ऊन पाण्याशिवाय निघत नाही. थंडीत गार पाणी चांगले’ असे ते म्हणत. संध्या ते स्नान करतांनाच उरकीत.

डोळे अधू असूनदेखील त्यांनी जन्मात कधी आरशी वापरली नाही.

शास्त्रीबोवांचा आहार अगदी नेमस्त असे. जिव्हेवर संयम ठेवण्याची त्यांची युक्ती मात्र अजब होती. शास्त्रीबोवांना मेथीचे थालिपीठ फार आवडे. अशा तऱ्हेची खाण्यावरची आसक्ति बरी नव्हे असे त्यांच्या एकदा मनात आले. मग जिभेला आळा कसा बसवावा? तो पदार्थ अजिबात वर्ज्य करून? पण तसे करून त्या पदार्थाची आवड कायमच राहील त्याची वाट काय? शास्त्रीबोवांनी उलट सुलट विचार करून ठरविले का एकदा त्या पदार्थाची शिसारी बसली की मग तो खायचे मनातसुद्धा येणार नाही. त्या दिवसापासून त्यांनी

तिन्ही त्रिकाळ थालिपीठ खायचे ठरवले, आणि केली सुरुवात. महिनेच्या महिने हा कार्यक्रम चालला होता. शेवटे अतोनात वीट आल्यावर त्यांनी ते खायचे सोडून दिले. बऱ्याच पदार्थांच्या बाबतीत त्यांनी असे केले.

विविध तऱ्हेच्या भाज्या ते घेऊन यायचे. ब्राह्मण न खाणारी, मासळीचा वास असणारी माचोळाची भाजी ते नेहमी आणायचे. माचोळाचे भरीत त्यांचे फार आवडते होते.

शास्त्रीबोवा शाकाहारी होते. पण ब्राह्मणाने मांस खाल्ल्यास शास्त्रास बाधा येते हे त्यास मान्य नव्हते. म्हणून ते मुद्दाम जाहीर रीतीने कधी तरी मांसाहार घेत. एकदा ते डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ह्यांच्याबरोबर बोटीतून रत्नागिरीस चालले होते. त्याच बोटीत काही सनातनी मंडळी होती. जेवणाची वेळ झाल्याबरोबर बोटीवरचा बबर्जी कीर्तिकरांच्या कानी पुटपुटला, 'तुम्ही भात व करी करायला सांगितली होतीत, ती आता इथे कशी आणू ? शास्त्रीबोवांनी ते ऐकले. ते मोठ्याने म्हणाले, 'अरे आण ते इथेच, त्यात काही दोष नाही. मी चोरून थोडाच खातोय ?' ह्या बाबतीत ते असेही म्हणत की 'मांसाहार शास्त्रनिषिद्ध नाही, उलट शास्त्रविहित आहे. आपद्धर्म म्हणून तर तो त्याज्य नाहीच नाही, हे सिद्ध करण्यासाठी मी वेळ पडली तर कुत्र्याची तंगडीसुद्धा खाऊन दाखवीन.'

**शिक्षणाबद्दल आस्था :–** शास्त्रीबोवांनी विद्यार्थ्यांकरता 'छोटी पुस्तके' का लिहिली ह्याचा वृत्तान्त थोडा गमतीचा आहे. एकदा शास्त्रीबोवा वर्गात शिकवीत होते. जीव तोडून शिकवीत होते. सर्व विद्यार्थी गंभीरपणे ऐकत होते. एक विद्यार्थी मात्र दुसऱ्याच कामात दंग होता. शास्त्रीबोवांच्या सांगण्याकडे त्याचे लक्ष नव्हते. शास्त्रीबोवांनी प्रश्न विचारल्याबरोबर तो गांगरला. शास्त्रीबोवांनी त्याला हटकले. उभे राहाण्यास सांगितले. तो गोंधळून उभा राहिला. त्याबरोबर एक छोटे चोपडे जमिनीवर गळून पडले. 'हे तू वाचतोस ?' वेताळपंचविशीचे पुस्तक पाहून त्यांनी विद्यार्थ्यांस विचारले. तो काहीच बोलला नाही. शास्त्रीबोवांनी मुकाट्याने पुस्तक टेबलावर ठेवले व शिकविण्यास आरंभ केला. शाळा सुटल्यावर नंतर त्यांनी पुस्तक विद्यार्थ्यांस परत दिले. पण त्यामुळे शास्त्रीबोवांच्या विचारांना गती मिळाली. का बरे हे विद्यार्थी असली पुस्तके वाचतात ? त्यांनी चांगले का

वाचू नये? पण त्यांनी चांगले वाचायचे म्हटले तर चांगली बोधप्रद आणि स्वस्त अशी पुस्तके तरी मराठीत कुठे आहेत? विद्यार्थी अशी पुस्तके वाचतात तो त्यांचा दोष नव्हे. आमचा आहे. विद्यापीठाचा आहे. सोपी आणि चटकदार अशी थोर पुरुषांची आणि स्त्रियांची चरित्रे लिहिली तर विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागणार नाही का? त्यांच्या वागणुकीत त्यामुळे पालट होणार नाही का? हे विचार मनात आल्याबरोबर शास्त्रीबोवांनी संतांची आणि मराठेशाहीतील वीरांची चरित्रे लिहिली. वामन, मोरोपंत इत्यादींच्या काव्याचे वेचे तयार केले. ते स्वतःच्या छापखान्यात छापले आणि दिले फुकट मुलांच्या हातात.

शास्त्रीबोवा आपल्या शिष्यांशी किती आपुलकीने वागत आणि त्यांच्या शिष्यांना त्यांच्याबद्दल काय वाटत असे, हे शास्त्रीबोवांचे एक विद्यार्थी श्री. डी. जी. गुप्ते ह्यांनी ज्या सुंदर आठवणी लिहून पाठविल्या आहेत त्या वाचून लक्षात येईल. या आठवणी खाली जशाच्या तशा दिल्या आहेत :–

‘ शास्त्रीबोवांच्या चरित्रातील मुख्य वैशिष्टय म्हणजे त्यांचे शिष्यवर्गावरील उत्कट प्रेम. उदाहरणार्थ, मी आपला स्वतःचाच अनुभव देतो. मी १८८४ साली मुंबईतील राबर्ट मनी इन्स्टिटयुटमध्ये प्रवेश केला. त्यावेळी गुरुवर्य त्या शाळेत व सेंट झेविअर कॉलेजात संस्कृतचे अध्यापक होते. लवकरच त्यांना माझी अत्यंत गरिबी दिसून आली व केवळ मला आपल्या पुत्रतुल्य लहान बंधूबरोबर इंग्रजी वाचण्याचे काम दिले. ते वर्गात नेहमी बाहेरचे संस्कृत श्लोक आणून, जे विद्यार्थी, त्या श्लोकांचा अर्थ बरा लावीत त्यांना उत्तेजन मिळावे म्हणून महिनाअखेर विशेष प्रावीण्य दाखविणारास संस्कृत पुस्तक इनाम देत. त्यारीतीने त्यांच्याकडून मला पुष्कळ सुंदर पुस्तके मिळाली होती व मी ती पुष्कळ वर्षे फार जपून ठेविली होती. त्यांच्या एका शिष्याला ( रा. नरहर बाळकृष्ण जोशी ) माझ्या अगोदर जगन्नाथ शंकरशेठची संस्कृत स्कालरशिप मिळाली होती, तशी मला पण मिळावी एवढाच त्यांचा हेतू होता. आपली व शाळेची किर्ती वाढावी अशी इच्छा त्यांना मुळीच नव्हती. कारण मी एल्फिस्टन हायस्कुलात जाऊन तेथील संस्कृत शिक्षक रा. नारायण बाळकृष्ण गोडबोले

यांचेजवळ एक वर्ष शिकावे असे त्यांनी मला सुचविले होते. कित्येक गोष्टी अनुकूल योगावर अवलंबून असतात व मी गोडबोले ह्यांचेजवळ काही दिवस शिकलो तर मला स्कालरशिप मिळण्याचा जास्त संभव आहे असे त्यांस वाटले असावे. पण लवकरच त्यांनी स्वतः निराळी शाळा काढली व त्याच शाळेतून मी माझे बहुतेक सहाध्यायी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालो. मला संस्कृत स्कालरशिप मिळाली नाही. परंतु उत्तीर्ण झालेल्या एकंदर विद्यार्थ्यांत माझा नंबर चवथा आल्यामुळे मला एलफिन्स्टन कॉलेजात एक स्कॉलरशिप मिळाली व माझा कॉलेजात प्रवेश झाला. ह्यावेळी माझी अडचण जाणून परीक्षेची फी रु. १० त्यांनीच दिली होती.

पुढे कॉलेजातील पहिल्या वर्षाचे परीक्षेच्या ऐनवेळी माझी प्रकृती बिघडल्यामुळे व कित्येक अडचणींमुळे मला परीक्षेत अपयश आले व सहा महिन्यानंतर कॉलेजातील परीक्षा होईपर्यंत एक टर्मची फी साठ रुपये भरण्याचा प्रसंग ओढवला. त्यावेळीही गोपाळ नारायण कंपनीकडून श्रीमद्भागवत छापले जात होते, त्यातील एका स्कंधाचे प्रुफ तपासण्याचे काम मला देऊन त्यांनी माझी अडचण दूर केली. माझा त्यापुढील अभ्यास त्यांच्या कृपेने निर्विघ्नपणे पार पडला. १८८९ साली कॉलेजचे शिक्षण पुरे झाल्यावर त्यांनी आपल्या शाळेतच शिक्षकाचे काम मला दिले व एल्. एल्. बी. चा अभ्यास करण्याचे सुचविले. त्याप्रमाणे काही काळ मी केले, परंतु कायद्याच्या अभ्यासाकडे माझे मन फारसे लागेना. शाळेतील जबाबदारीचे काम व अभ्यास ही दोन्ही सांभाळून प्रपंच चालविणे उत्तरोत्तर अधिकाधिक अवघड वाटू लागले. हे पाहून गुरुवर्यांनी माझी दुसरीकडे सोय करण्याचे ठरविले. त्यावेळी ते कै. न्यायमूर्ती रानडे यांचेबरोबर एकनाथमहाराजांचे भागवत वाचीत होते. त्यासाठी दर रविवारी त्यांच्या बंगल्यावर जात असत. त्यासुमारास आमदाबादेतील एका हायस्कुलात हेडमास्तरचे जागेसाठी एक अनुभवी व कार्यदक्ष शिक्षक पाहिजे होता, त्याबद्दल न्यायमूर्तीस तेथून पत्र आले होते. न्यायमूर्तींनी सहाजीकच गुरुवर्यांजवळ चवकशी केली. त्यांनी माझे नाव सुचविले. न्यायमूर्तींनी गुरुवर्यांच्या शब्दास मान देऊन माझी शिफारस केली व त्या जागेवर माझी नेमणूक झाली. तेव्हापासून आज ५० वर्षे माझे वास्तव्य गुजराथेतच आहे. मी इकडे आलो त्यावेळी मला गुजराथी

मुळीच येत नव्हते व कोणाचीही ओळख नव्हती. परंतु गुरुवर्यांनी आपले स्नेही कै. गोपाळराव दाभोळकर वकील यांना आगाऊ पत्र लिहून त्यांचेकडे उतरण्याची सोय केली. रा. दाभोळकर वकील अत्यंत प्रेमळ व परोपकारी स्वभावाचे असल्यामुळे, त्यांच्या उपदेशाने व मदतीने माझा तेथे चांगलाच जम बसला. माझ्याप्रमाणे दुसऱ्याही पुष्कळ शिष्यांस गुरुवर्य अमुल्य मदत करीत असत. होतकरू शिष्यास चांगले ग्रंथ वाचून आपलं ज्ञान वाढविण्यास ते प्रोत्साहन देत व ते त्या कामात त्यास आनंदाने मदत करीत. मी व माझे काही सहाध्यायी आपल्या शंका घेऊन पुष्कळ वेळा त्यांचे घरी जात होतो. गुरुवर्य आपले सगळे काम बाजूला ठेवून आमचे समाधान करीत.

आपल्या शिष्याला संस्कृतची शिष्यवृत्ती मिळावी ही त्यांची इच्छा दुर्दैवाने सफल झाली नाही. परंतु पुढे लवकरच त्यांचे दुसरे एक शिष्य रा. रावेरकर यांनी ती इच्छा पूर्ण केली. जन्मभर अध्यापनाचे काम करीत असल्यामुळे त्यांचा शिष्यपरिवार अर्थातच फार मोठा होता. त्यात महर्षि अण्णासाहेब कर्वे, डॉ. परांजपे, नेक नामदार जयकर ह्यांच्यासारख्या नामांकित व्यक्तीही होत्या. नामदार जयकर ह्यांनी गुरुवर्यांच्या अवसानानंतर त्यांच्या नावाने झेवियर कॉलेजात एक शिष्यवृत्ती निर्माण करण्याच्या कामी पुढाकार घेऊन आपली कृतज्ञताबुद्धी प्रगट केली होती.

गुरुवर्यांचे वैशिष्टय, म्हणजे त्यांची लोकोत्तर स्मरणशक्ती आणि त्यांचा अखंड विद्याव्यासंग. मी त्यांच्या शिष्यवृंदात दाखल झालो त्यावेळी ते 'विविधज्ञानविस्तार' ह्या मासिकांत 'विचारमाधुकरी' ह्या नावाची लेखमाला लिहीत होते, ती लेखमाला ते आम्हापैकी काहीजणास वाचावयास देत. त्यातील विषय फार गहन असल्यामुळे आम्हा विद्यार्थ्यांस त्यात फारसे समजत नसे. परंतु तेव्हापासून त्यांच्या विशाल ज्ञानाविषयी आमच्या मनात अत्यंत आदर उत्पन्न झाला. त्यावेळी त्यांनी मराठी काव्यांचा फारसा अभ्यास केला नसावा असे मला वाटते. पण लवकरच त्यांनी ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ वगैरे संतकवींचे ग्रंथ काळजीपूर्वक वाचले व ह्या ग्रंथातील पुष्कळ अत्युत्कृष्ट उतारे, त्यांच्या संभाषणांत येऊ लागले. मोरोपंत, मुक्तेश्वर वगैरे कवींची काव्येही, त्यांनी ह्याच वेळी वाचली असावी. रा. वामनराव ओक हे ह्यावेळी मोरोपंताचे भारत विस्तृत टीपासह प्रसिद्ध करण्याचे काम करीत

होते. त्यातील पुष्कळ आर्यांच्या संबंधाने त्यांचा गुरुवर्यांबरोबर पत्रव्यवहार चालत असे, गुरुवर्यांचा स्वभाव इतका निरभिमानी होता की अशा काही आर्यांविषयी आमच्यासारख्या अगदी क्षुल्लक मनुष्यांबरोबर पण ते चर्चा करीत. त्याच्याकरिता त्यांनी ' मोरोपंती आखाडा ' या नावाचे एक चर्चा-मंडळही स्थापिले होते. मी त्यांच्या शाळेत शिक्षक असतानाच त्यांनी पर्शियन भाषा शिकण्यास आरंभ केला. त्या भाषेत अल्पकाळात झालेली त्यांची प्रगती पाहून मला अत्यंत आश्चर्य वाटले. काही वर्षांनी मी गुजराथेतून मुंबईस गेलो असता, त्यांच्या दर्शनास गेलो, त्यावेळी ते ग्रीक भाषा शिकत होते. त्यांच्या हातात होमरचे इलिअड हे काव्य होते. भाषाशास्त्राच्या दृष्टीने ग्रीक भाषेचे ज्ञान आपल्या लोकास आवश्यक आहे असे ते म्हणाले व काही ग्रीक शब्दांच्या रूपाचे संस्कृत शब्दाशी असलेले साम्य माझ्या नजरेस त्यानी आणून दिले.

त्यांचे दुसरे आणखी वैशिष्टच, म्हणजे त्यांच्या ठायी असणारा मराठी भाषा, महाराष्ट्रदेश, मराठ्यांचा इतिहास व मराठी कवी ह्यांजविषयीचा उत्कट अभिमान. त्यांनी काढिलेल्या शाळेस दिलेले ' मराठा हायस्कूल ' हे नाव त्या अभिमानाचेच निदर्शक होते. मराठी भाषेचा प्रवेश विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षात व्हावा ह्याबद्दल ते पुष्कळ खटपट करीत. न्यायमूर्ती रानड्यांच्या ह्या संबधाने केलेल्या प्रयत्नास त्यांनी मनापासून शक्य तितके साहाय्य केले. संत कवींची चरित्रे लिहून त्यायोगे भूतदया, सहिष्णुता, औदार्य-बुद्धी, सत्यप्रियता लोकात जागृत करून कमीपणा व संकुचित दृष्टी दूर करण्याचा त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला. संतांच्या पुण्यतिथीचे दिवशी विद्वान, धर्मशील सद्गृहस्थाकडून त्या त्या संताच्या जीवनकार्यासंबंधी सुंदर प्रवचने करविली. संतचरित्रकार महिपतीबाबा ताहाराबादकर ह्यांच्या वंशातील एक विद्यार्थी त्यांच्या शाळेत शिकत होता. महिपतीसंबधाने त्यांच्या मनात वसत असलेल्या आदरामुळे त्यांनी त्या विद्यार्थ्यास पुष्कळ मदत केली. केवळ यांच्याच प्रोत्साहनामुळे व मदतीने तो स्कूल फायनलची परीक्षा पास झाला व पुढे त्यास चांगली सरकारी नोकरी मिळाली.

जातिभेदामुळे आपले अतिशय नुकसान झाले आहे असे त्यास वाटे. व जातिद्वेष जाऊन सर्वांची खरी एकी व्हावी ह्याबद्दल ते अहर्निश प्रयत्न करीत.

माझ्या मुलीचे लग्नाचे वेळी ते मुद्दाम बडोद्यास आले होते, त्यावेळी ते त्यांचे मित्र, तेथील कॉलेजातील संस्कृतचे प्रोफेसर रा. आर्ते यांचे घरी उतरले होते. आर्तेसाहेब कासार जातीचे आहेत. तरीपण गुरुवर्यांचे जेवणखाण त्यांचे घरीच झाले. मी राजपिपळा येथे असताना दोन वेळ ते माझेकडे आले होते. त्यावेळी त्यांचे जेवण आमच्याबरोबरच उघडपणे झाले. माझ्या जुन्या विचारांच्या ब्राह्मण स्नेह्यांस हे त्यांचे वर्तन फार चमत्कारिक वाटले. त्यांपैकी काहींनी त्यास म्हटले की आपण वेदशास्त्रसंपन्न विद्वान, सुचिर्भूत ब्राह्मण असून, असले धर्मबाह्य वर्तन करता त्यास काय म्हणावे ? त्यांनी शांतपणे उत्तर दिले की ' ब्राह्मणांनी परभाकडचे अन्न ग्रहण करू नये असे मला अद्याप शास्त्रात कोठे आढळले नाही. तसे ज्या दिवशी आढळेल त्या दिवशी तसे करणे मी वर्ज्य करीन.' अशा सडेतोड उत्तराने त्यांनी त्यास निरुत्तर केले. मराठ्यांचे राज्य बुडण्यास जी अनेक कारणे झाली त्यात आपसातील जातिमत्सर हे एक मुख्य कारण होते असे ते नेहमी म्हणत व तो गेल्याशिवाय आपली ऊर्जितावस्था पुन्हा येणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. वेदोक्त कर्मासंबंधी, बडोदे, कोल्हापूर वगैरे ठिकाणी जो कडाक्याचा वाद चालला होता त्यात ब्राह्मणांचा पक्ष दुराग्रहाचा आहे अशी त्यांची समजूत होती, म्हणून त्यांनी मराठ्यांच्या मुलांच्या मुंजी वेदातील मंत्रांनी करण्याच्या कामात पुढाकार घेतला व कोल्हापूर वगैरे ठिकाणी तशा मुंजी स्वतः लावल्या. ' सत्याअसत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता ' हे तुकाराम महाराजांचे वचन त्यांना फार आवडत असे. व त्या वचनाप्रमाणे आचरण करण्याचा त्यांचा निर्धार होता. अस्पृश्यांविषयी त्यांच्या मनात फार सहानुभूती होती. एकनाथासारख्या संतांचे पुण्यतिथीस ते अस्पृश्यास फराळास बोलावीत. त्यांची एकुलती एक कन्या सुभद्राबाई हिने आपले व्रत पुढे चालवावे अशी त्यांची इच्छा होती व तीस ह्या कार्यासाठी तयार करण्याचा उपक्रमही त्यांनी केला होता. परंतु निर्घृण काळाने तिच्यावर बालपणीच झडप घातली. त्यांचे सर्व मनोरथ जागचेजागीच राहिले.

श्रुतिस्मृत्यादि धर्मग्रंथांविषयी त्यांच्या मनात आदर होता. पण त्यांच्या आज्ञांचे पालन करताना सारासार विचारास अजिबात फाटा देणे इष्ट

नाही असे त्यांचे मत होते असे मला वाटते. तसेच आपले मताचे पुष्टचर्थ त्यांचा भलताच अर्थ करणे त्यांना मुळीच आवडत नसे. म्हणून दयानंद सरस्वती ह्यांनी केलेल्या वेदातील काही ऋचांच्या अर्थाची ते केव्हा केव्हा थट्टा करीत. आमच्या वर्गातील विद्यार्थ्याने एखाद्या कवितेचा भलताच अर्थ केल्यास ते हसून ' हा दयानंदी अर्थ झाला ' असेसुद्धा म्हणत.

स्त्रियांविषयी त्यांचे मनात असणारा आदर हेही त्यांचे एक वैशिष्टच होते. स्त्रियांना वेदाध्ययनाचा पूर्ण अधिकार आहे असे ते प्रतिपादीत. पारशाप्रमाणे हिंदू मुलींची मुंज करण्यास मुळीच प्रतिबंध नाही असे त्यांचे मत होते व तसे करण्याची कोणाची तयारी असल्यास उपाध्यायाचे काम आपण मोठ्या आनंदाने करू असे मजजवळ म्हटल्याचे मला आठवते. कालिदास व भवभूति या दोघात श्रेष्ठ कोण हा प्रश्न आमचे वर्गात एकदा निघाला, त्यावेळी भवभूति निःसंशय श्रेष्ठ असे त्यांनी आपले मत दिले. ते म्हणाले, ' भवभूतीची स्त्रीविषयीची भावना फारच उदात्त दिसते. उदाहरणार्थ मालतीचे भाषण घ्या.

**ज्वलतु गगने रात्रौ रात्रावखंडकलः शशी ।**
**दहतु मदनः किंवा मृत्योः परेण विधास्यति ।**
**ममतु हि सदाश्लाघ्यस्तोते जनन्यमलान्वया ।।**
**कुलममलिनं न त्वं वायं जनो नच जीवितम् ।**

' कोठे वरील भाषणात दाखविलेला बाणेदारपणा व कोठे पित्याचे गैरहजेरीत चोरून प्रणयपत्रिका लिहिण्याचे शकुंतलेचे अश्लाघ्य वर्तन ?' कालिदासाची दृष्टी स्त्रीजातीच्या गुणांपेक्षा बाह्यसौंदर्यावरच अधिक होती असे ते एकदा म्हणाले. ' अपि स्वदेहात्किमुतेन्द्रियार्थाद्यशोधनानां हि यशो गरीयः ' असे म्हणणाऱ्या कालिदासास स्त्रीची खरी योग्यता कळलीच नव्हती असेही ते एकदा म्हणाले होते, असे मला वाटते.

स्वभाषा, स्वधर्म, स्वराज्य, वगैरेसंबंधाने आपले विचार भावी पिढीला कळावे व तिची सर्वांगीण उन्नती व्हावी ह्या उदात्त हेतूने त्यांनी नवी शाळा काढली. शिक्षणप्रसाराचे कार्यात आपणास पूर्ण स्वातंत्र्य असावे, दुसऱ्या कोणाची ढवळाढवळ नसावी म्हणून त्यांनी सरकारी ग्रँट अथवा दुसरी कोणतीही कोणापासून मदत मिळविण्याची तजवीज केली नाही. पुढे

कॉलेजचे उच्च शिक्षण देण्याची हळूहळू व्यवस्था करावी म्हणजे आपला हेतू अधिक चांगल्या रीतीने सफल होईल असे त्यांना वाटू लागले व न्यायमूर्ती रानडे यांचे साहाय्याने युनिव्हर्सिटीकडून कॉलेजातील पहिल्या वर्षाचे शिक्षण देण्याची परवानगीही त्यांनी मिळविली होती. ह्या नवीन निघणाऱ्या क्लासास मी गणित विषय शिकवावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु दुर्दैवाने थोड्याच दिवसात प्लेगचा कहर सुरू झाला व गुरुवर्यांच्या ह्या योजनेला मूर्तस्वरूप त्यावेळी आले नाही. लवकरच न्यायमूर्ती निधन पावले व पुन्हा सर्व स्थिरस्थावर होते तो गुरुवर्यांची इहलोकीची जीवनयात्राही संपली.

मुंबईतील मराठा हायस्कूलप्रमाणे इतर ठिकाणीही लोकमताला इष्ट वळण लावण्याकरिता शाळा स्थापाव्या अशी त्यांची मनीषा होती. व त्याप्रमाणे सोलापूर येथे एक शाळा काढली होती. केसरी वर्तमानपत्रात धनुर्धारी ह्या टोपण नावाने लेख लिहून प्रख्यात झालेले टिकेकर ह्यांच्याकडे ह्या शाळेचे चालकत्व त्यांनी सोपविले होते, असे मला वाटते. परंतु दुर्दैवाने ही शाळा फार दिवस चालली नाही. मी त्यावेळी गुजराथेत दूर असल्यामुळे, कारणे काय झाली ते मला समजले नाही. कदाचित ती प्लेगला बळी पडली असेल. अत्यंत साधी राहाणी हे त्यांचे दुसरे एक वैशिष्टच होते. त्यांचा पोशाख फारच साधा होता. त्यात छानछोकीचा गंधही नव्हता. शेवटपर्यंत त्यांनी आपल्या पोशाखात कधीच बदल केला नाही. शक्य तोपर्यंत स्वदेशी वस्तूच वापरण्याचा त्यांचा निर्धार होता. व इतरांनीही तसेच करावे अशी त्यांची इच्छा होती. घरी ते आपले लिहिण्या-वाचण्याचे काम दिवसा ओटीवर झोपाळ्यावर बसून करीत. हातात कागद धरून तासचे तास त्यास कसे लिहिता येते याचे मला नेहमी नवल वाटे.

आणखी एका वैशिष्टयाचा उल्लेख करावा असे वाटते. हे वैशिष्टय म्हणजे सर्व देशातील व सर्व धर्मातील सत्पुरुषांविषयी त्यांचे हृदयात वसत असणारा आदर हे होय. मुसलमान संत व ख्रिस्ती संत ह्याविषयी ते नेहमी आदर प्रदर्शित करीत. झेविअर कॉलेजातील फादर लोकांचे निष्काम, निःस्वार्थ कर्तव्यतत्परतेचे ते कौतुक करीत व त्यांचे आपले लोकानी अनुकरण करावे असे ते नेहमी म्हणत. ह्यासंबंधाने त्यांची दृष्टी फार उदार

होती. देवाचे द्वारी सर्व सारखे, तेथे आपपर भाव नाही त्यांनी मला सांगितलेले चांगले आठवते.

ह्या सर्वगुणसमुच्चयामुळे त्याच्या मुद्रेवरील किंचित उग्रता व त्यांच्या बोलण्याचालण्यात केव्हा केव्हा दिसून येणारा तऱ्हेवाइकपणाही दूर सारून त्याच्या विशाल हृदयापर्यंत जे जे जाऊन पोहोचले, त्या त्या सर्वांस त्याच्याविषयी पराकाष्ठेचा आदर व पूज्य बुद्धी वाटल्याशिवाय रहात नसे. अशा महात्म्याच्या निकट परिचयाचा लाभ मला काही वर्षे मिळाला हे मोठे महद्भाग्य असे मी समजतो व त्या महात्म्याचे पुण्यस्मृतीस ही अल्प पुष्पमाला मी भक्तिभावाने अर्पण करतो.'

**शास्त्रीबोवांचा निःस्पृहपणा** :–शास्त्रीबोवा ब्राह्मणेतरांचे कैवारी आणि मराठ्यांच्या इतिहासाचे भोक्ते आहेत. हे जाणून कोल्हापूर दरबाराने त्यांच्याकडून कोल्हापूरच्या राजघराण्याचा इतिहास लिहून घ्यायचे ठरविले. त्याप्रमाणे शास्त्रीबोवांना पाचारण गेले. शास्त्रीबोवा कोल्हापुरास गेले. त्यांना दप्तर दाखविण्यात आले. ज्यावेळी पुस्तकाच्या धोरणाबद्दल विचारविनिमय करण्यात आला तेव्हा सरकारांचे असे म्हणणे पडले की दप्तरातल्या निवडक व अनूकुल गोष्टी घेऊन त्यावरच शास्त्रीबोवांनी लिहावे. पण शास्त्रीबोवा कसले ! हे अर्धवट लिहिणे मला होणार नाही. खरे असेल तेच लिहीन, असे सांगून ते चालते झाले.

कोल्हापूरच्या शाहू महाराजांना मराठ्यांच्या मुंजी करण्याची कल्पना पसंत होती. पण शास्त्रीबोवानी मराठ्यांबरोबर महारांच्याही मुंजी करणे अगत्याचे आहे असे सांगितले तेव्हा शाहूमहाराज तयार झाले नाहीत.

बडोद्याचे कै. सयाजीराव महाराज शास्त्रीबोवांचे चाहाते होते. शास्त्रीबोवांची विद्वत्ता आणि समाजहिताविषयीची कळकळ त्यांच्या कानी गेली होती. शास्त्रीबोवांकडून काही उपयुक्त काम करून घ्यावे ह्या उद्देशाने महाराजांनी त्यांना आमंत्रण पाठविले. शास्त्रीबोवा राजवाड्यात ठरलेल्या वेळी गेले. आतल्या दालनात महाराज बसले होते. एक बंद सोडलेला आंगरखा, मोठा सुती फेटा आणि बरेच वर नेसलेले जाडेभरडे धोतर, अशा वेषात शास्त्रीबोवांनी बाहेरच्या दालनात प्रवेश केला, तेव्हा तेथे असलेल्या नोकराने त्यांना हटकले. तो त्यांना आत सोडीना. तेव्हा धिमेपणाने पण

मोठ्याने शास्त्रीबोवांनी उत्तर केले, ' ठीक आहे. हा मी चाललो. महाराजांना कळवा की मी आलो होतो. माझं नाव राजाराम रामकृष्ण भागवत ' असे म्हणून शास्त्रीबोवा परत फिरले. इतक्यात शास्त्रीबोवांचे ते उद्‌गार कानी पडून महाराज स्वतः बाहेर आले व नोकराला हटकून शास्त्रीबोवांना आदराने आत घेऊन गेले. पुढे ' कैसरकडून सुलतानाकडे, ' ह्या पुस्तकाचे काम त्यांनी शास्त्रीबोवांकडे सोपविले.

**शास्त्रीबोवांची एकाग्रता** :–शास्त्रीबोवा लेखनात किंवा वाचनात गढले असले म्हणजे त्यांना आजूबाजूला काय चालले आहे, त्याचा पूर्ण विसर पडे. ते मुंबईत गावदेवीला फ्रेंच पुलाजवळ राहत असत. शेजारी हाजी कासमच्या वाडीत (आजची राघववाडी) एक गिरण होती. तिला पहाटे आग लागली. घराच्या बाहेरच्या ओटीवर झोपाळ्यावर बसून शास्त्रीबोवा लेखनात गुंग झाले होते. ओटीच्या बाजूनेच वाडीतून बाहेर येण्याजाण्याचा रस्ता होता. लोकांची ही गर्दी व धावपळ सुरू होती. आग विझविण्याचे आटोकाट प्रयत्न चालले होते. पण शास्त्रीबोवांच्या हे गावीही नव्हते. लेखन संपल्यावर शास्त्रीबोवांनी बाजूला वळून पाहिले, तेव्हा कुठे त्यांच्या लक्षात आग लागल्याचे आले. ते संथपणे भावाकडे वळून म्हणतात, ' का रे रामभाऊ, आग लागली वाटतं ?'

**ब्राह्मणेतरांचे ऋण** :–' हिंदी पंच 'मध्ये जालंधरनाथ (कै. रा. ब. आनंदराव तालचेरकर) ह्या शास्त्रीबोवांच्या स्नेह्याने एक-दोन मजेदार आठवणी, त्यांच्या मृत्युलेखात खालीलप्रमाणे दिल्या आहेत.

एकदा शास्त्रीबोवा जालंधरनाथांच्या घरी गेले. नित्याप्रमाणे दोघांचा जातिभेदाबद्दल वाद सुरू झाला. दोघेही पुढारलेल्या विचारांचेच, पण शास्त्रीबोवा अधीऱ्या वृत्तीचे. तेव्हा वादात जालंधरनाथ चेष्टेने हसून शास्त्रीबोवांना म्हणाले, ' अहो शास्त्रीबोवा, जरा दमाने घ्या. हळूहळू बदल होतोच आहे. एकदम का कुठे सुधारणा होते ?'

इतक्यात जालंधरनाथांच्या कन्येने चहा आणून शास्त्रीबोवांना दिला. चहाचा पेला एका हातात, दुसऱ्या हातात बशी चहाने अर्धी भरलेली. शास्त्रीबोवांची मान झटक्याने हलली. ' छट, छट ! भलतंच काही तरी. हळूहळू का कुठे सुधारणा होते. त्याला क्रांती पाहिजे क्रांती. ' शास्त्रीबोवा

हातवारे करून म्हणाले. बशीतला चहा लवंडला आणि शास्त्रीबोवा भानावर येऊन हसू लागले.

एकदा जालंधरनाथ शास्त्रीबोवांच्या घरी आले. ओटीवरल्या झोपाळ्यावर शास्त्रीबोवा विराजमान झाले होते. हातात तुकारामाची गाथा होती. आणि भोवती अशिक्षित कुणबी लोकांचा गराडा पडला होता. तारस्वराने शास्त्रीबोवा त्यांना संतवचनांचे मर्म समजावून देत होते. जालंधरनाथ आले आणि क्षणभर त्या मेळाव्याकडे पाहून त्यांनी चेष्टेने शास्त्रीबोवांना म्हटले, 'काय शास्त्रीबोवा, आज काय सावकारी वसूल करण्याकरिता ही कुळं गोळा केलीत की काय ' ' नाही रे बाबा. तसं काही नाही. उलट ह्यांचंच शेकडो वर्षांचं ऋण मी थोडसं फेडतो आहे, इतकंच. '

**व्यक्तिविषयक** :–काही तत्कालीन व्यक्तिसंबंधाने व त्यांच्या कार्यासंबंधाने शास्त्रीबोवांची वृत्ती कशी काय होती ह्याचे अनुमान पुढे दिलेल्या चुटक्यांवरून सहज कळून येईल.

१८९५ साली सामाजिक परिषद काँग्रेसच्या मंडपात नेहमीप्रमाणे भरवावी की नाही ह्या बाबतीत समाजधारीणात बराच वाद माजला. शास्त्रीबोवांचे मत विचारले तेव्हा शास्त्रीबोवांनी उत्तर दिले, 'माझी वैयक्तिक मते काहीही असोत. ह्या बाबतीत जिकडे रानडे–भांडारकर तिकडे मी. '

१८९३ साली प्रार्थनासमाजाचे एक संस्थापक नारायण महादेव परमानंद वारले. त्या सुमारास 'सुबोधपत्रिके'त कोणाचा तरी एक असा लेख प्रसिद्ध झाला की परमानंदाचे स्मारक म्हणून जनतेकडून निधी जमवून एक कॉलेज काढावे. त्यावेळी शास्त्रीबोवांनी आपले मत असे दिले की 'साहेबाच्या नावाने काढा की आता जमतील पैसे. परमानंद कितीही मोठे असले तरी त्यांच्या नावाने आज कॉलेज निघणे शक्य नाही.'

प्रा. श्रीधरपंत भांडारकर ह्यांनी 'Is Marathi Literature worth the name ?' म्हणून 'सुबोधपत्रिकेत' एक लेख लिहिला. त्याला आव्हान म्हणून शास्त्रीबोवांनी 'आमची देशी भाषा विद्यापीठी शोभण्यासारखी आहे की नाही' म्हणून एक व्याख्यान दिले. एवढेच नव्हे तर आदल्या दिवशी शास्त्रीबोवांनी भांडारकरांना एक कार्ड लिहून कळविले की,

'तुम्हाला आज उत्तर देणार आहे. हजर राहा.'

**सत्यप्रेम** :–शास्त्रीबोवांचा सत्याविषयीचा ध्यासदेखील काही विलक्षण होता. आपणच नव्हे तर ज्याचा ज्याचा म्हणून आपल्याशी संबंध येईल, त्याने त्याने खरे बोलले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असे. धोबी सांगतो त्या वेळी कपडे हजर करीत नाही, तो खोटे बोलतो. तेव्हा आपल्यामुळे त्याला खोटे बोलायचा प्रसंग येऊ नये म्हणून पांढरे कपडे टाकून शास्त्रीबोवांनी रंगीत अंगरखा व फेटा बांधायचे ठरवले. रंगारी देखील कबूल केल्या दिवशी कपडे रंगवून देईना. तेव्हा हतबुद्ध होऊन शास्त्रीबोवा उद्‌गारले, 'काय रंगारी देखील खोटे बोलतो ?'.

**स्मरणशक्ती** : शास्त्रीबोवांची पुस्तके, कागदांची बंडले वगैरे सर्व सामान एका भिंतीच्या मोठ्या कोनाड्यात ठेवलेले असे. वर्षानुवर्षे ते एकाच स्थितीत होते. वर धूळ साचली होती. त्या सामानाला हात लावण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती. पण सामानाचे ते हाल न पाहावल्यामुळे एक दिवस ते बाहेर गेलेले पाहून त्यांच्या पत्नीने पुस्तके वगैरे काढून धुरळा साफ काढून टाकला. नंतर ती पुस्तके पूर्वी होती तशीच अगदी तंतोतंत लावून ठेवली. मग काम मनासारखे झालेले पाहून ती आपल्या उद्योगाला लागली. शास्त्रीबोवा घरात आल्याबरोबर त्यांना तो फरक ताबडतोब जाणवला. त्यांनी एक पुस्तक चाळले. लगेच त्यांनी पत्नीला बोलावून 'माझ्या पुस्तकांना का हात लावला' म्हणून विचारले. तिने 'फार धूळ साचली होती म्हणून जरा झाडलं. सर्व सामान अगदी जसंच्या तसं आहे' असे उत्तर दिले. शास्त्रीबोवांनी तिला पुढे बोलू न देता म्हटले, 'ह्या पुस्तकात १९१ पानावर वीस वर्षांपूर्वी मी खूण घालून ठेवली होती ती कुठे आहे.?'

**मुलीचा मृत्यू** : आपले दुःख आपण सोसायचे, ते कुणाला दाखवायचे नाही, असा शास्त्रीबोवांचा बाणा होता. मृत्यूच्या प्रसंगी शोक करू नये, त्याने मृताच्या आत्म्याला कष्ट होतात अशी त्यांची भावना होती. १८९८ सालची गोष्ट. त्याची एकुलती एक कन्या सुभद्रा वारली. त्या वेळेस त्या मृत्यूची गंधवार्ताही नसल्यामुळे शास्त्रीबोवांचा एक विद्यार्थी (सॉलिसिटर सवनीस) त्यांच्याकडे गेला. समोर जे काही दिसले त्याने स्तिमित होऊन तो तेथेच खिळल्यासारखा उभा राहिला. त्याने पाहिले तो अंगणात प्रेतयात्रेची तयारी

चालली होती. शोकाला पारावर नव्हता. पण ओटीवरील झोपाळ्यावर शांतपणाने शास्त्रीबोवा लेखनात गढून गेले होते. जणू काय काहीच झालेले नाही. सर्व आटोपल्यावर एकाने सगळे काही झाले अशी शास्त्रीबोवांना वर्दी दिली. शास्त्रीबुवा उठले. मुलीचे शेवटले दर्शन घेताना 'काय सुभा, चाललीस ?' एवढेच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले. दुसऱ्या क्षणी शास्त्रीबुवा फिरून आपल्या कामात गुंग झाले. मुलीच्या मृत्यूने त्यांच्या मनाला किती घायाळ केले होते हे श्वेताश्वराच्या प्रस्तावनेवरून सहज दिसून येते. पण मनोनिग्रह दांडगा !

**गरीब विद्यार्थ्यांविषयी जाण :**

माझ्या वडिलांनी सांगितलेली एक आठवण फार महत्त्वाची आहे. माझे आजोबा कै. बाळाजी आबाजी भागवत हे जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर होते. माझ्या वडिलानाही मॅट्रीकच्या वर्गात गेल्यावर ती शिष्यवृत्ती आपण मिळवावी असे वाटले. त्यांनी अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यावेळी राजारामशास्त्री भागवतांनी त्यांना हाक मारली आणि सांगितले की 'तू या शिष्यवृत्तीसाठी अभ्यासाचे फार कष्ट करून आपली शक्ती आताच वाया दवडू नकोस. या शिष्यवृत्त्या गुणदर्शक असल्या तरी त्या गरीब मुलांसाठी असतात. तुझे वडील मातबर वकील आहेत, तेव्हा तू एका गरीब मुलाच्या भविष्यावर गदा आणू नको. आयुष्यात कठीण प्रसंग येतात. तर तुझी शक्ती त्या प्रसंगाना पुरून उरावी म्हणून राखून ठेव. गरिबांना कष्टाखेरीज दुसरा पर्याय नसतो.' माझे वडील म्हणाले, 'स्पर्धेच्या भिकार क्षेत्रातून मला वाचवल्याबद्दल आणि कठीण प्रसंगासाठी मानसिक शक्ती राखून ठेवण्याबद्दल केलेल्या उपदेशाबद्दल मी तात्यांचा फार ऋणी आहे. म्हणूनच मी सत्तरी झाली तरी काम करू शकतो.'

शास्त्रीबोवा माझ्या वडिलांचे चुलत मामा लागत. त्यांच्याबद्दल माझ्या वडिलांना फार आदर असे. 'त्यांचं माझ्यावर फार ऋण आहे' असे ते म्हणत. शास्त्रीबोवांमुळेच सर्व तऱ्हेच्या संशोधन कार्यात माझ्या वडिलांना अपार रस होता. विद्येची निष्ठा ही अंतिम मानवी निष्ठा आहे असे ते म्हणत.

**बाहुल्या**:–माझी आत्या सीताबाई भागवत पदवीधर झाली. नाशिकच्या सरकारी शाळेत मुख्याध्यापिका असताना ती १९२९ साली वारली. ती लहान असताना शाळेत जाताना फार रडायची. माझ्या आजीला त्यामुळे तिला रागवावे लागे. प्रसंगी मारावे काय असाही प्रश्न तिच्यापुढे उभा राहिला. शास्त्रीबोवांच्या कानी हे प्रकरण गेल्याशिवाय राहिले नाही. त्यांनी सीताबाईला बोलावले आणि म्हणाले, 'सीता, तू शहाणी आहेस. शाळेत जा. तू न रडता गेलीस तर मी तुला रोज एक नवी भावली आणून देईन. जाशील ना ?' ती आनंदाने हो म्हणाली. तोंड वाकडे करून पण न रडता रोज शाळेत जाऊ लागली. संध्याकाळी तात्या (शास्त्रीबोवा) तिच्या हाती रोज एक नवी बाहुली ठेवू लागले. सीताबाईचा बाहुल्यांचा संग्रह खूप मोठा झाला होता.

**जिना चढणे**:–घरातली एक सासुरवाशीण माझ्या आजीच्याच वयाची. आजीच्या मावसबहिणीची ती सून होती. एकदा ती दडदड करीत जिना चढून आली. शास्त्रीबोवानी तिला हाक मारली. ती थांबली. ते म्हणाले, 'सगुणा, जिना असा चढू नये. पुरुषानी पण असं दडदड करीत चालू नये. मग मुलीनी तर नाहीच. मी शिकवतो जिना कसा चढाउतरायचा ते.' असे म्हणून खूप जलद पण पाय न वाजवता शास्त्रीबोवानी जिना चढण्याचे प्रयोग आमच्या त्या काकूला करून दाखवले. ही हकीगत ती आम्हाला वारंवार सांगायची म्हणून मला आठवते.

'त्यानंतर मी मांजरासारखी पाय न वाजवता कसं चालायचं ते शिकले. तात्या रागावले नाहीत हो.' असे ती ही हकीगत सांगताना म्हणायची.

**भाज्या**:–शास्त्रीबोवाना भाजी बाजारात जाऊन दुर्मिळ आणि त्यातल्या त्यात गरीब ब्राह्मणेतर वर्गात ज्या भाज्या मुंबईत विशेष करून खातात त्या आणायचा नाद होता. माचोळ ही एक खारी समुद्रकाठची वनस्पती आहे. दिला माशासारखा वास येतो. तेव्हा ब्राह्मणांच्या घरात तिला कुठून थारा मिळणार ? पण शास्त्रीबोवा ती मुद्दाम आणायचे. माचोळाचे दही घातलेले भरीत त्यांना फार आवडायचे. वासोट्याची किंवा कोवळ्या कळकाची भाजी अशीच. हिलाही उग्र वास येतो. मुंबईला पाठारे प्रभु, चौकळशी, पाचकळशी सारस्वत वगैरे लोकांत या भाजीचे माहात्म्य फार.

शास्त्रीबोवा ही भाजीही आणायचे. पण माचोळाप्रमाणे ती रुळली नाही. माचोळही शास्त्रीबोवा गेल्यानंतर बंद झाला.

मलाही अशा भाज्या गोळा करायचा छंद आहे. माझी आजी म्हणायची ' तू एक त्या तात्यांसारखीच आहेस. हे नसते उपदव्याप आहेत.'

**नियमितपणा व कळकळ** :–शास्त्रीबोवांचा नियमितपणा वाखाणण्यासारखा होता. त्यांचे दैनंदिन व्यवहार घड्याळाच्या ठोक्याप्रमाणे चालायचे. आठवड्याची कामे पण दर दिवशी ठरविल्याप्रमाणे चालायची.

शास्त्रीबोवांचा कित्येक वर्षांचा एक नेम होता. एका ख्रिस्ती भिकाऱ्याला शनिवारी दुपारी ते न चुकता एक आणा देत. शास्त्रीबोवा शेवटचे आजारी पडले तो दिवस शनिवार होता. त्यांना बाहेर पडवत नव्हते. शास्त्रीबोवांना भिकाऱ्याची आठवण झाली. त्यांनी घरातल्या एक मुलास हाक मारून त्याच्या जवळ एक आणा दिला व म्हटलं, ' हा आणा धोबी तळ्यावर जाऊन, त्या भिकाऱ्याला दे. तो माझी वाट पाहत असेल.' पहाटेस त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

शास्त्रीबोवांच्या वेळी अशाच अनेक आख्यायिका त्यावेळी पसरलेल्या होत्या. आणि म्हणून त्यांना ' गृहस्थात साधू आणि साधूत गृहस्थ ' असे पुष्कळ जण म्हणत. आणि म्हणूनच गोविंदाग्रजांनी महाराष्ट्रीयांना बजावून सांगितले की दसरा जर खरोखर वीराप्रमाणे साजरा करायचा असेल तर ' भागवतांची धराच हिंमत.' हेच राजारामशास्त्री भागवतांच्या आयुष्याचे, आयुष्यातील धडपडीचे खरे रहस्य. आजूबाजूला विरोधाच्या वावटळी उठत होत्या. कार्याचे पाऊल प्रत्यक्ष पुढे पडत नव्हते. तरी शास्त्रीबोवांचे विचार दुर्दम्य विश्वासाने पुढे पुढेच धावत होते. आजची स्थिती फार वाईट आहे खरी. पण ती वाईट आहे म्हणूनच भविष्यकाळ उज्ज्वल येईल अशा श्रद्धेने त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. उद्योगाची कास धरली. आणि मृत्यूही त्यांना आकस्मिक आला. चार-आठ तासांच्या झटक्याने शास्त्रीबोवांनी जगातून प्रयाण केले.

३

# शास्त्रीबोवांची सामाजिक मते

शास्त्रीबोवांच्या मृत्यूनंतर त्यांची मते आणि त्यांचे सामाजिक कार्य यांचा जनतेस पुष्कळसा विसर पडला.

शास्त्रीबोवांचे सामाजिक लिखाण कितीतरी आहे. पण ते बहुतेक प्रासंगिक आहे; त्यात वादाचा चेव आहे, प्रतिस्पर्ध्यांना आव्हान आहे; अगदी क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीसुद्धा महत्त्वाच्या वाटून त्यावर दुतर्फी वर्तमानपत्रातून रणे माजलेली आढळतात. शास्त्रीबोवा पुनर्विवाहाला पहिल्याने बरीच वर्षे प्रतिकूल होते म्हणून सुधारकांची त्यांच्यावर इतराजी असे. बायकांच्या मुंजी, सहभोजन इत्यादि प्रकारांमुळे जुन्या मंडळींचाही हल्ला त्यांच्यावर होई. त्याचप्रमाणे प्रारंभी हिंदुधर्मासारखा उज्वल धर्म नाही हे 'हिंदुधर्म-विवेचकांत' अनेक ठिकाणी ज्या शास्त्रीबोवांनी म्हटले तेच शास्त्रीबोवा 'ऐतिहासिक गंजिफा'त त्या नकली धर्माची रेवडी उडवताना आढळतात, हे पाहून आचंबा वाटतो ! ही विसंगती कशामुळे झाली ? या मतांतराचे मूळ कशात आहे ? या विरोधाचा मेळ शास्त्रीबोवांच्या एकंदर कार्याशी कसा घालायचा याचाच विचार इथे करायचा आहे.

पहिल्यांदा एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही, की शास्त्रीबोवांच्या दुसऱ्या कुठल्याही मतात कितीही फरक पडला तरी एका बाबतीत मात्र त्यांची मते शेवटपर्यंत कायम राहिली. एवढेच नव्हे, तर ती उत्तरोत्तर अधिक उदार आणि प्रगतीपर होत गेली. या जातिभेदाच्या प्रश्नावरचे शास्त्रीबोवांचे विचार दूरवर व खोल गेले होते. त्यांच्या बुद्धीचा आणि भावनांचा कोपरान् कोपरा वर्णद्वेष कसा दूर करता येईल, जातीजातीत सलोखा

कसा निर्माण करता येईल, या विचारांनी सदैव भरलेला असे. त्यामुळे प्रश्न लग्नाचा असो नाहीतर आहाराबद्दलचा असो, तो शेवटी ह्या मोठ्या प्रश्नाला येऊन मिळायचा. त्यामुळे जातीबद्दलचा प्रश्न हा मुख्य आणि बाकी इतर सर्व विचार त्याच्याहून कमी दर्जाचे असे शास्त्रीबोवांच्या बाबतीत होई. एवढेच काय, पण या सर्व विचारांचे खत त्यांनी या एका मोठ्या विषयाला घालून त्याची शक्य तितकी जोपासना केली असे त्यांच्या सर्व लिखाणावरून वाटते. आणि म्हणूनच इतर विषयाबाबतींतले शास्त्रीबोवांचे विचार उडते व अपुरे वाटतात. विसंगतीही त्याचमुळे वाटते. पण जातिभेदाच्या मोठ्या विषयाचा विचार केला की ही विसंगती नाहीशी होऊन शास्त्रीबोवांच्या लेखनात सुसंबद्धता आढळते, खोल अर्थ दिसतो, जिव्हाळा दिसतो.

जातीय प्रश्नाबद्दल शास्त्रीबोवांची कशी भूमिका होती हे आता उघड झाले आहे. पण हा विषय त्यांनी कसा हाताळला आहे, त्याबद्दलचे त्यांचे विवेचन कोणत्या प्रकारचे आहे ह्याबद्दल थोडी चर्चा होणे आवश्यक आहे.

**चातुर्वर्ण्य आणि जातिभेद:–** शास्त्रीबोवांनी चातुर्वर्ण्यावर एकंदर तीन लेख लिहिले. पहिला लेख 'हिंदुधर्मविवेचकांत' १८८७ साली म्हणजे शास्त्रीबोवांची मते सुधारकी होण्यापूर्वी लिहिलेला आहे. दुसरा चातुर्वर्ण्य नावाचा अधिक विस्तृत लेख १८९६ साली 'विस्तारांत' आलेला आहे. तिसरा १९०२साली 'सुबोधपत्रिकेत ''चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्' ह्या मथळ्याखाली आला आहे. ह्या तीनही लेखांच्या कालमानातले अंतर लक्षात घेतले तर शास्त्रीबोवांची चातुर्वर्ण्यावरची श्रद्धा अचल होती हे आढळून येते. केवळ गीतेत कृष्णाने 'मी चातुर्वर्ण्य उत्पन्न केले आहे,' असे सांगितले म्हणून चातुर्वर्ण्य पाळायचे अशी मात्र त्यांची कधीच भावना नव्हती. समाजाची घडी नीट बसवण्यासाठी काही भाग पाडणे अवश्य असते. हे वर्ग संख्येने जितके थोडे तितकी त्या समाजाची शक्ति जास्त; व्यवहार सोपे व सरळ होण्याचा संभव पण जास्त. चार वर्गापेक्षा कोणत्याही समाजात कमी वर्ग असलेले हिंदू समाजाखेरीज इतर ठिकाणी आढळत नाहीत. फरक एवढाच की फार प्राचीन काळापासून आर्यांनी समाजाच्या वर्णभेदाची उघडपणे चर्चा केली. दुसऱ्या समाजात सर्व प्रकारचे भेद असूनही त्यांनी ते करायचे टाळले.

वेदांच्या काळी समाजाचे फक्त चार ठोकळ भाग होते त्यामुळे त्यात अठरापगड जातींचा बुजबुजाट नव्हता, खाण्या-पिण्याला अटकाव नव्हता; अनुरूप वधूवरांना एकत्र येण्याला अधिकच वाव होता. त्यामुळे बुद्धि, शौर्य, व्यवहारचातुर्य आणि सेवा ह्या चारही गुणांची जोपासना त्या त्या वर्णाच्या नियमाप्रमाणे चांगल्या तऱ्हेने केली जात असे. शास्त्रांतही मनुष्य जन्मतः शूद्र असतो, संस्काराने तो ब्राह्मण होतो असे म्हटले आहे. व्यास व वाल्मीकी हे जातीचे कोळी; पण तपाने त्यांना ब्राह्मणत्व आले. ज्या व्यक्तीत जो गुण असेल, त्याला समाजव्यवस्थेमुळे उठाव मिळू शकत असे. वर्ण केवळ जन्मावर नव्हे, तर कर्मावर अधिक अवलंबून होता. त्याचप्रमाणे अस्पृश्यतेचे जहर समाजात त्या काळी नव्हते. आणि म्हणूनच थोड्याबहुत फरकाने का होईना, प्रत्येक वर्ण आपापल्या परी अभिमानाने जगू शकत होता; दुसऱ्याला उपकाकरक होत होता. पण निर्भेळ चातुर्वर्ण्याचा काळ फार दिवस टिकला नाही. जातिभेद आत शिरला. सोनारांच्या पंधरा जाती तर शिंप्यांच्या सतरा असा प्रकार झाला. रोटीव्यवहार रोखला गेला. मग बेटीव्यवहार बोलायलाच नको ! आणि हे सर्व कशामुळे झाले ? तर पुराणकारांनी मूळ वदिक कलमात नसलेली कलमे पुराणात गोवली. मूळच्या कथांचा विपर्यास केला. भाकडकथा वाढल्या. धर्माच्या कळवळ्यापेक्षा रूढीबद्दलचा अभिमान बळावला. विचार आकुंचित झाले. मूळचा वैदिक धर्म किंवा ब्राह्मणी धर्म प्रसरणशील होता, त्यामुळे मोगल धर्माशी आणि पार्शी धर्माशी पण त्याचे तादात्म्य झाले. मग हिंदुस्तानातल्या सर्व धार्मिक विचारांना त्याने आत्मसात् केले असल्यास नवल ते काय ! त्यात चातुर्वर्ण्याच्या उदार व्यवस्थेमुळेच वैदिक कर्ममार्ग हिंदुस्थानभर फोफावला पण हा नवा पौराणिक धर्म अगदीच वेगळा पडला. त्यातल्या त्यात बौद्ध आणि जैन मतांची त्याच्यावर पुटे चढली. मग काय विचारता ? पहिल्याने खाण्यापिण्यात फरक पडला. मांस खाणाऱ्यांचा आणि ते निषिद्ध मानणाऱ्यांचा असे तट पडले. ब्राह्मणांनी मूळचा आहार बदलून धान्याहार पत्करला. येथपासून सोवळे ओवळे सुरू झाले. विटाळाच्या कल्पना रूढ झाल्या. यानंतरची दुसरी पायरी म्हणजे छोट्या छोट्या असंख्य जाती निर्माण झाल्या. विचार आणि आचार भिन्न झाले. इकडे मुसलमानी सत्ता प्रबळ होत चाललीच होती; तिच्या तेजात

हिंदूचे ब्राह्मतेज लुप्तप्राय होण्याची वेळ आली. इतक्यात काय झाले पहा! शंकराचार्यांनी पुन्हा उपनिषदांच्या धर्माला उजाळा दिला. शबरस्वामींने कर्ममार्गाचें पुनरुज्जीवन केले. त्यानंतर भक्तिमार्गाची प्रचंड लाट देशभर कोसळली. महाराष्ट्रात मुकुंदराय, ज्ञानेश्वर ह्यांनी भागवत धर्मांच्या द्वारे समतेची तत्त्वे लोकांपुढे मांडली. पण शिवाजीसारखे राज्यकर्ते आणि संत-कवीसारखे प्रचारक मिळूनसुद्धा जातिभेद मोडला नाही! जातिभेद मोडण्याला शास्त्रीबोवांनी तीन मुख्य उपाय सुचवले आहेत ते असे:–(१) समाजाचा धर्म वैदिक धर्मासारखा प्रसरणशील आणि भागवतधर्मासारखा समानतेचा पुरस्कर्ता असावा (२) सर्वांचा आहार सारखा असावा. मांसाहार निषिद्ध नाही, हे त्यांनी 'न मांस भक्षणे दोषः' ह्या लेखात सांगितले आहे. पूर्वी ब्राह्मण मांस खात होते. त्यांच्या आहारामुळे खाण्या-पिण्याच्या बाबतीत तरी उच्चनीचपणाची भावना नव्हती. आजच्या ब्राह्मणांनी तेच केले तर हा भेद पुष्कळसा कमी होईल. 'ऐतिहासिक गंजिफा' आणि मऱ्हाठ्यांसंबंधाने चार उद्गार' ह्या ग्रंथात असे उद्गार शास्त्रीबोवांनी वेळोवेळी काढले आहेत (३) पोटजातीत विवाह झाले तर मोठमोठ्या जाती तरी एकवटतील असे शास्त्रीबोवांनी म्हटले आहे. मिश्रविवाहाबद्दल मात्र त्यांनी काहीच मत प्रदर्शित केलेले दिसत नाही. त्यांच्या काळी पोटजातीतच लग्ने होण्याचा पूर्ण अभाव मग मिश्र विवाहाचा प्रश्न तर दूरच राहिला. जातिभेदाच्या प्रश्नाइतके दुसरे दोन प्रश्न शास्त्रीबोवांच्या जिव्हाळ्याचे होते. पहिला 'विवाहाचा,' 'स्त्रियांचा पुनरुद्वाह' 'विवाह व लग्न' आणि 'उपनयन व विवाह' हे त्यांचे लेख खूप गाजलेले आहेत. विवाहाच्या प्रश्नावर शास्त्रीबोवांनी फारच थोडे लिहिले; पण लिहिले ते वेचक. मुद्देही अगदी मोजके. पुनर्विवाह सशास्त्र आहे की नाही, पोटजातीत विवाह होणे किती जरुरीचे आहे, खरा वैदिक विधीच तेवढा अवश्य, बाकी लग्नातले सोहाळे अनाठायी आहेत, हेच त्यांनी पुन:पुन्हा बजावून सांगितले आहे.

राहता राहिला शिक्षणाचा प्रश्न. विद्यार्जनात आणि विद्यादानात शास्त्री-बोवांनी आयुष्य खर्ची घातले. स्वतःची शाळा काढली. विद्यार्थ्यांकरिता निरनिराळ्या विषयांवर लहानमोठी पुस्तके लिहिली. ती फुकट वाटली. पण

खुद्द शिक्षणपद्धतीवर मात्र त्यांनी एकाच लेखात आपले विचार प्रगट केले आहेत. ते इतके जाज्वल्य आणि अद्यावत् आहेत, की ते त्यांच्याच शब्दांत सांगितलेले बरे. 'आमचे इंग्रजी शिकलेले लोक काय करीत आहेत? सुधारणा की समुन्मूलन?' या लेखात शास्त्रीबोवा म्हणतात–

'नवीन इंग्रजी शिकलेल्या विद्वान् लोकांचे अलीकडे खासगी शाळाकडे बरेच लक्ष लागले आहे व त्यांना त्याबद्दल बरीच कृतार्थता वाटत आहे. जरी पुण्यातील नवीन शाळेप्रमाणे १००० विद्यामंदिरे झाली तरी ती खासगी कसली? जोपर्यंत ती सरकारचे वर्षासन घेताहेत व जोपर्यंत त्या शाळांतील मुले– मग ती १२०० असोत की १४०० असोत– परीक्षेतून पार पडल्यानंतर सरकार आपणास चाकरी देईल या आशेने शिकत आहेत, तोवर असल्या प्रकारच्या विद्येचा प्रसार अस्थिर होय. उद्या सरकारने म्हटले, की बी. ए. व्हा, अगर एम्. ए. व्हा, आम्ही तुम्हास पाच रुपयांचीसुद्धा नोकरी देणार नाही; असे झाले की आटोपली आमची विद्यामंदिरे व शाळा फार थोड्या वेळात...हल्ली विद्याभ्यास देशात कोणता चालला आहे? तर सरकारवर अवलंबून राहणारे विद्यापीठ जो ठरविते तो. त्यामध्ये लोकांचा संबंध फार परिमित आहे...आज आमच्या देशातील विद्याप्रसार म्हणजे येथील विद्यापीठ नेमील त्या पुस्तकातील विद्येचा प्रसार होय. वास्तविक पाहता कोणत्याही देशात विद्याप्रसार म्हणजे उत्तमोत्तम ग्रंथांच्या ज्ञानाचा प्रसार व ते वाचण्याची लोकात अभिरुची उत्पन्न झालेली अगर केलेली. यासंबंधाने हल्ली आमच्यात फारच उणीव आहे...देशातील विद्वान् व शहाण्या लोकांत अशी काही तजवीज शोधून काढली पाहिजे, की तिच्या योगाने जरी सरकारने सर्व आश्रय नाहीसा केला, बी. ए.ला व एम्. ए.ला पाच रुपयांचीसुद्धा नोकरी नाकारली तरी देशात सुरू असलेल्या शाळास वगैरे बिलकुल धोका येता उपयोगी नाही...'

'आपल्या राष्ट्राचा कदाचित नाश होईल व राजांचे आपापसातील कलह माजून भारतबाह्य यवनांचे व म्लेंच्छांचे राजकीय प्रावल्य होईल असे जेव्हा त्यांनी (आमच्या मोठमोठ्या दूरदृष्टी ऋषींनी) पाहिले, तेव्हा त्यांना वाटले की खरोखर आर्यराष्ट्र थोड्याच दिवसांत यवनांच्या तडाख्यात सापडणार. ग्रंथांचा अभ्यास भारतीय प्रजेत सरकारी आश्रयावाचून कसा

चालेल हा प्रश्न उद्भवला व त्याची त्यांनी हरएक तऱ्हेने तजवीज करून ठेवली ती ही, की वर्णचतुष्टयापैकी ब्राह्मणांवर ते ओझे लादले. या वर्गाने, पाहिजे तशी आपत्ती येवो, तरी वेदशास्त्राचे अध्ययन-अध्यापन करावे असे असे कडक नियम केले. त्यांना हल्लीच्या प्रोफेसराप्रमाणे ६००-६०० रुपये नव्हते; परंतु निदान त्यांच्या निर्वाहाची तजवीज व्हावी म्हणून निरनिराळी व्रते, नित्यनैमित्तिक, लग्नमुंजीसंबंधाने जे रात्रंदिवस वेदशास्त्राचा अभ्यास करणारे त्यांना दक्षिणाभोजन इत्यादी मिळावे असे नियम केले...या नियमांमुळे मुसलमानांनी समूळ ग्रंथ जरी जाळले व हिंदूंच्या विद्येचा उच्छेद हरएक तऱ्हेने जरी करण्याचा त्यांनी यत्न केला तरी तो सिद्धीस गेला नाही. परकीय व परधर्मी मुसलमानांच्या कारकीर्दीत हिंदुविद्येच्या हजारो, लाखो शाळा स्वतंत्र चालल्या होत्या, परंतु इंग्रजी विद्येचा प्रसार झाला व पाद्री लोकांनी 'भटांनी दक्षिणा उपटण्याचे आपस्वार्थी नियम केले' वगैरे जेव्हा लेख लिहिले तेव्हा आमच्या सुधारलेल्या लोकांनी त्या मतांचा प्रचार जारी केला. पुणे शहरात दहा हजारांपेक्षा जास्ती इंग्रजी शिकत आहेत. तरी सर्वांची उडी नोकरीवर. असले लाखो विद्वान् झाले तरी त्यापासून देशास काय फायदा? तात्पर्य, लोक नोकरीच्या इच्छेने अभ्यास करतात. असे शेकडो विद्यास्नातक येथील विद्यापीठातून निघत आहेत. तरी वर लिहिलेल्या कारणाने त्यांच्या हातून व्हावा तसा मुळीच त्यांच्या विद्येचा लोकांस फायदा मिळत नाही. शिवाय चाकरीत व कुटुंबभरणात गुंतल्यामुळे त्यांच्या हातून पुढे अभ्यासही होत नाही, त्यामुळे देशास जसे विद्वान् पाहिजेत तसे ह्या चाकरलोकातून विद्वानही मिळत नाहीत.'

□

## ४

# धर्मविषयक लेख

' जर आजचे ब्राह्मण पूर्वीच्याच ब्राह्मणांचे खरे वंशज मानावे तर जसे पूर्वीचे ब्राह्मण क्षत्रियांची आणि वैश्यांची मुंज करीत, तशी आजच्याही ब्राह्मणांस ती करावी लागणार. जर आजचे आर्य पूर्वीच्याच आर्यांचे खरे वंशज, तर पूर्वीचे आर्य जसे व्रात्यांसारख्या अनार्यांस आपणामध्ये ओढीत, तसे आजचेही आर्य जो विधर्मी असेल त्यास स्वधर्मी करून आपणांमध्ये ओढण्यास कंबर बांधलेले पाहिजेत–'

' व्रात्यस्तोम ' – राजारामशास्त्री भागवत.

शास्त्रीबोवांची खरी बुद्धिमत्ता त्यांच्या संशोधनात्मक लिखाणात दिसून येते. त्यांचे संशोधन मुख्यतः वेदांचा, विशेषतः ऋग्वेदाचा, अभ्यास व धर्म ह्यावर आधारलेले आहे. त्यांचे वेदांवरचे बहुतेक लेखन संशोधनाच्या स्वरूपाचे व धार्मिक कळवळ्याने झालेले असले तरी त्यांचे धर्मविषयक लेखन मात्र अधिक प्रचारकी थाटाचे आणि भावनात्मक आहे. ' विचार-माधुकरी 'सारख्या विषयात शास्त्रीबोवांनी संशोधनास अनुकूल असा भावनांचा संयम राखला आहे; त्यांच्या ' पार्स व पार्सी धर्म, ' ' मोगल व मोगली धर्म ' ह्या लेखात हीच तटस्थ वृत्ती पुष्कळ आढळते. पण शास्त्री-बोवांचा हे लेख लिहिण्यामागचा खरा हेतु ' केवळ जिज्ञासापूर्ति ' हा नसून सामाजिक व धार्मिक सुधारणा हा होता. ह्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांचे निव्वळ धार्मिक लेख कोणते व संशोधनात्मक लेख कोणते ह्यांचे वर्गीकरण करणे सोपे काम नाही. एवढे मात्र खास सांगता येते की शास्त्री-बोवा प्रत्यक्ष व्यवहारात वेदांसंबंधीच्या किंवा त्यांसारख्या संशोधनात्मक

लिखाणाला धार्मिक लिखाणापेक्षा गौण मानीत. उदाहरणार्थ, मराठ्यांच्या धर्माविषयी शास्त्रीबोवांचा पेशा पूर्णपणे प्रचारकी किंवा वारकरी बाण्याचा होता. महाराष्ट्रातील संतकवीचे पोवाडे मुक्तकंठाने गाताना शास्त्रीबोवा वेद व उपनिषदे ह्यांची महती विसरून जात; व म्हणत की आमच्या संतकवीच्या काव्यात काय नाही ? वेद आहे, उपनिषदे आहेत, भारत, रामायण, भागवत– सारे काही आहे. त्यांनी सांगितलेला धर्म कळला म्हणजे वेदातला, उपनिषदातला धर्म आपोआपच कळला. वेदांचा अभ्यास करायचा, पण तो आजच्या सर्व व्यवहारांना व्यवस्थित रूप आणण्यासाठी आणि पुराणांनी जी देवधर्माची खुळे पसरविली ती मोडण्यासाठी; अस्पृश्यता, जातिभेद आणि शिवाशिवीचे आचरट प्रकार थांबविण्यासाठी. वेदांच्या अभ्यासाचा सर्वांत मोठा फायदा हा की त्यांच्या आधाराने आपल्याला सनातन व शुद्ध अशी वर्णाश्रमांची पद्धत फिरून आचरता येईल अशी शास्त्रीबोवांची भावना शेवटपर्यंत होती. त्याचप्रमाणे पार्शी व मोगली धर्मांची सूक्ष्म बुद्धीने छाननी करतानासुद्धा ते धर्म मूळच्या वैदिक धर्माशी कसे संलग्न आहेत ते शास्त्रीबोवाना सुचवायचे होते. महाभारतातल्या वेगवेगळ्या कथानकांचा उहापोह करतांनासुद्धा मूळच्या शुद्ध आणि सात्त्विक अशा ' ब्राह्मणी धर्माचे ' स्वरुप विशद करून आणि तितकाच दांभिक असा ' भिक्षुकी किंवा भेटी ' धर्म ह्यांवर वेळोवेळी कोरडे ओढले आहेत.

शास्त्रीबोवांच्या धार्मिक भूमिकेची व त्यांच्या बदललेल्या मतांची छाननी करणे हे फार बिकट काम आहे. त्यांच्या धर्मविषयक लेखांचे सार थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येईल :–

(१) श्रुती व स्मृती ह्यात सांगितलेला धर्म खरा हा धर्म आहे. परंतु तो आज महाराष्ट्रात त्याच स्वरूपात रूढ नाही. महाराष्ट्रीयांच्या पूजा-अर्चा ' पौराणिक ' रूढीप्रमाणे चालत आल्या आहेत. आणि त्यांचे तत्त्वज्ञान व ईश्वराबद्दलच्या भावना संतमंडळींनी घडविल्याप्रमाणे आहेत. भक्ती हा महाराष्ट्राचा आत्मा आहे.

(२) मूर्तिपूजा गौण असली तरी शास्त्रविहित असून उपयुक्त आहे. निदान भक्तिमार्गात ' पहिले पाऊल ' म्हणून तिचे महत्त्व निःसंशय फार आहे. ह्या

बाबतीत शास्त्रीबोवांचा प्रार्थनासमाजाशी व ख्रिस्ती मिशनऱ्यांशी कडक विरोध होता. ' हिंदुधर्मविवेचका 'तील ' संतमंडळी ' ह्या लेखमालेत एका ठिकाणी शास्त्रीबोवा असे म्हणतात की, ' संतमंडळींचे जसे आज आमच्या देशावर व लोकांवर उपकार झालेले आहेत तसे कोणत्याही मंडळींचे कोणत्याही देशावर किंवा लोकांवर झालेले नाहीत. हल्ली मऱ्हाठ्यांस उपनिषदांची गरज नाही, शांकरभाष्याची गरज नाही व संस्कृत भाषेचीही नाही; ज काही संस्कृतात उपयोगाचे होते, ते सर्व संतमंडळीने ऊर्फ सन्मणिमालेने आमच्या प्रिय मऱ्हाठी भाषेत सुधारणा करून प्रतिबिंबवून ठेवले आहे. जसे महाराष्ट्रातील ब्राह्मणांचे ह्या कामी आम्हा मऱ्हाठ्यांवर उपकार झाले आहेत तसेच ब्राह्मणेतरांचेही झाले आहेत. त्यामुळे जसे महाराष्ट्रातील ब्राह्मणांचे तसे ब्राह्मणेतर जातींचे आम्ही उपकार मानावे, व ते मानीतही आहो. आम्हा मऱ्हाठ्यांमध्ये जे ब्राह्मण आहेत ते तुकारामबाबांचा जितका मान ठेवितात तितकाच ब्राह्मणेतर लोक ज्ञानेश्वरांचा ठेवितात. जी भेदबुद्धी आम्हा शेकडा नव्याण्णव मऱ्हाठ्यामध्ये नाही तिचा उगीच आमच्यावर आरोप करून किंवा तिचा आलंब करून जर ब्रह्मद्वेषाची शंका येण्याजोगी नामधारी ख्रिस्ती लोकांसारखी कामे न कराल व त्यांच्या वर्तमानपत्रातून किंवा मासिक-पुस्तकांतून क्षणभंगुर पैशाचा लोभ करून आमच्यातील फूट वाढविण्यासारखे लेख न लिहाल तर फार उत्तम होईल. जर कोणासही ख्रिस्ती धर्म खरोखरी देवदत्त वाटत असला तर त्याने खुशाल ख्रिस्ती व्हावे. आम्ही हिंदू त्याच्या आड कधीही येणार नाही. पण बाबांनो, हिंदू म्हणवून केवळ दुराभिमानाने हिंदू धर्माची टर करण्यासाठी म्हणून ख्रिस्ती पत्रांबरोबर संबंध ठेवणे योग्य नाही. जर मूर्तिपूजा ही अगदी पहिली पायरी असे तुम्हांस वाटत असले तर ती तुम्ही करू नका, व अधिकार असल्यास खुशाल अगदी वरच्या पायरीवर बसून उंच ठिकाणची हवा खा. पण मूर्तीपूजा करणे हा देवप्राप्तीचा मार्ग नव्हे असे म्हणून मात्र महाराष्ट्रमंडळापुढे मोठ्याने शंखध्वनी करू नका. मऱ्हाठ्यांचे पूर्वज– जसे ब्राह्मणांचे तसेच ब्राह्मणेतरांचे– मूर्तिपूजेची व भक्तीची सांगड घालून देवास मिळविते झाले. तेव्हा ज्या वेळी आपल्या वंद्य व स्मरणीय पूर्वजांस ब्राह्मण व ब्राह्मणेतर मऱ्हाठे अगदी विसरतील त्या वेळी मूर्तिपूजानिषेधकांचे फावेल. पण तो

दुर्दिन येण्यास अजून अगणित वर्षे गेली पाहिजेत, व तो दुर्दिन येऊ नये म्हणून मऱ्हाठे तरी भगीरथ प्रयत्न करण्यास सोडणार नाहीत. पुढे देवाची इच्छा. पण ' प्रयत्नीं परमेश्वर ' हे मऱ्हाठ्यांस नीट अवगत आहे... आमच्या संतमंडळींस देव मिळाला नाही असे म्हणण्याची कोणाचीही छाती नाही. ज्या रस्त्याने गेल्यास तोच देव आम्हास निःसंशय मिळेल. सारांश, आम्हा अस्सल मऱ्हाठ्यांस व आम्हांबरोबर दरोबस्त अस्सल हिंदूंस देव धुंडाळण्याची गरज नाही. ज्या कोणास इतरत्र देवास धुंडणे असेल त्याने खुशाल धुंडावे. पण तसले मत अस्सल मराठ्यांमध्ये किंवा हिंदूमध्ये मुळे धरील असे कोणास वाटत असेल तर मात्र ती आम्ही चूक समजतो.'

(३) वेदात गंधर्व, किन्नर, नाग इत्यादिकांचे उल्लेख वारंवार आले आहेत. शास्त्रीबोवांनी ' विचारमाधुकरी 'त हे प्राणी स्वर्गीय नसून हिमालयाच्याच आसपास वस्ती करून राहिलेली माणसेच होती, हे उपपत्तीच्या आधाराने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तरी पण अतिमानुष किंवा ' दैवी सृष्टी 'वर शास्त्रीबोवांचा विश्वास होता. ही सृष्टी मानवी सृष्टीपेक्षा उच्च असून मानवी सृष्टीप्रमाणेच देवास शरण जाते अशी त्यांची भावना होती. शास्त्रीबोवा ईश्वरावर दृढ श्रद्धा ठेवणारे होते. त्यामुळेच ईश्वर व आत्मा ह्याबद्दल सदैव साशंक असणाऱ्या बौद्ध व जैन धर्मांबद्दल त्यांना वैषम्य वाटे.

शास्त्रीबोवांनी धर्मग्रंथांचा हा जो सारासार अभ्यास केला तो केवळ स्वतःची ज्ञानाची भूक भागवण्याकरता नव्हे; तसेच त्यांनी ह्या विषयावर लेख लिहिले तेही काही भाविकपणाने किंवा उपदेशकी आव आणून लिहिले नाहीत. रानडे, भांडारकर ह्याप्रमाणे 'धर्मपर' व्याख्याने अगर लेख शास्त्रीबोवांनी कधीच लिहिले नाहीत. त्यामुळे त्यांचे धर्मविषयक लेख लोकहितवादीप्रमाणेच तात्त्विक आणि विवेचक आहेत. ' संतांनी सांगितले त्यापेक्षा आपण ईश्वराबद्दल काय निराळे किंवा अधिक चांगले सांगणार ' अशी शास्त्रीबोवांची मनोभूमिका असल्यामुळे त्यांनी जुनेच उतारे अधिक खुलासेवार लोकांपुढे ठेवले. 'ज्ञानेश्वरी महासागरातील बुड्या', 'भगवद्गीतेतील बुड्या ' इत्यादी लेख व एकनाथ, तुकाराम इत्यादिकांची चरित्रे शास्त्रीबोवांची ही वृत्ती स्पष्ट करून दाखवतात. शास्त्रीबोवांची वृत्ती अशी शेवट-

पर्यंत राहण्याचे मुख्य कारण म्हणजे वेदांच्या, संतवाङ्मयाच्या आणि इतिहासाच्या आधाराने त्यांना आपल्या अस्सल परंपरेला न सोडता महाराष्ट्रीय समाजाची विस्कटलेली घडी नीट बसवावयाची होती. महाराष्ट्रातील जातींचे परस्परसंबंध, लग्नाचे खरे शुद्ध स्वरूप, विधवाविवाह इत्यादि अनेक सामाजिक प्रश्न जुन्या वाङमयाच्या आणि प्रचलित रूढी आणि बोलभाषा ह्यांच्या साहाय्याने ते पडताळून पाहत होते.

धर्मासंबंधी शास्त्रीबोवांच्या लेखनात मोठे मतान्तर दिसून येते ते असे की ' हिंदुधर्मविवेचका ' च्या अंकात १८८५ साली त्यांना तात्त्विक दृष्टया हिंदुधर्मात काहीच वावगे दिसत नव्हते, एवढेच नव्हे तर हिंदु धर्मासारखा उदारमतवादी धर्म नाही हे त्यांनी त्यांची अंगे व उपांगे पडताळून प्रतिपादिले आहे. ' श्रुति, स्मृति, पुराणे व शिष्टाचार ' ' इतिहास (रामायण व महाभारत), ' ' चातुर्वर्ण्य ' ' चातुराश्रम्य, ' ' अवतार, ' ' सांख्यशास्त्र,' ' योगशास्त्र ' आणि ' संध्या ' इत्यादी लेखांत ह्याच वृत्तीचा सूर उमटलेला आहे. या वेळेस शास्त्रीबोवा हिंदुधर्म व हिंदूंच्या चाली ह्यांच्यांकडे भेदक दृष्टीने पाहत नव्हते. ' हिंदुधर्मविवेचका ' चा अवतार त्या वेळी महाराष्ट्रात वाढत चाललेले धर्मांतराचे खूळ मोडून काढण्याकरता होता. ' कुटुंबमित्र ' व ' ज्ञानोदया 'ला ते जाहीर आव्हान होतं. ' शिमग्याचा सण ' ह्या आपल्या लेखात शास्त्रीबोवा स्पष्टपणे म्हणतात की पाद्री लोकांस खूष करण्याच्या भरीस बळी पडू नका. आमचा धर्म आणि आमचे नाव समूळ नाहीसे होईपर्यंत त्यास चैन पडावयाचे नाही. ते हसत राहणारच. याकरिता तुम्ही आपल्या दृष्टीने आपला विचार करा. आपण परतंत्र झालो आहोत म्हणून सर्वसंगपरित्याग करून नित्य उदासीन होऊन रडत बसण्यापासून काही उपयोग नाही. ' हाल मे ख्याल, ख्याल मे खुशाल ' हीच वृत्ती धरली पाहिजे. तात्पर्य, चालू शिमग्याला अत्याचार आणि किंचित दुराचार दिसतो तो वजा केला असता बाळगोपाळांस व राजारंकास सारख्या रीतीने रमविणारा दुसरा उत्तम सणच नाही.'

पुढे रानडयांचे व शास्त्रीबोवांचे साहचर्य वाढले. आणि झेविअर कॉलेजमध्ये अध्यापकांचे काम करीत असता व्यासंगाला अधिक अवसर सापडून शास्त्रीबोवांच्या धार्मिक मतात पालट होऊ लागला. आता त्यांना

पूर्वीचे चातुर्वर्ण्य आवडले तरी अस्पृश्यता डोळ्यांना सलू लागली. स्त्रियांस वेदाधिकार नाही हे शल्य खुपू लागले. त्याचप्रमाणे स्त्रियांना पुनर्विवाहास मोकळीक ठेवू नये हे बरे वाटेना. ह्याच वृत्ती अखेर बळावत जाऊन त्यांनी हिंदुधर्म हा अधर्म आहे असे न कचरता लिहिले व महाराष्ट्रधर्माचा पुरस्कार पूर्वीपेक्षाही दुप्पट जोराने केला. त्यांचा रोख सर्व हिंदूत समतेच्या तत्त्वाप्रमाणे रोटीबेटीव्यवहार का होऊ नये ह्यावर होता. ' मी ब्राह्मण आहे पण हिंदू नाही ' असे ते म्हणत.

परंतु त्यांच्या मतान्तराचा आढावा घेताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की वर शास्त्रीबोवांच्या धार्मिक मताची जी तीन सूत्रे दिली आहेत ती मात्र प्रारंभापासून अखेरपर्यंत अढळ होती, व त्यांच्याच अनुरोधाने शास्त्रीबोवांच्या इतर मतांची छाननी करणे सोपे झाले.

त्यांच्या मुख्य धर्मविषयक लेखांचे विवेचन थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल—

**महाराष्ट्र धर्म**— शास्त्रीबोवांच्या लोकप्रिय झालेल्या धर्मविषयक लेखात ' महाराष्ट्रधर्मा 'ची गणना प्रामुख्याने होते. शास्त्रीबोवांचे धार्मिक लेख त्या वेळच्या परिस्थितीस उद्देशून लिहिले असले तरी आजच्या बदललेल्या काळीही वाचकास विचारोन्मुख करण्याचे सामर्थ्य त्यांमध्ये आहे. एकीकडे ख्रिस्ती धर्म, एकीकडे प्रार्थनासमाजाचा धर्म आणि एकीकडे आर्यसमाजाचा धर्म अशा तीन लाटात शिक्षित महाराष्ट्र समाज हेलखावे खात असताना सशास्त्र हिंदूधर्म व त्याची महाराष्ट्रात झालेली परिणती ह्याचे विवेचन शास्त्रीबोवांनी ह्या लेखात केले आहे. धर्मभावना ही सर्वांत श्रेष्ठ भावना अशी शास्त्रीबोवांची श्रद्धा असल्यामुळे एक प्रकारच्या भाविक कळकळीने त्यांनी हा लेख लिहिला आहे. ह्या लेखाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात ब्राह्मणांच्या वैदिक व औपनिषदिक किंवा ' कर्मठ ' व ' वेदांती ' धर्माचे निरूपण करून बौद्ध व जैन धर्मांच्या प्रसारामुळे ह्या मूळच्या धर्माचा कसा लोप झाला हे दाखविले आहे. कुमारिल व शंकराचार्य यांनी या दोन मार्गांचा जीर्णोद्धार आपापल्या परीने कसा केला तेही ह्या भागात दाखविले आहे. शंकराचार्यांच्या चळवळीतूनच भगवद्गीतेला उर्फ भक्तिमार्गाला प्राधान्य मिळाले. रामानुजानेही भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. दुसऱ्या

भागात ' भगवद्‌गीते'वर असलेल्या भागवती धर्माचे उर्फ ' महाराष्ट्र धर्मा ' चे विवेचन केले आहे. ह्यात अनुक्रमे मुकुंदराय, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, इत्यादी संतांच्या कार्याचे वर्णन करून इतर प्रांतातील संतांच्या कामगिरीमधील फरक स्पष्ट दाखविला आहे. ' महाराष्ट्र धर्मा ' चे शास्त्रीबोवांच्या मते हेच वैशिष्टय होते की त्यात ब्राह्मण-शूद्र हा भेद नव्हता. व दुसरे म्हणजे रामदास-शिवाजी ह्यांच्या कर्तबगारीमुळे अध्यात्मिकाची सांगड ' दर्बारी धर्मा 'स जसा जिवंतपणा आला तसा दुसऱ्या प्रांतातल्या धर्मांना आला नाही.

**ब्राह्मणी धर्म व भटी धर्म**– शास्त्रीबोवांच्या वेळी गाजलेला असा त्यांचा लेख ' ब्राह्मणी धर्म व भटी धर्म ' हा होय. ' हेमंत व्याख्यानमालेत हा लेख पहिल्याने पुढे आला. ह्या व्याख्यानाचा मूळ उद्देश शास्त्रविहित धर्म व भिक्षुकांनी रूढ केलेला धर्म ह्यातील तफावत दाखवून ब्राह्मणी धर्माचे महत्त्व हल्लीच्या काळी प्रत्यक्ष व्यवहाराने कसे पटवता येईल ते दाखविण्याचा होता. ब्राम्हणी हा शब्द शास्त्रीबोवांनी जातीचा द्योतक म्हणून वापरला नसून शास्त्रशुद्ध आचरण करून ईश्वरभक्ती करणाऱ्यास लावला आहे. चोखामेळ्यास ते ब्राम्हण म्हणतात.

ब्राह्मणी धर्माचे शास्त्रीबोवांनी दोन भाग पाडले आहेत. पहिला वैदिक, कर्मठ किंवा रूढ भाषेत बोलायचे झाल्यास कर्मकांडाचा. ह्यात वैदिक याग व पुढे मीमांसेचा समावेश होतो. बौद्ध व जैन धर्माच्या प्रसारामुळे यज्ञयाग बंद पडले व कर्मठ ब्राह्मणधर्म लुप्तप्राय झाला. पुढे त्याचे पुनरुज्जीवन शबरस्वामी व कुमारिलभट्ट यांनी केले. ह्या दोघांनी ज्या सुधारणा केल्या त्यांचे थोडक्यात विवेचन शास्त्रीबोवांनी केले आहे. ह्या सर्वांत महत्त्वाची सुधारणा म्हणजे स्त्रीस यज्ञाधिकार आहे आणि धर्मात तिचे स्थान पुरुषाच्या बरोबरीचे आहे हा सिद्धान्त होय. ह्यांच्याच आधाराने स्त्रीला उपनयनाचा अधिकार पोचू शकतो असे शास्त्रीबोवांनी प्रतिपादन केले आहे. ह्या कर्मठ ब्राह्मणी धर्माचे शास्त्रीबोवांनी जे सार काढले आहे ते असे:–

( १ ) चातुर्वर्ण्य म्हणजे हल्लीचा क्षुद्र व संकुचित जातीभेद नव्हे.

चातुर्वर्ण्य गुणांवर अवलंबून होते. चातुर्वर्ण्यात रोटी–बेटीव्यवहारास आडकाठी नसे.

( २ ) उपनयन ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तिन्ही वर्णांत होत असे. विशीच्या आत लग्न शास्त्रविहित नाही.

( ३ ) यज्ञयागात मांसाहार अवश्य असे. उलट कांदा लसूणासारख्या वनस्पति निषिद्ध असत, हल्लीचे भक्ष्याभक्ष्यप्रकरण शास्त्रसंमत नाही.

ब्राह्मणी धर्माच्या दुसऱ्या शाखेचे नाव वेदान्त किंवा उपनिषदांचा धर्म. ह्या धर्माचा जीर्णोद्धार शंकराचार्यांनी केला. हा धर्म आत्मशुद्धी व विरक्ती ह्यावर अधिष्ठित झालेला आहे. हा जातिभेदाच्या व लिंगभेदाच्या पलीकडचा असून थोडयांसच साध्य आहे. ही विद्या ज्यांना साध्य आहे तेंच फक्त ब्राह्मण. बाकीचे सारे कृपण किंवा ब्राह्मणेतर होत. ह्याप्रमाणे पुरातन ब्राह्मणी धर्माचे विवेचन करून हल्लीच्या बालविवाह, जातिभेद, भक्ष्याभक्ष्य इत्यादी खुळचट कल्पना ज्यात रुढ झाल्या आहेत त्या धर्माला शास्त्रीबोवांनी भटी धर्म असे नाव दिले आहे. धर्माचे विवेचन करताना शास्त्रीबोवांना ' हिंदु धर्म ' ह्या शब्दाचे वावडे आहे ते पूर्वीच्या धर्माला ब्राह्मणी धर्म व हल्लीच्या धर्माला भटी धर्म किंवा ' नकली धर्म ' म्हणतात...

**ब्राह्मण म्हणविणारास सवाल–** ब्राह्मण म्हणवणारास सवाल हे त्याचे ' हेमंतव्याख्यानमाले ' तलेच दुसरे एक व्याख्यान अधिक प्रासंगिक असून वरील मतांचेच प्रतिपादन करणारे आहे. पहिल्या व्याख्यानापेक्षा हे अधिक कडवट असून त्याने त्या काळी समाजात वादाच्या अनेक वावटळी उठल्या.

**पार्स व पार्सी धर्म–** ' पार्स व पार्सी धर्म ' आणि ' मोगल व मोगली धर्म ' ही ' हेमंतव्याख्यानमाले 'तील दोन व्याख्याने त्यातील विषयाच्या नावीन्यामुळे म्हणा किंवा ते धर्म हिंदू लोकांना परके वाटत असल्यामुळे म्हणा किंवा त्यात प्रचलित चालीरीतीविरुद्ध कोठेच टीका नसल्याने म्हणा त्या काळी लोकप्रिय झाली होती. ' पार्स व पार्सी धर्म ' ह्या निबंधांतील आधुनिक पार्श्यांच्या पूर्वजांची उत्पत्ती आणि धर्म यांविषयी चर्चा केली आहे. वेद आणि द्रुहचुस्चा शिलालेख ह्यामधील विधाने आधारभूत म्हणून धरलेली असली तरी शब्दसाम्यामुळे झालेली व्युत्पत्ती आणि अनुमाने

ह्यांवरच ह्या लेखाची उभारणी झाली आहे. आणि म्हणून संशोधनाच्या दृष्टीने त्याला फार महत्त्व देता येत नाही.

'पार्स' हा शब्द शास्त्रीबोवांनीच कल्पिलेला आहे. द्रुह्यसने दिलेला 'पर्सु' शब्द आणि वेदातील 'पारशव' आणि 'पर्शु' शब्द ह्यापासून शास्त्रीबोवांनी 'पार्स' असा शब्द निघण्यास हरकत नाही असे ठरविले. एवढेच नव्हे तर 'पार्स,' 'पृथु' (पार्थेनियन) व 'पल्हव' (पेहलवी-पासून निघालेला शब्द) हे एकाच गटातील लोक असून मागून वेगळे झाले असे दाखविले आहे. द्रुह्यस हा पार्सांचा राजा. पार्सांचा धर्म मूर्तिभंजक होता. पार्स लोक नद्या, डोंगर, अग्नी इत्यादि देवतांची पूजा करीत; त्यांची दैवते देवर्निर्मित होती, मनुष्याने तयार केलेली नव्हती.

पल्हवांच्या पैगंबराचे नाव 'जरतोस्त' असून 'अर्देसर' देवतेचे माहात्म्य ह्या लोकात फार होते.

अवेस्ता भाषेचे अध्ययन केलेले शास्त्रीबोवा हे त्या वेळचे पहिलेच हिंदू विद्वान.

**मोगल व मोगली धर्म**– 'मोगल व मोगली धर्म' हा लेख वरील लेखा-प्रमाणेच आहे.

मोगलांचे दोन प्रकार होते. एक अस्सल मोगल. हे मूर्तिपूजक होते. ह्यांच्या धर्मावर मुख्य पगडा श्रमण संस्कृतीचा होता. श्रमण व ब्राह्मण ह्यांचे आचार परस्परविरोधी असले तरी व्रतवैकल्ये करून इष्ट देवतेची कृपा संपादन करणारे दोघेही होते. त्यामुळे वेगवेगळ्या लोकात दोघांनाही वर्चस्व मिळाले. श्रमणी धर्म तार्तरीत सर्वत्र पसरला होता. हाच मोगलांचा मूळचा देश. ह्याशिवाय 'लामा' किंवा बौद्धधर्माचादेखील थोडासा परिणाम मोगलांवर झाला होता. हे मोगल सहिष्णु असून 'चेंगिझ' हा त्यांच्यामध्ये सर्वांत मोठा पुरुष होऊन गेला. सर्व धर्म सारखे आहेत ही शिकवण त्याने प्रथम अंमलात आणली. मोगलांच्या देवता बुरणुसाच्या व रेशमाच्या असत. आणि त्यांना नैवद्य दाखविल्याशिवाय मोगल अन्न घेत नसत. दुसरे मोगल हे वरील मोगलापासून विभक्त झालेले म्हणजे अविंध होत. ह्या दोघांमध्ये धर्मासंबंधी वारंवार युद्धे होत. हे मूर्तिभंजक होते.

**उपनिषदे**– शास्त्रीबोवांनी अकरा उपनिषदे, इंग्रजी व मराठी भाषान्तरे

व चर्चात्मक प्रस्तावना यासहित तयार करण्याचे ठरविले होते. परंतु 'ऐतरेय' व 'श्वेताश्वतर' ही दोनच त्यांना पुरी करता आली.

शास्त्रीबोवांचा उपनिषदांचा अभ्यास श्रद्धेवर आधारलेला आहे. ज्ञानाचे पावित्र्य, आचरणातील शुद्धता आणि अढळ भक्ती हे तीन गुण अंगी बाणावयास पाहिजे असतील तर उपनिषदांचे अध्ययन जरूर केले पाहिजे अशी त्यांची भावना होती. पण हे अध्ययन पारंपरिक अंधश्रद्धेने न होता जिज्ञासापूर्वक साधकबाधक विचाराने झाले पाहिजे असे त्यांना वाटे. उपनिषदांच्या प्रस्तावनेत शास्त्रीबोवांची भूमिका स्पष्ट दिसून येते.

**ऐतरेयोपनिषद्–** शास्त्रीबोवांनी ह्या उपनिषदातले मांडलेले महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत : (१) ह्या उपनिषदातील सृष्टयुत्पत्तीची कथा व बायबलमधील त्याच विषयावरील कथा ह्यांची तुलना. बायबलमधील ईश्वराची कल्पना अधिक कोती व संकुचित आहे, कारण उपनिषदात ईश्वरीच्या 'मी करीन' ह्या संकल्पानुसार सर्व ब्रह्माण्ड एकाच वेळी एकदम निर्माण झाले; तर बायबलप्रमाणे आकाश, उजेड इत्यादी तत्त्वे वेगवेगळी गरजेप्रमाणे ईश्वराने 'उत्पन्न होवोत' म्हटल्यावर निर्माण झाली. (२) अन्नावर प्राणन अवलंबून आहे, जीवन नाही. सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास अन्नावर देहाचेच व्यापार काय ते चालू शकतात. जीवनात आध्यात्मिक विकासाचा अंतर्भाव होतो. (३) मनुष्याची योग्यता जनावराहून जास्त असण्याचे कारण असे की, 'जो जीवात्मा भौतिक सृष्टीवर अंमल चालविणारा आहे तो परमात्म्याच्या अंश आहे. परमात्म्याचा जीवरूपी अंश आठ लोकपाळाच्या आठ अंशांनिशी आत वसत असल्यामूळे मानवी प्राण्याची योग्यता बाकीच्या प्राण्यांहून कितीतरी पटीने अधिक आहे. (४) प्रज्ञा ही मानवाला मिळालेली अमोल देणगी असून तिला 'जगाचे नेत्र' म्हटले आहे. (५) ब्रह्मा, इंद्र इत्यादी देवता दुय्यम दर्जाच्या असून ईश्वर सर्वांत श्रेष्ठ आहे.

**श्वेताश्वतर–**'श्वेताश्वतरोपनिषद्' तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने 'ऐतरेया–' पेक्षा वरचे ठरते. ह्या उपनिषदाच्या प्रस्तावनेत शास्त्रीबोवांनी मीमांसा व पुराणे ह्यांची तुलना केली आहे. मीमांसेत विचारीपणा व समंजसपणा ह्यांची परा-

काष्ठा झाली असून पुराणात मात्र भाकडकथा व असंबद्ध प्रलाप ह्यांवरच जास्त भर दिला जातो असे त्यानी म्हटले आहे. मागच्या उपनिषदाप्रमाणेच ह्याही प्रस्तावनेत शास्त्रीबोवांनी ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म आणि ‘श्वेताश्वतरा’चा बाणा ह्यांबद्दल मार्मिक चर्चा केली आहे. तिचा सारांश असा: ‘श्वेताश्वतरां’त प्रशान्तपणा ज्याच्या अंगी असेल त्यालाच ही विद्या शिकवावी असे म्हटले आहे. मुसलमान ह्या शब्दाचा अर्थ ‘शांती असलेला’ असा आहे व ख्रिस्तास तर ‘शांतीचा राजा’ म्हणतात. तेव्हा मुसलमानां-प्रमाणे आणि ख्रिस्त्यांप्रमाणे त्या त्या धर्माची पायरी ‘श्वेताश्वतरा’च्या वरची आहे असा आक्षेप त्यांच्याकडून येण्याचा संभव आहे. शास्त्रीबोवा ह्या आक्षेपाचे खंडन करताना असे म्हणतात की सुंता किंवा बाप्तिस्मा अशा कोरड्या संस्कारांपासून प्रशान्तपणा येऊ शकतो असे म्हणणे निवळ खोटे आहे. शांतपणा हा जात्याच माणसाच्या अंगी असावा लागतो. शांती ही परमेश्वरी देणगी आहे. तिचा लाभ सर्वांच्याच नशिवी नसतो. स्वाभाविक शांतपणा हा काही व्यक्तीत उघड, तर काहीत सुप्तावस्थेत असतो. प्रयत्नान्ती ज्याचा शांतपणा जागृत होऊन टिकाऊ होऊन राहण्याचा संभव असेल त्यालाच ‘श्वेताश्वतरी’ अमोल विद्या ग्रहण करता येईल.

‘श्वेताश्वतरा’च्या तत्त्वज्ञानात मुख्यत्वे पुढील मुद्यांचा समावेश होतो. (१) अंतर्यामी आत्मा हा जीवाचा सोबती आहे. तो सर्व जाणतो, सर्व पाहतो. (२) जे देवास ओळखण्याचा यत्न करीत नाहीत ते दुःखात बुडतात.

थोडक्यात सांगायचे म्हणजे शास्त्रीबोवांना भक्तिमार्गाशी संलग्न झालेला ब्राह्मणी धर्म जगातल्या सर्व जातींना, संस्कृतींना एकत्र कवटाळून धरण्या-इतका विशाल आहे असे वाटे. पार्स व पार्शी धर्म, मोगल व मोगली धर्म या त्यांच्या लेखात हेच ध्वनित झाले आहे. व्रात्यस्तोम या लेखाने त्या मताला अधिक पुष्टी मिळाली आहे.

□ □

५

# वाङ्मयसेवा

लेखक ह्या दृष्टीने शास्त्रीबोवांची भूमिका कोणत्या प्रकारची होती ह्याबद्दलचे विवेचन ' जीवनकथा ' ह्या प्रकरणात आलेच आहे. परंतु सतत पस्तीस वर्षे शास्त्रीबोवांनी जो विद्याव्यासंग केला त्याचे अधिक खुलासेवार परीक्षण होणे जरूर आहे. कारण एक तर समकालीनाकडून त्यांच्या उत्कृष्ट गणल्या जाणाऱ्या वाङमयाचीही फार उपेक्षा झाली, व दुसरे म्हणजे बऱ्याच वर्षांत त्यांच्या वाङमयाकडे कुणी अभ्यासू दृष्टीने न पाहिल्यामुळे त्यांचे लिखाण किती आहे व कुठे कुठे प्रसिद्ध झाले आहे हे समजण्यासदेखील मुष्कील पडते. शास्त्रीबोवांच्या लिखाणाची प्रचंड जंत्रीच ह्याची साक्ष आहे. त्यांच्या काही लेखावर (विविधज्ञानविस्तारांतील ' मराठेशाही ' ' विचार माधुकरी ' इत्यादी) अजिबात नाव नाही, तर काहींवर ' एक भगवद्‌भक्त ' ('पंचजनविचार '– ' ज्ञानेश्वरी महासागरातील बुड्या ' इत्यादी ' विविधज्ञानविस्तारातील ' लेख) किंवा ' ब्राह्मण आहे, पण हिंदु नव्हे ' रा. रा. भा. (' ऐतिहासिक गंजिफा '– दीनबंधु) अशी विविध व तऱ्हेवाइक टोपणनावे आढळतात. लिहिण्याचे विषय तर अनंतच. भाषा, धर्म, इतिहास व संशोधनपर असे त्यांच्या लिखाणाचे चार ठोकळ भाग पाडता येतील. सामाजिक चालीरीतींवर त्यांनी लिहिलेल्या टीका, ' धर्म ' ह्या सदराखालीच घालावयास काही हरकत नाही. कारण शास्त्रीबोवांची समाजसुधारणा धर्मसुधारणेवर मुख्यत्वे अवलंबून होती.

शास्त्रीबोवा बहुभाषी होते. कोणतीही भाषा असो, एकदा तिच्यात काहीतरी विशेष आहे असे वाटले म्हणजे पुरे; लागलेच शास्त्रीबोवा ती

शिकण्याच्या नादी. ह्या नादाच्या भरात त्यांनी पुस्तु भाषाही पठाणांशी बोलण्याचा सराव ठेवून थोडीफार हस्तगत केली होती. मराठी ही त्यांची मायभाषाच पडली व तिच्याबद्दल शास्त्रीबोवांना जिव्हाळाही फार वाटे. त्याशिवाय गुजराती व हिंदीही ते जाणत. देशी किंवा प्रांतीय भाषांना त्या वेळी विश्वविद्यालयात मुळीच शिरकाव नव्हता. त्याबद्दल शास्त्रीबोवांनी वेळोवेळी प्रांतीय भाषांचे सांस्कृतिक महत्त्व विद्यालयीन शिक्षणक्रमात किती आहे हे लेखाच्या व व्याख्यानांच्या द्वारे लोकांच्या पुढे मांडले. जातिभेदावर तर त्यांना तो मोठा तोडगा वाटे. संस्कृत व तदनुषंगिक प्राकृत भाषा (पाली सोडून) त्यांना अवगत होत्या. प्राकृत वाङ्मयाची महती गाणारा भरतवर्षातील हाच पहिला विद्वान; एवढेच नव्हे तर प्राकृत भाषा संस्कृत भाषेपूर्वीच्या लोकभाषा आहेत हे प्रतिपादन करणारे शास्त्रीबोवा पहिलेच भाषापंडित. वैदिक वाङ्मय व धर्म यांचे सारासारग्रहण करता यावे म्हणून त्यांनी अवेस्ता भाषेचेही अध्ययन केले होते. हे त्याचे एक अपूर्व वैशिष्टचच होते. त्याशिवाय कुराणाचा उत्तम अभ्यास व्हावा म्हणून त्यांनी अरबी भाषा हस्तगत केली. अवेस्ता व फारसीदेखील ते चांगले जाणत. शाळेत विद्यार्थ्यांना ते फारसी शिकवीत. व्याकरण व ख्रिस्ती धर्माची भूमिका नीट पारखता यावी ह्या दृष्टीने त्यांनी लॅटिन व ग्रीक भाषांचाही तात्पुरता अभ्यास केला होता. फ्रेंचही त्यांना अवगत होते. इंग्रजी तर शिकल्यावाचून गतीच नव्हती. ह्याप्रमाणे केवळ स्वत:ची ज्ञानाची हौस भागविण्याकरिता निरनिराळ्या भाषातील वाङ्मयाच्या अवगाहनात गढून जाणारे व्यासंगी विद्वान किती असतील ?

**भाषाशैली–**

शास्त्रीबोवा स्वत:विषयी वैयक्तिक असे कधीच लिहीत नसत. तरी पण त्यांचे लेखन विवेचक आणि प्रचारकी थाटाचे असल्यामुळे, आणि स्वत:ची मते ठासून प्रसंग पडेल तिथे मांडण्याची त्यांना फार हौस असल्यामुळे, त्यांचे पुष्कळ लेख आत्मनिष्ठ वाटतात. जे पाहिले, जे वाचले व जे अनुभवले त्याचा ठसा स्वत:च्या मनावर जसा उमटला असेल तशाचा तसा ते वाचकासमोर ठेवीत. अंतर्गत विचार शब्दरूपाने मांडताना ते शक्य तितक्या नैसर्गिक स्थितीत– नागव्या स्थितीत म्हटले तरी चालेल– मांडीत. भाषेला मुद्दाम

नटवून सजवून ती अधिक परिणामकारक करण्याचा त्यांनी चुकूनसुद्धा प्रयत्न केला नाही. परंतु नटण्याच्या किंवा नटविण्याच्या त्यांच्या तिटकाऱ्यामुळे त्यांच्या भाषेत सुबकपणा किंवा कोमलता आली नाही. हे गुण नसले तरी ती तेजस्वी आहे आणि तिखट आहे. शिवाय मनाला पटेल तेच लिहिले ह्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांच्या लिखाणात एक प्रकारचा खोल जिव्हाळा आढळून येतो. हा गुण लेखनकलेच्या अमोलिक लेण्यांपैकी एक नाही असे कोण म्हणेल ?

त्यांच्या लेखनात 'बोली'ची झाक मारते. 'म्हावरे,' 'मोहतूर,' 'सागोती' यासारखे शब्द त्यांच्या गंभीर लिखाणात इतस्ततः विखुरलेले दिसतात. संस्कृत शब्दांच्या ऐवजी नित्याचे मराठी शब्द वापरायचे ह्या बाण्याने वरील शब्द ते उपयोगात आणीत. भाषा सामान्य जनांसाठी सुबोध करण्याचे त्यांनी प्रयत्न केले त्यापैकी वरील प्रयत्न होय.

शास्त्रीबोवांची मते प्रतिपादन करण्याची रीत आणि तडफ पहिल्यापासून शेवटपर्यंत एकाच ठशाची राहिल्यामुळे नाव पाहिल्याशिवाय हा लेख कोणाचा ते नक्की ओळखता येते. पण त्यांची भाषा मात्र शेवटपर्यंत रूपे बदलीत होती. पहिल्याने शास्त्रीबोवांनी विविधज्ञानविस्तारात लिहावयास सुरुवात केली तेव्हा (१८८१ सालापासूत) त्यांची भाषा सुंदर नसली तरी डौलदार होती. बाळशास्त्री जांभेकरांचे चरित्र, त्याचप्रमाणे एकनाथाचे चरित्र सुबोध मराठीचे चांगले नमुने आहेत. पण पुढे पुढे अस्सल मराठी शब्दच वापरण्याचा त्यांचा नाद अतिरेकाला जाऊन पोचला. १९०१–१९०२ साली त्यांनी 'सुबोधपत्रिके'त जे लेख लिहिले आहेत त्यात, विशेषतः 'रँगलर परांजपे' व 'एक विधवागृह हवे आहे' हे विशेष उल्लेखनीय आहेत. पहिला लेख रँग्लर परांजपे विलायतेत यश मिळवून हिंदुस्तानात परत आले त्या वेळी त्यांचे अभिनंदन करण्याकरिता लिहिला आहे. त्यात गुरूला चांगल्या शिष्याविषयी जो अभिमान वाटतो तो पूर्णपणे प्रत्ययाला येत असला, तरी 'सुरेख झाले' ह्या शब्दांच्या पुनरावृत्तीमुळे तो लेख किंचित पोरकट वाटतो. दुसऱ्या लेखात 'मांडवशोभा' हा शब्द वापरल्याने हा लेख उपरोधिक आहे की विधवांबद्दलच्या अनुकंपेने लिहिला आहे ते कळत नाही. 'कैसरकडून सुलतानाकडे' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत भाषेची सुधारणा करण्याकरिता

पदे तोडून लिहिणे अधिक सोयीचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. हे सर्व पुस्तक त्या तत्त्वाप्रमाणेच लिहिले आहे, उदाहरणार्थ– 'या अगदी अ-योग्य प्रतिस्पर्ध्यास घडघडवण्यात आल्या– नंतर, त्याच्या पीठा-वर अथानासियूने स्वतःस बसवून घेतले. याच्या नावा-मुळे व सांनिध्या-मुळे बड्या परिषदेचा जोम आणलेल्या एका छोट्या परि-षदेत, ज्या बिशपांनी निर-उपायाने रिमिनी मुक्कामी कबुलायतीवर सह्या केल्या होत्या, त्या सर्वां-वरची वाळू नैसच्या कबुलायती-वर नुसत्या सह्या घेऊन काढून टाकण्यात आली.' (पृ. १२१) ह्या अशा पद्धतीने शास्त्रीबोवांची भाषा उलट दुर्बोध मात्र बनली आहे.

अगदी शेवटच्या चार वर्षांत मात्र शास्त्रीबोवांनी जे लिखाण केले आहे त्यात भाषेच्या दृष्टीने फार मोठा पालट आढळून येतो. मधल्या काळात त्यांची भाषा जी मासलेवाईक, तुटक व बोजड झाली होती तिचा नूर आता पालटला. आता ती अस्खलित, साधी आणि डौलदार अशी झाली. शास्त्री-बोवांचे विचारही अधिक मुद्देसूदपणे मांडलेले दिसतात. जणू काय इतकी परिणामकारक भाषाशैली कमावण्यासाठी शास्त्रीबोवांना वरीलप्रमाणे गिरक्या खाव्या लागल्या. ह्या शैलींचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे त्यांचे 'दीनबंधु' या ब्राह्मणेतर पत्रात आलेले 'ऐतिहासिक गंजिफा' ह्या सदराखालचे लेख. ह्या भाषेचा नमुना थोडक्यात पुढे दिला आहे.

'हिंदु धर्मास 'धर्म' हे भरीव नाव शोभत नाही. असे का ? तर 'धर्म' शब्द घेतला की त्यात भावंडाचे नाते जाहीर ध्वनित होते. ख्रिस्ती म्हटला की प्रत्येक ख्रिस्ती त्यास आपला बंधु समजतो, त्याच्याशी जाहीर बंधुत्व लावतो. हातचे पाणी घेण्यास व त्याने केलेल्या स्वैंपाकाच्या आहुती आपल्या आतल्या अग्निहोत्रात होमण्यास संकोच बिलकूल बाळगीत नाही. ख्रिस्त्याहूनही हे बंधुत्वाचे नाते मुसलमान जास्त पटवू शकतात. हे दोन्ही धर्म जिवंत आहेत. जो धर्म विधर्म्यास आत ओढून त्याच्याशी बंधुत्वाचे नाते जाहीरपणे लावतो, तो धर्म जिवंत होय, तो धर्म भगवती भागीरथीचा प्रवाह होय. पारशी व यहुदी हे दोन्ही धर्म आज जिवंत नाहीत. ते आज मुर्दाड होऊन पडले आहेत. तरीही जसा पारशांचा तसा यहुद्यांचा समाज एकजात आहे. जसे पारशांचे पारशांशी तसे यहुद्यांचे यहुद्यांशी नाते बंधुत्वाचे असते.

रोटीच्या दळणवळणास बिलकुल अडकाठी नसते' इत्यादी.

ज्याप्रमाणे रूढ बोलभाषेतले शब्द शास्त्रीबोवांनी आपल्या लेखनात न कचरता वापरले त्याचप्रमाणे त्यांनी काही अतिशय सुंदर शब्दाचीदेखील मराठी भाषेत भर टाकली आहे. इंग्रजीवरून त्यांनी न्यायमूर्ति, विद्यापीठ व विश्वविद्यालय हे शब्द प्रथम रूढ केले. सारस्वत (साहित्य या अर्थी) व ब्राह्मणेतर हे दुसरे दोन शब्द.

शास्त्रीबोवांच्या भाषाविषयक व्यासंगाची छाननी थोडक्यात पुढीलप्रमाणे देता येईल.

**संस्कृत भाषा–**

संस्कृत भाषेच्या व्युत्पत्तीसंबंधी शास्त्रीबोवांची कामगिरी उल्लेखनीय असली तरी संस्कृत साहित्यासंबंधाने त्यांचे मत कलुषित होते. ज्या संस्कृत वाङ्मयाचा शास्त्रीबोवांस अभिमान वाटे ते सर्व वैदिक वाङ्मय होते. वेद, विशेषतः ऋग्वेद, उपनिषदे, काही सूत्रवाङ्मय, महाभारत, रामायण, भगवद्गीता हे त्यांच्या मते संस्कृत भाषेचे खरे भांडार होते. काव्य–नाटकाबद्दल– एक भवभूती सोडल्यास– त्यांना कमालीचे वैषम्य वाटे. 'संस्कृत व देशी भाषा' ह्या एका लहानशा लेखात संस्कृत भाषा नको, व देशी भाषा विद्यापीठाच्या कार्यक्रमात का हवी, ह्याचे स्पष्टीकरण शास्त्रीबोवांनी केले आहे. मराठीसहित एकंदर प्रांतीय भाषाबद्दल शास्त्रीबोवांची भूमिका काय होती हे ह्या लेखावरून चांगलेच कळून येते; आणि म्हणून तो फार महत्त्वाचा आहे. त्यातले मुख्य मुद्दे पुढे दिले आहेतः–

संस्कृत भाषा नको असल्याची नऊ कारणे शास्त्रीबोवांनी दिली आहेत. त्यांचा आशय असा की संस्कृत साहित्याचे अध्ययन आमच्या राष्ट्रीय बाण्यास व संस्कृतीस विघातक आहे. कारण (१) रामायण, महाभारत इत्यादि उत्कृष्ट ग्रंथांत जी पारंपरिक सुंदर तत्त्वे व चरित्रे संग्रहित केली आहेत त्यांचा एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत इत्यादि कवींनी मराठीत उत्कृष्ट पुरस्कार केला आहे. म्हणून संस्कृत भाषेची गरज उरली नाही. (२) संस्कृत भाषेमुळे 'धर्मवासना शिथिल होते' कारण दंडी, कालिदास, बाण वगैरे लेखकांनी, वंद्य मानलेल्या देवांची शिमग्यातही आपले लोक उच्चारावयास लाजतील अशा प्रकारची स्थलोस्थली चावट व बीभत्स टर

उडवलेली असते. (३) 'ऋतुसंहार' 'मेघदूत,' इत्यादी कामुकतेने भरलेली काव्ये विद्याक्रमात असल्याने विद्यार्थ्यांची कोवळी मने विघडण्याचा संभव असतो. (४) संस्कृतात 'वर्णसंकराचा बाऊ केलेला असून, ब्राह्मणेतरांचा ठिकठिकाणी अपमान केलेला असतो व त्यांच्याविषयी तुच्छ बुद्धी प्रदर्शित केलेली असते; उदाहरणार्थ, शंबूकाख्यान व शूद्र वेद ऐकेल तर त्याच्या कानांत तापलेले तेल ओतावे ही मनूची आज्ञा. (५) संस्कृत भाषेत ऐतिहासिक गद्य ग्रंथ 'हर्षचरिता'खेरीज दुसरा नाही. (६) ही मृत भाषा असल्याने 'तिच्या प्रसाराने लोकसमूहाची स्थिती सुधारण्याचा' बिलकूल संभव नाही. (७) स्वराज्य नसल्यामुळे ती निरवश झाली आहे. (८) राष्ट्रीय बुद्धीचा रोप हृदयात लावण्याचे काम तिच्या हातून होणे नाही. कारण ही केवळ धर्मभाषा होती; बोलभाषा व राष्ट्रीयभाषा नव्हती. (९) तीतील हवा कर्मठपणाने उग्र झालेली असल्यामुळे व इतिहासाचा तीत गंधही नसल्यामुळे, कोणीही चांगले उदाहरण घालून देऊन आपले नावे वंद्य करून व आपले आचरण उदाहार्य करून ठेवलेले तीत वाचण्यात येत नाही.

शास्त्रीबोवांचे हे सर्वच मुद्दे तर्कशुद्ध आहेत असे नव्हे; उदाहरणार्थ, संस्कृत भाषेतल्या अश्लीलतेबद्दल शास्त्रीबोवांचे मत पूर्वग्रहदूषित असल्यामुळे त्यांनी त्या मुद्यावर फाजील भर दिलेला आहे. त्याचप्रमाणे शेवटल्या मुद्यात शास्त्रीबोवांनी म्हटल्याप्रमाणे ऐतिहासिक वाङमयाची वाण असली तरी देखील त्या भाषेत दंतकथावाङमय विपुल आहे, आणि त्याची ऐतिहासिक उपयुक्तता मोठी आहे हे आज कोणीही कबूल करील.

परंतु ह्याबरोबरच त्यांनी जे दुसरे अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत ते खरोखरच विचार करण्याजोगे आहेत. ज्या काली संस्कृतास भलतेच महत्त्व येऊन विद्यापीठात देशी भाषांना वाळीत टाकण्यात आले होते, त्या काळी देशी भाषांची कड घेऊन संस्कृत भाषेसंबंधाने असे उद्गार काढणारे शास्त्रीबोवा एकटेच होते. आज देशी भाषांचे वैभव वाढते दिसत आहे, त्याचे मूळ निःसंशय वरील उद्गार काढणाऱ्या मनोवृत्तीत आहे.

**संस्कृत भाषेच्या व्युत्पत्तीसंबंधाने व्याख्याने** (इंग्रजी)

शास्त्रीबोवांच्या भाषाविषयक लेखनात वरील व्याख्यानांना अग्रस्थान द्यावे लागेल. ह्यात मुख्यत्वे वैदिक वाङमयाचा समावेश होतो. वैदिक

वाङ्मयाचे काही भाग पाडून त्यातील भाषेचे व व्याकरणाचे नमुने शास्त्रीबोवांनी चर्चेसाठी घेतले असून त्यात ठिकठिकाणी ग्रीक, लॅटिन, अवेस्ता इत्यादी भाषांची तुलनादेखील केली आहे.

ही व्याख्याने एकंदर आठ आहेत. आणि त्यात अनेक वादग्रस्त प्रश्न शास्त्रीबोवांनी उपस्थित केले आहेत. कित्येक वेळा त्यांनी भाषाशास्त्राच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकून अनेक जातिविषयक प्रश्नांचा उहापोह केला आहे. डॉ. भांडारकरांची ह्या विषयावरील व्याख्याने अधिक मुद्देसूद असून संस्कृत, प्राकृत आणि आधुनिक प्रांतीय भाषा ह्यांचे विवेचन त्यांनी अधिक स्पष्टपणे केलेले आढळते. शास्त्रीबोवांनी वर सांगितलेल्या भाषांचा तुलनात्माक उपयोग केला असला तरी त्यांच्या अभ्यासाचे केन्द्र वैदिक वाङ्मय आणि त्यातल्या त्यात ऋग्वेदच आहे.

**व्याख्यानांचा आशय**–पहिल्या व्याख्यानाचा उद्देश संस्कृत भाषा ही मूळ कोठे उगम पावली व तिचा प्रसार पहिल्याने कोणत्या लोकांनी केला हे दाखविण्याचा आहे. शास्त्रीबोवांचे म्हणणे असे की ग्रीक, लॅटिन ह्या जशा प्रदेशांच्या किंवा विशिष्ट लोकसमूहाच्या भाषा तशी संस्कृत ही प्रांतवाचक किंवा लोकवाचक भाषा नाही. हिचा उगम ऋग्वेदापासून झाला व तिला 'आर्यांची' भाषा म्हणतात. ज्या संस्कृत भाषेचे व्याकरण पाणिनीने लिहिले ती मूळची वैदिक भाषा नसून तिच्यातून निघालेली लौकिक संस्कृत भाषा होय. वैदिक भाषेत काही विशिष्ट शब्दप्रयोग आढळतात. त्याचे स्पष्टीकरण पाणिनीस करता आले नाही. ते शब्द 'म्लेंच्छ' म्हणजे 'अडाणी' उर्फ गांवढळ बोलीतून आले आहेत. त्याचप्रमाणे काही शब्द 'असुरा'पासून म्हणजे परप्रांतीय भाषेतून आलेले असून दुर्बोध आहेत. म्लेच्छ व आसुरी संस्कारांपैकी आसुरी भाषेचे संस्कार अधिक जुने, म्हणजे आर्य लोकांची वसाहत हिंदुस्थानात होण्याच्या पूर्वीचे, आहेत.

वैदिक भाषा ही आर्य लोकांची भाषा खरी पण हे 'आर्य' लोक कोण ? संहितांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णांच्या लोकांचा उल्लेख आला आहे. त्यापैकी अगदी प्रारंभीच शूद्रांना बाहेर ढकलण्यात आले. दुसऱ्या कालखंडात वैश्यवर्गाला पण सोमयागातून बाहेर काढण्यात आले. राहता राहिले ब्राह्मण आणि क्षत्रिय.

ह्या दोहोत क्षत्रियांची संख्या अधिक असून लोकात त्यांचे वर्चस्व होते. क्षत्रियात ' राज्,' ' मनुष्य ' आणि ' क्षत्र ' असे तीन मुख्य वर्ग होते. ' राज ' वर्गात ' राजन् ' म्हणजे वरूणाचे उपासक व ' राजन्य ' हे इंद्राचे उपासक असून, वरुणाचे उपासक हे राज्यकर्ते आणि इंद्राचे उपासक हे प्रजाजन असा भेद होता. ' मनुष्या'त मनुराजा व मनुस् ह्या दोघांच्या वीरवृत्तीच्या वंशजांचा अंतर्भाव होतो. ' क्षत्र'वर्गाला विशेष प्राधान्य नसून तो पुढे वीरवृत्तीचा वाचक बनला. एकंदर क्षत्रियवर्गात काही धंदेवाईक कारागिरांचादेखील पुढे समावेश झाला.

ब्राह्मण हे ब्राह्मवर्ताचे मूळचे राहणारे. ब्रह्मावर्त हा ' ब्रह्म ' लोकांचा देश असून त्याची व्याप्ती सरस्वती व दृषद्वती ह्या दोन नद्यांमध्ये होती. ब्रह्मर्षि देश ह्या शब्दावरून ' ऋषि ' हा नवा शब्द दृष्टोत्पत्तीस येतो. ' ब्रह्मर्षि ' हा शब्द ' ब्राह्मण ऋषि ' असा नेहमीप्रमाणे न घेता ब्रह्म ही एक जात व ऋषि ही दुसरी पोटजात असाच घेतलेला अधिक बरा दिसतो. संहितात अगस्ति, अत्रि, अंगिरस, कश्यप, भृगु, वसिष्ठ व विश्वामित्र ही सात ऋषिवर्गातील नावे आहेत. विश्वामित्राच्या इतिहासावरून ऋषिवर्ग हा क्षत्रिय वर्गाशी रक्ताचा संबंध असलेला, अर्थात् संमिश्र, असा वर्ग होता हे निर्विवाद सिद्ध होते. ब्राह्मणांनी आपले वर्चस्व वैदिककालाच्या तिसऱ्या खंडापासून पुढे प्रस्थापित केले. अर्थात् संस्कृत भाषा ही मूळ क्षत्रियांपैकी ' मनु ' वर्गाची (लोकसंख्येने सर्वात मोठ्या असलेल्या वर्गाची) भाषा असून ती पुढे क्षत्र, राज्, ऋषि आणि ब्राह्मण ह्या वर्गांनी उचलली. हीच पुढे आर्यावर्ताची भाषा बनली.

ह्या व्याख्यानात शास्त्रीबोवांनी केलेला कालखंडाचा उल्लेख संदिग्ध आहे. त्याचप्रमाणे लोकांचे वर्गीकरणदेखील अनुमानावरच बरेचसे आधारल्यामुळे आक्षेपार्ह आहे. पुढील पाच व्याख्यानात अनुक्रमे वेदपूर्व भाषेच्या नामांचे विभक्तिकरण, वैदिक नामांची विभक्तिप्रत्ययापासून झालेली रूपे आणि वेदोत्तर ऐतिहासिक कालखंडातील संस्कृत नाम व धातू ह्यांची रूपे आणि विभक्तिप्रत्यय ह्याबद्दल चर्चा केली आहे.

सहाव्या व्याख्यानात अवेस्ता आणि वैदिक संस्कृत ह्या दोन भाषांतील साम्यनिदर्शक शब्दाबद्दल चर्चा आहे, आणि सातव्या व आठव्या व्याख्यानात

ग्रीक, लॅटिन, अवेस्ता आणि संस्कृत ह्यातील साम्यनिदर्शक शब्द, प्रत्यय, स्वर इत्यादींची कोष्टके आहेत. ही सर्व कोष्टके फार कसोशीने केलेली असून भाषाशास्त्राचा अभ्यास करणाराला फार उपयोगी आहेत. परंतु त्यावरून शास्त्रीबोवांनी बांधलेले ऐतिहासिक आराखडे मात्र कोणाला आजकाल पटतीलसे वाटत नाही.

### खुर्दा अवेस्तासंबंधी (इंग्रजी)

अवेस्ता ही आर्यांच्या वैदिक भाषेशी वरीच संलग्न असून तिच्यापेक्षा जुनी आहे. वेदभाषेची अवेस्ता ही वडील बहीण आहे. कारण, वेदभाषेप्रमाणे अवेस्ता ही धर्मभाषा आहे. ह्या भाषेतील वाङ्मयांत ज्या देवता वर्णिल्या आहेत त्यांची नावे व इतर वर्णनेदेखील वैदिक देवतांशी मिळती जुळती आहेत. शब्दांचे साम्य तर ह्या दोन भाषांत कमालीचे आहे. ह्या सर्व साम्यस्थलांचा विचार शास्त्रीबोवांनी ह्या लेखात केला आहे. एवढेच नव्हे तर अवेस्ता देवतांमधून वैदिक देवतांची व यज्ञसंस्थेची कल्पना कशी निघाली व नंतर आर्यांच्या विशिष्ट समाजरचनेमुळे वैदिक देवतांच्या कार्यांत व रूपांत कसे फेरफार घडले हे त्यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वैदिक देवतांचे शास्त्रीबोवांनी जे वर्णन केले आहे ते फक्त ऋग्वेदावरच आधारलेले आहे, व त्या त्या देवतेची सर्व अंगे, उपांगे लक्ष्यात घेऊन केलेले नाही. त्यामुळे त्यांची विधाने अपुरी वाटतात.

त्यांनी दाखविलेली साम्यस्थळे विचारणीय आहेत. तरी पण भाषेखेरीज इतर बावतीत त्यांनी केलेली विधाने अवेस्ताच्या अधिक खोल अभ्यासानंतरच पारखता येतील.

**प्राकृत भाषा—**

### प्राकृत भाषेची विचिकित्सा

शास्त्रीबोवांनी संस्कृत व मराठी भाषेच्या व्याकरणावर लहान लहान निबंधवजा पुस्तके लिहिली आहेत. त्या दोनही निबंधांपेक्षा ‘ प्राकृत भाषेची विचिकित्सा ’ हा निबंध फार सरस आहे. विवेचनपद्धती सुलभ असून प्राकृत भाषांचा उगम व विकास यांविषयी दिलेली माहिती नावीन्यपूर्ण असून प्राकृत भाषांवरचे त्यांचे प्रेम व दांडगा व्यासंग दाखविते.

ह्या निबंधाचे ठोकळ मानाने तीन भाग पाडता येतील. पहिल्या प्रस्तावनारूपी भागात ‘प्राकृत’ शब्दाच्या व्युत्पत्तीची चर्चा, दुसऱ्या भागात व्याकरण; व तिसऱ्या भागांत प्राकृत भाषांतील वाङमयाची चर्चा केली आहे. निबंधांतील सर्वांत महत्त्वाचा भाग हाच होय.

‘प्राकृत’ ह्या शब्दाचा अर्थ ‘प्रकृतीपासून आलेले’ असा नसून ‘पाअड’ म्हणजे ‘प्रकट’ किंवा ‘उघड’ असा आहे. अर्थात प्राकृत भाषा ही सामान्य जनांची म्हणजे सर्वांस सहज समजणारी, व्यवहाराची, भाषा. शास्त्रीबोवांचे हे विधान सयुक्तिक वाटते.

प्राकृत भाषा पुष्कळ जुनाट असून ती लौकिक संस्कृत भाषेतून निघाली असे समजण्याची जरूर नाही. कारण संस्कृत धर्माची, तर प्राकृत व्यवहाराची भाषा पडली. त्यांची कार्यक्षेत्रे त्यामुळे भिन्न स्वरूपाची होती. आज़काल आपण मराठी, गुजराती, बंगाली वगैरे ज्या भाषा बोलतो, त्या सर्व जुन्या प्राकृतापासूनच निघालेल्या आहेत.

महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी, पैशाची इत्यादी प्राकृत भाषा पूर्वी उपलब्ध होत्या. त्यांपैकी महाराष्ट्री सर्वांत जुनी व उत्कृष्ट भाषा. ही प्राकृत भाषा संस्कृताच्या पूर्वरूपापासून व काही देशी भाषांतून निघाली असावी. हिच्यापासून शौरसेनी, मागधी व पैशाची भाषा निघाल्या. शौरसेनी भाषेत स्वतंत्र ग्रंथ आढळत नाहीत. पैशाची भाषेत बृहत्कथारूपी अमूल्य कथाभांडार लिहिले होते. मूळची बृहत्कथा आजमितीस उपलब्ध नाही. पण तिचे संस्कृत रूपांतर प्रसिद्ध आहे.

मागधी भाषेत जैन व बौद्ध सारस्वत उपलब्ध आहे. महाराष्ट्री भाषेत अनेक ग्रंथ आहेत. त्यांपैकी ‘गाथासप्तशती’ नावाच्या गीतसंग्रहाची शास्त्रीबोवांनी सांगोपांग चर्चा केली आहे. इतर भाषांतल्या वाङमयाचा ओझरता उल्लेख करून ‘सप्तशती’वर मात्र शास्त्रीबोवांनी अघळपघळ लिहिले आहे. ते त्यांच्या मराठी भाषेवरच्या प्रेमाचे व महाराष्ट्रीविषयीच्या पक्षपाताचे द्योतक आहे. काही असले तरी ‘सप्तशती’सारख्या उत्कृष्ट परंतु केवळ प्राकृतांत लिहिल्यामुळे संस्कृत पंडितांच्या उपेक्षेस पात्र झालेल्या ग्रंथाचा उघडपणे गौरव हिंदुस्थानात शास्त्रीबोवांनीच पहिल्याने केला. मात्र ‘कालिदासा’च्या ‘शाकुंतला’स पांचट व अश्लील ह्मणणाऱ्या शास्त्रीबोवांस

सप्तशती 'तला शृंगार कसा मानवला असावा हे गूढ वाटते. हे त्यांच्या पूर्वग्रहाचे एक उत्तम उदाहरण आहे. निबंधाच्या शेवटी त्यांनी प्राकृत भाषांतील व्याकरणग्रंथांविषयी थोडी चर्चा केली आहे.

साहित्यसेवा तीन प्रकारची असू शकते. पहिला प्रकार म्हणजे ललित-वाङ्मयाची निर्मिती, दुसरा म्हणजे टीकात्मक लिखाण आणि तिसरा म्हणजे त्या विषयांवर प्रत्यक्ष अवलोकनाने, अनुभवाने किंवा प्रयोगाच्या साहाय्याने ग्रंथनिष्पत्ती करणे. हा तिसरा भाग अधिक व्यापक असला तरी त्याची मर्यादा बहुतेक वेळा साहित्यशास्त्राच्या टप्प्यापलीकडे पोचते. आणि म्हणूनच भौतिक किंवा सामाजिक शास्त्रावर जे लिखाण होते, त्याची चर्चा सहसा साहित्यात केली जात नाही. शास्त्रीबोवांचे बरेचसे लिखाण ह्याच सदरा-खाली जाते. कथा-काव्य-नाटक इत्यादि प्रकार त्यांच्या प्रवृत्तीस मानवणारे नव्हते. एवढे मात्र खरे की त्यांनी आपल्या साहित्यसेवेची सुरुवात 'देशाच्या सद्यःस्थितीवरील विचार' म्हणून एक काव्य आणि वॉल्टर स्कॉटच्या 'टॅलिसमन्' ह्या कादंबरीचे रूपांतर यांनी केली. परंतु ते तेवढ्यापुरतेच. पुढे विवेचक वाङ्मयानेच त्याची जागा घेतली.

टीकावाङ्मयांत त्यांनी थोडीबहुत भर घातली नाही असे नाही; ह्या टीकात्मक लिखाणात 'अलंकारमीमांसा' ह्या निबंधाचे स्थान वरचे आहे. शास्त्रीबोवांनी संतकवींच्या काव्याचा परामर्श घेतला. मराठी भाषेच्या व्युत्पत्तीबद्दल व व्याकरणाबद्दलही लहानमोठ्यांस उपयोगी पडेल अशा रीतीने लिहिले. मराठी भाषेच्या उत्क्रांतीबद्दल शास्त्रीबोवांचे लिखाण मौल्यवान आहे यात शंका नाही. परंतु ह्या त्यांच्या अभ्यासातही एक मोठी उणीव दिसून येते. ती ही की त्यांनी ऐतिहासिक गद्यवाङ्मयाची उपेक्षा केली आहे. शिवकालीन व पेशवाईतील बखरी हा मराठी गद्यवाङ्मयातील अपूर्व ठेवा आहे. ह्या उपेक्षेचे कारण असे असू शकेल की वरील साहित्य प्रचलित राजकीय परिस्थितीवर आधारलेले होते. शास्त्रीबोवा इतिहासभक्त असले तरी दैनंदिन राजकीय घडामोडींकडे त्यांचे फारसे लक्ष्य नसे. ते ऐतिहासिक व्यक्ती व घडामोडी यांच्या मागे असलेली लोकांची भावना यांवर स्थिर झालेले असे. आत्मविकास हे शास्त्रीबोवांचे ध्येय असल्यामुळे व्यक्तिपूजेला त्यांच्या लिखाणात महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. ते त्यांनी

लिहिलेल्या चरित्रावरून व इतरही पुस्तकांवरून वेळोवेळी प्रत्ययास येते. संतवाङ्मयाची महती त्यांनी याच कारणामुळे गायिली आहे. अर्थात मराठी भाषेची त्यांनी केलेली सेवा अमूल्य असली तरी त्यांची दृष्टि व्यापक नसल्याने वेळोवेळी त्यांची मते पारखून घ्यावी लागतात. तसेच ह्या एकांगीपणामुळे त्यांनी आपल्या समकालीन गद्यपद्यवाङ्मयाची कुठेच वास्तपुस्त केलेली दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या वेळी इंग्रजी वाङ्मयाच्या आधाराने बाहेर पडू लागलेले काव्य, कथा, कादंबरी व निबंधरूपी वाङ्मय त्यांना आकलिता आले नाही. खरोखर प्रसाराच्या दृष्टीने ह्या वाङ्मयाला केवढे मोठे स्थान आहे. विद्यापीठात देशी भाषेचा पुरस्कार करावयाचा तो केवळ संतवाङ्मयाच्या थोरवीकरिता, धर्माच्या प्रचाराकरिता, असा शास्त्रीबोवांचा आग्रह दिसतो. परंतु ललितवाङ्मयाची उपेक्षा त्या काळच्या बहुतेक विद्वानांनी केल्यामुळे शास्त्रीबोवांनाच त्याबद्दल दोषी ठरवता येत नाही.

मराठी भाषेवरील शास्त्रीबोवांचे बहुतेक लिखाण उद्बोधक आहे. त्यांतल्या त्यांत विविधज्ञानविस्तारांतील 'मराठीचा एक कॅथोलिक भक्त' हा फादर स्टीफन्सवरील त्यांचा लेख उल्लेखनीय आहे. मराठी ही केवळ परपुष्ट किंवा परधार्जिणी भाषा नसून संस्कृतपूर्व काळातही ती अस्तित्वात होती हे शास्त्रीबोवांनी अनेक अस्सल मराठी शब्दांची पूर्वपीठिका विशद करून दाखविले आहे. इतकेच नव्हे, तर गोमंतकीय कोंकणीचा अभिमान धरणाऱ्यांनी मराठीचे ऋण विसरू नये असा इशारा दिला आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक एकीकरण होण्यास 'मराठी–ख्रिस्ती' व कोंकणी आणि दक्षिणी मुसलमानांतही मराठी भाषेचा अधिक फैलाव झाला पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. उत्तरार्धात स्टीफन्सचेच छोटे चरित्र देऊन त्याने मराठी भाषेची कशी योग्य सेवा केली हे सांगितले आहे.

**अलंकारमीमांसा**

शास्त्रीबोवांची संस्कृत व देशी काव्यावरील मते, त्याचप्रमाणे काव्याविषयी त्यांची अभिरुची, 'अलंकारमीमांसा' ह्या त्यांच्या चिमुकल्या पुस्तकात उत्तम रीतीने प्रकट झालेली आढळून येतात. संस्कृत भाषेत अलंकारांवर पुष्कळ मोठे साहित्य आहे. आणि साधारणपणे अलंकारशास्त्राचा विचार करताना संस्कृत अलंकारिकांच्याच पाउलांवर पाऊल टाकून चालण्याची

वहिवाट आपल्याकडे पडलेली दिसते. परंतु शास्त्रीबोवांच्या स्वतंत्र आणि विवेचक बुद्धीने त्यांना ह्याही बाबतीत परंपरेचे दास बनूं दिले नाही ; उदाहरणार्थ, उपमेवर व कार्यकारणभावावर अधिष्ठित झालेले अलंकार सोडले तर विषयाची मांडणी, रसचर्चा इत्यादी बाबतीत त्यांची मते पूर्ण स्वतंत्र आहेत.

वर्णन करण्याचे दोन प्रकार, (जसे असेल तसे सरळ वर्णन करणे किंवा प्रकारान्तराने वर्णन करणे ) स्वभावोक्ती आणि वक्रोक्ती, आहेत असे सांगून, शास्त्रीबोवांनी हे वेगळे 'अलंकार' नसून 'काव्यांचे आत्मभूत' आहेत व म्हणून त्यांना अलंकार न म्हणतां 'अलंकार्य' म्हणणेच जास्त उचित आहे असे प्रतिपादन केले आहे. त्याचप्रमाणे स्वभावोक्तीचे तीन प्रकार शास्त्रीबोवा मानितात ते असे :—नीरस, सरस, व कालिक. नीरस स्वभावोक्ती ही अलंकारशास्त्रांत वर्णिलेली मामुली वर्णनात्मक स्वभावोक्ती. सरस स्वभावोक्तीत रसोत्कर्ष उत्कटपणे आढळून येतो (संस्कृतांत त्याला रसध्वनि म्हणतात.) कालिक स्वभावोक्तीत झालेल्या, प्रत्यक्ष घडत असलेल्या किंवा होणाऱ्या स्थितीचे किंवा प्रसंगाचे चित्र रेखाटलेले असते. (ह्याला संस्कृतात भाविक अलंकार म्हणतात.) वक्रोक्तीबद्दल देखील शास्त्रीबोवांची मते विचारणीय आहेत. वक्रोक्तीचे पर्यायोक्ती, समासोक्ती आणि अतिशयोक्ती असे त्यांनी तीन प्रकार मानले आहेत. ह्या सर्वांची लक्षणे जरी जुन्या अलंकारिकाप्रमाणेच शास्त्रीबोवांनी दिलेली असली तरी त्यांची त्यांनी जी एकत्र सांगड घातली आहे ती, किंवा अन्योक्ती व अर्थान्तरन्यास हे पर्यायोक्तीचेच दोन वेगळे प्रकार आहेत हे त्यांचे विधान बरेच वादग्रस्त आहे. विशेषत: अर्थान्तरन्यास हा ठराविक विधानास पुष्टी देणारा दाखला असल्यामुळे तो पर्यायोक्तींत किंवा शास्त्रीबोवांनी म्हटल्याप्रमाणे 'अलंकार्या'त सामील न करता स्वतंत्र अलंकारच मानणे अधिक योग्य वाटते.

रसासंबंधीदेखील शास्त्रीबोवांची मते विचारणीय आहेत. शृंगार, वीर, बीभत्स, रौद्र, हास्य, भयानक, करुण, अद्भुत आणि शान्त हे ठराविक नवरस न मानतां शास्त्रीबोवा भक्ती, वीर, शृंगार, करुण, भयानक, अद्भुत हास्य आणि वत्सल हे आठ रस मानतात. परंपरेने मूळचे आठ रसच खरे

व सर्व भावांची स्तब्धता दाखवणारा शान्त रस हा नववा रस मागाहून जोडला गेला, त्यामळे शान्त हा रस दुय्यम प्रकारचा रस आहे हें शास्त्री बोवांचे म्हणणे सयुक्तिक वाटते.

शृंगाररसाबद्दल मात्र शास्त्रीबोवांस अतिशय तिटकारा आहे. शृंगार हा काव्याची गोडी वाढवणारा रस असला तरी तो रसांचा मुकुटमणी आहे हे म्हणणे वाजवी नाही. संस्कृत कवींच्या स्त्रीलंपटपणामुळे शृंगाराचे काव्यांत अवास्तव स्तोम माजले व त्यामुळे त्याला रसांत अग्रस्थान मिळाले असे शास्त्रीबोवांचे मत आहे. उलटपक्षी भक्तीसारख्या ‘ प्रवृत्ति ’ कायम करून सद्‌गतीची दिशा दाखविणाऱ्या ’ रसाला संस्कृत काव्यांत अर्धचंद्र मिळाला आहे. शास्त्रीबोवांच्या मते भक्ती हा सर्वांत श्रेष्ठ रस आहे. त्यांच्या खालोखाल वीररस. भक्तिरस व वीररस ‘ ही दुक्कल जातिभेदाच्या पलीकडील आहे, अलीकडील नव्हे,’ अशी शास्त्रीबोवा प्रतिपादन करितात, ते भागवत धर्मातील बंधुभावाच्या तत्त्वास व धारातीर्थी दिसून येणाऱ्या वीरवृत्तीस अनुलक्षून आहे. भक्ती हा रस असावा की नसावा ह्याबद्दल अजूनही साहित्यिकांत वाद होतात. कारण प्राकृत भाषेत, विशेषतः मराठी कवितेत, भक्तिरसच प्रामुख्याने आढळून येतो. परंतु शास्त्रीबोवा ह्या वादाचे पुरस्कर्ते असले तरीदेखील त्यांनी भक्तिरसाच्या समर्थनार्थ जी वर दिलेली कारणे आहेत ती शास्त्रीय स्वरुपाची (म्हणजे भक्तिरस मानला तर त्याचा स्थायीभाव वगैरे कोणता इत्यादी) नसून वैयक्तिक मतांवर व आवडीवर बरीचशी उभारली आहेत.

□ □

६

# इतिहासविषयक लेख

'छोटया चरित्रकाराच्या कर्तव्याचा अतिक्रम कोणत्याही प्रकारे भागवताच्या हातून झालेला नाही. जी संशोधनाची शक्ती वाटयास आली आहे, तिच्या अनुरोधाने भागवताने संक्षिप्त प्रकारे काम केलेंले असते. विस्ताराने काम करण्यास जी सामग्री हवी ती भागवतासारख्या किरकोळ प्राण्यास मिळण्याचा मुळीच संभव नाही. ती सामग्री न्यायमूर्तीसारख्या वजनदार व वशिलेदार गृहस्थांस मात्र मिळण्यासारखी असते.' (शिवछत्रपतीच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे– राजारामशास्त्री भागवत.)

हिंदुस्तानच्या इतिहासाचे तीन भाग पडतात. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन. प्राचीन इतिहासाबद्दलचे विचार शास्त्रीबोवांनी वेदकालीन वाङ्मयावर जे लेख लिहिले आहेत त्यात, 'विचारमाधुकरी' 'पार्स व पार्सी धर्म' आणि 'मोगल व मोगली धर्म' इत्यादी लेखांत बरेचसे आले आहेत. ह्या चर्चेत पंजाब, गंगा-यमुनेचे खोरे, सह्याद्रीलगतचा काही प्रदेश आणि मध्य आशियाचा काही प्रदेश ह्यांमधील काही विशिष्ट जातींबद्दल, धर्माबद्दल आणि घडामोडींबद्दल माहिती दिली आहे.

मध्ययुगीन इतिहासाबद्दल ह्मणजे गुप्तकालापासून पुढच्या घडामोडीचा विचार करताना शास्त्रीबोवांची दृष्टी महाराष्ट्राच्याच इतिहासाकडे रोखली गेली आहे. त्यात शालिवाहन राजांची वंशावळ व त्यांचे पराक्रम ह्यांचे वर्णन असून पुढे महाराष्ट्रात जी संतपरंपरा निर्माण झाली, तिच्या कार्याला अनुकूल भूमिका ह्या काळांत कशी तयार होत गेली हे देखील सांगण्याचा

त्यांनी प्रयत्न केला आहे.

तिसरा भाग मुकुंदराय-ज्ञानेश्वरापासून सुरू झाला. (शास्त्रीबोवांच्या-वेळी ' महानुभाव ' वाङमयाचा शोध लागलेला नव्हता.) ह्या काळात मराठेशाहीची भरभराट होत जाऊन शिवाजी व इतर मराठे वीर निर्माण झाले.

ह्या दोन्ही भागांचा विचार करताना असे दिसूत येते की ' महाराष्ट्रा '-च्या घडामोडींचा संगतवार इतिहास शास्त्रीबोवांस लावता आलेला नाही. किंबहुना लोकजागृती हेच त्यांच्या ऐतिहासिक लेखनाचे ध्येय असल्यामुळे अव्वल दर्जाच्या इतिहासकाराची भूमिका त्यांना राखता आली नाही. इतिहास-भोक्ते आणि टीकाकार ह्या दृष्टीनेच त्यांच्या ऐतिहासिक लेखनाकडे पाहिले पाहिजे. त्यांचे दुसरे वैशिष्टच असे की, हिंदुस्तान हे एकराष्ट्र नसून, महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक इत्यादी अनेक वेगवेगळी राष्ट्रे आहेत अशी त्यांची आधुनिक घटनेबद्दलही भावना होती.

**मराठ्यांचा इतिहास :**–शास्त्रीबोवांचा मराठ्यांच्या इतिहासाचा व्यासंग आणि त्यांचे महाराष्ट्रमंडळाबद्दलचे प्रेम अव्वल दर्जाचे होते. त्यांनी मराठ्यांशी पूर्वपीठिका, भाषा, धर्म आणि कित्येक इतिहासप्रसिद्ध व्यक्ती ह्यांविषयी केलेल्या लिखाणाचा विस्तार फार मोठा आहे. ह्या त्यांच्या लिखाणाचे दोन भाग पाडता येतील. पहिल्या भागात प्राचीन महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास दिलेला आढळतो. ह्यांत मुख्यत्वे ' मराठेशाही ' ' मऱ्हाठ्यासंबंधी चार उद्‌गार ' व ' आमचा देश, आमची देशी भाषा व आमचे देशी लोक ' ह्यांचा समावेश होतो. दुसऱ्या भागात मुसलमानी सत्तेच्या प्रस्थापनेनंतर महाराष्ट्रांत ज्या घडामोडी झाल्या, जे विचार उत्पन्न झाले, व ज्या बऱ्या वाईट व्यक्ती इतिहासांत आपले नाव ठेवून गेल्या त्यांच्या कारभाराविषयी चर्चा केलेली आढळून येते. मराठ्यांच्या काही बखरांना ते ' भूतार्थ बखरा ' म्हणतात व बाकीच्यांना ' भाकड ' म्हणतात. सांस्कृतिक इतिहास लिहिताना बुद्धीची जी चपळता व तर्काची चलाखी लागते ती शास्त्रीबोवांच्या अंगी असल्यामुळे त्यांची पहिल्या भागातील कामगिरी महत्त्वाची आहे. तरी पण महाराष्ट्रासंबंधाने त्यांची भावनावशता, विशिष्ट संस्कृत ग्रंथांबद्दलची त्यांची पूर्वग्रहदूषित मते, पुराणांबद्दलचा

तिटकारा, आणि इतर प्रांतांबद्दल त्यांस वाटणारे औदासीन्य, ह्यामुळे प्रतिभा व व्यासंग असूनदेखील त्यांचे लेखन हे अव्वल दर्जाचे संशोधन आहे असे म्हणता येत नाही. कारण महाराष्ट्राचा काय किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रांतांचा काय सांस्कृतिक इतिहास लिहावयाचा असल्यास इतर प्रांतांच्या संस्कृतीची त्याच्यावर पडलेली छाप व अखिल भारतीय सांस्कृतिक घटनेत त्या विशिष्ट प्रांतांचे स्थान ह्यांचा साधकबाधक प्रमाणाने जरूर विचार करावयास हवा. त्या दृष्टीने शास्त्रीबोवांचे लिखाण एकांगी वाटते. उदा. 'आमचा देश, आमची देशी भाषा, आमचे देशी लोक' ह्या लेखमालेत त्यांनी द्राविडी संस्कृतीचे ऋण कबूल केले आहे. महाराष्ट्राच्या मूळ रहिवाश्यांच्या इतिहासाची छाननी केली तर ते विधान चूक आहे असे म्हणता येणार नाही; परंतु पुढे शास्त्रीबोवांनी गोपाळकृष्ण, व कृष्णद्वैपायन, अर्जुन इत्यादी सर्व 'काळ्या' विभूतींना महाराष्ट्रीयांचे पूर्वज बनवले आहे. शास्त्रीबोवांनी ह्या विधानास दिलेली सर्व कारणे लक्षांत घेतली तरी देखील त्यास पुष्टी मिळत नाही. अशा रीतीने पायाच डळमळीत राहिल्यामुळे त्यांचे प्रत्येक विधान पूर्णपणे पारखून घ्यावे लागते. परंतु ह्या बाबतीत शास्त्रीबोवांनी केलेल्या कामगिरीचे महत्त्व मात्र ह्यामुळे कमी होते असे नव्हे. साधनांचा अभाव हे एक मोठे कारण ह्या उणीवेस असू शकेल. कै. राजवाड्यांच्या लेखनात, किंवा साधनसामुग्री अधिक असून देखील कै. केतकरांच्या 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' ह्या ग्रंथांत भरमसाट विधाने काय थोडी आढळतात ? पण म्हणून त्यांच्या त्या ग्रंथांना किंमत नाही असे थोडेच ठरते ? भारतीय प्राचीन इतिहासाची साधनसामुग्रीच इतकी तुटपुंजी आहे की बरीचशी कल्पकतेची जोड दिल्याशिवाय कुठल्याही दोन विधानांत किंवा प्रसंगांत सुसंगती दाखवता येत नाही.

दुसऱ्या भागात येणाऱ्या लिखाणात शिवकालीन आणि पेशवाईपर्यंतच्या मराठेशाहीचे विवेचन आहे. ह्यात 'मराठेशाही' ही लेखमाला सर्वांत अगोदरची व अधिक वाचनीय आहे. ह्यालाच पुरवणी म्हणून म्हणता येईल असा 'शिवछत्रपतींच्या चरित्रातील काही मुद्दे' हा लेख पण महत्त्वाचा आहे. परंतु मराठेशाहीवरचे हे लिखाण सुबोध आणि चांगले असले तरी स्वतंत्र अभ्यासाचे द्योतक नाही. शास्त्रीबोवांनी ह्या लेखमालेला जे आधारग्रंथ

दिलेले आहेत ते बहुतेक इंग्रजी आहेत. शास्त्रीबोवांनी मराठेशाहीवर प्रत्यक्ष बखरी वाचून थोडेच लेखन केलेले आढळते. ह्यावरून ते स्वयंसिद्ध इतिहासकार नसून इतिहासाचे निःसीम भोक्ते होते असे म्हणावयास काहीच हरकत नाही. ह्याशिवाय ‘ शिवाजी ’, ‘ संभाजी ’, ‘ राजाराम ’, ‘ अहिल्याबाई ’ ह्या प्रसिद्ध व्यक्तींची, त्याचप्रमाणे तितक्याच अप्रसिद्ध सिधोजी निपाणकर व रत्नाकरपंत अप्पा ह्यांचीही चरित्रे त्यांनी लिहिली आहेत. ही सर्व चरित्रे शालेय शिक्षणाच्या हेतूने लिहिली आहेत. मराठ्यांच्या इतिहासासंबंधाने शास्त्रीबोवांनी वेळोवेळी जी मते व्यक्त केली, त्यावरून शिवाजीची कर्तबगारी, मुत्सद्दीपणा, धार्मिक प्रवृत्ती इत्यादी गुणांमुळे शास्त्रीबोवांना त्यांच्याविषयी कमालीचा आदर वाटे असे म्हणता येईल. त्याच्या हयातीत चंद्रराव मोऱ्यांचा वध हेच काय ते एक किल्मिष होते. संभाजीवर त्यांचा मोटा रोष होता. संभाजीच्या वधासंबंधानेही शास्त्रीबोवांना काही अनुकंपा वाटलेली दिसत नाही. इंग्लंडच्या इतिहासात पहिला चार्लस हा जरी स्वतःच्या अमानुष कृत्यांमुळे फाशी गेला असला तरी त्याचे शेवटल्या दिवसाचे वर्तन इतके तेजस्वी व बहारीचे झाले की त्याच्या शत्रूंनीसुद्धा तो दिवस इतिहासातील अमर क्षण म्हणून लिहून ठेवले. संभाजीचा वध व त्यावेळची त्याची बाणेदार वृत्ती हीदेखील जातिवंत मराठ्याला स्फूर्ती देणारी बहुमोल आठवण आहे. पण त्याबद्दल शास्त्रीबोवांनी काहीच लिहिले नाही. राजाराम व ताराबाई ह्यांच्याबद्दल शास्त्रीबोवांस सहानुभूती वाटत असे. पण शाहूबद्दल मात्र त्यास तसे प्रेम वाटत नसे. ताराबाई व शाहू ह्या दोघांनाही धाब्यावर बसवून पेशव्यांनी मराठ्यांची गादी बळकावली म्हणून त्यांना पेशव्यांचा फार राग येत असे. स्वामिद्रोहाच्या ह्या पापाचे फळ कुलक्षयाच्या रूपाने पेशव्यांस भोगावे लागले असे ते वारंवार आपल्या लेखात प्रतिपादन करीत. त्यामुळे पेशवाईबद्दल आदर असणाऱ्या इतिहासकारांशी त्यांचे कधीच पटले नाही.

शास्त्रीबोवांनी एकंदरीत जे ऐतिहासिक लेख लिहिले त्यांपैकी बहुतेक सर्व ‘ विविधज्ञानविस्तारात ’ प्रसिद्ध झाले. सतत पंचवीस वर्षे एका मागून एक अशा किती तरी लेखमाला त्यांनी लिहिल्या. त्यातील काही पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या, तर काही ‘ विस्तारा ’तच कायमचे ठाण मांडून बसल्या

आहेत.

**मराठेशाही** :– ही शास्त्रीबोवांची विस्तारातली पहिली लेखमाला. १८८६ साली ही लिहावयाला शास्त्रीबोवांनी सुरुवात केली. १८८८ मध्ये ती पुरी झाली. ही लेखमाला शास्त्रीबोवांच्या अत्यंत लोकप्रिय लेखमालांपैकी एक आहे. सर्वसाधारण मराठ्यांस रुचतील अशीच मते त्यात त्यांनी प्रतिपादन केली आहेत. त्यामुळे ह्याबाबतीत त्यांचा कुणाशी मतभेद झाल्याचे दिसून येत नाही.

शास्त्रीबोवांनी ह्या लेखमालेला ऑर्म, मल्हार रामचंद्र चिटणीस, ग्रँट डफ, जोनाथन स्कॉट व कृष्णाजी अनंत सभासद ह्यांच्या ग्रंथांचा आणि लेखांचा आधार घेतलेला आहे.

शिवाजी हा ह्या लेखमालेतील अत्यंत महत्त्वाचा लेख आहे. शिवाजीच्या चरित्राची रूपरेखा जरी शास्त्रीबुवांनी दुसऱ्याकडून उचलली असली तरी शिवाजीचे असामान्य व्यक्तिमत्त्व आणि त्याची कामगिरी ह्यांबद्दलच शास्त्रीबोवांचे विचार अगदी स्वतंत्र आहेत.

शास्त्रीबोवांना क्रांती हवी होती. पण त्यांना रक्तपाती क्रांती नको होती. मनुष्यांच्या विचारात व आचारात आमूलाग्र बदल जिने होतो अशी क्रांती त्यांना पाहिजे होती. म्हणूनच मानसिक आणि आध्यात्मिक बळ आणि गोड वाणी ही त्यांना क्रांतीची मुख्य आयुधे वाटत. शिवाजीने तोरणा व पुरंधर किल्ला सर केला, त्या प्रसंगांना उद्देशून शास्त्रीबोवा म्हणतात, ‘ शिवाजीने रक्ताचा एक थेंब न पाडता मऱ्हाठी पातशाहीचा पाया घातला. शिवाजी खरोखरच रक्तपातप्रिय नव्हता म्हणूनच तो पाया घालू शकला. तशात महाराष्ट्रांचा रक्तपात तर कोणत्याही रीतीने त्यास इष्ट नव्हता. त्याचा मोठा हेतू मऱ्हाठे एकवटण्याचा.’ ह्या चरित्रास मुख्य आधार कृष्णाजी अनंत सभासद ह्यांच्या शालिवाहन शके १६१६ ह्या वर्षी लिहिलेल्या व ‘ काव्येतिहाससंग्रहा ’मध्ये छापलेल्या ‘ शिवछत्रपतीचे चरित्र ’ ह्या लेखाचा आहे.

संभाजी, राजाराम, शाहू ह्यांचीही त्रोटक चरित्रे ह्या लेखमालेत आली आहेत. त्यांपैकी शिवाजी, संभाजी व राजाराम ह्यांची चरित्रे शास्त्रीबोवांनी मागाहून स्वतंत्रपणे छापून काढली. ती शाळेतील विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशी आहेत. ह्या चरित्रांपैकी शिवाजीच्या चरित्राबद्दल असे

सांगतात, की मराठीत पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले शिवाजीचे पहिले चरित्र शास्त्रीबोवांचेच होय. शिवाजीचे कमरेपर्यंतचे नेहमी दिसणारे चित्रदेखील शास्त्रीबोवांनी पहिल्याने आपल्या पुस्तकांवर छापले. पुढे ते लोकप्रिय झाले.

**मराठ्यांच्या संबंधाने चार उद्गार–** शास्त्रीबोवांनी महाराष्ट्र, मराठी भाषा, महाराष्ट्र धर्म, इत्यादि विषयांवर जे काही लिखाण केले आहे त्यात ‘ मऱ्हाठ्यांच्या संबंधाने चार उद्गार ’ हे पुस्तक विशेष महत्त्वाचे आहे.

हे पुस्तक म्हणजे ‘ विविधज्ञानविस्तारातील ’ लेखमालेचा नवा अवतार आहे. हे पुस्तक सकृद्दर्शनी संशोधनात्मक वाटले तरी ह्यातील संशोधनाचा भाग बराचसा वरवरचा आहे. एक तर हे पुस्तक सामान्य वाचकासाठी लिहिलेले असल्यामुळे, त्यात तात्त्विक चर्चा जशीच्या तशी देता येणे शक्य नव्हते. दुसरे म्हणजे आधुनिक प्रश्न भूतकालीन प्रसंगाशी ताडून पाहण्याची सवय शास्त्रीबोवांस असल्यामुळे संशोधकाची उच्च भूमिका त्यांना ह्या ग्रंथात राखता आली नाही. पुस्तकाचा मूळचा उद्देश हा की भूतकाळातील घडामोडींचा अभ्यास करून शहाणे व्हावे आणि ह्या ज्ञानाचा सद्यःस्थितीत शक्य तो फायदा करून घ्यावा.

अर्थात सद्यःस्थितीचे विवरण करताना टीकेचे अस्त्र चांगलेच परजले आहे. मात्र ह्या टीकेचे रोख विशिष्ट व्यक्तींवर किंवा कंपूवरच नसून, समाजाच्या घटक समजल्या गेलेल्या प्रत्येक व्यक्तिसमूहावर व संस्थेवर आहे. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, ख्रिस्ती मिशनरी, ब्राह्मण व ब्राह्मणेतर ह्या सर्वांचे दोष झणझणीत शब्दात त्यांनी पुढे मांडले आहेत, आणि ते दोष काढून टाकण्यास काय इलाज करावे, हे पण त्याचबरोबर कळकळीने दाखविले आहे.

ह्या पुस्तकाचा मुख्य विषय ‘ वर्णद्वेष ’ हा आहे. भाषाशास्त्राच्या आधाराने शास्त्रीबोवांनी असे प्रतिपादन केले आहे की बावीसशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रात वर्णभेद नव्हता. ‘ कुळवाडी ’ ही आर्य व द्रवीड ह्यांच्यापासून झालेली एकच जात महाराष्ट्रात होती. नंतर जैनांच्या प्रचार कार्यामुळे शाकाहारी जैन व मांसाहारी ‘ कुळवाडी ’ असे दोन भेद झाले. त्यानंतर ‘ ब्राह्मण ’ जात झाली. अर्थात महाराष्ट्रात शेकडो जाती ह्या मूळच्या स्वतंत्र जाती नसून वरील जातींचेच पोटभेद आहेत. म्हणून इतिहासापासून

आम्हाला हेच शिकावयाचे की महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस पहिल्याने ‘ मऱ्हाठा ’ आहे. मराठी बाणा हा महाराष्ट्रीयांचा समानधर्म असल्यामुळे वर्णद्वेषाला महाराष्ट्रात जागा नसावी.

प्राचीन महाराष्ट्रात भक्ष्यभेद नव्हता; आणि सर्व लोक शैव असल्यामुळे धर्मभेदही नव्हता. जैनांच्या आक्रमणामुळे हे भेद आले. त्यांची बरी वाईट फळे महाराष्ट्रास कशी भोवली हे प्राचीन काळापासून तो अगदी पेशवाई-पर्यंतच्या महाराष्ट्राच्या इतिहासाचा आढावा घेऊन शास्त्रीबोवांनी वर्णन केले आहे.

‘ सर्व लोकांचा व्यवहार व दळणवळण जिच्यात चालते ’ अशी ‘ प्रगट ’ किंवा प्राकृत भाषा सोडून ब्राह्मणांनी संस्कृत भाषेचे स्तोम माजविल्यामुळे वर्णभेद बळावला. ह्या वर्णद्वेषाचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न महाराष्ट्रीय संतपरंपरेने केला. अर्थात् आजच्या जबाबदार संस्थांना जर वर्णद्वेष दूर करावयाचा असेल तर संतांची शिकवण व तिची जपणूक करणारी मराठी भाषा ह्यांना भरपूर उत्तेजन मिळाले पाहिजे. अशी एकंदरीत शास्त्रीबोवांची विचारसरणी होती.

**आमचा देश, आमचे देशी लोक, आमची देशी भाषा :–**

‘**आमचा देश** ’ म्हणजे महाराष्ट्र. महाराष्ट्राच्या प्राचीन वसाहतीसंबंधाने व भाषेसंबंधाने जे मुद्दे आहेत ते ‘ मऱ्हाठ्यांसंबंधाने चार उद्‌गार ’ ह्या पुस्तकांत आलेच आहेत. म्हणून त्यांबद्दल विशेष उल्लेख न करता इतर महत्त्वाच्या मुद्यांचाच विचार खाली केला आहे. ही लेखमाला विस्तृत असून तिचे वर दिलेल्या नावाप्रमाणे तीन भाग केले आहेत.

पहिल्या भागात महाराष्ट्राच्या चतुःसीमा वर्णन केल्या असून हा देश आर्यावर्ताच्या बाहेरचा असून त्यांत विदर्भ, गोवे व कर्नाटक ह्यांचासुद्धा समावेश होत होता, असे विधान केले आहे. ह्या नंतर प्राचीन काळापासून ह्या देशाचा राजकीय इतिहास निवेदन केला आहे. त्याचा सारांश असा :– महाराष्ट्राच्या इतिहासाचे दोन भाग पडतात. एक शालिवाहनापूर्वीचा व दुसरा नंतरचा. पहिल्या भागासंबंधाने काही माहिती मिळत नाही.

शास्त्रीबोवांना ‘ बृहत्कथा ’ हा ऐतिहासिक ग्रंथ असावासे वाटत होते. पण कथासरित्सागरांत (ब्राह्मणांनी रचिल्यामुळे) ऐतिहासिक गंधही नाही

असे ते म्हणत.

शालिवाहनी कुळांतल्या कारकीर्दीला आरंभ कधी झाला हे समजत नाही. मात्र ज्या वेळी नंद राजे मगधांत राज्य करीत होते, त्या वेळी शालिवाहनाचे महाराष्ट्रात राज्य होते ह्यात शंका नाही. ह्यानंतर ४०० वर्षांनी शककर्ता शालिवाहन गादीवर आला. त्याने विक्रम वंशातील राजाबरोबर लढाई मारून त्याचा मोड केला. तेव्हापासून दक्षिणेत शालिवाहन शक मोजूं लागले. पराभव पावलेल्या विक्रम राजाचे नाव हर्ष असून तो मोठा पराक्रमी होता. त्याने काश्मीर देश काबीज करून तेथे आपला शक नुकताच चालविला होता. ह्या विक्रमाच्या शकांत व शालिवाहनाच्या शकांत मुळीच अंतर नाही. शालिवाहनाचा वंश शालिवाहन शकाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकांत नष्ट झाला असावा असा अंदाज आहे.

शालिवाहन शतकाच्या दुसऱ्या पादांत बदामीला जैसी चाळक्याने (जयसिंग चालुक्य) नवीन गादी स्थापिली. मध्यंतरी शालिवाहनानंतर राठोड घराणे राज्य करीत होते. त्यानंतर चाळके आले. पुलकेशीचा (चाळके) मुलगा कीर्तिवर्मा ह्याने नल किंवा नलोडे, मोरे व कदम ह्या तीन कुळीस साफ बुडविले. त्याच्यानंतर त्याचा भाऊ मांग चाळके गादीवर बसला. त्याने नर्मदेवर स्वारी करून कलचुऱ्यांस बुडविले व कुडाळावरही आपला अंमल चालविला. त्याने रेवदंड्यावर जलमार्गाने स्वारी केलेली दिसते. बदामीची सुंदर लेणी त्यानेच कोरविली. त्याच्यानंतर कीर्तिवर्म्याचा मुलगा दुसरा पुलकेशी गादीवर बसला. शालिवाहनाच्या सहाव्या शतकात त्याने उत्तरापथाच्या हर्षवर्धन राजाचा नर्मदेवर पराभव केला. तेव्हापासून बदामीकर आपल्या नावामागे 'परमेश्वर' असे बिरुद लावू लागले.

शालिवाहनाच्या सातव्या शतकाच्या शेवटल्या पादांत कन्दर किंवा कृष्ण नावाच्या राठोड राजाचे नाव ऐकू येते. त्याचा नातू गोविंद ह्याने आठव्या शतकात कुमारीपर्यंत दक्षिणापथ, वर मारवाड व पूर्वेस गौडमंडळ अशा तिन्ही दिशा एकदम हलवून टाकिल्या. वेरूळची भव्य शैव लेणी ह्याने करविली. शालिवाहन आठ व नऊ शतके ही महाराष्ट्राच्या इतिहासात संस्मरणीय आहेत. आठव्या शतकांत मालखेडची गादी जाधवांनी स्थापली.

निजामशाहीतील कल्याणकर चाळक्यांच्या गादीच्या स्थापनेचा काळ जवळ जवळ ह्याच होता. कोकणात एक सासष्टीकरांची ठाणे जिल्ह्यात व दुसरी खारेपाटणकरांची रत्नागिरी जिल्ह्यात अशा दोन गाद्या ह्याच सुमारास स्थापन झाल्या. करवीरकर शेलारांची गादी पण ह्याच सुमारास अस्तित्वात आली.

नवव्या शतकात गोव्याच्या कदमांची ख्याती होऊ लागली. दहाव्या शतकाच्या अखेरीस कल्याणकर चाळक्यांमध्ये विक्रम चाळके हा पराक्रमी राजा होऊन गेला. ह्याने आपला शक चालू केला होता असे असे दिसते. पण तो त्याच्यानंतर थोडेच दिवसांत नष्ट झाला.

शालिवाहनाच्या बाराव्या शतकापासून अर्वाचीन काळास आरंभ झाला. तेव्हापासून तो थेट इ. स. १८१८ च्या खडकीच्या लढाईपर्यंतचा मराठेशाहीचा त्रोटक वृत्तान्त शास्त्रीबोवांनी दिला आहे.

**आमचे देशी लोक** :– ह्यांत प्राक्शालिवाहनी वसाहती व हल्ली महाराष्ट्रात रूढ असलेल्या जाती व पोट जाती ह्यांचा वृत्तान्त आला आहे. डॉ. केतकरांच्या 'समाजशास्त्राचे' बीज ह्या लेखात पेरले गेले आहे ह्यात संशय नाही.

प्राक्शालिवाहन काळांतील लोकांचा इतिहास अज्ञात असून मनोरंजक आहे. त्यामुळे शास्त्रीबोवांचे ह्या बाबतीत विचार पुढे दिले आहेत.

(१) **नाग** :– नाग हे सर्प नसून डोंगरी लोक होते. संस्कृतांत त्यांना 'खाली राहणारे' म्हटले आहे. त्यावरून ते दक्षिणेकडचे असावे. नंतर ते वर हिमालयापर्यंत आणि काश्मीरपर्यंत पसरले. महारांच्या नावास अद्यापि 'नाक' किंवा 'नाख' शब्द जोडतात. महार मूळचे नाग असावेत.

(२) **गोप** :– हे सपाटीवर राहणारे लोक. गुराखी डोंगऱ्यांच्या नंतरचा. हे नागांप्रमाणे स्थायिक नव्हते. 'व्रज' म्हणजे चालणारे लोक. कृष्ण मूळचा गवळ्याचा मुलगा. ब्राह्मणांनी त्याला वासुदेव बनविले. गोदावरी, गोपपूर (गोवे), गोमंतक व गोवर्धन ह्या गोपांच्या चार नामांकित निशाण्या आजमितीस महाराष्ट्रात आहेत. कन्हरपासून कर्नाटक नाव पडले.

(३) **वानर** :– हे विशिष्ट जंगली लोक होते. ह्यांचे मूळचे गाव पंपा. आज ते हंपी ह्या नावाने प्रसिद्ध आहे.

(४) **कोळी** :– मनूचे आद्यस्थान कोसलदेश. तो चिनी प्रवासी हुएन त्सांग ह्याने महाराष्ट्रातच घातला आहे. कोसलवनापासून कोळवन हा शब्द निघाला. तेच मूळचे कोळी लोकांचे वसतिस्थान.

(५) **मानव** :– हेही मूळचे महाराष्ट्रातलेच होत. त्याचप्रमाणे दनु, दानव व द्रविड हेही येथे होते. ब्राह्मण मात्र मूळचे ब्रह्मावर्ताचे रहाणारे. त्यांचा प्रवेश महाराष्ट्रात फार उशीरा झाला.

**आमची देशी भाषा** :– प्राकृत व मराठी भाषेच्या पूर्वपीठिकेसंबंधाने शास्त्रीबोवांची मते ‘प्राकृत भाषेच्या चिकित्सेत’ अधिक स्पष्ट रीतीने मांडली गेली आहेत. त्यांचीच पुनरावृत्ती ह्या लेखात झाली आहे.

**ऐतिहासिक गंजिफा** :– शास्त्रीबोवांचे लक्ष्य ब्राह्मणेतर चळवळीकडे वेधल्यानंतर त्यांनी जे बहुमोल उद्‌बोधक लिखाण केले त्यांत ‘ऐतिहासिक गंजिफा’ ही ‘दिनबंधू’त प्रसिद्ध झालेली लेखमाला फार महत्वाची आहे. ही लेखमाला मोठी असून तिचे विषयही विविध होते. दुर्दैवाने ही लेखमाला जुन्या ‘दीनबंधू’बरोबरच बरीचशी नष्ट झाली असून, डॉ. नवले ह्यांनी चालविलेल्या नव्या ‘दीनबंधू’त सुमारे नऊ, दहा गंजिफा पुनर्मुद्रित झाल्या आहेत. त्यांचे विषयी त्यांच्या आधारानेच पुढे दिलेले विवेचन करणे सोपे झाले. भाषेच्या आणि विषयांच्या दृष्टीने ह्या गंजिफा विशेष उल्लेखनीय आहेत. ही लेखमाला शेवटच्या चार-पाच वर्षांत (१९०३–१९०८) शास्त्री बोवांनी लिहिली आहे. पण हिची भाषा ‘कैसरकडून सुलतानाकडे’ ह्या पुस्तकाप्रमाणे मासलेवाइक किंवा ‘सुबोध पत्रिके’तील १९०२ सालच्या लेखांप्रमाणे तुटक व हमखास बोलीच्या रूपाची नाही. ‘हिंदुधर्मविवेचकां’त १८८७ साली जे त्यांचे लेख येत असत त्यांतील भाषेप्रमाणे डौलदार, ओघवती आणि सुबोध आहे. अर्थात आपले मुद्दे लोकांपुढे मांडण्याच्या विशिष्ट तऱ्हेमुळे आलेला ‘राजारामशास्त्री छाप’ ह्याहीं लेखांवर हुबेहुब पडला आहे.

विषयाच्या दृष्टीने हिंदुधर्मांचे स्वरूप, हिंदू म्हणजे काय, हिंदूचे एकीकरण, ब्राह्मण कोण, लग्नाचे विधी व त्यांचे स्पष्टीकरण, महाभारत व व्यास, परशुराम, इत्यादी विषय अद्यापही समाजशास्त्राच्या अभ्यासकांना ताजे वाटतात. ते अजून समाजसुधारकापुढे पेचप्रश्न म्हणून उभे आहेत. हे

विषय शास्त्रीबोवांनी इतक्या स रळरीतीने व सडेतोडपणाने, इतकेच नव्हे तर, नानातऱ्हेची माहिती गोळा करून लिहिले आहेत की ते आजही जनतेचे मार्गदर्शन करूं शकतील.

ह्या गंजिफांतील कांही गंजिफाचा सारांश खाली दिला आहे.

## गंजीफ १

**क्षत्रियांचे अस्तित्व** :– ह्या लेखाचा विषय ब्राह्मण व क्षत्रिय (म्हणजेच) उच्चवर्णीय ब्राह्मणेतर ह्यांच्यांमधील तेढ हा आहे. ब्राह्मणांचे म्हणणे असे की खऱ्या क्षत्रियांचा केव्हाच धुव्वा परशुरामाच्या काळी उडाला आहे. तेव्हा स्वतःस क्षत्रिय म्हणवणारे हे नामधारी क्षत्रिय, पण खरे शुद्र व कुळंबट आहेत. उलट क्षत्रियांचे म्हणणे असे की ह्या ब्राह्मणांत काय गुण शिल्लक आहे तर आम्ही त्यांस मानावे ? कोणाही विचारवंतास हा वाद लज्जास्पद वाटेल. जुनी रूढी काहींही असो. आजच्या काळात विराट पुरुषाचे मुख व बाहू समजल्या गेलेल्या ह्या दोन गटांनी एकमेकांचा नायनाट करणे म्हणजे खऱ्या संस्कृतीचा उघड ऱ्हास आहे. बुद्धिमान व बलिष्ठ लोक नष्ट झाले तर समाजांत काय शिल्लक राहील ? ह्या वाद-ग्रस्त प्रश्नाने उत्तर शास्त्रीबोवा असे देतात की ब्राह्मणांना आपले सामर्थ्य पटवून देण्यासाठी क्षत्रियांनी अधिक सुसंघटित व्हावे. ब्राह्मणांनी पण क्षत्रियांच्या परिषदांकडे दुर्लक्ष करूं नये. दोन पक्षांतील समंजस विचार-विनिमय हेंच खऱ्या उन्नतीचे पहिले पाऊल आहे.

## गंजीफ २

**हिंदु व हिंदू धर्म** :– हिंदू ह्या शब्दाच्या खऱ्या अर्थाची फोड करून सांगणारे शास्त्रीबोवा पहिलेच विद्वान व समाजसुधारक आहेत. परक्या शद्बाची हकालपट्टी करू इच्छिणाऱ्या हिंदुत्वाभिमान्यांनी इकडे जरूर लक्ष द्यावे. हिंदू हा शब्द जरी ‘ सिंध ’ व ‘ सिंधू ’ ह्या शब्दांपासून झाला असला तरी तो ‘ केवळ मुसलमानांनी जन्मविलेला आहे. ’ मग तो इकडच्या लोकांनी उचलला. ह्या शब्दाचा अर्थ फारसीत ‘ गुलाम ’ असा होतो. हिंदुस्थानावर स्वारी करणाऱ्या अफगाण लोकांनी हिंद अथवा सिंधमधले इतके लोक गुलाम करून विकले की हा शब्द अफगाण लोकांत गुलामाचा

वाचक झाला. ‘ तेथून तो रूमप्रांती म्हणजे आशिया मायनरमध्ये गेला. इ. स. १४ शतकांतल्या जलालुद्दीन रूमीने तो आपल्या काव्यांत दाखल करून ठेवला आहे.’ अर्थात ‘ हिंदुस्थान ’ म्हणजे ‘ मुसलमानांची गुलामगिरी करणारांचे स्थान ’ व ‘ हिंदूधर्म म्हणजे ‘ मुसलमानांची गुलामगिरी करणारांचा धर्म ’ असे ह्या आमच्या अत्यंत जिव्हाळयाच्या दोन शब्दांचे रहस्य शास्त्रीबोवांनी सांगितले आहे.

हिंदू धर्माला धर्म हें नांव शोभत नाही. कारण त्यांत ख्रिस्ती धर्माप्रमाणे बंधुत्वाचे नाते नाही. जातिभेदामुळे रोटीबेटीचा व्यवहार रोखला गेला आहे त्यामुळे धर्म जिवंत राहण्यास जो एकोपा व व्यवहाराची देवघेव लागते ती थांबली आहे.

दुसरे असे की हिंदुधर्मात संघटना करण्याला इतर धर्मांप्रमाणे एक ‘ शास्त्र ’ प्रमाण नाही. ‘ एकजातपणा ’ व ‘ शास्त्र ’ हे धर्माचे ‘ दोन जरीपटके ’ होत. ज्या धर्मात ह्यांचे वावडे आहे, त्याला धर्म कशाला म्हणावयाचे ? जोपर्यंत हा मेलेला धर्म आम्ही उराशी बाळगून राहू तोपर्यंत राष्ट्रीयत्वाची कुठलीही भावना आमच्यात येणेच शक्य नाही.

## गंजीफ ३

**चित्पावन–कऱ्हाडे** :–शास्त्रीबोवांनी अतिशय समतोल बुद्धीने व पुष्कळ माहिती मिळवून जे थोडे मनोरंजक लेख लिहिले आहेत, त्यापैकी हा लेख आहे. ह्यांतील विधाने जरी कित्येकांस पटत नसली तरी तो कुठेही कुणास बोचण्यासारखा नाही. हेच ह्या लेखांचे वैशिष्टच.

ह्या लेखांतील मुद्दे पुढीलप्रमाणें सांगता, येतील. (१) मराठेशाहीच्या उत्कर्षाच्या पूर्वार्धात अनेक ‘ मराठ्या ’ जातींचे साहाय्य शिवाजीस लाभले. सर्वांत मोठे साहाय्य ब्राह्मण, राव (मराठे) व प्रभु (कायस्थ) ह्यांचे झाले. ब्राह्मणांच्या तीन धान्याहारी व दोन मांसाहारी जाती महाराष्ट्रात आहेत. मांसाहारी ब्राह्मणांत सारस्वत (शेणवी) व कुडाळदेशकर, धान्याहारी ब्राह्मणांत प्राचीन कालापासून गाजलेले देशस्थ, कोकणस्थ व कऱ्हाडे हे मोडतात. यांपैकीं कोकणस्थ व कऱ्हाडे हें दोघेही बराच काळपर्यंत ‘ कोनाकोपऱ्यांत आपल्या आयुष्याचे दिवस घालवीत पडले होते. शाहूच्या अभिषेकापासून ह्या दोन जाती पुढे आल्या.’

(२) चित्पावन हा शब्द ' चित्तपावन ' किंवा ' चितापावन ' ह्या दोहों-पैकी कोणत्या शब्दापासून निघाला तें सांगता येत नाही. मात्र चित्पावन आपला संबंध परशुरामशी जोडतात ; आणि त्या संबंधाचे चिन्ह म्हणून ' दाघोबा ' (देह गोप) म्हणून एक लिंगाच्या आकाराच्या तीन दगडांचे बनलेले एक चिपळूणच्या जवळचे स्थान दाखवितात. वस्तुतः ते ब्रह्मा, विष्णु, महेशाचे वाचक नसून, ती कोणातरी बौद्ध भिक्षूची समाध असावी. चित्पावनांचा संबंध द्रविडी नंब्रुद्री ब्राह्मणांशी आला असावा. आजगांवच्या परशुरामाची पुजारकी कऱ्हाडयांकडे वंशपरंपरेने शेकडो वर्षे चालत आली आहे, हे लक्षांत ठेवण्याजोगे आहे.

(३) कऱ्हाडे हे नाव कऱ्हाड गावापासून पडले असावे. वाडी प्रांती चित्पावनांची बरीच वसाहत होती. ती कऱ्हाडे व शेणवी ह्या दोघांनी उठविली. चित्पावन व कऱ्हाडे दोघेही श्राद्धाच्या दिवशी मांसान्न भक्षण करीत ; पण पुढे जैन मताच्या प्रचाराने ती रीत बंद पडली. मांसाहारा-बरोबर इकडील ब्राह्मणांचे दुसरेही सांस्कृतिक गुण नष्ट झाले व जैन धर्माची पक्कड लोकांवर बसली.

ही झाली शास्त्रीबोवांची इतिहासविषयक ढोबळ कामगिरी. ह्या शिवाय त्यांनी दुसरेही किरकोळ लेख लिहिले आहेत. ह्यांना किरकोळ म्हणण्याचे कारण त्यांतील चरित्रवजा असे जे लेख आहेत ते फार लहान आहेत.

## चरित्रे

त्यांच्या चरित्रात्मक लिखाणात रामदास, तुकाराम व एकनाथ ही लिखाणे प्रमुख आहेत. परंतु व्यक्तिगत किंवा सामाजिक इतिहासापेक्षा शास्त्रीबोवांचे लक्ष त्या व्यक्तीचा विकास कोणत्या गुणामुळे झाला, आणि इतिहासात त्या गुणांचे खरे मोल काय ह्याकडेच जास्ती असे.

**रामदास** :–(इंग्रजी) रामदासाबद्दल संत म्हणून शास्त्रीबोवांस फार आदर असे. राज्यक्रांति घडवून आणण्यास त्याचे श्रम बरेच कारणीभूत झाले असेही त्यांनी प्रतिपादन केले आहे. परंतु रामदासाचा व शिवाजीचा समकालीन असूनदेखील, गुरुशिष्यसंबंध तर राहोच परंतु एरवीदेखील

फारसा संबंध आलेला नाही. ती निव्वळ दंतकथा आहे. शिवाजीचा नातू शिवाजी (शाहू) आणि रामदासांचा त्यांच्याच नावांचा चाफळचा शिष्य ह्यांचा संबंध असावा. शिवाजी सातान्याला क्वचितच गेला होता, असे शास्त्रीबोवांचे मत आहे.

**तुकाराम**:– तुकारामाच्या अभंगात एकनिष्ठ भक्ती आहे. आणि जातिभेदाचा तिळमात्र संभव नाही. त्याच्या साधुवृत्तीमुळे ब्राह्मणदेखील त्याचे शिष्य बनले. ब्राह्मणेतरांत देखील सर्वात लोकप्रिय झालेला संत तुकाराम, असे तुकारामाचे थोडक्यात शास्त्रीबोवांनी वर्णन केले आहे.

**एकनाथ**:– शूद्रास जवळ करणारा आणि खरे काव्य निर्माण करणारा संत म्हणून एकनाथाला शास्त्रीबोवांनी गौरविले आहे. त्यांनी एकनाथाचे चरित्र रसाळपणे लिहिले असून, त्यात अंत्यजांच्या मुलावर एकनाथांनी जे प्रेम दाखविले त्या प्रसंगाचे विशेष कौतुक केले आहे.

चरित्र्याच्या दृष्टीने खाफीखानाचा इतिहास ही भाषांतरवजा लेखमाला उल्लेखनीय आहे. त्याचप्रमाणे ‘ फिरंग्याचा इकडील इतिहास ’ ही लेखमालाही शास्त्रीबोवांच्या विशाल जिज्ञासेचे द्योतक आहे.

**लक्ष्मीबाई झांशीकरीण**:– कै. पारसनीसांचे लक्ष्मीबाईचे चरित्र प्रसिद्ध झाल्यानंतर शास्त्रीबोवांनी त्याला उत्तरवजा असलेला लेख ‘ विस्तारा ’त प्रसिद्ध केला त्यात त्यांनी लक्ष्मीबाईच्या कार्याची केलेली मीमांसा बऱ्याच इतिहास भक्तांना व तिच्या सर्व चाहत्यांना झोंबेल अशी आहे. ते म्हणतात की लक्ष्मीबाईची स्वातंत्र्यस्फूर्ती स्वयंभू नसून केवळ प्रसंगाने तयार झालेली व गत्यंतर नसल्याने कार्यात उमटलेली वृत्ती होती. शिवाजीचे स्वातंत्र्यप्रेम रोमरोमात पहिल्यापासून खेळत आलेले होते. लक्ष्मीबाईची थोरवी अशी की एकदा कार्याला हात घातल्यावर मात्र आपले सर्वस्व तिने पणाला लावले. प्राण दिला पण माघार घेतली नाही. जर इंग्रज तिच्याशी चांगले वागते, तर ऐषआरामातच राहून ती आपली ‘ ज्वानी सफल करती.’

रत्नाकरपंत आपा कुळकर्णी, अहिल्याबाई होळकरीण, व सिधोजी निपाणकर ह्यांची चरित्रे शास्त्रीबोवांशी मुलांकरिता लिहिली आहेत. अहिल्याबाई सोडल्यास दुसरी दोन नावे अपरिचितच आहेत. पण शास्त्रीबोवांनी प्रसिद्ध

व अप्रसिद्ध सार्‍या व्यक्तींना गुणगौरवाच्या भावनेने एकाच मालिकेत बसविले आहे. शास्त्रीबोवांचे संबंध लेखन म्हणजे लहान मोठ्या गुणी माणसांच्या व्यक्तिचित्रांचे छोटेसे प्रदर्शनच असे.

**कोकणच्या संबंधाने चार शब्दः–** वरील लेखांशिवाय कोकण प्रांता-संबंधी ' कोकणच्या संबंधाने चार शब्द ' ही लेखमाला ऐतिहासिक दृष्टचा फार महत्वाची आहे. कोकणसंबंधी शास्त्रीबोवांपूर्वी व त्यांच्यानंतरची कित्येक वर्षे कोणीच विद्वत्तापूर्ण असे काही लिहिले नाही. त्यामुळे या लेख-मालेचे मोल विशेष आहे. दुर्दैवाने ती अपूर्ण राहिल्यामुळे तिच्या संबंधाने काही खल करणे कठीण आहे.

**भाषांतरेः–** शास्त्रीबोवांच्या ऐतिहासिक कामगिरीत त्यांची काही पुस्तकाची भाषांतरे उल्लेखनीय आहेत. ' फिरंग्यांची इकडील हकिगत ' ' नादिरशहाची बखर ' आणि ' कैसरकडून सुलतानाकडे ' ही तीन प्रसिद्ध आहेत.

**सारांशः–** शास्त्रीबोवांच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल थोडक्यात असे म्हणता येईल की त्यांची हिंदुस्थानच्या इतिहासाबद्दलची कल्पना व्यापक होती. जे जे लोक, मग ते मोगल असोत, फिरंगी असोत वा पार्शी असोत, हिंदुस्थानात कायमचे ठाणे मांडून बसले, त्या सर्वांविषयी शास्त्रीबोवांनी काही ना काही नवीन माहिती मिळविण्याबद्दल मोठी मेहनत घेतली. कोणताही धर्म, कोणताही पंथ, कुठलीही जातजमात त्यांना परकी किंवा हलकी वाटली नाही.

मराठेशाहीवरील त्यांचे लेखन संशोधनाच्या पूर्ण कसोटीस उतरण्या-सारखे नसले तरी त्यांच्या ग्राहकशक्तीचे द्योतक आहे. कुठलीही ऐतिहासिक घटना त्यांच्या नजरेतून सुटली नाही. बारीकसारीक व्यक्तींनाही त्यांनी उपेक्षिले नाही. चांगल्या अभ्यासाशिवाय कुठल्याही ऐतिहासिक घडामोडी-बद्दल असाधारण व स्वतंत्र मत बनवणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. इतिहास कसा शिकावा ह्याचा धडा शास्त्रीबोवांपासून शिकण्यासारखा आहे.

महाराष्ट्रातल्या जातीच्या उपपत्तीबद्दल शास्त्रीबोवांचे विचार निःसंशय मननीय आहेत. त्यांवर समाजशास्त्राच्या दृष्टीने विचार होणे अवश्य आहे.

□ □

## ७

# संशोधनात्मक लेख

' यांच्या विद्वत्तेविषयी पुष्कळ लोकांची खात्री होती. तथापि यांनी विक्षिप्त म्हणून कीर्ती संपादन केली होती, ती स्वतंत्र विचार, लोकांस अप्रिय अशा मतांचे प्रतिपादन, मतांची चंचलता आणि संशोधनाची अपूर्णता इतक्या गुणसमुच्चयामुळे झाली होती. तथापि त्यांच्या लेखात महत्वाचा भाग पुष्कळ होता–' **डॉ. श्री. व्यं. केतकरे,' महाराष्ट्र ज्ञानकोश.'**

शास्त्रीबोवाचे कुठलेच लिहिणे वरचेवर नसे. त्यांची दृष्टिी चौफेर असे. ते सगळे काही नीट पहात. स्वतःला हवे असेल तेवढे वेचून घेत, आणि त्यावर खूप विचार करून काही आराखडे मनात तयार करीत. त्यांच्या विचारांची गति द्रुत असे. त्यामुळे त्याच्या स्वाभाविक चौकस वृत्तीला भारदस्त वळण आणि ग्राहक शक्तीला भरपूर खत मिळाले. कल्पकतेला संयमाची जोड मिळाली; आणि ह्या सर्व गुणांना व्यासंगाची अपूर्व जोड मिळाल्याने त्यांची मते कितीही विक्षिप्त असली, ती आज कितीही टाकाऊ म्हणून ठरली आणि समाजाने त्याच्याकडे कितीही डोळेझाक केली, तरी महाराष्ट्राच्या ज्ञानमार्गाच्या पाऊलवाटेवर ह्या जिज्ञासू प्रवाशाची पाऊले कुणालाही पाह्यची म्हटल्यास सहज दिसण्यासारखी आहेत. गेल्या चार प्रकरणावरून शास्त्रीबोवांचे ज्ञान किती विविध तऱ्हेचे होते हे सहज कळून येते. त्या त्या विषयांतील त्यांची कामगिरी कोणत्या तऱ्हेची होती हे पण दिसून येते. तरीसुद्धा शास्त्रीबोवांच्या विचारांची गरुडभरारी, दीर्घ व्यासंग, आणि आपण करतो ती विधाने खरी आहेत हे सिद्ध करण्याकरता त्यांनी घेतलेले श्रम, ह्या सर्वांचे दर्शन त्यांच्या संशोधनात्मक लेखनांत जसे

होते तसे इतर ठिकाणी येत नाही; आणि म्हणूनच ह्या प्रकरणांत त्यांच्या वेचक संशोधनात्मक लिखाणाची थोडी चर्चा केली आहे. शास्त्रीबोवांचे हे लिखाण इतके मोठे आहे की त्याची समग्र छाननी करावयाची म्हटल्यास शेकडो पाने खर्ची घालावी लागतील. नुसत्या 'विविधज्ञानविस्तारातल्याच त्यांच्या लेखमाला पाहा. किती गुंतागुंतीचे प्रश्न त्यात आले आहेत. 'यदुक्षेत्र कोणते ?' 'महाराष्ट्रांतील लोकांची पूर्वपीठिका.' 'शककाल-विचार.' 'देवांचे अवतार.' 'कोकणचा इतिहास.' 'फिरंग्यांचा वृत्तांत.' 'मराठेशाही.' एक ना दोन. 'विस्तारा'ला विचारपूर्ण भरगच्च वाङ्मयाचे मोठे वाण देणारे विद्वान दोन. पहिले गुंजीकर व दुसरे भागवत. गुंजीकरांपेक्षा भागवंताची कारकिर्द फार मोठी होती. त्यामुळे त्यांचे वाङमय गुंजीकरांपेक्षा विपुल आहे. 'वार्ताहर,' 'विस्तार' 'हिंदुधर्म विवेचक' इत्यादी नियतकालिकांना एकदम वेगवेगळ्या विषयांवर साहित्य आणि तेही विचारांनी परिपूर्ण असे पुरविण्याची शास्त्रीबोवांची शक्ति पाहिली म्हणजे अचंबा वाटतो.

शास्त्रीबोवांच्या काळी संशोधनाची सामग्री तुटपुंजी होती. आधीची वाट रुळलेली नव्हती. विषय अनंत होते. बोट लावावे तिथे विषयाला तोंड फुटे व वादविवादांच्या वावटळी उठत. अर्थात कोणत्याही विद्वानाला आपले म्हणणे लोकसमूहापुढे मांडायचे झाल्यास ह्या सार्वजनिक चकमकीतून सुटता येत नसे. त्यामुळेच पुष्कळदा शास्त्रीबोवांसारख्या अव्वल प्रतीच्या संशोधकाला संशोधनाच्या उच्च पातळीवरून खाली घसरावे लागे. त्यांतल्या त्यांत शास्त्रीबोवा पडले समाजसुधारक. वादविवादाची हौस त्यांना मुळचीच फार. तेव्हा लहान सहान व्यावहारिक बाबींनादेखील ते संशोधनाच्या धारेवर धरीत.

त्यांच्या बऱ्याचशा बहुजनसमाजाला माहीत असलेल्या लिखाणांत संशोधन अपुरे वाटते आणि निष्कर्ष काढण्याची घाई झालेली दिसते. पण ह्या बऱ्याचशा लेखांमागची शास्त्रीबोवांची भूमिका पडताळल्यास, ते लिहिताना त्यांचा हेतू काय होता हे समजून घेतल्यास, हे लेख संशोधनात्मक ठरविण्याची चूक निदान कोणताही विद्वान करीलसे वाटत नाही. परंतु शास्त्रीबोवांचे

समग्र वाङ्मय जिज्ञासू दृष्टीने फारच थोड्यांनी अभ्यासिले असल्यामुळे शास्त्रीबोवांच्या वाङ्मयाचे निरनिराळे विभाग न पाडता, एकाच चाळणीतून सरसकट ते चाळले जाते. त्यामुळे 'ज्ञानकोशकारांनी'ही सरसकट अपूर्णतेचा शिक्का त्याच्या लिखाणावर मारलेला आहे. पण त्यांतल्यात्यांत शास्त्रीबोवांचे काही लिखाण संशोधनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे, ह्याबद्दल दुमत नाही ही एक आनंदाची गोष्ट आहे. फक्त महत्त्वाचे लिखाण कुठले हाच काय तो प्रश्न आहे. ज्ञानकोशकारांनी शास्त्रीबोवांच्या चार मुद्यांचा उल्लेख ओझरता केला आहे. त्यात नाग, गोप वगैरे लोकांचा इतिहास आणि महाराष्ट्रांतील सर्व लोक एकाच खाणीचे आहेत ह्या दोन मुद्यांवर विशेष भर दिला आहे. मी ह्या प्रकरणांत ह्याच्या जरा पुढे जाऊन मला शास्त्रीबोवांचे संशोधनाच्या दृष्टीने जे महत्त्वाचे म्हणून लिखाण वाटले त्याची थोडक्यात चर्चा केली आहे.

शास्त्रीबोवांच्या संशोधनात चंचलतेचा दुसरा एक ढोबळ दोष ज्ञानकोशकारांनी दाखविला आहे. चंचलतेची दोन कारणे असू शकतात. एक वृत्तीचा अधिरेपणा आणि मतांतील पालट. शास्त्रीबोवांचा स्वभाव अधिरा होता आणि त्याचा ठसा त्यांच्या लिखाणावर उमटावा ह्यांत काही नवल नाही. पण मतांतील पालट हा शास्त्रीबोवांच्या बाबतीत दोष समजता येणार नाही. त्यांच्या धार्मिक व सामाजिक मतांत किती व कसे अंतर पडले, व त्याची कारणे काय ह्याची चर्चा मागेच आली आहे. संशोधनात्मक लिखाण त्याला अपवाद कसे असेल ? विकसनशील मन नेहमी अधिक मोठ्या व नव्या कल्पनांना कवळीत असते, ते काही नाविन्याच्या हौशीमुळे नव्हे तर सत्याच्या ओढीमुळे, ज्ञानाच्या शक्तीमुळे. 'शिवछत्रपतींच्या चरित्रांतील कित्येक मुद्दे' ह्या शास्त्रीबोवांच्या लेखावर वादविवादाची वादळे उठली. त्या वादविवादांत एके ठिकाणी त्यांनी असे म्हटले आहे की, 'मला आज जे सत्य दिसेल ते मी बोलतो. कदाचित् मला सत्य म्हणून वाटते ते सत्य नसेलही. पण माझी खात्री पटल्याशिवाय मी विधान करीत नाही. माझी चूक ध्यानांत आली, तर मी लगेच माझे मत बदलतो; त्यामुळे आजचे माझे म्हणणे उद्या चूक ठरेल. ठरो. पण मला जोपर्यंत ते खरे वाटते तोपर्यंत मी तेच खरे मानीन.' ह्या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांच्या मतांत पालट पडलेला

चटकन ध्यानात येतो. एवढेच नव्हे, तर पुष्कळ वेळा त्यांच्या नव्याजुन्या मतांतले अंतर दोन ध्रुवांएवढे असते. पस्तीस-चाळीस वर्षे सतत व्यासंग करीत राहिल्यास कुठल्याही प्रामाणिक विद्वानाला पहिल्यापासून शेवटपर्यंत एकाच मताला चिकटून बसता येणे शक्य आहे काय ? विचारांच्या प्रगतीला चंचलपणा हे नाव शोभेल काय ?

शास्त्रीबोवांच्या संशोधनांतल्या उणीवा मी ठिकठिकाणी दाखविल्या आहेत. परंतु त्यांच्या बुडाशी विचाराचे दारिद्र्य, आळस किंवा वेळ मारून नेण्याची अहंमन्य, अशिष्ट वृत्ती नव्हती. अगदी साध्या माणसालासुद्धा समजावे, त्याने विचारोन्मुख व्हावे म्हणून पांडित्याचे अवडंबर बाजूला ठेवून संशोधनाला साधे सुटसुटित रूप त्यांनी दिले. ह्या साधेपणाचा काही ठिकाणी अतिरेक झाल्यामुळे देखील त्यांची काही विधाने पोरकट व अट्टाहासाची वाटतात. परंतु इतके मात्र खरे की हिंदुस्तानच्या धर्माचे, समाजाचे, इतिहासाचे व वाङमयाचे संशोधन करणाऱ्याने शास्त्रीबोवांचे लिखाण डोळ्यांखालून घातल्यास त्याच्या विचारांना गती आणि निराळे वळण लागल्याशिवाय राहणार नाही.

शास्त्रीबोवांच्या संशोधनात्मक लिखाणाचे तीन भाग पाडता येतील. पहिल्या भागांत वेदविषयक लिखाण येते, दुसऱ्या भागांत महाभारतविषयक लेख येतात, आणि तिसऱ्या भागांत इतिहास, पुराणे, भाषा इत्यादी सर्व विषयांचा समावेश होतो.

**वेदविषयक लिखाणः**–' हिंदुधर्मविवेचकां'त १८८५ साली ' श्रुतिस्मृति व शिष्टाचार ' ह्या लेखाने शास्त्रीबोवांनी वेदांसंबंधी लिहावयास सुरुवात केली. परंतु ' हिंदुधर्मविवेचका'चा हेतू ' हिंदुधर्माचे स्वरूप सर्व हिंदू लोकांस थोडेबहुत कळावे ' असा असल्याने त्यांत वेदांची अगदी ठोकळ माहिती तेवढी दिलेली आहे. पुढे पुढे शास्त्रीबोवांचे लक्ष ह्या विषयाकडे अधिक लागले व त्यांनी वेदांचे, विशेषतः ऋग्वेदाचे, सूक्ष्म अध्ययन केले. त्याचेच फळ म्हणजे त्यांची ऋग्वेदाची इंग्रजी व मराठी भाषांतरे होत. त्यांच्या इंग्रजी भाषांतरापेक्षां मराठी भाषांतर लोकांच्या अधिक माहितीतले आहे. त्याचे नांव ' वेदार्थयत्नकाराचे स्मारक ' असे आहे. कै. शं. पां. पंडित ह्यांची वैदिक वाङमयाबद्दलची कामगिरी प्रसिद्धच आहे. त्यांची ' वेदार्थयत्न,

या नावाची कृती विद्वानांनी वाखाणलेली आहे. त्यांच्या स्मृतीनिमित्त शास्त्रीबोवांनी ऋग्वेदातील वेगवेगळी सूक्ते घेऊन त्यांचे भाषांतर केले आहे त्याचप्रमाणे कठीण शब्दांची फोड करून आणि सूक्तांतील व्यक्तींची आणि प्रसंगांची ऐतिहासिक छाननी करून मूळच्या वैदिक कथा व पौराणिक कथा ह्यांमध्ये किती तफावत आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

ऋग्वेदासंबंधी शास्त्रीबोवांचा दुसरा महत्त्वाचा लेख 'A Key to interpret the veda' हा आहे. संहितांच्या शब्दांचा अर्थ लावण्याचे व दैवतांचे इतिहास पारखण्याचे प्रयत्न हिंदुस्थानात यास्काच्या वेळेपासून चालू आहेत, व आधुनिक पाश्चात्य परिशीलनाने वैदिक वाङमयाविषयी कुतूहल पुन्हा नव्या स्वरूपांत जागृत झाले आहे. परंतु इतके झाले तरी वेदांचा एकच अर्थ लावणे अजूनही जवळ जवळ पूर्वीप्रमाणेच दुर्घट आहे. प्रत्येक अभ्यासक आपल्या बुद्धीप्रमाणे वेदांतून नवे नवे अर्थ काढतो. त्यामुळे कुठल्याही एका लेखकाचे वैदिक वाङमयांविषयीचे लेख प्रमाण म्हणून धरता येत नाहीत. अर्थात शास्त्रीबोवांच्या वैदिक लेखनात जी विसंगती किंवा संदिग्धता आढळते ती पुष्कळ वेळां अनिवार्य आहे, हे विसरून चालावयाचे नाही. भांडारकर, राजारामशास्त्री भागवत आणि राजवाडे ह्यांची प्राचीन वाङमयाविषयीची सर्वांत मोठी कामगिरी ही की तिघांनीही जुन्या वाङमयांतले सुटे सुटे शब्द, व्यक्ती आणि दैवते घेऊन त्यांवर जंत्रीवजा टिपणे देण्याचा प्रयत्न केला. वैदिक वाङमयाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या भावी विद्यार्थ्यांसाठी ही पायवाटच त्यांनी करून ठेवली आहे. प्रस्तुत लेखांत ऋग्वेदांतील काही महत्त्वाची सूक्ते घेऊन त्यांतल्या शब्दांवर शास्त्रीबोवांनी काही टांचणे केली आहेत. ऋग्वेदसंहिता समोर असल्याखेरीज ह्या सर्वच टाचणांचा परामर्श घेतां यावयाचा नाही. तरी पण त्यांतील काही महत्त्वाच्या विधानांचा खाली विचार केला आहे.

**सरमासूक्त**–इंद्राचे शत्रु जे पणी त्यांच्याकडे इंद्राने देवशुनी सरमा हिला पाठवले. पणि व सरमा ह्यांचा संवाद ह्या सूक्तांत दिला आहे. ह्या सूक्तांचा विचार करताना शास्त्रीबोवांनी जी अनुमाने केली आहेत ती अशी–(अ) इंद्र हा एक इंद्र नसून अनेक इंद्र होते. इंद्र ही मूळची माणसे असून पराक्रमाने त्यांनी वेगवेगळ्या लोकसमूहांवर छाप पाडली. उदाहरणार्थः–(१) सुमंतु

नांवाचा इंद्र, ज्याने चुमुरी, धुनी, पिप्रु, शंबर, शुष्णु ह्यांना मारले व दस्यूंचा पराभव केला. ह्या इंद्राच्या पराक्रमात विष्णूचा वाटा होता. (२) दुसऱ्या इंद्राने योनीचा पुत्र गिरि ह्याचा पराभव केला. योनी म्हणजेच पृथु योन. पृथु लोक हे मूळचे पार्थियन होत. ह्या इंद्राचे 'पर्शु व याद्व' ह्या लोकांशी पण वैर होते. पर्शु हे पार्श किंवा पारशांचे पूर्वज होत. (३) शंभर ऋतु करणारा सवासीचा पुत्र इंद्र. ह्याचे नांव ऋचिशाम असे होते. (४) हिन्वाचा मुलगा इंद्र. (५) मरुत् ज्याचे सेवक आहेत असा धनिष्टेचा मुलगा इंद्र. (६) शिप्री नावाचा इंद्र. (७) विधवापुत्र इंद्र. (८) पाकस्थामा नावाचा इंद्र, कुरुयानाचा मुलगा.

(आ) मरुत् हे मूळचे देवेतर असून इंद्राच्या आश्रयाने त्यांना प्राध्यान्य मिळाले.

(इ) दस्यू हे मोंगोलियन लोकांपैकी होते.

(ई) पणि म्हणजेच फिनिशियन व्यापारी होत. रसा नदीवर त्यांचे वास्तव्य होते. रसा म्हणजेच मध्य आशियातील तैग्रीस किंवा युफ्राटिस ह्या दोहोंपैकी एक नदी आहे.

(उ) ऋषी ही वेदकालीन एक जात होती. अंगिरस, विश्वामित्र इत्यादी लोकांचा ऋषींशी निकटचा संबंध आहे.

(ऊ) बृहस्पती हा देवांचा गुरू व ब्रह्मणस्पती म्हणजे ब्रम्ह जातीच्या लोकांचा मुख्य होता.

**जुहूसूक्त** – बृहस्पतीची बायको जुहू सोमाने पळविली. देवांचे सोमाशी युद्ध होऊन जुहू परत आपल्या पतीकडे कशी आली ह्याबद्दलची कथा ह्या सूक्तांत आहे. ह्या कथेतील शास्त्रीबोवांची विधाने पुढीलप्रमाणे आहेत.

(१) मनुष्य (मनुसंतती) आणि राजन् ह्या जातींच्या लोकांनी जुहुसाठी सोमाशी युद्ध केले.

(२) मित्र हा अग्नीप्रमाणेच एक मनुष्य होता. हा बहुधा वसूंचा राजा असावा.

(३) अश्विनीकुमार हे अश्व नावाच्या जातीचे मुख्य असून अश्व लोकात बहुपतित्वाची प्रथा असावी असे 'सूर्यासावित्री' सूक्तावरून वाटते. अश्व लोक चांगले दर्यावर्दी असावेत.

**पुरूरवासूक्त–** पुरूरवा आणि ऊर्वशी ह्यांच्या मीलनाची व वियोगाची कथा प्रसिद्धच आहे. ऊर्वशी गंधर्व नावाच्या लोकांपैकी असावी.

**वम्रसूक्ते–** ही अनेक सूक्तें असून निरनिराळ्या विषयांसंबंधी आहेत. ह्या सूक्तांवरून शास्त्रीबोवांनी असा निष्कर्ष काढला आहे की यज्ञ हा शब्द अवेस्ता ‘ यज्ञ ’ शब्दापासून आला असावा. पण यज्ञ हा पुरुष आहे ही कल्पना स्वतंत्र वैदिक आहे. त्याचप्रमाणे याग ह्या शब्दाची उत्पत्ती वरील-प्रमाणेच असली तरी याग हा पुरुष होऊ शकत नाही. ह्या लेखात शास्त्री-बोवांची मते जरी सर्वच पटण्यासारखी नसली तरी विचारसरणी अनुकर-णीय आहे. आपले मताना पुष्टी देण्यासाठी त्यांनी जागोजागी आधार दिले आहेत. त्यांच्या संशोधनात्मक लिखाणात ह्या लेखाला त्यांच्या भाषा-विषयक व्याख्यानानंतर दुसरे स्थान द्यावे लागेल.

**वेदांतला कोणता भाग कलियुगातला, कोणता कलियुगापूर्वीचा–**‘वेदांतला कोणता भाग कलियुगातला, कोणता भाग कलियुगापूर्वीचा ’ हे ‘ हेमंत-व्याख्यानमाले ’तील एक व्याख्यान आहे. त्याचा आशय पुढीलप्रमाणे आहे:– कलियुगास पाच हजार वर्षे लोटली असून कलियुगाचा आरंभ युधिष्ठिर शकापासून झाला. वेदातील काही भाग युधिष्ठिराच्या काळानंतरचा आहे.

(१) शौनकाचा संबंध असलेल्या ऋचा नैमिषारण्यांतील शौनकास उद्देशून आहेत म्हणून त्या कलियुगातील आहेत. (२) ‘ द्रष्टे ’ म्हणजे ‘ पाहणारे ’ जे ऋषि होते त्यांच्या ऋचा कलियुगापूर्वीच्या. (३)‘ प्रवक्ते ’ म्हणजे मंत्र रचणारे ऋषी होते त्यांच्या ऋचा कलियुगानंतरच्या. (४) ऐतरेय ब्राह्मणांतील तुर कावशेयाची हकीगत कलीनंतरची आहे (५) ऐतरेय आरण्यक जवळ जवळ सगळे कलियुगांतले आहे. (६) यजुर्वेदातली तित्तिरि व वैशंपायन यांची कथा कलियुगानंतरची. त्याचप्रमाणे पिशाच्च, यति इत्यादी शब्द कलीनंतरचे असून अनुक्रमे पिशाच जातीच्या लोकांना व बौद्धांना उद्देशून वापरले असावेत. (७) सामवेदांपैकी शौनकी मनूवरील सामे कलीनंतरची.

**महाभारतांतील कांही भाग उकलण्याचा यत्न–** ‘ महाभारतातील काही भाग उकलण्याचा यत्न ’ ह्या लेखांत शास्त्रीबोवांनी जे मुद्दे मांडले आहेत त्याचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे देता येईल:–

(१) महाभारताची दोन रूपे आहेत. पहिले २४००० श्लोकांचे भारत हे सूताने रचले आणि शौनकाला नैमिष्यारण्यांत सांगितले. या सूताचे नाव उग्रश्रवा असून तो वेदेतर म्हणजे वैदिक प्रणालीच्या बाहेर असणारांपैकी होता. महाभारत हे एक लाख श्लोकांचे बाड व्यासाच्या नावावर टाकण्यांत आले आहे. पण व्यास ही एक निव्वळ कल्पना आहे. अनेक लोकांचे हात लागून भारत व भारताचे महाभारत बनले.

(२) ज्या परकीय संस्कृतींचा महाभारतात ठसा उमटलेला आढळतो त्या सिंधुनदीपलीकडे असणाऱ्या म्हणजे वेदपूर्व आर्यसंस्कृती, ग्रीक आणि यावनी संस्कृती होत.

कुत्रा पांडवांबरोबर स्वर्गात जातो ती कथा वेदपूर्व किंवा अवेस्ता संस्कृतीची निदर्शक आहे. पांडवांच्या उत्पत्तीची कथा ग्रीक संस्कृतीशी जुळते. लाक्षागृहाच्या कथेतील कालयवनाचा उल्लेख यावनी संबंध दाखवतो.

(३) ह्याशिवाय अहिंसेचा भाग बौद्ध आणि जैन धर्मांतून आलेला आहे. ब्राह्मणांची महती वैदिक देवांपेक्षा अधिक आहे असे दाखविणारा भाग ब्राह्मण भाटांनी घुसडला आहे. देव व ब्राह्मण ह्यांपेक्षा क्षत्रियांची पायरी वरची आहे असे क्षत्रिय भाटांनी प्रतिपादन केले.

(४) युधिष्ठिर हा पांडवांपैकी (यमाचा पुत्र असल्यामुळे) सर्वांत लहान होता. अर्जुन सर्वांत मोठा (इंद्राचा मुलगा असल्यामुळे). पण ह्या गोष्टींचा कथानकांत विपर्यास केलेला आढळतो.

(५) कृष्ण चार होते. पहिला कृष्ण सत्यवतीचा मुलगा. धृतराष्ट्र, पंडु व विदुर ह्यांचा पिता. त्याचा पुढे द्वैपायनाशी म्हणजे महाभारताचा विस्तार करणाऱ्या व्यासाशी संबंध जोडला गेला. दुसरा कृष्ण सुभद्रेचा भाऊ, कुंतकुलांतील होता. हा अर्जुनाचा सखा. हे दोन्ही कृष्ण उत्तरेकडील होत. तिसरा कृष्ण सूरकुळांतील असून तो वसुदेव देवकीचा मुलगा, मथुरेत राहणार होता. जरासंधाचा वध ह्यानेच केला. चवथा कृष्ण दक्षिणेकडील होता. हा नंद-यशोदेपाशी वाढला. हा कर्नाटकी असून त्याचे मूळचे नाव 'कन्हर' होते. ते ब्राह्मणांनी बदलून त्याचे संस्कृतात कृष्ण रूपांतर केले. शिशुपाळाचा वध ह्यान केला.

'विचारमाधुकरी' ह्या सदराखाली शास्त्रीबोवांनी १८८३ पासून

‘ विविधज्ञानविस्तारा ’त नाना विषयांवर लेखमाला देण्यास सुरुवात केली. हे सदर जवळ जवळ वीस वर्षे त्यांनी चालविले. ‘ मऱ्हाठ्यांसंबधी चार उद्‌गार ’ ‘ आमचा देश, आमचे देशी लोक, आमची देशी भाषा ’ इत्यादि विस्तृत लेखमाला मध्ये आल्यामुळे ‘ विचारमाधुकरी ’त पुष्कळ खंड पडला आहे. काही प्रसंगी ही तिन्ही सदरे शास्त्रीबोवा एकदमच चालवीत. त्यामुळे ‘ विचारमाधुकरी ’तल्या काही लेखांत पुनरावृत्ती आणि विसंगती आढळून येते. तरी पण हे दोष वजा केले असता विचारमाधुकरीच्या रूपाने शास्त्रीबोवांनी केलेली साहित्यसेवा मोलाची आहे. महाराष्ट्राच्या भरीव निबंध-वाङ्मयांत ‘ विचारमाधुकरी ’चे स्थान अढळ राहील. भाषेच्या दृष्टीने ‘ पंचजनविचार ’ आणि ‘ त्रिमूर्तिविचार ’ ह्या लेखमाला वाचण्यासारख्या आहेत. ह्या लेखांनंतर शास्त्रीबोवांची भाषा ओबड-धोबड होत गेली.

**शककालविचार–** पंचांगांत ‘ शककाल ’ हा शब्दप्रयोग नेहमी येतो. ‘ शककाल ’ ह्या शब्दाचा अर्थ व त्याची सुरुवात ह्यासंबंधी निश्चित मत ठरविणे कठीण आहे. ह्या लेखमालेत शास्त्रीबोवांनी शककालासंबंधाने चर्चा केली आहे. तिचा सारांश असाः–

(१) ‘ शककाल ’ म्हणजे शक नावाचे म्लेच्छ लोक हिंदुस्थानात आले तो होय, हे म्हणणे अगदी पोकळ आहे. तसे असताही जर षष्ठीतत्पुरुष समास केला पाहिजे असा आग्रह असेल तर शकांचा काल म्हणजे मृत्यु असा अर्थ घेतला पाहिजे. शकांचा नाश विक्रमादित्याने केला हे काश्मीर-सारख्या हिंदुस्थानच्या उत्तरेस एका कोपऱ्यांत असणाऱ्या लहानशा देशांतील लोकांसही विदित होते. परंतु ‘ शक ’ ह्या शब्दाचा खरा अर्थ ‘ शक्नोति ’ ह्या संस्कृत रूपापासून निघालेला, म्हणजे ‘ समर्थ असणारा, ’ असाच धरणे अधिक युक्त आहे. तसे नसते तर गर्गांच्या हातून युधिष्ठिराच्या काळास शककाल हा शब्द लागला नसता. ह्यावरून असे मात्र समजू नये की शक हा शब्द म्लेच्छांचा किंवा म्लेंच्छगणाचा मुळीच वाचक नाही. ‘ शककाल ’ ‘ शकनृप ’ असल्या शब्दांतील ‘ शक ’ शब्द व म्लेच्छ ह्या दोहोत मात्र वाच्यवाचक भावाचा स्वीकार करणे बरोबर नाही. ज्याप्रमाणे नाशिकच्या शिलालेखात ‘ हूण ’ हा शब्द लोकवाचक नसून ‘ सोने ’ अर्थी वापरला आहे त्याप्रमाणे ‘ शक ’ हा शब्द ‘ सामर्थ्यवान् ’ असा समजावा.

पहिला शक भारतीय युद्धाचा. दुसरा कलियुगाचा. तिसरा शककाराचा म्हणजे शालिवाहनाचा. भारतीय युद्धापासून म्हणजे युधिष्ठिराच्या अभिषेकापासून ३०३० वर्षे गेली आणि शालिवाहनापासून ५०६ वर्षे गेली. तेव्हा रविकीर्तीचे इवल्ली येथील जिनमंदिर तयार झाले. ह्यावरून २५२४ वर्षे युधिष्ठिर शक चालला व २५२५ वर्षांपासून शालिवाहन शकास आरंभ झाला. कलीची १२५० वर्षे युधिष्ठिरशक वजा करून गेली १५५० व्या वर्षी रविकीर्तीने देऊळ बांधले. १५५० त ५०६ वर्षे वजा केली असता बाकी ७७४ वर्षे राहातात. ह्यावरून कलींची युधिष्ठिरशकविरहित ७४४ वर्षे गेली व ७४५ व्या वर्षांपासून युधिष्ठिरशकास आरंभ झाला.

ह्या लेखात शास्त्रीबोवांची विषयांतराकडे बरीच प्रवृत्ती दिसून येते. उदाहरणार्थ, 'नंद' राजे शूद्र होते ह्याबद्दल अवास्तव चर्चा, मौर्य हे नाव मोरे ह्या शब्दावरून आले ह्याबद्दल व्युत्पत्तीचा आधार. ह्या लेखात दुरान्वयी मुद्दे वरेच असल्यामुळे टीकाकारांची आयतीच सोय झाली आहे.

**वैष्णवमतविचार–** ह्या लेखात विष्णू हा शब्द ईश्वर या अर्थी लेखकाने वापरला आहे; शिवविरोधक दैवत म्हणून नव्हे. भृगु, अंगिरस, कपिल, याज्ञवल्क्य इत्यादी ऋषि वैष्णवमताच्या उत्पत्तीस कसे कारण झाले हे शास्त्रीबोवांनी सांगितले आहे. महावीर व बुद्ध ह्या ब्राह्मणविरोधी दुकलीमुळे ब्राह्मणधर्मावर अनेक हल्ले झाले. पण त्यांतूनही 'भगवद्‌गीते'सारखे रत्न निपजले व वैष्णवधर्म अधिक उज्ज्वल स्वरूपांत पुढे आला. ब्राह्मण 'भगवद्‌गीता' काखोटीस मारून दक्षिणेकडे गेले. कर्मकांडाने आंधळे झालेले याज्ञिकही पुढे वैष्णव झाले आणि त्यांनी वैदिक धर्म व योग ह्यांची व्यवहारात कुशलतेने सांगड घालून 'भगवद्‌गीते'च्या आधारावर वैदिक धर्म दृढ केला.

## त्रिमूर्तिविचार

**शिव–** त्रिमूर्तींत शिव ही प्रधानमूर्ती आहे. सविता व शिव एकच होत. हा शब्द 'सू' धातूपासून झाला आहे. 'सू' म्हणजे प्रसवणे. अर्थात् सवित्यांत स्त्रीत्वाची कल्पना अभिप्रेत आहे. शिवाची मूर्तिदेखील तीन मूर्तीपासून म्हणजे शक्तीपासून बनलेली आहे. उदाहरणार्थ– (१) काली.

सविता हा कालाचा नियंता. ह्या कल्पनेतून ही शक्ती उत्पन्न झाली. (२) पशुपति ही जीवांचे रक्षण करणारी शक्ती आहे. (३) लिंग ही उत्पादक शक्ती आहे. पशू म्हणजे गाय. आणि 'गो' ह्या शब्दाचा अर्थ किरण असा होतो. अर्थात् सूर्याच्या किरणांपासून प्रकाश, पाऊस, अन्न इत्यादी निर्माण होतात आणि त्यांच्यावर जीवसृष्टीची उपजीविका होते. सूर्य आणि शिव ह्या दोन शक्ती एकाच रूपाच्या आहेत.

शिवाचे दोन अवतार आहेत. प्राचीन शिव म्हणजे रुद्र. त्र्यंबक पण तोच. त्र्यंबक व अंबिका ही बहीण-भावंडे होती. दक्षयज्ञानंतर ह्या शिवाचे मूळचे रूप पालटून त्याला हिमालयातील शिवाचे अर्वाचीन रूप मिळाले. तेथून पार्वतीच्या चरित्रास आरंभ होतो.

**विष्णु–** विष्णु हा मूळचा यज्ञस्वरूप होता. आकाश व समुद्र हेही अधिकाराने विष्णु समजले गेले. लक्ष्मी म्हणजे आकाशाची शोभा. विष्णु व लक्ष्मी ह्या जोडप्यात लक्ष्मीला दासीरूप देण्यात आले. त्याच्या उलट शिव व शिवा ह्यांचा खरा अर्धांगयोग आहे. हा योग मनास पावन करणारा आणि 'अनिर्वचनीय आनंदाची खाण' होय. त्रिमूर्तींतील दुसरी मूर्ति–विष्णु–जर 'ह्या भरतभूमीत तोंड न दाखवती तर स्त्रियांची अवस्था इतकी शोचनीय झाली नसती.' अति प्राचीन काळी स्त्रीलिंगाचा मान पुंलिंगापेक्षा अधिक होता. उदाहरणार्थ, सूर्याचंद्रमसौ, अग्नीवरुणौ इत्यादी.

**ब्रह्मा–** ब्रह्मा हा वेदपुरुष होता. क्वचित्प्रसंगी यज्ञपुरुष पण तोच समजला जात असे. यज्ञाशी संबंध आल्यामुळे विष्णूशी पण त्याचा संबंध आला. त्यामुळे विष्णूचे पुत्रत्व त्याच्याकडे आले. यज्ञामुळे प्रजा मिळते म्हणून ब्रह्मदेव निर्माता झाला.

**दशावतार–** दशावतार ही लेखमाला नीट वाढवली असती तर फार महत्त्वाची झाली असती. कारण अद्याप दशावतारावर कुठलेच चांगले पुस्तक उपलब्ध नाही. शास्त्रीबोवांनी ही लेखमाला लिहिली तेव्हा ती कुठल्या हेतूने लिहिली हे कळत नाही. कारण, त्यात काही अवतारांचे वर्णन अजिबात नाही, तर काहींचे अगदी त्रोटक आहे. उदाहरणार्थ, वराह, कूर्म व परशुराम ह्यांबद्दल जवळ जवळ काहीच माहिती नाही. रामावताराची पण थोडीबहुत तीच कथा. कदाचित् ही लेखमाला अपूर्ण असावी. 'दशावतारा'तील

महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) **सवित्याचे महत्त्व**– सविता ज्याप्रमाणे शिवरूप त्याप्रमाणे विष्णुरूप पण होता. वामन म्हणजेच सविता. सवित्याचे वामनरूप अगदी लहान होय. 'तीन प्रकारांनी पाऊल टाकले' असे जे सूक्तांत वर्णन आहे त्याचा अर्थ असा– सूर्य उगवल्यानंतर क्षितिजावर येतो, दुपारी आकाशाच्या मध्यभागी व संध्याकाळी फिरून क्षितिजावर येतो.

(२) मत्स्योपाख्यानांत मनूचे नाव आहे. मनु हा मानवांचा बाप म्हणून मत्स्यावतार पहिला झाला. ह्या आख्यानांत असुरांचा संबंध नाही; पण वैष्णवास त्याशिवाय बरे वाटेना. म्हणून शंखासुराचा संबंध जोडावा लागला.

(३) कूर्मावतार हा वराह व नरहरि ह्या दोन अवतारांनंतर झाला असला पाहिजे.

(४) परशुराम ख्रिस्तापूर्वी १२ व्या किंवा १३ व्या शतकात झाला असला पाहिजे. कारण परशुरामशक मलबारात चालतो.

(५) कृष्णावतार रामावताराच्या अगोदरचा आहे. गोप लोक स्थायिक नव्हते. रामाच्या वेळी लोक स्थायिक झाले होते.

**यदुक्षेत्र कोणते व त्यात ब्राह्मण आले केव्हा ?**:– ह्याही लेखमालेत असंबद्ध व्युत्पत्तींनी भरलेले दोन-तीन लेख आहेत. शेवटल्या लेखावर तर नावदेखील नाही. त्यामुळे ते वरील सदरांतीलच आहेत की नाही हेही सांगणे कठीण आहे.

ह्या सर्व लेखांचा थोडक्यात सारांश असा– यदुक्षेत्र हे नाव 'यदु'वरून पडले. यदु दोन होते. पहिला दैत्याचा मुलगा यदु, आणि दुसरा ययातीचा मुलगा यदु. यदुक्षेत्र हे वृंदावन मथुरा म्हणजे यमुनेच्या आसपासचे आणि नर्मदेच्या उत्तरेकडचे नसून दक्षिणेकडचे होते. त्यांत गुजरात, गोदावरीच्या आसपासचा भाग, कोकण (गोकर्ण), गोवे, (गोपकपतत) इत्यादी 'गो' शब्दाशी संबंध दाखवला जाणारे प्रांत येत. गोवर्धन, गोमान हे अतिप्राचीन काळचे पर्वत दक्षिणेतलेच आहेत. 'कृष्णा' नदी दक्षिणेसच आहे.

आभीर हा शब्द गवळीवाचक आहे. आभीर राजे दक्षिणेतच राज्य करीत असत.

गोप हे मूळचे दाक्षिणात्य असून कृष्ण हाही दाक्षिणात्य असला पाहिजे. ज्या नदीत कृष्णाने कालियाचे दमन केले ती सूर्यदुहिता होती. यमुना सूर्यदुहिता असल्यामुळे मथुरेच्या आसपासच कृष्णाची जन्मभूमी ठरली पाहिजे असे नाही. तापी किंवा तपती ही पण सूर्यदुहिताच होती. नर्मदा चंद्राची मुलगी तर तिला समांतर असणारी तापीच खरी सूर्यदुहिता होय. काळ, मृत्यू व यम हे तीन पर्याय होत. सूर्य हा काळकर्ता व यमुना पडली प्रत्यक्ष काळी; त्यामुळे काल व काली ही दोघे बहीण भावंडे ठरवून यमुनेस सूर्यदुहिता करण्यात आले. मथुरा हीच सध्याची मदुरा, हीच यदूंची आद्यभूमी. अर्थात यादव हे मूळचे द्रविड होते. यदूंचा विस्तार विदर्भात आणि बुंदेलखंडापर्यंत झाला होता.

यदुक्षेत्रात द्राविडी लोकांची व गोपांची मूळची वस्ती असून त्यात ब्राह्मण फार उशिरा आले. शालिवाहन शक ११९६त हेमाद्रीच्या वेळेपासून त्यांना महाराष्ट्रात प्राधान्य मिळू लागले.

**पंचजनविचार**– ही लेखमालाही फार विस्कळीत असून व्युत्पत्तीवरच सारा भार दिलेला आढळतो. ह्या लेखातील पंचजनांचे वर्णन व संस्कृत भाषेच्या व्युत्पत्तीमध्ये आलेले पंचजनांचे वर्णन ह्यात फार तफावत आहे. व्याख्याने बरीच मागून लिहिल्यामुळे हा फरक पडला असावा. ह्या विस्तृत लेखमालेचा मतितार्थ थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे–

अगदी पूर्वी एकच जन (लोक) होता, व तो एकाच पुरुषापासून व स्त्रीपासून निघाला हा केवळ भ्रम आहे. वेदांत पंचजन हा शब्द मनुष्यमात्राचा वाचक म्हणून वापरला आहे, परंतु हा शब्द मनुष्यवाचक होण्याचे मुख्य कारण असे की मूळ एकंदर मानववंश पाच मुख्य जातीत सामावला होता. ह्या मोठ्या जाति लहान लहान पोटजातींच्या बनलेल्या होत्या. त्या जाती मनुष्य, गंधर्व, असुर, राक्षस व सर्प ह्या होत. मनुष्य हा शब्द मूळचा विशिष्ट लोकांचा वाचक असल्यामुळे तो मनुष्यमात्राचा वाचक होऊ शकत नाही. तेव्हा अर्थातच जन शब्दाची प्रवृत्ति होऊन, ते जन पाच होते म्हणून पंचजन असा मनुष्यमात्राचा वाचक शब्द वापरण्यात येऊ लागला. मनुष्य, मानव, आणि मानुष हे चारही शब्द पुढे शेकडो वर्षांनी मनुष्यमात्राचे वाचक झाले. आणि पंचजन हा शब्द लुप्त झाला. देव व मनुष्य ह्यांचा

गोदावरीवर वास होता. गंधर्व व असुर ह्यांचा सिंधुनदीवर होता. राक्षसांची मूळची भूमी सिंहलद्वीप व यक्षाचे आद्यस्थान ब्रह्मपुत्रा नदी. त्याचप्रमाणे सर्पांची वसति काश्यप सरोवरावर (कॅस्पिअन समुद्र) होती.

अमरावती वगैरे देवांची नगरे; अयोध्या वगैरे मनुसंततीची होती. यक्ष व राक्षस हे दोघेही पुलस्त्याची संतति समजले जात असून त्यांची नगरे लंका, अलका वगैरे होती. नाग म्हणून डोंगरी लोक होते; तो यक्षाचाच पोटभेद असावा. देव व देवांचे पोटभेद पहिल्याने थोडे उत्तरेस व पुढे लवकरच पश्चिमेस वळले. यक्ष पहिल्याने थोडे उत्तरेस व पुढे लवकरच पूर्वेकडेस वळले. सर्पांनी राक्षसांच्या पूर्वेस व पश्चिमेस असा जो थंड ओसाड प्रदेश (मध्य आशियाचा) पडला होता, तो व्यापला. राक्षस जलमार्गाने पश्चिमेस गेले. याप्रमाणे मूळच्या पाच लोकांनी सर्व भूभाग व्यापून टाकला.

□ □

८

# समारोप

राजारामशास्त्र्यांनी पस्तीस वर्षे लिहिले. भाराभर लिहिले. वाटेल त्या लहान-मोठ्या विषयावर लिहिले. जुन्यावर, नव्यावर, त्यांनी टीकेची झोड उठवली. त्यांची टीका म्हणजे परंपरेच्या जुनाट खोडांना समूळ उलथून पाडणारा झंझावातच होता. समाजातली व्यंगे त्यांनी दाखवली. जरासुद्धा आडपडदा न ठेवता दाखवली. पण त्याच समाजाचे जे काही चांगुलपणाचे बीजाकुंर त्यांना दिसले ते त्यांनी कौतुकाने जोपासले. दलितांची दुःखे, दलितांचे सुप्त सामर्थ्य शास्त्रीबोवास माहीत होते. ते सामर्थ्य वाढीस लावण्यासाठी शास्त्रीबोवानी आपली वाणी, लेखणी व करणी पणास लावली. बरे असो की वाईट असो, शास्त्रीबोवानी जे लिहिले, ते अंतःकरणाच्या तळमळीने लिहिले. शास्त्रीबोवाचे लिखाण म्हणजे एका तळमळणाऱ्या, अस्वस्थ आणि सामर्थ्ययुक्त अंतःकरणातून स्फुरलेले खडे बोल आहेत.

शास्त्रीबोवा विक्षिप्त म्हणून गाजले असले तरीदेखील महाराष्ट्राच्या बौद्धिक व नैतिक कीर्तीत ज्यांनी फार मोठी भर टाकली आहे, अशा महाराष्ट्रभूमीच्या काही सत्पुत्रांच्या आयुष्यात त्यांनी महत्त्वाच्या प्रेरणा निर्माण केल्या यात शंका नाही. उदाहरणार्थ, महर्षि धोंडो केशव कर्वे म्हणतात, ‘ वंदनीय गुरुवर्य राजारामशास्त्री भागवत यांचा माझा संबंध गुरुशिष्य नात्याचा होता. पहिल्यापासूनच मजवर त्यांचा लोभ जडला, व वडील माणसाशी वागावे तसाच मी शेवटपर्यंत त्यांच्याशी वागत राहिलो. माझ्या पुनर्विवाहानंतर आपली पसंती दर्शविण्यासाठी एकदा ते पुण्यास मजकडे उतरावयास आले होते. त्यांचा थोर व उदार स्वभाव मी मराठा

हायस्कूल सोडले त्या वेळी दिसून आला. शिक्षणक्षेत्रातच काम करण्याची आवड व एल्फिन्स्टन हायस्कुलात एक वर्ष काम केलेले त्यामुळे त्या हायस्कूलचे प्रिन्सिपॉल वामन आबाजी मोडक ह्यांनी माझा प्रवेश सरकारी नोकरीत सहज करून दिला असता, पण सरकारी नोकरीत शिरायचे नाही असे मनाने घेतल्यामुळे शास्त्रीबोवांच्या मराठा हायस्कुलातच कायमचे राहाण्याचे मी ठरविले व आरंभापासूनच मी त्यांना तसे सांगितले होते. पुढे १८९१ च्या सप्टेंबरात प्रो. गोखल्यांकडून मला फर्ग्युसन कॉलेजात काम करण्यासाठी बोलावणे आले तेव्हा त्यांचे पत्र मी त्यांना दाखवले. तेव्हा त्यांनी ताबडतोब ते काम पत्करण्याचा मला सल्ला दिला, व प्रेमाने मला निरोप दिला. शास्त्रीबोवांचा स्वतंत्र बाणा असे. मराठा हायस्कूलला सरकारी मदत घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. सरकारी अधिकाऱ्यांची व्यर्थ लुटबुड होऊन विनाकारण त्रास होत असे, ह्यामुळे त्यांनी ती गोष्ट मनात आणली नाही. महाराष्ट्रात शास्त्रीबोवांची उपेक्षा झाली ही गोष्ट खरी.'

मराठा हायस्कूलमधील त्यांचे ख्यातनाम शिष्य रँगलर परांजपे म्हणतात, 'महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात शास्त्रीबोवांना अवश्य स्थान मिळेल. ज्या कित्येक सुधारणा व जी मते आता सर्वमान्य झालेली आहेत त्यांचा पुरस्कार करणारांमध्ये ते नेहमी प्रमुख असत. जातिभेद नष्ट करण्याची आवश्यकता आता पुष्कळांना पटलेली आहे; पण त्यांनी ती पन्नास-साठ वर्षांपूर्वीच प्रतिपादिली होती.'

त्यांचे सेंट झेविअर्स कॉलेजातील शिष्य डॉ. मुकुंदराव जयकर यांनी तर शास्त्रीबोवांची सह्याद्रीच्या उत्तुंग शिखराशी तुलना करून पुढीलप्रमाणे त्यांचे वर्णन केले आहे. 'राजारामशास्त्री भागवतांना मी एक थोर हिंदी गृहस्थ मानतो. कारण जास्त कसोशीने त्यांचे वर्णन कसे करावे हेच मला समजत नाही. चिकित्सक संशोधनात निमग्न झालेला गाढा विद्वान, सर्व मिथ्याचारांबद्दल— मग ते मिथ्याचार कितीही उच्चपद पावलेले असोत— तिटकारा असणारा निर्भय सत्यशोधक, परस्पर–विरोधी भावना व विचार यांचा समन्वय घालणारा, सर्व प्रकारच्या दलितांचा दक्ष कैवारी, जाज्वल्य सुधारक, नकली हिंदुधर्मावर त्वेषाने प्रहार करणारा आणि इतके असूनही जरा सुद्धा दिखाऊपणा न ठेवता ईश्वरावर अचल श्रद्धा ठेवणारा नम्र

सेवक, कळकळीचा मित्र आणि तेवढाच दुर्दमनीय प्रतिस्पर्धी या सर्वांचे मिश्रण म्हणजे शास्त्रीबोवा...

शास्त्रीबोवांच्या विनम्र वृत्तीची मला जाणीव होती......आपल्या वाङमयीन व सामाजिक अशा सर्व कार्यक्षेत्रात गटबाजी शिरली आहे. तिला पुष्कळ वेळा जातीयवादाचे स्वरूप येते. बाळशास्त्री जांभेकर, जगन्नाथ शंकरशेट, नारायण दिनानाथ, भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग इत्यादी नावे आमच्या राजकारणी आणि सामाजिक नेत्यांच्या मनातही अगदी पुसट पुसटच राहिलेली दिसतात; जर या नेत्यांमध्येही अशा बद्दलचे अज्ञान दिसते, त्याअर्थी त्यांची संगती इतर कोणत्या तऱ्हेने लावता येईल? हे आणि असे दुसरे कितीएक आहेत की ते प्रगतीचे अग्रदूतच होते. पण आज त्यांची स्मृती अज्ञानाच्या आणि विकल्पांच्या थरांखाली गाडली गेली आहे. त्यांच्या अवशेषांवरून आपण चालतो. आपण कोणाच्या अवशेषावरून चालतो आहो, आपल्या पदाघाताखाली केवढी अमोल संपत्ती दडलेली आहे, याचा आपल्याला गंधही नसल्यामुळे आणि ते जाणून घेण्याची आपली इच्छा आणि धमक पण नसल्यामुळे आपण हे अवशेष तुडवीत पुढे जातो. शास्त्रीबोवादेखील या विस्मृत विभूतींपैकीच एक आहेत. आणि ती विभूती कशी तर आपल्या विषयींच्या अपवादात धन्यता मानणारी! त्यांच्या प्रगाढ निष्ठेचे जणू काही ते मोल होते. या थोर पुरुषाबद्दल आदर आणि पारख लोकांना असायला हवी. कारण हल्ली उथळ, शब्दवेल्हाळ आणि भटक्या वावदूकांचा जसा काही लौकिकावर व प्रतिष्ठेवर हक्क असल्यासारखा झाला आहे.'

डॉ. भीमराव आंबेडकरांचा देखील शास्त्रीबोवांशी लहानपणी परिचय होता. ते म्हणतात, 'राजारामशास्त्री भागवत हे आपले एक हितचिंतक आहेत याची अस्पृश्यांना चांगलीच जाणीव होती हे माझ्या लहानपणी मला आढळून आले. अस्पृश्योद्धारासाठी अगदी सुरुवातीच्या काळात चळवळ करणाऱ्या लोकांपैकी ते एक होते. अस्पृश्यांसाठी झटणारे ते एक अत्यंत कळकळीचे कार्यकर्ते होते, व त्यात त्यांचे कोणत्याही प्रकारचे राजकीय उद्दिष्ट नव्हते. या व्यतिरिक्त राजारामशास्त्री भागवतांची आठवण म्हणजे हिंदुसमाजाने आपला पाया तपासण्याची वेळ आली आहे असे सांगणारा

पुरुष त्या काळात तरी विरळाच होता. चिपळुणकरांसारख्या माणसानी त्यांच्या कार्यात विघ्ने उपस्थित करण्याचा चंग बांधला असता ते आपल्या भूमिकेवर अचल राहिले, ही त्यांना खरोखरच भूषणावह अशी गोष्ट होय. त्यांचे सर्व लिखाण संकलित करून प्रसिद्ध झाले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. म्हणजे ते सध्याच्या पिढीला उपलब्ध होईल. कारण हिंदुसमाजाला कोणते दुखणे लागले आहे, याची पुसटशीदेखील कल्पना या पिढीला नाही. '

कै. विठ्ठल रामजी शिंदे याच्या अस्पृशांच्या कार्याचा पाया राजारामशास्त्र्यांच्या प्रोत्साहनामुळेच पडला.

राजारामशास्त्र्यांना सानेगुरुजींनी 'धर्ममूर्ती' म्हटले आहे.

अशा या शास्त्रीबोबांचे लेखन त्यांच्या काळी टीकेच्या भडिमारास तोंड देऊन उभे होते. शास्त्रीबोवांवर झालेल्या टीकांची थोडी चुणूक पुस्तकाच्या शेवटी दिली आहे. शास्त्रीबोवा वादविवादात कोणाला हार जाणारे नव्हते. प्रतिपक्ष्याची वैयक्तिक व्यंगे त्यांनी कधीच टीकेत उच्चारली नाहीत. या बाबतीतली त्यांची सहिष्णुता आणि धैर्य कित्ता घेण्याजोगी आहेत. एकदाच–फक्त– एकदाच भावनावश होऊन त्यांनी थोडेसे दुःखाचे उद्गार काढले आहेत.

नेटिव ओपिनियनमध्ये ऑगस्ट १८८९ च्या अंकात 'लिहून आलेला मजकूर' या सदराखाली शास्त्रीबोवांच्या 'रत्नाजीपंत आपा, अहिल्याबाई होळकरीण व सिधोजीपंत निपाणकर' या पुस्तकावर फार कडक व वैयक्तिक टीका आली होती. तिला उद्देशून शास्त्रीबोवा म्हणतात, 'जी गोष्ट ऐतिहासिक समजण्यास बिलकुल पुरावा नाही, ती ऐतिहासिक चरित्रांत दाखल करणे केवळ इतिवृत्तांवर चरित्र लिहू पाहणाऱ्या ग्रंथकारांचे काम नव्हे. बापटांसारख्या चरित्रकारानी व ग्रंथकारानी व दरोबस्त ब्राह्मणमंडळीने सर्वतोमुख निष्कलंकत्व दाखविण्यासाठी अतिशयोक्तीने भरित व निराधार अशा अप्रामाणिक कथा खुशाल मानाव्या, व तसल्या कथांवर खुशाल मनोराज्यमय इमारती बांधून राघोबादादासही शिवाजीच्या वर्गात खुशाल घालावे; इतकेच नाही, तर राघोबादादास सूर्य बनवून, शिवाजीस त्याच्या

पुढे खद्योतही ठरवावे. पण तो मार्ग नुकत्याच निर्दिष्ट केलेल्या पैकीच कित्येक ग्रंथकारांच्या मते ' कालाचा अपव्यय करून लेखणीस शीण देणाऱ्या व घाणेरडी पुस्तके लिहिणाऱ्या ' मजसारख्या सर्व प्रकार क्षुद्र व क्षुल्लक प्राण्यास पसंत नाही, तेथे नाइलाज आहे. ' असली चरित्रे वाचून कोवळ्या अर्भकांच्या मनावर वाईट परिणाम होईल ' वगैरे आरोप मजसारख्यावर असल्या मंडळीने खुशाल आणावे. माझ्या अल्पमतीप्रमाणे मी मुलांची मने भूषित करतो, दूषित करीत नाही. जी मंडळी मी अर्भकांची मने दूषित करतो असे समजते, त्या मंडळीने आपली व आपल्या मित्रमंडळींची मुले शाळेतून खुशाल काढावी. जे सद्गृहस्थ माझे आचरण इतके निंद्य समजतात, त्यांस दुसरा जबाब देण्याजोगा नाही. तो जबाब पूर्वी एकदा दिला व आणखी जितके म्हणून प्रसंग येतील तितक्याही प्रसंगी तोच ठरीव व अभिज्ञ जबाब मिळेल. असल्या प्रसंगाच्या संबंधाने मला अतिशय खेद होतो; तो इतक्या-साठीच की नसते गुरुशिष्याचे नातेही लावून अनृत भाषणाचा प्रसंग लेखकास ओढून आणावा लागतो.' शास्त्रीबोवांच्या लेखांवर झालेल्या टीका व एकंदर वादविवाद वाचून माझ्या मनात एक कल्पना आली. डॉ. केतकरांनी राजवाड्यांवरच्या सर्व बऱ्या वाईट टीका एकत्र करून छापल्यास सामाजिक व वाङ्मयीन दृष्ट्या टीकेचे बरे-वाईट स्वरूप कसे असते हे अभ्यासकास फार बोधप्रद होईल असे म्हटले आहे. शास्त्रीबोवांवरील सर्व बऱ्या-वाईट टीकांचे सार मी शेवटच्या भागात दिले आहे ते याच हेतूने. मला तर असे वाटते, की लोकहितवादी, फुले, चिपळूणकर, टिळक, आगरकर, राजवाडे आणि केतकर या सर्व चळवळ्या पुरुषांच्यावरील साधकबाधक टीकांवर एक ग्रंथ शास्त्रीय दृष्टीने कुणी लिहिल्यास, त्यापासून टीकाशास्त्राची फारच प्रगती होईल. वाईट टीकेतूनसुद्धा काहीतरी सार काढणे काही सोपे काम नाही. मला शास्त्रीबोवांसंबंधी लिहिताना वरील सर्व लेखकांच्या वाङ्मयाचा थोडासा अभ्यास करावा लागला. त्यातल्या त्यात या सर्व व्यक्ती परस्पर-विरोधी असल्या तरी संस्कारक्षम आणि तडफेने काम करणाऱ्या होत्या. व्यक्तिशः त्यांचे आयुष्यात एकमेकांशी पटले नसले तरी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे विचार वादविवादाच्या भोवऱ्यातून वर येऊन कुठे ना कुठे तरी प्रति-स्पर्ध्याच्या विचाराशी तादात्म्य पावलेले दिसतात. जन्मभर झगडलेले टिळक

व शास्त्रीबोबा, पण मराठीचा केवढा अभिमान त्यांना. गीतेवर किती त्यांची श्रद्धा. राजवाड्यानी शास्त्रीबोवांचे वाभाडे काढले. पण महाराष्ट्राच्या वसाहतीबद्दलच्या कुतूहलाने नकळत दोघांचे विचार एकाच पन्हाळातून वहात गेले. भाषाशास्त्राच्या कामगिरीने तर या दोन्ही विद्वानांची अशी काही सांगड पडली आहे की सांगून सोय नाही. हे गपित ते दोघे जिवंत होते तोपर्यंत त्यांना मात्र उमगले नाही. साने गुरुजींनी म्हटले आहे, की ' जुन्याकडे नव्या दृष्टीने पाहणे, पुराणातील भाकडकथांचे अवगुंठन काढून त्यातील ऐतिहासिक सत्य संशोधणे व आपली मते स्पष्टपणे व निर्भीडपणे मांडणे हे राजारामशास्त्री भागवतांचे काम राजवाडे यांनी उचलले.' (इतिहासाचार्य राजवाडे, पृ. ४०). मराठी भाषेच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासकांपुढे या सर्व थोर समाजसेवकांनी व विद्वानांनी मांडलेल्या विविध कल्पनांच्या वारशातून आपल्या पिढीला सतत पोषक असणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाचा लाभ कसा झाला, हा एक महत्त्वाचा विषय आहे. नुसते त्यांनी रुढ केलेले नवे शब्द जरी तपासले तरी त्यातून कितीतरी मनोरंजक ज्ञान मिळते. उदाहरणार्थ, टिळकांचा नोकरशाही हा शब्द. राजारामशास्त्री भागवत यांचे ब्राह्मणेतर व राजकारण हे शब्द. त्यांच्यामध्ये केवढे सामर्थ्य भरले आहे ! केवढ्या कल्पना त्यांच्यामागे आहेत ! पण त्या वेळेला हे ' विचित्र ' शब्द वापरल्याबद्दल त्यांना शालजोडीतले अहेर मिळाले. निदान शास्त्रीबोवांची तरी विक्षिप्त ही पदवी या शब्दासनावर बसल्यामुळे अढळ राहिली. दुसरी एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या सगळ्या नागमोडी विचारांच्या वळणा वळणांतूनच आजच्या शास्त्रीय विचारपद्धतीची चौकट तयार झाली आहे. वर सांगितलेल्या कुठल्याही लेखकाचे आजच्या अभ्यासकाला अनुकरण करून चालणार नाही. पण त्यांच्या कळकळीचे आणि सामर्थ्योपासनेचे महत्त्व मात्र एवढे मोठे आहे की, त्यांची योग्य जोपासना केल्याशिवाय आम्हाला कुठलेच काम थोडेसेदेखील उत्तम करून दाखविता येणार नाही.

□ □

# परिशिष्ट—१

## शास्त्रीबोवांचे ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेले वाङमय व व्याख्याने

### ऐतिहासिक

(१) हिंदुस्थानचा छोटा इतिहास, भाग १–४ (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८८७)

(२) मऱ्हाठ्यांसंबंधाने चार उद्‌गार (निर्णयसागर छापखाना, मुंबई, १८८७)

(३) रत्नाकरपंत आपा, अहल्याबाई होळकरीण व सिधोजी निपाणकर (फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८८९)

(४) शिवछत्रपतींचे चरित्र (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९२)

(५) संभाजीचे चरित्र (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६)

(६) राजारामाचे चरित्र (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९२)

(७) शिवछत्रपतीच्या चरित्रातील कित्येक मुद्दे (हेमंत व्याख्यानमाला आर्यभूषण छापखाना, पुणे, १८९३)

(८) शककालविचार (फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८९३)

(९) एकनाथाचे चरित्र (ब्राह्मण छापखाना, १८९३)

(१०) कैसरकडून सुलतानाकडे (गिबनकृत Rise and Fall of the Roman Empire वर श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी लिहिलेल्या टिप्पणांचे भाषांतर; नेटिव ओपिनियन प्रेस, मुंबई, १९०६)

### धर्मविषयक

(१) ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म किंवा वेद व वैदिक धर्म (हेमंत व्याख्यानमाला, आर्यभूषण छापखाना, पुणे, १८८९)
(२) मोगल व मोगली धर्म (हेमंत व्याख्यानमाला, आर्यभूषण छापखाना पुणे १८९०)
(३) पार्स व पार्शी धर्म (हेमंत व्याख्यानमाला, आर्यभूषण, छापखाना १८९१)
(४) महाराष्ट्रधर्म (ब्राह्मण छापखाना मुंबई, १८९५)
(५) व्रात्यस्तोम (हेमंतव्याख्यानमाला, आर्यभूषण, १८९६)
(६) ऐतरेयोपनिषद् (निर्णयसागर छापखाना, मुंबई, १८९८)
(७) श्वेताश्वतरोपनिषद् (निर्णयसागर, १९००)
(८) वेदांतला कोणता भाग कलियुगांतला, कोणता कलियुगापूर्वीचा (पार्वतीवरदा प्रेस मुंबई १८९९)
(९) ब्राह्मणी व भटी धर्म (सुदर्शन छापखाना, अहमदनगर, १८९९)
(१०) साठ श्लोकी श्रीमद्भगवद्गीता सार्थ (आत्मतत्त्वप्रकाश बेळगाव, १९०९)
(११) विवाह व उपनयन सार्थप्रयोग (श्रुतिबोध छापखाना, मुंबई, १९११)

### सामाजिक

(१) जशास तसे (फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई १८८४)
(२) जशास तसे पुरवणी (फॅमिली प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८८५)
(३) विधवा विवाह सशास्त्र की अशास्त्र ? (जगदीश्वर प्रेस, मुंबई १८८५)
(४) आमची देशीभाषा विद्यापीठी शोभणारी आहे की नाही (हेमंत व्याख्यानमाला, आर्यभूषण, पुणे १८९२)
(५) उमेदवाराची साडेसाती (हेमंत व्याख्यानमाला, ब्राह्मण छापखाना, मुंबई, १८९५)
(६) ब्राह्मण म्हणविणारास सवाल (हेमंतव्याख्यानमाला निर्णयसागर, मुंबई १८९९)

(७) ब्राह्मणांचा धर्मासंबंधी जुलूम (नेटिव ओपिनिअन १८९९)

(८) पुनर्विवाहाच्या प्रचारार्थ आजपर्यंत झालेला उद्योग व त्याचे फल (सन दिलेला नाही पण १८९० च्या सुमाराचा असावा. छापखान्याचे नाव पण अज्ञात.)

**भाषाशास्त्र, व्याकरण अलंकार, इत्यादी**

(१) अलंकारमीमांसा (ब्राह्मण छापखाना, मुंबई, १८९०)
(२) संस्कृत भाषेची विचिकित्सा (श्री समर्थप्रसाद छापखाना, कोल्हापूर)
(३) प्राकृत भाषेची विचिकित्सा (कर्नाटक प्रेस, मुंबई १८९६)
(४) रेवतीचे पहिले पुस्तक (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६)
(५) मराठी भाषेचे छोटे व्याकरण. (ब्राह्मण छापखाना, मुंबई)

**मराठी कवीच्या काव्यातील उतारे**

(१) मोरोपंती कर्णपर्वातील वेंचे (ब्राह्मण छापखाना १८९६)
(२) मोरोपंती गदापर्वातील वेचे (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६)
(३) भीष्मभक्तिभाग्य (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६)
(४) रामदासी वेंचे (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६)
(५) मोरोपंत त्रिपर्वी वेचे (ब्राह्मण छापखाना, मुंबई १८९६)
(६) वामनी वेचे हरिविलासातील (ब्राह्मण छापखाना, मुंबई, १८९६)

**संस्कृत संक्षिप्त कृती**

(१) स्वल्प कौमुदी (ब्राह्मण छापखाना, सन अज्ञात)
(२) पंचतंत्रसारम्–प्रथमतंत्र सारम् (ब्राह्मण छापखाना, सन अज्ञात)
(३) भगवद्योग– (श्रीमद्‌भगवग्‌दीतासारम्) (ब्राह्मण छापखाना मुंबई १८९६)

## इंग्रजी लिखाण

(1) Eleven Upanishads– Aitareya and Shwetashwatara (Nirnayasagar Press, Bombay 1898; 1900)

(2) A Course of Eight Lectures in Sanskrit (The Wilson-Philological Lectures; Native Opinion Press, Bomday 1903)

(3) Khordeh Avesta Searched From a Vedic Point of View (Native Opinion Press Bombay 1904)

(4) The Original Bhagavadgita Unearthed (Native Opinion Press 1905)

(5) The Divings into The Bhagavadgita (Native Opinion Press 1904)

(6) An attempt to analyse The Bhagavadgita (Native Opinion Press 1905)

(7) Is Hindustan a Religion (Indian Interpretor, Oct. 1906)

(8) To All Vegetarian Brahmins (Scottish Misson Industries, Poona 1907).

(9) The Samhita of The Rigveda Searched (J. B. R. S. 1902)

(10) The Vedic Shakhas (Unpublished)

या शिवाय शास्त्रीबोवांनी मराठी म्हणींचा व वाक्सांप्रदायांचा एक शब्द कोश तयार केला होता. तो त्यांनी मृत्युसमयी डॉ. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ह्यांचे हवाली केला होता. असे कीर्तिकरांनी कै. विद्याधर वामन भिडे यांना १९०९ साली लिहिलेल्या एका पत्रावरून समजते. कीर्तिकर तो ग्रंथ छापणार होते. तो का छापला गेला नाही व त्याचे काय झाले ते समजत नाही. ते पत्र असे आहे-

True–Copy

Alexandra Lodge,
Andheri,
30th Sept. 1909

My dear Mr. Bhide,

I know you well by repute as the author or ' राघवीय परिवाह ' a splendid poem it is, be sure.

As I am myself publishing the MS you ask for, I am sorry I can't lend it to you.

Our revered friend R. R. B. left the MS with me with the sacred trust of Publication. That trust I am going to justify by publishing the Idioms soon in R. R. B's sacred memory.

I am sorry to disappoint you by not sending to you the MS at once.

But you with, I hope, be able shortly to see it in print.

With kind regards,

Believe me
Yours sincerely,
Sd/–K. R. Kirtikar.

यावर भाष्य करायला नकोच !

◻ ◻

# परिशिष्ट-२

## नियतकालिकांतील लिखाण आणि शास्त्रीबुवांच्या लेखनावर आलेले टीकालेख

'विविधज्ञानविस्तारा'खेरीज इतर नियतकालिकांतले म्हणून जे शास्त्रीबोवांचे लिखाण दिले आहे, ते सर्व अपुरे आहे. काळाच्या दाढेत सर्वस्वी गडप झालेले लिखाण पुढील प्रमाणे आहे. 'दंभहारक' मासिकातील लेख; वऱ्हाडातील 'ज्ञानसंग्रहातील' लेख; सदाशिवराव केळकरांच्या 'कामगार, बंधू' पत्रातील लेख; 'काशीविद्यासुधानिधी'तील लेख; मधुमक्षिकाचिकित्सक व धुरीण ह्या बेळगावकडील मासिकातले व वृत्तपत्रांतील लेख आणि 'पुणे वैभव' पत्रातील लेख. वार्ताहरातील लेख; हिंदुधर्मविवेचकातील बरेचसे लेख, 'ऐतिहासिक गंजिफा'तील लेख इत्यादी.

### (१) हिंदुधर्मविवेचक

हे १८८५ पासून १८८७ पर्यंत चालू होते. ह्याचे फक्त खाली दिलेले लेख उपलब्ध आहेत. ह्या मासिकाला 'हिंदु युनियन क्लब'चा आधार होता. ह्यातील दोन लेख सोडून बाकी सर्व शास्त्रीबोवांचे आहेत. शास्त्रीबोवांची संपादकीय कामगिरी ह्यांत चांगली दिसून येते. आटोपशीरपणा व शास्त्रशुद्ध विचारसरणी हे या मासिकाचे वैशिष्टच आहे. शके १८०७. (१८८५)

(१) कार्तिकः–श्रुती, स्मृती, पुराणे व आचार हा हिंदु धर्माचा पाया.

(२) मार्गशीर्षः– हिंदुधर्म अधिकारभेदाने व्यवस्था लावतो तेच रास्त

(३) पौषः– श्वेताश्वतर उपनिषद्.

(४) माघः– श्रुती, स्मृती, पुराणे व शिष्टाचार.
(५) श्वेताश्वतर.
(६) फाल्गुनः– चातुर्वर्ण्य.
(७) चातुराश्रम्य.
(८) श्वेताश्वतर.
(९) ज्येष्ठः– ज्ञानोदय व हिंदुधर्मविवेचन.
(१०) आषाढः– मूर्तिपूजा.
(११) श्वेताश्वतर.
(१२) श्रावणः– संध्या.
(१३) श्वेताश्वतर.
(१४) भाद्रपदः– श्वेताश्वतर.
(१५) आश्विनः– माधवबागेतील हिंदु लोकांची सभा वर्ष २ रे शके १८०८.
(१६) कार्तिकः– कुटुंबमित्र व हिंदुधर्मविवेचक.
(१७) मार्गशीर्षः– श्वेताश्वतर.
(१८) पौषः– योगशास्त्र.
(१९) माघः– आमचे इंग्रजी शिकलेले लोक काय करीत आहेत ? सुधारणा की समुन्मूलन ?
(२०) तैत्तिरीयोषनिषद्.
(२१) फाल्गुनः– सांख्यशास्त्र (२२) तैत्तिरीयोपनिषद्
(२३) चैत्रः– कलियुग (२४) शिमग्याचा सण.
(२५) तैतिरीयोपनिषद्.
(२६) वैशाखः–द्वैत आणि अद्वैत (२७) तैत्तिरीयोपनिषद्.
(२७) ज्येष्ठः– संतमंडळी.
(२८) आषाढः– संतमंडळी.
(२९) श्रावणः– आपली हल्लीची सामाजिक स्थिती (२) संतमंडळी.

## (२) वार्ताहर

' वार्ताहर ' हे ' फॅमिली प्रिंटिंग ' प्रेसचे पहिल्याने साप्ताहिक व मग द्वै-साप्ताहिक व काही दिवस दैनिक पण होते. एक वर्ष (कोणते वर्ष ते

ठाऊक नाही. बहुधा १८८४ असावे) त्याचे संपादक पण होते. पण ह्या पत्राच्या केवळ तीन वर्षांच्याच फायली उपलब्ध असल्यामुळे शास्त्रीबोवांचे संपादन कार्य ह्यांत कशा प्रकारचे झाले त्या बद्दलचा उल्लेखही करता येणे शक्य नाही, अपवाद म्हणून १८८४ साली शास्त्रीबोवांचा व गुंजीकरांचा जो वाद झाला, त्यासंबंधी ' जशास तसे ' या पुस्तकार ' वार्ताहरकर्ते ' या नावाने लिहिलेले संपादकीय स्फुट ' आमचे दोन शब्द ' हे त्या पुस्तकास पुरवणी म्हणून जोडलेले आहे. हे पत्र सुधारकांच्या विरुद्ध असल्याचे दिसते. ' ब्राह्मणांची निंदा करण्याकरता दीनबंधूचा अवतार आहे. म्हणून त्या अवताराचा अंमल मोडण्याकरता वार्ताहराचा अवतार आहे. ' असे संपादकीय उद्‌गार १२–६–१८८७ च्या ' वार्ताहरात ' आढळून येतात. ज्या ' हिंदुधर्मविवेचकाचे ' संपादक शास्त्रीबोवा १८८५–१८८७ साली होते त्याची जाहिरात ह्या पत्रात प्रामुख्याने येत असे. त्याचप्रमाणे फॅमिली प्रिंटिंग प्रेसमध्ये छापलेल्या ' वार्ताहराच्या किताबखान्यातील ' ' जशास तशा ' पासून अगदी प्रारंभीच्या पुस्तकाच्या जाहिराती ह्यातच येत असत. शास्त्रीबोवांच्या अलंकारशास्त्राची व अलंकारशास्त्र शिकवण्याच्या मोफत वर्गाची जाहिरात पण ह्यातच येत असे. ह्यातील काही उद्‌गार पत्र रूपाने आलेले शास्त्रीबोवांच्या बहुतेक विरुद्ध आहेत. दोन संपादकीय व एक पत्र मात्र त्यांच्याबाजूचे आहे. ते उल्लेख असे :–

(१)' मराठ्यां संबंधाने चार उद्‌गार ' या नावाचे नुकतेच एक पुस्तक बाहेर पडलेले सुप्रसिद्धच आहे. त्या संबंधाने हक्काबद्दल त्याचे प्रकाशक व मालक, आमचे उदार-प्रकृती जावजी दादाजी, येथील निर्णयसागर छापखान्याचे चालक, हे मोठ्या उदार बुद्धीने, कर्ते रा. रा. राजाराम रामकृष्ण भागवत यांना काही रक्कम देण्याला तयार होते, परंतु त्यांनी ही ती मोठ्या थोर मनाने स्वीकारली नाही, असे आम्हाला चांगल्या आधाराने माहीत आहे. असे असता शास्त्रीबोवांनी एक बडी रक्कम घेतली तशी जे क्षुद्रबुद्धी गृहस्थ गावात व्यर्थ कूट खात आहेत, ती सर्वथैव निराधारी आहे, असे आम्ही स्पष्ट म्हणू शकतो.' (१८–७–१८८८)

(२) अलीकडील विद्यालयातून स्वधर्मशिक्षणाचा पूर्ण अभाव असल्यामुळे धर्मोन्नतीचे पाऊल बरेच मागे पडले आहे. त्या कामी अधिक मदत

व्हावी, म्हणून येथील मराठा हायस्कूलच्या व्यवस्थापकांची (राजाराम-शास्त्री भागवतांची) आज कित्येक दिवस खटपट सुरू आहे– व त्याच संबंधाने त्यांची स्वतंत्र पुस्तकमालाही तयार होत आहे. असे असता ते पुस्तकमाला करू इच्छित नाहीत, म्हणून आम्ही त्या कामी हात घातला, असे एक गृहस्थ गावात सांगत फिरत अ,हेत, ते केवळ व्यर्थ व तोंडपुजे-पणाचे असे आम्ही समजतो. (८–७–१८८८)

(३) पोच:– भगवद्‌गीतेचे भाषांतर भागवतांचे की गुंजीकरांचे ? याबद्दल संपादकाच्या शंकेला भागवतांनी ते आपले नव्हे म्हणून कळविले. (७–१०–१८८८)

**उमेदवारांची साडेसाती :– टीका :–** काल हेमंतोत्सवात उमेदवारांची साडेसाती सुरू झाली ती तब्बल एक तास बोकांडीस बसून संपली. हेमंतो-त्सवात साडेसातीस आरंभ केला राजारामपंत भागवतांनी. हे नव्हत प्रोफेसर, नव्हत शास्त्री. प्रोफेसर पदवी मिळण्यास एम. ए. हवा, आणि प्रार्थना-समाजाचा सभासद नसला तर 'वेद ईश्वरप्रणीत नव्हत' इतकी तरी थेट देठापासून गर्जना करणारा केसरी, अगर गर्जना न झाल्यास शिमगा तरी माजवणारा भला भक्कम सुधारकाचा बच्चा हवा. भागवत नाहीत प्रार्थनासमाजाचे सभासद, नाहीत 'वेद ईश्वरप्रणीत नव्हत' असे समजणारां-पैकी. बरे, शास्त्री म्हणावे तर यांनी बिसमिल्लाचे ही शास्त्र म्हटलेले आणि इराण्याच्या चहाशी प्रवासाच्या हकीकतीत वारंवार प्रसंग आलेला. शास्त्र्यास नसतो इराण्याच्या चहाचा निजध्यास. म्हणून हे प्रोफोसर भागवत नव्हत, राजारामशास्त्री भागवत नव्हत, तर राजारामपंत भागवत...हे उपजत खरडते. अभ्यासाचा बोजा कमी कसा होईल, परीक्षामध्ये बेतबात राहून उमेदवारांचे हाल कमी कसे होतील, असले उमेदवारांस उद्देशून अनेक प्रश्न आज उद्‌भवलेले आहेत त्या पैकी कित्येकांचा उल्लेख कालच्या साडेसातीत आला होता. असल्या प्रश्नांचा ब्राह्मणसभेस जितका अधिकार तितका दुसऱ्या सभेस नाही... जर ब्राह्मणांनी आपले अधिकार टाकून दिले, तर जगाची रहाटी चालणार कशी ? या चिंतेने दिवसास अन्न गोड लागत नाही, रात्रीस झोप येत नाही, 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' महापुरुषाच्या मखाने आपली कामगिरी झुगारली की जगाचे वाटोळे. तर ब्राह्मणांनो,

आपले मुखत्व गाजवा, आणि उमेदवारांची साडसाती कमी होईल अशी व्यवस्था करण्याचे मनावर घ्या. तशांत हे काम बिनभांडवली. यास भांडवल काय ते अकलेचे. ते तर अक्षय्यतृतीयेच्या श्राद्धाच्या फळाप्रमाणे तुमच्या आंगी अक्षय्य मुरलेले. तर जसे धर्मशाळेचे आणि हिंदुमुसलमानांमध्ये सलोखा करण्याचे तसे उमेदवारांच्या साडेसातीवर आपल्या अनिवार्य ब्रह्मास्त्राचा प्रयोग अश्वत्थाम्याप्रमाणे करण्याचेही काम एकदा घ्या मनावर आणि प्रोफेसर भय्यासाहेबांच्या (जिनसीवाल्यांच्या) उपजत वक्त्यांच्या परमगुरूस द्या एखादा चांगलासा उद्योग करून–' भुकेलेला भट (२०–२–१८९५)

(५) **टीका** :– भागवतास 'निबंधाचार्य' चेष्टेने म्हटलेले. भुकेलेला भट (१३–३–१८९५)

(६) **महाराष्ट्रधर्माची आगगाडी** :–भागवत 'अल्लोपनिषदांचे अध्ययन केलेले...दीडतासाने हा राजारामपंती गोंधळ संपला. इत्यादि, भुकेलेल्या भटाचे उद्‌गार. (२४–४–१८९५)

(७) **भुकेलेल्या भटास उत्तर** :– संपादकास लिहिलेले पत्र :– ' आपण अशा संस्कृत शिव्यांनी भरलेल्या ताळ ना तंत्र असलेल्या पत्रास थारा देऊ नये...महाराष्ट्रधर्माची गाडी काय, रानडयांस शिव्या काय, रा. राजाराम-पंतांची विचारसरणी अगदी चुकली असेल, टीकेस पात्र असेल पण त्या विषयी माहिती देताना अगर टीका करताना ह्या कोंकराच्या उडयांप्रमाणे संस्कृत शिव्या काय होत ? नामदार न्यायमूर्ती रानडे व राजारामपंत अशा लेखांना कसचे भीक घालायला बसले आहेत म्हणा ? पण आपणा सर्वांनी मिळून एकदा तरी सदिच्छेने लेखकाला दोन गोष्टी सांगणे आवश्यक दिसते– अरे, भुकेलेल्या भटा ! बाबा ! विचार करून व आपणास खरोखर काही लिहावयाचे आहे, अशी खात्री झाल्यावाचून केवळ 'लिहिणारा' म्हणून लिहावयाचा हा नाद तू सोडून दे. गृहस्था, कोठे तू व कोठे नामदार रानडे, डॉ. भांडारकर, रा. राजारामपंत आदिकरून मंडळी ? बरे, खरोखर जर तुला काही म्हणावयाचे असते, तर गोष्ट निराळी. तू आपल्या शंका अगर उलट विचार पत्रात लिहिता क्षणीच तुझे त्या विद्वद्वर्यांनी समाधान करून दिले असते. पण तू काय लिहितोस; कोणीकडे कसा बहकतोस,

मध्येच काही विनोदाच्या रूपाने आपली योग्यता कशी प्रगट करतोस हे तुझे तुलाच तरी कळते का ? विषय म्हणून घेतोस कोणता, त्याला उपमा देतोस काय व पर्यवसान करतोस कोणीकडे ! कशाचा कशास पत्ता तरी ? तुझ्यामध्ये थोडा ज्ञानशून्यत्वाने जरी असला तरी अभिमान दिसतो. पण त्याचा उपयोग असा अविचारात ? घेतली लेखणी आणि मारले खराटे असे करू नकोस...तू भुकेलेला आहेस म्हणून हे लेखरूपी भोजन दिले आहे. त्याचा स्वीकार करून समाधान पाव व नीट मार्गाला लाग.– भुकेलेल्या भटाचा यजमान. (२५–५–१८९५). यानंतर २७–५–१८९५ च्या अंकात जरी इराण्याकडे, शेणव्याकडे, खाणारे ' फराळी ब्राह्मण ' ' बिसमिल्ला ' ब्राह्मण वगैरे जरी टीका, भुकेलेल्या भटाने एकदा आडून केली तरी नंतर रानडे-भागवतांच्या नावाचा मजकूर त्याने लिहिला नाही. लिहिले ते टिळक जिनसीवाल्यांच्या स्तुतीपरच.

## (३) केसरी

केसरी, मराठा, वाईचे मोदवृत्त, इत्यादि नियतकालिकांशी शास्त्रीबोवांचे कधीच पटले नाही. सुधारकांशी त्यांचे जितके जुळलेले, तितकेच ह्या पत्रांशी त्यांचे फाटलेले असायचे. सुबोधपत्रिकेतल्या बहुतेक लेखात ह्या पत्रांच्या व त्यांच्या संपादकांच्या धोरणावर वेळोवेळी कडक टीका आहे. त्यांच्या धार्मिक व सामाजिक मतांना ते ' भिक्षुकी ' मते म्हणत. त्यांच्या राजकीय मतांबद्दल शास्त्रीबोवांनी शेवटपर्यंत काही एक वाकडे लिहिलेले नाही, ही एक विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. साहेबाची मानसिक गुलामगिरी शास्त्रीबोवांनी कधीच पत्करली नाही. सरकारी नोकरीवर त्यांचा कटाक्ष. समाजात सर्वांगीण सुधारणा झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही अशी त्यांची आगरकरांप्रमाणेच भावना होती. पण आगरकरांचा पिंड जितका सुधारकाचा तितकाच राजकीय प्रवृत्तीचा होता. शास्त्रीबोवा संशोधक म्हणूनच समाजसुधारक होते. केसरीप्रमाणेच निबंधमालेचा व शास्त्रीबोवांचा संबंध विरोधभक्तीचाच होता. पण ' निबंधमाले 'चा अवतार फार लहान व तेव्हा त्यातील उल्लेख काही अंशी केसरीतच अंतर्भूत आहेत अशी समजूत करावी लागते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे मराठी इंग्रजी छाप पडलेले व अलंकारांनी

भरलेले, नखरेल असे होते. शास्त्रीबोवांस ते आवडत नसे. त्याला ते 'पिळांनी फुगलेले पुणेरी मराठी' म्हणत. केसरीत शास्त्रीबोवांच्याबद्दल उल्लेख आले आहेत ते असे :–

(१) 'उमेदवारांची साडेसाती' ह्या हेमंतव्याक्यानमालेतल्या व्याख्यानाचा परामर्श 'केसरी'ने सहानुभूतीने लिहिला आहे. कारण शास्त्रीबोवांची व केसरीकरांची मते तंतोतंत एक होती. शास्त्रीबोवा विद्यार्थ्यांविषयी कळवळा बाळगणारे; म्हणून त्यांना विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय असह्य होई. केसरीकार राष्ट्रीय आणि इंग्रजी धोरणाला हाणून पाडणारे. तेव्हा त्या दोघांचे कसे जुळले हे ऐकणे मजेचे आहे. ही मनमिळणी होण्यास मुख्य कारण झाले हे की, १९ फेब्रुवारीला लॉर्ड हॅरिस हे चान्सेलर असताना डॉ. भांडारकर या व्हाइस चान्सेलरचे भाषण झाले. हॅरिससंबंधी लोकमत चांगले नव्हते. भांडारकरांनी त्याची स्तुती वारंवार करावी. त्यामुळे चिडून जाऊन त्यांचे भांषण होतांना विद्यार्थ्यांनी टवाळी केली. त्यावेळी सर्व वर्तमानपत्रात (केसरीखेरीज) विद्यार्थ्यांवर खरपूस टीका आली. त्यासुमारास शास्त्रीबोवांचे व्याख्यान झाले, व मॅट्रिकपासून ते बी. ए. पर्यंतच्या विद्यार्थ्यांची गाऱ्हाणी त्यांनी प्रथम वेशीवर टांगली. एकंदर विद्याक्रम कसा व किती असावा ह्या विषयीं चर्चा केली. 'बरेच निर्बुद्ध आणि आळशी असे उमेदवार पसार झाले तर ते बिचारे सुटले; ते ठीक झाले. सुबुद्ध आणि मेहनती असे उमेदवार जर ना पसार होतात तर ते उघड गैरवाजवी होते. निरपराधास साडेसाती नडत आहे. ती न नडेल, अशी व्यवस्था विद्यापीठाने लावली पाहिजे.' असे शास्त्रीबोवा म्हणतात. (२६–२–१८९५)

(२) शास्त्रीबोवांच्या अभिनंदनाचा प्रसंग केसरीला १८९५ साली मिळाला. त्या वर्षी न्यायमूर्ती रानडयांनी भागवत धर्मावर प्रार्थनासमाजात आणि ठाकुरद्वारला मुंबईत व्याख्याने दिली, ती शास्त्रीबोवांच्या प्रेरणेने. मराठी संतवाङ्मयाचा अभ्यास शास्त्रीबोवांनीच रानडयांस करावयास लावला, आणि प्रार्थनासमाजाची तत्त्वे अधिक लोकप्रिय करायची असल्यास देवळातून व्याख्याने करा, आणि संतास विसरू नका असा आदेश शास्त्रीबोवांनी स्वतःस गुरुस्थानी असलेल्या रानडयांस दिला. (२–१–१८९६)

(३) 'व्रात्यस्तोम अगर ब्राह्मणी धर्माची दीक्षा,' ह्या व्याख्यानाबद्दल सुद्धा एकमत असल्याने थोडी कडक टोका सोडल्यास विरोधी पक्षाचासुद्धा एक सूर होता. अनार्यास आर्य करणे, मुळचे हिंदू ख्रिस्तीं झाले असल्यास व त्यांना पश्चात्ताप झाल्यास शुद्ध करून घेण्यास हरकत नसावी असे मत स्पष्टपणे मांडले आहे. (१८–१–१८९६)

४) 'न मांसभक्षणे दोषः' या विस्ताराती'ल लेखावर कडक टीका. 'सुधारक अलोकडे ज्या वातावरणात भ्रमण करीत असतात त्याहूनही उंचीवरच्या वातावरणात शास्त्रीबुवांनी उड्डाण केले आहे.'

'ताडी, शिंदी फेणी, बेवडा, म्होवडा', इत्यादी दारूची नावे शास्त्रींबोवांनी दिलेली पाहून केसरीकार म्हणतात. 'अबब ! काय ही माहिती ! किती तरी हीं नावे माहीत होण्याला कितीतरी परिश्रम करावे लागले असतील ? सारांश शास्त्रीबुवा ब्राह्मण असूनही त्यांनी दारूच्या कार्यातील हे जे आपल्या चौकसपणाचे दिग्दर्शन केले आहे, ते अतिशय वर्णनीय आहे यात शंका नाही (३१–३–१८९६, ७–४-१८९६)

(५) 'ब्राह्मण म्हणविणारास सवाल':– 'विषयाची मांडणी विलक्षण व एककल्ली असून त्यांच्या निबंधापैकी काही भाग ग्राह्य नसला तरी विचार करण्यासारखा आहे– असली बाष्कळ व चावट व्याख्याने देण्यास परवानगी देऊन 'जस्टिस' सारख्या पिशाच्चांना दिवाणखान्यात हुतुतू घालावयास लावण्याचे श्रेय कमिटीने का घेतले कळत नाही.' (१४–१–१८९९, १७–१–१८९९)

(६) 'ब्राह्मण म्हणविणाऱ्यांस केलेल्या सवालाचा जबाब.' ह्या श्री. काशिनाथ वामन लेले यांच्या व्याख्यानास पाठिंबा. 'बायकांची मुंज' ही कल्पनाच मूर्खपणाची अशी टीका. (२४–१–१८९९, १४–२–१८९९)

(७) 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता,' (टिळकी धर्मावर भागवती टीका) ह्या व्याख्यानावर केसरीकार म्हणतात 'आजच्या स्थितीत आम्हास हितकारक सद्‌बोध करणारी माणसे पाहिजेत, विघातक टीकाकार नकोत.' (१–१२–१८९९)

(८) क्षत्रियांची मूळची पायरी :– ह्या व्याख्यानावर कडक टीका. (२३–११–१९०१)

ह्या उल्लेखाशिवाय शास्त्रीबोवांबद्दल अत्यंत त्रोटक मृत्युलेख पण केसरीत

आला आहे. त्यातही आदरापेक्षा सुटकेचा निश्वासच टाकल्याचा भास होतो. (केसरीतील मृत्युलेख)

(४) **निबंधचंद्रिका.**

हे मासिक ' निबंधमाले 'चाच नवा अवतार असून चिपळुणकरी बाण्याचे होते.

विविधज्ञानविस्तारांतील विचारमाधुकरी.

दशावतार-विचार यावर कडक टीका.

रा. रा. निबंधचंद्रिकाकार यांस :–

वि. वि. पुढील लेखास स्थळ द्यावे. बंधुप्रीतिपाशात पडून मला अर्धचंद्र द्याल की काय, असा संशय येतो. परंतु तसे होणार नाहीसे वाटून आलो आहे.

भगवद्भक्तांचे पहिल्या तीन विचारांतले विलक्षण तार्किक वाचून पोट धरधरून हसू येते ! तसेच ह्या विचारातलेही वाचून होते. तीन विचार वाचता वाचता जे जे विलक्षण किंवा चुकीचे किंवा टीकार्ह वाटले त्यावर खूण करीत गेलो. शेवटी पाहता सर्वच चिन्हमय होऊन गेले. तेव्हा थक्क होऊन विचारमाधुकरी हे एक काव्यच समजून स्वस्थ बसलो ! आज चवथा विचार वाचता वाचता साहजिकच ज्या शंका इत्यादी आल्या त्या लिहाव्याशा वाटून लिहीत आहे.

२– ' नरहरि व वराह हे अतिप्राचीन काळी कश्यप सरोवराजवळ असावे ' असे म्हणण्यास आधार काय ? बरे, हे विधान संशयात्मक केलेले असून त्याजवरच अवलंबून असणारे दुसरे विधान ' काश्यप सरोवराजवळ असता हिरण्याक्ष नावाच्या असुर राजाचा वध एका वराहाने व त्याचा बंधु हिरण्यकशिपु याचा वध एका नहिरीने किंवा नरहरीने केला, हे निश्चयात्मक कसे करिता आले ? बरे ते कसेही असले तरी त्यास आधार काय ? ह्या गोष्टी कोणत्या काळी झाल्या ? ह्या कलमावरील १६ व्या टीपेत हिराडोटसवरून जे सांगितले आहे त्याचा काळ कोणता ? कश्यप भरतभूमीत येण्यापूर्वी उपनिषत्काळ झाला असे भगवद्भक्तमत दुसऱ्या विचारावरून दिसते. औपनिषदांच्या गांजणुकीने सुकलेली यज्ञविद्या कश्यपागमनाने टवटवीत दिसू लागली असे ते म्हणतात. कश्यपांबरोबर वराह आले व

त्यांनी आल्यावर वराहावतार कल्पना केली ! तर मग " उदधृतासि वराहेण कृष्णेन शतबाहुना ' असे भूमीस उद्देशून एका उपनिषदात म्हटले आहे, हे कसे ? या वाक्यात वर्णिलेल्या वराहकृत्याची उपपत्ति भगवद्भक्त कशी करितात ? त्यांच्या कविप्रतिभेच्या घरी उपपत्ति पाणी भरते आहे. तेव्हा त्यास ही उपपत्ति दुर्घट नाही. परंतु सहज विचारले.

(३) याज्ञिक काश्यपांत कधी गेले ? रामचरितात वसिष्ठ-रघुसंबंध याज्ञिकांच्या वाचण्यात आला ते रामचरित वाल्मिकीचेच की कोणते ? जर विश्वामित्रयज्ञरक्षणार्थ राम गेला ही ब्राह्मणांची कृती; रामाचा अश्वमेध, दशरथशाप, शंबुकवध ही दीनबंधु फुले प्रभृति महाशोधकांच्या व त्या बरोबरच की काय कोण जाणे, आमच्या खऱ्या शोधक भगवद्भक्तांच्या दृष्टीने लबाड ठरलेल्या भूदेवांची कल्पना; सगळी यज्ञविद्या रामचरितात मागाहून ढकललेली, अर्थात् पुत्रप्राप्त्यर्थ दशरथयज्ञ इत्यादी झाडून सारे यज्ञवर्णन हल्ली रामायणात असलेले हे लबाडांचे काम; परशुरामकथा मागाहूनच घुसली; अहल्योद्धार तसाच; तर रामचरितांतले मूळचे काय ? ' ब्राह्मण अवतार झाले कृतयुगात. त्रेता-द्वापरात क्षत्रिय कुलात मात्र भगवंताने अवतार घेतले असे ब्राह्मण म्हणू लागले, व त्यावरून उलटी बौद्धांनी त्यांची तोंडे बंद केली. ' या म्हणण्यास आधार काय ? या गोष्टीचा काल कोणता ? कोणते ब्राह्मणअवतार कृतयुगात झाले असे ब्राह्मण म्हणतात ? ' परशुराम शक मलबारात चालतो त्यावरून परशुराम हा ख्रिस्ताच्या पूर्वी १२ व्या किंवा १३ व्या शतकात झाला ' हे कोणते न्यायशास्त्र ?

(४) यात कूर्मावताराची उपपत्ति आहे. वाचकहो, समुद्रमंथन ते काय? व कोठे झाले म्हणाल तर, गंधर्वाप्सरस हे कश्यप (कास्पियन) समुद्राच्या ऐलतीराहून पैलतीरास गेले हे ते होय. अप्सरस, असुर, आशर, हे एकच. युरोपियन इतिहासकारांनी आपल्यास माहीत करून दिलेले तुर्कस्तानातील निनव्हीचे आसीरिअन लोक हेही त्यातलेच. आणि हे सर्व मूळचे खलाशी ( अप्सु सरति-अप्सरस ). भगवद्भक्तापूर्वी शेकडो वर्षे– त्यांच्याच मते साडेचार हजार वर्षे– होऊन गेलेल्या वाल्मीक्यादिकांनी केलेले असुर इत्यादी शब्दांचे निर्वचन भगवद्भक्तकृत विवेचनापुढे त्याज्य ! वाल्मीक्यादी बिचाऱ्यास कश्यप समुद्र कोठे माहीत होता ! असो, अप्सरस् शब्दाचा

स्त्रीलिंगी प्रयोग तैत्तिरीय वेदात शेकडो ठिकाणी आहे. उदाहरणार्थ 'ऋताषाड्ऋतधामाग्निर्गंधर्वस्तस्यौषधयोप्सरसः...स इदं...परन्तु...ताः... पांतु' हा अनुवाक् ( तैत्तिरी. संहि–अष्टक ३ प्रपाठ ४ अनु. ७ ) पाहा. ह्या पहिल्याच वाक्यावरून व पुढील 'चंद्रमा गंधर्वाच्या नक्षत्रे ह्या अप्सरा' इत्यादी वाक्यांवरून अप्सरा ह्या गंधर्वपत्नी ही समजूत स्पष्ट दिसते. तर ह्याची व्यवस्था काय ? वैष्णव-मत-विचार यात भगवद्भक्तच म्हणतात की 'गंधर्वांच्या बायका अप्सरा' तसेच त्रिमूर्ति-विचारात ते म्हणतात की 'द्वंद्वशब्दाचा मूळचा अर्थ स्त्री पुरुष' आणि ह्या कलमात तर गंधर्वाप्सरस् हा द्वंद्व असे म्हणत असूनही अप्सरस् हे पुरुष झाले !

(५) महाभारतातले मत्स्योपाख्यान हे मत्स्यावताराचे बीज, हे उपाख्यान भगवद्भक्तांच्या वेदव्यासाचे की द्वैपायनाचे ?

(६) भगवद्गीता रचना काल भगवद्भक्तांच्या मते बुद्धानंतर परंतु भगवान् बुद्धानंतर की काय ? 'भगवंताच्या मते बुद्ध हा अवतारच' या वाक्यावरून बुद्धानंतर भगवान् असे होते. विचार २ कलम ३२ या वरून व ५ व्या विचारातील काही वाक्यावरून कृष्ण हाच भगवद्गीतेतला भगवान् हे भगवद्भक्तांस मान्य दिसते. तर कृष्णही बुद्धानंतरचा की काय? पाचव्याच विचारात कृष्ण हा पांडव समकालीन ठरविला आहे. तेव्हा या सगळ्यांची एकवाक्यता कशी ? अश्वत्थ हा यज्ञवृक्ष याज्ञियांचा मूळचाच नव्हे काय ? अश्वत्थाचा उल्लेख तैत्तिरीय संहितेत पुष्कळ ठिकाणी आहे. ऋक्संहितेतही अश्वत्थ हा कल्याणकारक वृक्ष अशी समजूत दिसते. ( ऋ. सं. अष्ट ८ अध्या. ५ 'अश्वत्थेवो निषदनं' इ० वाक्ये पाहा ). 'आश्वत्थप्लाक्ष इतीध्मो भवति' (तैत्ति. सं. अ. ३ प्र. ४ अनु. ८ पाहा). या वरून अश्वत्थ हा यज्ञवृक्ष बुद्धांपासून चोरलेला नव्हे, हे स्पष्ट होय. आश्वलायनही अश्वत्थास यज्ञवृक्ष म्हणतो.

(७) गीतगोविंदांतील अवतारक्रम हल्लीच्या प्रमाणेच आहे. नैषधकार श्रीहर्षानंतरचा जयदेव असे भगवद्भक्तांचे मत दिसते. त्यास आधार काय? श्रीहर्षकवी या निबंधांत विविधज्ञानविस्तारावतारकार भगवद्भक्तांनी ( भाषादि सादृश्यावरून हे सहज दिसते. ) नैषधकाराचा काल सुमारे विक्रम संवत् १२२० ठरविला आहे. परंतु या पूर्वी फार वर्षे जयदेव झाला

असे कवि चरित्रकार लिहितात ते कसे ?

प्रसंगोपात दुसऱ्या काही शंका लिहितो. गोत्रकर्ते मुख्य ऋषी सात. त्या पैकी चार हिंदुस्थानातले. दोन दाक्षिणात्य आणि दोन औतराह– त्यात अत्रि दंडकारण्यातले; अगस्ति त्याहून दक्षिणचे कावेरीतीरचे; कौशिक कनोज देशातले; आणि वसिष्ठ कोसलातले. बाकीचे तीन– अंगिरस, भृगु आणि कश्यप– हे हिंदुस्थानाबाहेरचे, म्हणजे काबूलपासून कास्पियन समुद्रापर्यंत राहाणारे. कण्व हे भरतच. ते वरील चोहोंमध्ये अंतर्भूत होतात त्या प्रमाणेच हे भगवद्‌भक्तांचे मत. आता चमत्कार पाहा ह्या बेटचा सगळचांची भाषा एक. सगळे वेदसूक्त द्रष्टे. सगळचांची प्रार्थनापद्धती बहुधा सारखीच, सगळचांनी योजलेली छंदेही सारखीच. त्यांच्या स्थलांमध्ये हजारो कोसांचे अंतर; चिंता नाही. स्थल-भेद असल्यावर कालसाम्य असेलच असे नाही; हरकत नाही. हिंदुस्थानात हल्ली वीस पंचवीस भाषा आहेत. कावेरी पासून कास्पियन समुद्रापर्यंत याहून जास्त असणे शक्य; म्हणून काय झालं ? कालांतराने भाषांतर होते; तरी काय हरकत ? कश्यप आणि अगस्त्य यांची भाषा एक असली तरी यातला एक ऋषी कश्यप (कास्पियन) समुद्रावर राहाणारा व दुसरा कावेरी तीरी राहाणारा दिसणे भगवद्‌भक्त कविदृष्टीस अशक्य नाही; असो भाषाकोविद भगवद्‌भक्त तार्किकांनी याचा विचार केलाच असेल.

विश्वमित्रकाळ ख्रि. पू. १२ वे किंवा १३ वे शतक; शुनःशेप तेव्हाच झाला. शुनःशेपाच्या नावांवर मोडणाऱ्या सूक्तांचा कर्ता शुनःशेप हे अनुक्रमणिकाकारांचे अज्ञान. वस्तुतः ती शुनःशेपानंतर बऱ्याच वर्षांनी झाली. त्या नंतर बव्हृच शौनक झाले. नंतर पहिला ब्राह्मण काल. नंतर दुसरा ब्राह्मण काल. याच सुमारास पाणिनी (पाणिनीच्या अगोदर किंवा त्यासुमारास कल्पसूत्रांचा काल झालाच पाहिजे). पाणिनी नंतर शाश्वतिकविरोधवादी हिंदुस्थानात आले. आणि त्यांनी तिसरा ब्राह्मणकाल प्रवृत्त केला. देवासुरांचा शाश्वतिक विरोध तर ख्रि. पू. १० व्या शतकाच्या अखेरीस झाला. तेंव्हा या सर्व भगवद्‌भक्ताप्रमाणे ख्रि. पू. १३ व्या शतकापासून १० शतकाच्या अखेरीपर्यंत हे सर्व झाले. बौद्धकाल व उपनिषत्काल यातच. आणि हा सर्व खेळ ह्मणजे काही मंत्र (संहिता), काही ब्राह्मणे कल्पादिवेदांगे, उपनिषद

आणि यातच बौद्धांची गडबड, इतके होण्यास तीनशे किंवा चारशे वर्षे लागली ! !

पाणिनीच्या वेळचे संस्कृत स्वरित. तर मग खुद्द अष्टाध्यायी स्वरित का नाही ? तशीच पाणिनीची शिक्षा स्वरित का नाही ? पाणिनीस कल्प माहित होते. मग कल्प स्वरित पाहिजेत. तसे कोणते आहेत ? पाणिनीस कल्प माहित होते, त्या अर्थी आश्वालायन, सत्याषाढ, बोधायन, कात्यायन इत्यादी पैकी कल्पसूत्रे तरी पाणिनीच्या पूर्वीची असली पाहिजेत. आणि स्वरविरहित तेवढे पाणिनी नंतरचे. तेव्हा वरील कल्पसूत्रे पाणिनी नंतरची असे होते तर हे कसे ? ' अग्निमुखावैदेवः पाणिमुखाः पितर अितिह ब्राह्मणं ( आश्वला. सू. अध्या, १६ स्वं. ७) असे आश्वलायन म्हणतो. आणि ' अग्निमुखाः ' हे वाक्य ऐतरेय ब्राह्मणातले आहे. अशी आणखीही ब्राह्मणवाक्ये आश्वालायन सूत्रात आहेत. आश्वलायन सूत्र पाणीनीच्या पूर्वीचे असले पाहिजे. आणि त्यापूर्वीचे ऐतरेय ब्राह्मण असे वरील वाक्या-वरून निश्चित होते. तेव्हा ऐतरेय ब्राह्मण पाणिनीच्या पुष्कळ पूर्वीचे असले पाहिजेत. परंतु आमचे भगवद्‌भक्त म्हणतात ते स्वरविरहित म्हणून पाणिनी नंतरचे ! ! देवासुरांचा शाश्वतिक विरोध प्रतिपादक वाक्ये तैत्तिरीय ब्राह्मणात तर पुष्कळच सापडतील. तैत्तिरीय उपनिषदातही आहेत. तर मग तैत्तिरीय संहिता, ब्राह्मण व उपनिषद् ही पाणिनी नंतरची की काय ? तिन्ही स्वरित आहेत. तेव्हा भगवद्‌भक्तांच्या एका सिद्धांता-प्रमाणे तर ती निश्चये पाणिनीच्या पूर्वीची ! याची व्यवस्था काय ?

तित्तिरीहो, बेटे धन्य तुम्ही. तुमचे मूलस्थान तार्तरी हा भगवद्‌भक्त-प्रसाद तुम्हास लाधला; मोगलचीनसखित्व आणि साधर्म्याने पेरुमेक्सि-कोवासिसखित्वही तुम्हास मिळाले ! हतभाग्य अक्र्यादिकांच्या कपाळी असे काही स्पष्टपणे नाही. भटकणाऱ्या तित्तिरीस साग्निकयाग कोठून ? भगवद्‌भक्त महाराज, नरमेध, निरग्निक पशुमेघ या खेरीज तैत्तिरीय संहितेत जे काही आढळेल ती कोणा भगवद्‌भक्तांची कृती ?

ते वेगळे केले म्हणजे तैत्तिरीय संहितेचा अष्टमांश तरी राहील काय ? तो जो अल्पांश तेवढाच काय मूळचा तित्तिरीचा वेद ?

द्वैपायनाचे भारत वेदव्यासाने अन्यथा केले; द्वैपायन हा पांडवाच्या वेळचा;

आणि त्याच्याही पूर्वीचा वाल्मीकि असे भगवद्भक्ताचे मत दिसते. पांडवाचा काल त्यांच्या मते ख्रिस्तापूर्वी सुमारे २५०० वर्षे आणि संहिताकाल तर त्यांच्या मते ख्रि. पू. फार तर १३०० वर्षे. तर मूळचे वाल्मीकिकृत रामचरित सर्व वेदांपेक्षाही प्राचीन काय ? पांडवांच्या वेळची अति प्राचीन संस्कृत भाषा हल्ली लुप्तच झाली. या भगवद्भक्त मतावरूनही हल्ली प्रत्यक्ष असलेले वेदादि सफल वाङमय हे पांडवाहून व त्यांच्या पूर्वीच्या रामचरिताहून अर्वाचीन ठरले ! पांडवाच्या वेळचे संस्कृत जर आज अनुमेयच आहे तर वाल्मीकिचे रामचरित व द्वैपायनाचे भारत अशा तऱ्हेचे काही पांडव काली होते असे तरी कशावरून ? राम पांडवांचे एवढे तरी नशीब म्हणावयाचे कीं रामपांडव ह्मणून कोणी होते एवढे तरी भगवद्भक्त म्हणतात ! पांडव, राम हे असले तरी ते जंगली होते की त्यांच्या वेळी आचार विचार काही होते ? त्यांच्या वेळीं श्रुत्यादि काही नव्हते तर त्यांचा धर्म कोणता ? त्यांचे देव कोण ? त्यांच्या वेळी ज्योतिषादि काही शास्त्रे होती की नव्हती ?

भगवद्भक्त ‘ हे काही सामान्य धेंड नव्हे. ’ ते जबरे वाचक, मोठे विद्वान व महाशोधक दिसतात. त्यांचा उद्योग पाहून आश्चर्य वाटते व त्या विषयी एक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. हे लिहिण्यास मला खरोखर मोठा आनंद वाटतो. असो. हे सर्व खरे खरे, तरी त्यांचे लेख वाचताना ते एकंदरीत काय ह्मणतात हे समजण्याची आमच्या सारख्या जडधींस मारामार पडते; दुर्बोधता, दूरान्वय, वाक्यरचनानियमभंग इत्यादी दोष येथे दाखविण्याचे कारण नाही. वाचकास मासला पाहिजे असल्यास मऱ्हाठे-शाहीतले ( मराठेशाही हेएक भगवद्भक्तांचे विविधज्ञानविस्तारकाराव तारित हे सहज दिसते. ) ३६ ओळींचे एक वाक्य ( वि. ज्ञा, वि. पू. । ६ अं. १२ पृ. २६९ ) व २५ ओळींचे एक वाक्य ( वि. ज्ञा. वि. १६ अं ११ पृ. २४६ ) पाहावे. भगवद्भक्तांचे काही उद्‌गार वाचताना ते काढणारा मिशनरी आहे की काय असा भास होतो ! परंतु भक्तांच्याच इतर विचारांवरून व प्रेषित प्रलापास वि. ज्ञा. विस्तारात जागा मिळणार नाही अशी खात्री असल्यामुळे तो भास झाकावा लागतो. तरी मिशनरीशिष्यत्व स्वीकारून, विष्णु शिव तुलना इत्यादी काही स्थली जो निर्लज्यपणा प्रकट

केला आहे, तो पाहून शिष्यांनी गुरू जिंकले एवढेच वाटून राहात नाही, तर पुराणास शिमगा म्हणणाऱ्या भगवद्भक्तांनी विविधज्ञानमिशाने शिमगा गाजविला आहे असा भास दृढ होऊ पाहातो !

भगवद्भक्तास विनंती आहे की आजपर्यंतच्या विचारांत त्यांची जी निरनिराळी अनुमाने किंवा सिद्धान्त झाले आहेत ते त्यांनी एकदा सगळे एकत्र लिहावे, तसे करण्यास शे-पन्नासापेक्षा जास्त ओळी खर्च करण्यास नकोत; परंतु तेवढ्यांनी माझ्यासारख्या मूढ वाचकावर फार उपकार होतील. चंद्रिकाकार महाराज, मी येथे खेडेगावात पडलो. माधुकरी मागण्याचे सामर्थ्य नाही व या खेडेगावात मिळण्याचाही संभव नाही. इतकेच नाही तर महाभाग भगवद्भक्तांनी आयती आणून वाढलेली माधुकरी खाण्याचेही सामर्थ्य नाही. खेडेगावात कोरड्यास तरी कोठून मिळते ! घशाखालीच ती उतरेना ! जेमतेम खाऊ लागलो तो ही शुद्ध माधुकरीच आहे की, माधुकरी मागून आणून तीत पदरचे अनेक पदार्थ मिसळून पुन्हा शिजवून तिची घाण केली आहे, तसेच म्लेंच्छयवनविचारछायेने ती विटाळलेली आहे की काय, असे वाटू लागले. बळेच काही खाल्ली तो ओकून पडली. थोडीचा तरी पोटात पाक होईल की नाही, झाला तर तो पुष्टिप्रद होईल की विकारमात्र उत्पन्न करील हे काही समजत नाही ! तर माधुकरीदात्या भगुबुवांनी, किंवा इतके लांब तरी कशाला, साध्या उच्चाराच्या भगोबांनी माधुकरी खाणारांची तृप्ती करावी. भगोबा म्हटले म्हणून मला गांवढळ व दांडगा म्हणाल तर तसे नाही हो ! खऱ्या प्रेमभावाने असे म्हटले. मी राहातो या गावात भगवान् देवाचे महात्म्य आहे. येथले साधे भोळे ' महारथी 'चे वंशज, वेदांपेक्षाही प्राचीन अशा संस्कृत भाषेशी संबंध ठेवणारी मराठी भाषा बोलणारे, हे भगवान हा शब्द भगु, भगोबा, किंवा भग्या असा म्हणतात. आणि भगवद्भक्तांच्या भाषाशास्त्राप्रमाणे पाहिले तर तोच उच्चार खरा. भगवान् हे ' संस्कृतज्ञ ब्राह्मणाच्या लठ्ठ कल्पनाशक्तीचे अपत्य '! भक्त हा बुवा याचा अपभ्रंश म्हणा किंवा तो पर्याय म्हणा. भगवद्भक्त मजवर कोपणार नाहीत असा दुसऱ्याही कारणाने मला भरंवसा आहे. कारण मी आहे पशुपति अर्थात् भगवानाशी सवर्ग्य. कसा तो पाहाः पशुपति, भगवान् गोपाल, अजापाल, मेषपाल, हे सगळे

पर्याय शब्द.' शिवस्य हृदयं विष्णुः ' असेही पाहिजे तर म्हणा. अथवा पशुपति व भगवद्भक्त ही एकाच प्रकृतीची अपभ्रष्टरूपे म्हणता येतील. कशी तर पहा: पशुपति– पाशुवत– फाशुक्त– भाशुवत– भागवत– भगवद्भक्त का आहे की नाही खाशी फायलालजी '! इतक्याही सिद्धतेउपर ते रागावून म्हणतील की, हा माधुकरी खाणारा आहे मूर्ख, द्वादशी सोडणारा भोजनभाऊ, आयते खाऊन उलटच्या शिव्या देणारा. तर मी आहेच खरोखर द्वादशीचा बोलून चालून– मुक्काम द्वादशी, भगवत्सन्निधि.

ता. २४ डिसेंबर । १८८४. मु. वाई.

पशुपति.

श.

(ही टीका बहुधा भाऊशास्त्री लेले यांची असावी.)

## (५) केरळकोकीळ

केरळकीळच्या १८९९ च्या अंकात (पुस्तक १३, पृ. १३६) पुढील प्रमाणे टीका शास्त्रीबोवांबद्दल आहे. शास्त्रीबोवांच्या ' ब्राह्मण म्हणविणा-रांस सवाल ' ह्या व्याख्यानाला कै. योगी. यांनी सवालास प्रतिसवाल म्हणून उत्तर दिले आहे. त्यांवर संपादक म्हणतात. ' प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनी केलेल्या ब्राह्मण म्हणविणारास सवाल ह्या व्याख्यानाचे विचार व त्यावर उत्तरे देणारांची झालेली धांदल वर्तमानपत्रावरून सर्वश्रुत झालीच आहे. प्रोफेसर मजकुरांचे माथे अघटित विचारांनी कसे भ्रमत असते याची साक्ष आमच्या कोकिळातल्या ' मऱ्हाठ्यांविषयी चार उद्गार' ह्या पुस्तकपरीक्षेवरून व त्यांच्या इतरत्र चमकत असलेल्या पुस्तकमालिके-वरून व विचारमालिकेवरून बहुतेक महाराष्ट्रीयांस पटलेलीच आहे. त्याच मासल्याचे हे सवाल होत– त्यास उत्तर म्हणून बाळकृष्ण गणेश योगी यांनी तयार केले आहे...कित्ता घेण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रतिपक्ष म्हटला की त्यांची टर करायची, विनोद करावयाचा, भेदक शब्द वापरायचे त्याचा ह्या टीकेत मागमूस नाही. ' बायकांची मुंज व चातुर्वर्ण्य यांवर टीका.

त्याच सुमारास ग्रंथमालेत (त्यावेळी शास्त्रीबोवांचे लेख ' संस्कृत भाषेची विचिकित्सा ', ' प्राकृत भाषेची विचिकित्सा ') येणाऱ्या लेखांबद्दल कै. कृष्णाजी नारायण आठल्ये, संपादक केरळकोकीळ म्हणतात की ' अनेक

पदवीधर व विद्वान लोक मिळून कोल्हापूर मुक्कामी एक ग्रंथमाला नावाचे प्रचंड मासिकपुस्तक काढीत असल्याचे प्रसिद्धच आहे. या मालेतील लेखांची भाषा रद्दड व पिचपिचित असल्याचे गवगवाही कोणास माहित नाही असे नाही. हा मारून मुटकून प्रचारांत येणाऱ्या विद्वान व जगन्मान्य भाषेचा मासला.' (पुस्तक १५, पृ. २८२, १९०१)

केरळकोकिळाच्या एकदर उथळ विचारसरणीने जरी काव्यविषयात त्याचा नंबर बराच वर लागला तरी त्याला फारसा मान नसे हे त्या काळच्या अनेक लोकांच्या मतावरून दिसून येते. नाहीतर ग्रंथमालेसंबंधी असे उद्‌गार त्यांत निघते ना.

## (६) काळ

काळासंबंधाने त्वेषाचे उद्‌गार शास्त्रीबोवांनी सुबोधपत्रिकेत दोन-चार ठिकाणी काढले आहेत. (उदाहरणार्थ, १४–११–१९०१) काळकर्त्यांनी देखील आपल्या खुबीदार छद्मी लेखणीने शास्त्रीबोवांवर शस्त्र परजले आहे.

(१) काळातील निबंध, भाग ५ यातला यात 'एका गुणी माणसाची बदछान' हा औपरोधिक लेख म्हणजे शास्त्रीबोवांचे एक व्यंगचित्र आहे. ते असे. 'इतक्यात एक गबाळ्यासारखे धोतर नेसलेला, अंगात बाराबंदी घातलेला व डोकीवर एक मोगली टोपी ठेविलेला गृहस्थ दिसल्यावरून हे कोण असावे म्हणून प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा त्याच्याकडे पाहून त्रिंबकराव अगदी गोंधळून गेल्यासारखे दिसू लागले. त्यांच्या मनातील गोंधळाचे स्वरूप पुढील प्रमाणे होते. हा कोण असावा ? याला काय म्हणू? हा मोगल म्हणू का ब्राह्मण म्हणू ? एकीकडे धोतर नेसला आहे, पण दुसरीकडे मोंगली टोपी आहे. याच्या हातात कसलीशी पोथी दिसते आहे, पण त्या फाटक्या खिशातून बिस्किटाचा अर्धा खाल्लेला तुकडा डोकावतो आहे. गळ्यात जानवे दिसते, पण रस्त्यातल्या महार चांभारांना धक्के मारून चालत आहे. असा हा विलक्षण प्राणी कोण असावा ? अशा रीतीने पुष्कळ वेळ गोंधळून अखेरीस त्रिंबकरावांनी सांगितल्यावर 'अहो हे एक शास्त्री आहेत' असे एकजण मोठ्याने ओरडले... 'हे क्षत्रिय शाखेतील ब्राह्मण. यांचे नाव मल्हारीभट्टी मोहिते. राणोजीशास्त्री कदम यांच्या मुलीची वेदोक्त मुंज आज व्हावयाची आहे, तिकडे बहुत करून चालले

असावेत.' (काळ, अग्रलेख, १०–१०–११०२) शास्त्रीबोवांनी एका मराठ्याच्या मुलीची मुंज लावली होती त्या प्रसंगास अनुलक्षून हे उद्‌गार काढलेले आहेत.

(२) त्याचप्रमाणे 'सगळेच नरसू' हे दुसरे एक आचार– भ्रष्ट व स्वार्थी निर्बुद्ध सुधारकाचे व्यंगचित्र देखील शास्त्रीबोवांनाच उद्देशून लिहिले आहे असे मला प्रो. नरहर रघुनाथ फाटक यांनी सांगितले. ह्यातला टोला 'न मांसभक्षणे दोषः' ह्या शास्त्रीबोवांच्या धोरणाला हाणला आहे. त्याचप्रमाणे ह्यात शास्त्रीबोवांनी १९०२ साली सामाजिक परिषद्' व बोलघेवडे सुधारक ह्यांची जी कानउघाडणी केली आहे तिच्यावर हल्ला केला आहे. त्या वेळी सामाजिक परिषद् अगदी गडबडली होती. पण त्यातल्या त्यात समारोप असा केला आहे की 'अखेरीस एक वृद्ध गृहस्थ उठून म्हणाले ' थोड्याबहुत प्रमाणाने आपण सगळेच नरसू आहोत. काही अंशी आपली अशी स्थिती आहे खरी व म्हणून हिंदुसमाजातील बाकीची स्थिती सुधारण्याच्या कामी आपण आपली स्थिती सुधारली पाहिजे.' हे भाषण ऐकून सर्वांना त्यातील सत्यता भासून जिकडे तिकडे शांतता झाली व सभेचे काम सुरळीत चालू झाले. (काळातील निबंध, भाग ६ पृ. १६४)

## (७) निबंधमाला

निबंधमालेत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी शास्त्रीबोवांसंबंधाने तुच्छतापूर्वक उल्लेख 'सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट' वर जी टीका केली आहे त्यातील तळटीपेत 'भट्ट प्रोफेसर' म्हणून त्यांचा उल्लेख करून मागासलेल्या जातींची बाजू घेऊन ब्राह्मणांवर ताशेरा झाडणारे असूनदेखील त्यांनी 'दीनबंधू'स ऐकवलेले सवाल मनन करण्याजोगे आहेत असे विष्णुशास्त्री म्हणतात. त्यांच्याच भाषेत सांगावयाचे झाल्यास 'हे गृहस्थ ब्राह्मणांचे पक्षपाती कितपत आहेत हे सर्वांस माहीत आहेच. असे असतांही त्यांनी केवळ समान दृष्टीने सदरील विषयावर जे विचार प्रगट केले, ते विशेषतः सत्यशोधक मंडळीने ऐकण्यासारखे होते (निबंधमाला पृ. ४६८)

## (८) इंदुप्रकाश

इंदुप्रकाश पत्राच्या फायली फक्त पाच वर्षांच्या (१८८३, १८८४,

१८८५, १८८६, व १८९५) तेवढ्याच शिल्लक आहेत. त्यावरून काय ती शास्त्रीबुवांच्या लेखनाची परीक्षा करावी लागते, ह्यात शास्त्रीबोवांचे तीन लेख व पुढीलप्रमाणे उल्लेख आहेत ते असे:

कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर व शास्त्रीबोवा ह्यांची खडाजंगी झालेली फार प्रसिद्ध आहे. विषय जातिवाद होता. गुंजीकरांनी १८८४ मध्ये 'सरस्वती-मंडळ' नांवाचे पुस्तक लिहून महाराष्ट्रातील ब्राह्मणांविषयी माहिती दिली त्या त्यांचा सारस्वत जातीबद्दल दुराभिमान दिसून येत होता. त्यावर प्रथम इंदुप्रकाशात (व नेटिव ओपिनियनमध्येदेखील) असे म्हटले आहे की 'सरस्वती मंडळात सामान्यत्वे मनुष्य स्वभावास अनुसरून जो एक प्रकार आम्हांस वाटत होता तो बराच दृष्टीस पडतो. स्वजातीवरचे अपवाद दूर करणे आणि अन्य जातीवरचे अपवाद युक्तीने प्रगट करणे हे त्यात स्पष्ट-पणे दिसून येते. अशा लेखांनी उगीच एकमेकाविषयी मत्सर मात्र व्हावयाचा.' त्यानंतर श्री. हरी लक्ष्मण देशमुख नावाच्या गृहस्थांचेसुद्धा असेच पत्र आले असून त्या पुस्तकात अर्थ नाही असे त्यांनी म्हटले आहे. (ह्या शिवाय 'सरस्वती मंडळास उत्तर' म्हणून एक दीड आणा किंमतीचे चोपडे पण त्या वेळी प्रसिद्ध झाले होते.)

(३–११–१८८४)

त्यानंतर 'जशास तसे' हे शास्त्रीबोवाचे गुंजीकरांना दिलेले उत्तर प्रसिद्ध झाले. त्यात चित्पावनांची कड घेऊन सारस्वतांवरच्या विधानास त्यांनी खोडून काढिले होते. ह्या दोन पुस्तकांचा उल्लेख इंदुप्रकाशात असा आला आहे की 'सरस्वतीमण्डळ, जशास तसे, ह्या पुस्तकावरून असे दिसते की यांच्या योगाने रिकामा वाद मात्र उत्पन्न होतो, वैमनस्ये वाढतात आणि परस्परांच्या उणेपणाने पांढरे कागद म्हणून अशा प्रकारच्या ग्रंथरचनेच्या भरीस आमच्या समंजस मंडळीने पडू नये हे उत्तम.'

(३–११–१८८४)

त्यानंतर एक वर्षाने लॉर्ड रिपन यांनी आपल्या भाषणात, 'सरस्वती-मंडळ' 'जशास तसे', 'भ्रमनिरास' व दीनबंधूतले जोतिबा फुल्यांचे लेख ह्या सर्वांचा उल्लेख करून हिंदुलोकामध्ये व त्यातल्या त्यात सुशिक्षितांमध्ये पण कशा फळ्या पडल्या आहेत याचे वर्णन केले.

त्यानंतर शास्त्रीबुवांनी फिरून कधी ह्या वादात मन घातले नाही. गुंजीकरांना निरुत्तर करण्याचा एवढाच त्यांचा हेतू होता. कारण प्रारंभा-पासून अखेरपर्यंत त्यांनी जातिभेदावर कोरडेच ओढले आहेत. येथे एक गोष्ट मात्र नमूद करून ठेवावीशी वाटते की, ' जुना ओळखी ' नावाच्या इसमाने ' विविधज्ञानविस्तारांत ' शास्त्रीबोवांवर जी टीका केली आहे. तिच्यांतले मुद्दे विद्वतेला साजेसे नसून त्यात ' सरस्वती मंडळाचे ' पडसाद स्पष्ट उमटले आहेत. शास्त्रीबोवांची उत्तरे मात्र केवळ विषय प्रतिपादनाला धरून आहेत. जातीय उल्लेखाकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे.

शास्त्रीबोवांचे इंदुप्रकाशातले लेख:–
उमेदवारांची साडेसाती (उपोद्घात) १८-२-१८९५
शिवाजी स्मारक २१-७-१८९५
खाफीखान आणि शिवाजी १२-८-१८९५

इंदुप्रकाशाच्या जुन्या फायली अधिक मिळाल्या तर शास्त्रीबोवांच्या प्रासंगिक लिखाणात महत्त्वाची भर पडलेली दिसती. निदान त्यांच्या विषयींच्या साधक बाधक टीकाचे तरी स्वरूप अधिक स्पष्ट झाले असते यात शंका नाही.

## (८) सुबोधपत्रिका

सुबोध पत्रिकेचे १९०१ पर्यंतचे अंक नष्ट झाले त्यामुळे १९०१ पासून १९०८ पर्यतचे शास्त्रीबोवांचे संशोधनात्मक मराठी लेख ज्याप्रमाणे बहुतेक विस्तारांत आले आहेत त्याप्रमाणे सर्वसाधारण सामाजिक प्रश्न ' पत्रिकेत' हाताळलेले आहेत. ते येथे दिले आहेत .त्यांनी जातिभेद, सामाजिक खुळचट चाली; इत्यादीवर झणझणीत शब्दांत लिहिले आहे.

(१) विधवा विवाह केल्याने भ्रष्ट होत नाही. भक्ष्य मांसाहार केल्याने ब्राह्मण नष्ट होत नाही. कोणत्याही वर्णांतल्याशीं दळणवळण केल्याने भक्ती करणारा भ्रष्ट होत नाही. (२२–९–१९०१)

(२) भिक्षुकांचे वेदोक्त व पुराणोक्त (१०–११–१९०१)

(३) अमेरिकेतले राजाध्यक्ष व शिद्दी (१०–११–१९०१)

(४) कोणत्या कर्मकांडाशी ब्राह्मणांचा उभा दावा (१७–११–१९०१)

(५) क्षत्रियांची मूळची पायरी (२४–११–१९०१)
(२२–१२–१९०१)

(६) राजसत्ता आणि धर्म (१–१२–१९०१)

(७) रँगलर परांजपे ( १५–१२–१९०१ ) यावरून येथील ब्राह्मणाचे शास्त्रीबोवांस उत्तेजनपर पत्र व 'पत्रिकेच्या' संपादकाचे यावरून त्याच्या विरुद्ध लिहिणाऱ्या इंदुप्रकाशास उत्तर, ( १९–११–१९०१ व २२–१२–१९०१; १९–१–१९०२ )

(८) राष्ट्रीय सामाजिक परिषद (१२–१–१९०१)

(९) स्त्री व पुरुष (१९–१–१९०१)

(१०) उमरावतीचे मुधोळकर आणि निकृष्ट जाती
(१६–१–१९०२)

(११) एक विधवागृह हवे आहे. (२३–४–१९०२)

(१२) जास्त खुलासा करण्याची मेहरबानी कोणी करील काय ?
(६–४–१९०२)

(१३) हा मान की अपमान (यांत कै. रानड्यांची तोंडी स्तुती पण रँगलर परांजप्यासारख्यांना किंवा कर्व्यांना पंक्तीलाभही देण्याचे मनोधैर्य नसलेल्या बोलघेवड्या सुधारकांची कानउघडणी केली आहे.)
(२–३–१९०२)

(१४) न्यायमूर्ती क्यांडी व देशी भाषा (१६–३–१९०२)

(१५) सहा शत्रु व मित्र (१३–४–१९०२)

(१६) यज्ञ हवा की नको (२०–४–१९०२)

(१७) साताऱ्यांतील ब्राह्मण म्हणविणारी माणसे
(४–५–१९०२)

(१८) प्रार्थनासमाज आणि जातिभेद (११–५–१९०२)

(१९) एक आनंदाची गोष्ट (८–६–१९०२)

(२०) प्रो. जिनसीवाले व प्रार्थनासमाज (२२–६–१९०२)

(२१) न्यायमूर्ती चंदावरकर (२२–६–१९०२)

(२२) इतिहासाची साधने कोठे राहिलेली बरी ? विलायतेत की आमच्या देशात ? हे त्याच मथळ्याच्या केसरीतील लेखास उत्तर आहे. )

(२३) वामनराव केळकरांचे प्रायश्चित्त (२४–८–१९०२) या लेखावर 'पत्रिके'च्या ३१–८–१९०२ च्या लेखात दोन टीका आल्या आहेत. त्यांचा आशय असा :– 'शास्त्रीबोवांनी आपल्या लेखात 'चित्तपावन', 'भट', 'भिक्षुक' वगैरे व्यक्तीला किंवा व्यक्तिसमुदायाला लागतील असे शब्द न वापरता आपल्या विद्वत्तेला शोभेल अशा भारदस्त भाषेच्याद्वारे व शास्त्रातील निरनिराळ्या साधुसंतांच्या वचनांच्या आधारे जर ते आपल्या आवडत्या विषयांचा ऊहापोह करतील. तर त्यांच्या विशाल ज्ञानापासून लोकांस बराच फायदा होईल.'

(२४) ब्राह्मणी धर्म उर्फ चित्पावनी पद्धत (१३–७–१९०२)

(२५) आर्यसमाज आणि जातिभेद (१८–५–१९०२)

(२६) व्यभिचारी व अव्यभिचारी भक्ती (आर्य महिला समाजातर्फे झालेले पहिले पुराण, ४–९–१९०४)

(२७) अस्सल श्रुती, स्मृती व व्रते (२ रे पुराण. २५–९–१९०४ २–१०–१९०४)

या पुराणात स्त्रियांनी जातिभेदातीत दृष्टी ठेवावी. खुळी व्रते सोडावी, कोणाला तुच्छ लेखू नये म्हणून सांगितले आहे. उदाहरणार्थ, कायस्थांबद्दल 'काकात् क्रौर्यं यमात् लौल्यम्' असल्या श्लोकांच्या आधाराने कायस्थ. म्हणजे (का) कावळ्याप्रमाणे लोभी, (य) यमाप्रमाणे क्रूर, (स्थ) हाडे फोडणारा असा काही मंदमती ब्राह्मण अर्थ करतात त्याप्रमाणे अर्थ घ्यायचा नाही, तर कायस्थ म्हणजे राजाच्या नजिक असणारा.

**राजारामशास्त्री भागवतांविषयी 'सुबोधपत्रिका'–**

(१) भागवताच्या गीतेवरील प्रभुत्वाची प्रशंसा. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आद्यगीता ६० ते ८५ श्लोकी होती. भागवतांना ती मराठीत प्रसिद्ध करण्याबद्दल विनंती. कारण शास्त्रीबोवांचा उद्योग किती किती दांडगा आहे याची कल्पना त्यांच्या अनेक ग्रंथांवरून व लेखावरून होण्यासारखी आहे. (१७–७–१९०४)

(२) विधवाविवाहाबद्दल झालेले व्याख्यान भांडारकरांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात झाले व ज्ञानप्रकाशात समग्र छापून आले त्याचा उल्लेख करून 'पत्रिका' म्हणते 'राजारामशास्त्र्यांस आडपडदा माहीत नाही. आपल्या

मतांस अनुसरून भाषण करावयाचे. मग ते लोकांस रुचो वा न रुचो.'

(३) दीनबंधूमध्ये ' रा. रा. भां 'चे प्रार्थनासमाजाचे एक सभासद श्री. सय्यद यास अनावृत्त पत्र. सय्यद प्रथमपत्नी वारल्यानंतर १५ दिवसांनी दुसरे लग्न जुळवीत आहेत असे कळल्यानंतर लिहिलेले. व श्री. सय्यदांच्या शीघ्र विवाहेच्छू वृत्तीवर ताशेरे झाडणारे. त्याचा कडक निषेध श्री. द्वा. गो. वैद्य, वा. स. सोहनी इत्यादींच्या सह्यांनीशी ' एक विलक्षण थट्टा ' या नावाने. (३–६–१९०६)

या पत्रानंतर शास्त्रीबोवा व ' पत्रिका ' यांच्यात तेढ पडलेली दिसते. कारण शेवटच्या दोन वर्षांत शास्त्रीबोवांचे लेख ' पत्रिके 'त न येता ' दीन-बंधू 'त येऊ लागले ते शेवटपर्यंत. पण अखेर शास्त्रीबोवांचे भाकीत खरे झाले व सय्यदांच्या द्वितीय विवाहाच्या बातमीचा इन्कार करणारांची बाजू अर्थातच कमजोर ठरली.

(४) जानेवारी १९०८ मध्ये शास्त्रीबोवांबद्दल ' पत्रिकेत ' मृत्युलेख आला होता. तो फार आदरपूर्वक व दुःखभराने लिहिला होता. जणू काही शेवटचा प्रकार त्यांच्या दीर्घ प्रेम-स्मृतीत पार लोपून गेला.

(५) या नंतरच्या शास्त्रीबोवांच्या मतांचे सार ' पत्रिके 'त आले आहे. ते फार मोलाचे आहे. त्या लेखांचे नाव, ' प्रो. राजारामशास्त्री भागवत यांच्या विचारांची आठवण ' (२–२–१९०८). मृत्यूमुळे सर्व भेद मिटल्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

## (१०) नेटिव ओपिनियन

नेटिव ओपिनियन मध्ये शास्त्रीबोवांवर साधक बाधक टीका बरीच आली आहे. नेटिव ओपिनियनचे तुटक फुटक अंक जे एकंदरीत मिळाले, त्यात शास्त्रीबोवांबद्दल उल्लेख पुढीलप्रमाणे आहेत. हे पत्र चिपळुणकरी बाण्याचे होते. टिळकांस पाठिंबा देणारे होते.

(१) ' जशास तसे ' किंवा ' सरस्वती मंडळावर खरमरीत टीका ' या शास्त्रीबोवांच्या पुस्तकाची जाहिरात. पुस्तके नेटिव ओपिनियनच्या ऑफिस-मध्ये ठेविली होती. (२५–१–१८८५)

(२) शास्त्रीबोवांच्या बॉम्बे हायस्कूलबद्दलची माहिती. 'दादीशेट अग्यारी लेनमध्ये पहिले चार वर्ग सुरू केले आहेत. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचा कित्ता डोळयांसमोर ठेवून नेकीचे शिक्षक निवडले आहेत', इत्यादी १–३–१८८५)

(३) मराठी ग्रंथकारास सूचना– गुंजीकर व शास्त्रीबोवांस या लेखात इषारा. विशेषतः जातिवैमनस्याच्या वादाचा पाया घालणाऱ्या गुंजीकरावर त्वेषाची टीका (२४–५–१८८५).

(४) मराठयांविषयी चार उद्गार– ह्यातील पहिल्या भागावर एका टीकाकाराची कडक टीका. या टीकेत गुण सोडून केवळ दोष टिपणारा लेखक म्हणून 'केस सोडून त्यातील उवा टिपणाऱ्या दुष्ट माकडाची' उपमा शास्त्रीबोवांस दिली आहे. टीकाकार पेशव्यांचा कैवारी असून शास्त्रीबोवांनी बाळाजी विश्वनाथाची केलेली संभावना त्यास झोंबलेली आहे. पेशवे मंडळीच्या 'गुणावगुणाविषयी इतिहासदृष्टया विचार करणे' ही शास्त्रीबोवांची भूमिका त्याला पटत नाही. शास्त्रीबोवांनी केलेली माधवराव पेशव्यांची स्तुती मात्र त्या टीकाकाराला दिसली नाही.

त्याचप्रमाणे धनाजी पितृभक्त राजारामाची पत्नी ताराबाई हिला सोडून शाहूला मिळाला म्हणून शास्त्रीबोवांनी त्याला स्वामिद्रोही म्हटले आहे. त्यावर पण टीकाकार घसरला आहे. (३–७–१८८७; ४–९–१८८७).

ही टीका झणझणीत आहे. तिच्यात शास्त्रीबोवांना 'सूर्यावर थुंकणारा' म्हटले आहे. जरी या टीकेत टीकाकाराची चित्पावनांबद्दलची अभिमानाची भावना ठळक दिसून येत असली तरी तिच्यात काही ठिकाणी मार्मिकपणाही आहे. शास्त्रीबोवांना चित्पावनांचे वैरी ठरविले आहे, तो शेरा मात्र अस्थानी आहे. कारण शास्त्रीबोवांचे हे पुस्तक जातिभेद नष्ट व्हावा म्हणून कळवळयाने लिहिले आहे. त्यात 'जशास तसे' ही वृत्ती औषधालासुद्धा सापडत नाही.

(५) शास्त्रीबोवांचे 'संस्कृत भाषा नको' हा छोटा निबंध प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर फार मोठे वादळ झाले. मराठी भाषा विद्यापीठात असावी ह्या कै.वामन अबाजी मोडक व न्यायमूर्ती रानडे ह्यांनी चालविलेल्या चळवळीत शास्त्रीबोवांनी प्रतिपक्षाला डिवचून जेवढे जागृत केले, तितके

कुणी केले नसेल.

नेटिव ओपिनियनमध्ये 'संस्कृतभाषेचा कैवारी' व शास्त्रीबोवा यांचा मोठा पत्रव्यवहार आलेला आहे. त्यात कैवारी प्रारंभी म्हणतात, 'त्यांनी (भागवतांनी) हल्ली आपल्या लेखणीला आणि तद्वारा वाचकांना बरेच शिणविले आहे. प्रथम त्यांनी मराठ्यांविषयी चार उद्‌गार म्हणून एक बरेच लांबलचक चऱ्हाट वळले आहे. त्यात इतके असंबद्ध प्रलाप आहेत की जर एखाद्या मनुष्यास लहान अपराधाबद्दल शिक्षा देणे असेल तर त्यास ते पुस्तक तीन-चार वेळा वाचण्यास सांगावे. त्यातील लेखांनी सर्व पुरातन पंडिताच्या विद्वत्तेस सुद्धा या जाडया विद्वानाने हरताळ लाविला! धन्य त्याची– संस्कृत भाषा मराठी भाषेपासून निघाली, कालिदास कवी वाईट, बाणकवीचे कवितेत चावटपणा फार, अशा कल्पनेच्या भराऱ्या मारून त्यांनी तर्कशास्त्राची फटफजिती करून टाकिली. यामुळे प्रतिष्ठित वर्तमानपत्रकारांनी त्यांच्या पुस्तकाबद्दल चकार शब्द काढिला नाही, यामुळे आपला लेख लोकांना आवडला असे जाणून भागवतांनी आपल्या पोतडीतून आणखी एक चोपडे बाहेर काढिले. हे त्यांस इतके चांगले वाटत आहे की, त्यांच्या शेकडो प्रती छापून मोठमोठ्या लोकांकडे पाठविल्या आहेत. असे लेख वाचणे व त्यावर टीका करणे यासारखा कालाचा अपव्यय दुसरा नाही, असे पुस्तकाचे हेडिंग पाहण्याबरोबर होईल; मग समग्र वाचल्यास तर मनाची स्थिती काय होईल हे इथे सांगितले पाहिजे असे नाही. तथापि लोकांच्या मौनाने भागवत यांचा भलताच ग्रह होऊन ते आणखी आपला एखादा स्कंध काढू लागतील म्हणून चार शब्द लिहिले आहेत. बाकी जोतिबा फुले, दीनबंधु, भागवत यांचे समाधान करणाऱ्याने 'प्रयत्ने वाळूचे' ही भर्तृहरीची उक्ति ध्यानात ठेवावी हे बरे.'

यापुढे शास्त्रीबोवाच्या लेखाला 'क्षुद्र' लेख म्हणून कैवाऱ्यांनी 'संस्कृत नको व मराठी हवे' या शास्त्रीबोवांच्या विधानास 'गाईबरोबर वत्साचाही नाश करण्याचा भागवतांचा बेत दिसतो,' असा टोमणा मारला आहे. त्याला उद्देशून शास्त्रीबोवा म्हणतात 'संस्कृत नको पण मराठी पाहिजे' असे म्हटल्याने गाईबरोबर वत्साचा नाश करण्याचा आरोप मजवर कसा येतो? गाय म्हातारी झाली, मरावयास टेकली आहे. सृष्टिक्रमाने ती मेलीच

ाहिजे. तिच्यावर ' कैवाऱ्यां'नी खुशाल थडगे किंवा तुळशीवृंदावन बांधावे. ्तसाचे संगोपन करावे हाच असल्या प्रसंगी सर्वांचा धर्म होय. रडून छाती ंपटण्यात काही अर्थ नाही. पण असली अलंकारिक भाषा येथे कशास हवी? ाराठी कांही वासरू नव्हे. तर चांगली तरणी ताठी गाय आहे असे मी ्रमजतो. मराठीचे स्वरूप शुद्ध राहाणे म्हणजे काय याचा ' कैवाऱ्यां'नी ृपा करून अधिक खुलासा करावा. मला वाटते की भूमंडळावरील कोणत्याही ोकांचे स्वरूप शुद्ध नाही, तसे कोणत्याही भाषेचे स्वरूप शुद्ध नाही.

यास उत्तर म्हणून कैवाऱ्यांनी फिरून दोन लेख लिहिले. त्यात मराठीला विद्यापीठात स्थान हवे तर द्यावे पण संस्कृतास ढकलून देऊ नये असे विचार प्रगट करून शेवटी म्हटले आहे, ' भागवत म्हणतात संस्कृताच्या कैवाऱ्यांनी कांही केले नाही. संस्कृताचे कैवारी काय करतात आणि भागवत तरी काय करतात. करणारे वेगळेच आहेत. तेथे राजा बोले आणि दळ हाले...... याप्रमाणे चालले आहे. त्यांस जागे करण्यास भागवतांसारखे उद्योगी पाहिजेत हे खरे आहे, पण तो उद्योग त्यांनी मार्गाने करावा, आडमार्गाने करूं नये अशी विनंती करून भागवतांची रजा घेतो व पुनः असे तुषकंडन करण्यास कैवारी तयार नाही असेही कळवितो.

यावर ' कैवारी व भागवत ' म्हणून शास्त्रीबोवांनी अखेरचा लेख तयार केला त्यात ते म्हणतात, आज संस्कृताप्रमाणे आमच्या देशी भाषेस विद्यापीठात स्थळ मिळाल्यास यांच्यासारख्या कैवाऱ्यांस तरी अनिष्ट नाही, हे उघडपणे जाहीर व्हावे, म्हणूनच ' संस्कृत व देशी भाषा ' हे पुस्तक छापविले व इतर कैवाऱ्यांप्रमाणे या कैवाऱ्यांकडेही पाठविण्यात आले. पुस्तक छापवून वाटण्याचे हे एक मुख्य प्रयोजन कैवाऱ्यांनी कृपा करून लक्ष्यात ठेवावे... संस्कृत ग्रंथकाराच्या उखाळ्या पाखाळ्या काढिल्याशिवाय कैवाऱ्यासारखे जे संस्कृताचे फाजिल अभिमानी आहेत, त्यांचे डोळे उघडले नसते. जर संस्कृताच्या फाजिल अभिमान्यांनी देशी भाषांस निरुपयोगी व नादान ठरवून त्यांच्या आंगी नसता कमीपणा आणण्यास व त्यांच्या तर्फेचा मजकूर केवळ दुराग्रहाने दाबून टाकण्यास यत्न केला नसता तर संस्कृताच्या उखाळ्या पाखाळ्या निघत्या ना....

ब्राह्मण हे ऐतिहासिक प्राणी अजून जिवंत आहेत. त्यांनी जे काही चांगले

किंवा वाईट इतिहासात केले असेल त्याचा ऊहापोह करणे जसे प्रत्येक हिंदूचे तसे प्रत्येक महाराष्ट्राचे कर्तव्य होय. ज्या गोष्टी त्यांनी केल्या त्याबद्दल त्यास दोष दिल्यास अस्सल ब्राह्मणास वाईट वाटण्याचे प्रयोजन नाही. माझा लेख दरोबस्त ब्राह्मणांच्या संबंधाने नव्हता व कधीही नसतो. ज्या एकनाथ स्वामीस देशी भाषेत ग्रंथ केल्यामुळे वाळीत राहावे लागले, ते जातीचे ब्राह्मणच होते, ते काही ब्राह्मणेतर नव्हते. ब्राह्मण जातीचा जो मला विशेष अभिमान आहे, तो एकनाथ स्वामींसारखे केवळ परार्थ पुरुष तीत अनेक जन्मून गेले म्हणून आहे. एकनाथ स्वामीचा छळ केला, हे काम ब्राह्मणांनी आपल्या वंद्य जातीवर धुता धुता न जाणारा कलंक लावणारे केले, असे मी समजतो. तेव्हा मी काही दरोबस्त ब्राह्मण जातीच्या उखाळ्या पाखाळ्या काढल्या नाहीत.'

यानंतर शास्त्रीबोवा म्हणतात की 'आज आमचा पक्ष फारसा वजनदार नाही तरी आमच्या पक्षातील मंडळी दरवर्षी वाढत जात आहे.' शास्त्रीबोवांचे भाकित खरे ठरून मराठी १९०० साली मुंबई विद्यापीठात एम्.ए. करिता प्रविष्ट झाली. त्याचप्रमाणे प्राकृत (वरील टीकाकाराने ज्यांना चुकीने मराठी म्हटले आहे.) ह्या लौकिक संस्कृता पूर्वीच्या लोकभाषा आहेत या शास्त्रीबोवांच्या भाषाशास्त्रीय सिद्धान्ताबद्दलदेखील आता वाद राहिला नाही. (१०-१-१८८९; १३-१-१८८९; १७-२-१८८९; २१-२-१८८९; ३-३-१८८९).

(६) हेमंतोत्सव व्याख्यानमाला. 'वेद व वैदिक धर्म' या शास्त्रीबोवांच्या व्याख्यानाचा सारांश दिला आहे. ह्यात प्रस्तुत निबंध 'जुन्या माहितीने व नवीन कल्पनांनी पूर्ण भरला' आहे असे सांगून, 'एकंदरीत व्याख्यान सुरस व ज्ञानप्रचुर होते' असा समारोप केला आहे. (३-६-१८८९).

(७) शिवछत्रपतीचे चरित्र :– हा अभिप्राय एका उत्कृष्ट अभिप्रायाचा मासला म्हणून पुढे दिला आहे तो असा– हे 'लहानसे द्वादशपत्री सांच्याचे त्र्यायशी पानांचे पुस्तक वे. शा. सं. रा. रा. राजारामशास्त्री भागवत यांनी लिहिले आहे. यांनी काढलेले 'मराठ्यांविषयी चार उद्गार' ज्यांनी वाचले असतील त्यांना हे पुस्तक कसे उतरले आहे हे सांगावयाला नको. शास्त्रीबुवांचा महाराष्ट्राविषयीचा अभिमान योग्य असून नावाजण्यासारखा

आहे. या लहानशा पुस्तकात त्यांनी शिवाजीविषयी व इतर तत्कालीन महाराष्ट्रीयांविषयी वाचकांची यथार्थबुद्धी करून देण्याचा बराच प्रयत्न केला आहे. वस्तुतः पहाता शास्त्रीबुवांनी हा जो ग्रंथ केला आहे, त्यात त्यांचा हेतू शिवाजीचे समग्र चरित्र लोकांस सादर करण्याचा नसून आजपर्यंत जे लेख या महापुरुषाविषयी प्रसिद्ध झाले आहेत, यांच्यावर टीका करून लोकांचे कित्येक अज्ञानमूलक भ्रम दवडण्याचा आहे असे म्हणण्यास हरकत नाही. आणि हा त्यांचा हेतु बराच सिद्ध झाला आहे; हे चरित्र वाचले असता आम्हा महाराष्ट्रीयांचे नाव ज्याने इतिहासात अमर करून ठेविले त्या प्रौढप्रताप शिवछत्रपतींच्या ठायीची न्यायबुद्धी, पापभीरुता निःसीम स्वदेशाभिमान, मातृपितृभक्ती, गुणज्ञता, शौर्य, धैर्य, दीर्घदृष्टी, दया, दाक्षिण्य, सौजन्य, राजकार्यकुशलता, महामनस्कता इत्यादि गुण कसे वसत असत हे समजून त्याच्याविषयी आपल्या ठायीची पूज्यबुद्धी वाढते. त्याचप्रमाणे चरित्रकारांनी आमच्या शिवाजीची शिकंदर, सीझर, नेपोलियन औरंगझेब व लॉर्ड क्लैव यांशी तुलना करून तो त्यांच्याहून किती श्रेष्ठ होता हे स्पष्ट दाखविले आहे.

अफझुलखानादिकाशी शिवाजीने कपटाने आचरण केले म्हणून त्यास किती एक इतिहासकार जो दोष लावितात तो बिलकूल सत्य नव्हे, असे शास्त्रीबोवांनी या पुस्तकात सांगितले आहे. त्याचप्रमाणे त्यास कित्येक इंग्रज इतिहासकार चोर लुटारू म्हणतात, त्याच्या निरसनार्थ दोन शब्द लिहिल्यास बरे झाले असते. तसेच दादोजी कोंडदेव व श्रीसमर्थ रामदास ह्यांचाही ह्या चरित्रामध्ये उल्लेख होणे इष्ट होते.

शास्त्रीबुवांचा यासारख्या आणखी दुसऱ्या ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे लिहिण्याचा उद्देश आहे, असे त्यांच्या मलपृष्ठावरील उल्लेखावरून कळते. हा त्यांचा उद्योग स्तुत्य आहे. आमच्या पूर्वी होऊन गेलेल्या महाराष्ट्र वीरांनी काय काय पराक्रम केले, व त्यांच्या अंगी कोणकोणते गुण होते हे आम्हास समजल्याने आमच्या ठायी त्यांच्याविषयी आदरबुद्धी वृद्धिंगत होऊन आम्ही जे त्यांचे वंशज म्हणवितो त्या आमच्या ठायी त्यांस शोभेल असे काय आहे हे नीट समजेल. शास्त्रीबोवांच्या ह्या छोटेखानी पुस्तकातच गोपीनाथपंत, मुरारबाजी, प्रतापराव, सूर्याजी, बाजी प्रभु, हंसाजी मोहिते,

इत्यादिकांच्या अंगचा स्वदेशाभिमान, निःसीम स्वामिभक्ती, अचाट शौर्य, व अद्वितीय आत्मनिरपेक्षता या गुणांचे वर्णन वाचून त्यांच्याविषयी मनात पूज्यबुद्धी उत्पन्न होते, आणि वाटते की धन्य ते महात्मे.

सारांश हे चरित्र सर्व महाराष्ट्रीयांनी वाचून मनन करण्यासारखे आहे. आता खुद्द चरित्रकारांसच ज्या काही सूचना करावयाच्या आहेत त्यांपैकी पहिली ही की, अशी त्रोटक चरित्रे सोडून जर ते शिवाजीचे एक समग्र चरित्र लिहितील, तर महाराष्ट्रजनांवर त्यांचे बहुत उपकार होतील. दुसरी सूचना करावयाची ती ही की, त्यांनी भाषेच्या लौकिक स्वरूपाकडे विशेष लक्ष देऊन ग्रंथरचना करावी. म्हणजे त्यांच्या भाषेचे सध्याचे रुक्षत्व जाऊन तीत मनोरमत्व विशेष येईल.' (१८–४–१८८९)

(८) 'मराठी विरुद्ध संस्कृत' हा इंग्रजीत लिहिलेला लेख मराठा हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट श्री. म. स. बापट यांचा आहे. तो उघडच शास्त्रीबोवांच्या मतांचे मंडन करण्याकरिता लिहिलेला आहे. (३०–६–१८८९)

(९) शिवछत्रपतींचे चरित्र :– या पुस्तकावर केसरीशी सहमत असणाऱ्या 'एका मित्रा'ची टीका आली आहे. या टीकेचा मुख्य रोख (१) भागवतांच्या साधारण समजुतीच्या विरुद्ध असलेल्या मतांविरूद्ध आहे. (२) भाषा तुटक व बोजड असल्याची तक्रार (पण ती रास्त आहे) आहे. (३) संस्कृताचा द्वेष व अस्सल महाराष्ट्रीबद्दलच्या फाजील अभिमानाबद्दल टोमणा आहे. (४) सर्वांत मुख्य म्हणजे रसद, हेजीब, राजकारण, व अविंध वगैरे शुद्ध फारशी किंवा लुप्तप्राय जुने मराठी शब्द योजल्याबद्दल शास्त्रीबोवांना दोषी ठरविले आहे.

आजकालचा वाचक मात्र 'राजकारण' ह्या शब्दासारखा सुंदर व आमच्या जीवनात आता खोल शिरलेल्या शब्दाला शास्त्रीबोवांनी जुन्या मराठीतून वर काढून रोजच्या भाषेत रुळविल्याबद्दल धन्यवादच देईल. 'हेजीब' हा शब्द हरीभाऊ आपट्यांनी आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यात अमर केला आहे. 'रसद' व 'अविंध' हे शब्दही आता मराठीत चांगलेच रुळले आहेत. (२९–८–१८८९, १–९–१८८९; ५–९–१८८९, ८–९–१८८९).

(१०) वर उल्लेखिलेल्या टीकाकाराने 'भागवतांनी हे पुस्तक मराठा

हायस्कूलातील खालच्या इयत्तांतून इतिहासाऐवजी लाविले आहे ' या बातमीबद्दल खेद व्यक्त केला आहे. त्यावर शास्त्रीबोवा लिहितात. ' हे पुस्तक सर्व इयत्तांतून लावले आहे. रत्नाकरपंत आपा हेही लावावयाचे आहे. व एकनाथाचे चरित्र प्रसिद्ध झाल्यावर तेही लावण्यात येईल. जर ह्या गृहस्थांना व त्यांच्या मित्रांना आपल्या मुलांस शाळेतून काढावयाचे असेल तर त्यांनी जरूर काढावे ' (या उत्तरात मित्राच्या ' हे मुलांची मने दूषित करतात ' या विधानाला उत्तर देताना शास्त्रीबोवा म्हणतात की ' मी मुलांची मने दूषित करीत नाही तर भूषित करतो. '

(१२–९–१८८९)

(११) ' मित्रा 'चे भागवताच्या वरील पत्रास उत्तर. शाळा व पुस्तक सार्वजनिक असल्याने दोष दाखविणे कोणाचेही कर्तव्य आहे, हा त्याचा मुद्दा.

(१२) ' संस्कृत ब्रह्मकर्म ' हा नुकताच प्रसिद्ध झालेला शास्त्रीबोवांचा निबंध हा देशी भाषा का हवी ह्यावर असून वर दिलेल्या त्यांच्या मतास पुरवणी म्हणूनच आहे. त्यावर कडक टीका. देशी भाषा झाल्या की प्रांताप्रांतात एकमेकांचे विचार कळण्यास कठीण जाईल म्हणून संस्कृत भाषा सार्वत्रिक म्हणून हवी असे टीकाकाराने म्हटले आहे. (१०–१०–१८८९)

त्याला उत्तर म्हणून ' संस्कृत भाषा हल्लीच्या काळी गतार्थ व निरुपयोगी आहे ' ह्या लेखात शास्त्रीबोवा म्हणतात. वेगवेगळचा प्रांतांत किंवा विद्वानाविद्वानांत कोणती भाषा सार्वत्रिक म्हणून उपयोगात आणायची हा मुद्दा सध्या गौण आहे. मुख्य गोष्ट म्हणजे त्या त्या प्रांतातल्या विद्वान व अशिक्षित लोकांत परस्पर दळणवळण वाढले पाहिजे. हे सत्कार्य संस्कृत शिकल्याने होणार नाही. तर देशी भाषांवरच सर्वांशी ह्या सत्कार्याचा भार टाकला पाहिजे.

(१३) विविधज्ञानविस्तारातल्या (पुस्तक २१, पृ. २२८) रा. रा. भा. यांच्या उत्तरावर प्रत्युत्तर (१५–१२–१८८९; १९–१२–१८८९; २२–१२–१८८९, २६–१२–१८८९) ही सर्व प्रत्युत्तरे वर उल्लेखिलेल्या टीकाकारांची व ' शिवछत्रपतीच्या चरित्रा ' संबंधीच आहेत.

(१४) हेमंत व्याख्यानमालेतले शास्त्रीबोवांचे ब्राह्मण म्हणविणारांस

सवाल (बायकांची मुंज) व्याख्यान झाल्यावर त्यावर इतके वादळ झाले की त्या वर्षी हेमंत व्याख्यानमालेने वादविवाद बंद केला. त्यामुळे काशीनाथ-शास्त्री लेले यांनी 'सवालांस जबाब' 'भारतीय व्याख्यानमाला' नवीन सुरू करून तिथे दिले. ते समग्र छापले आहे. (२९–१–१८९९).

(१५) 'आमचा इतिहास, इतिहास लेखक व आम्ही' या संपादकीय लेखात, वि. का. राजवाडे, वासुदेव वामन खरे, पारसनीस हे स्वतंत्र व पहिल्या प्रतीचे इतिहासकार, भागवतशास्त्री, भानु, रानडे, भवानराव पावगी इत्यादी दुय्यम प्रतीचे इतिहासकार असून हे सर्व 'चलाख, मेहनती आणि कळकळीचे लोक' आहेत असे म्हणून त्यांचे अभिनंदन केले व आश्रयदाते व निदान 'दहा-वीस तरी साधक बाधक उत्तम टीकाकार मिळावयास हवेत,' ते मिळत नाहीत ही जनतेची इतिहासवाचनाबद्दलची उदासीनता अक्षम्य आहे असे म्हटले आहे. (२९–१–१८९९)

(१६) प्रो. राजाराम रामकृष्ण भागवत कळवितात की, सातारा मुक्कामी आश्वलायन सूत्राच्या अनुरोधाने झालेल्या विवाहाच्या प्रयोगाची ज्यांस माहिती हवी असेल त्यांनी २६ जूनचा 'धुरीण' (बेळगाव, खानापूरचा) पाहावा. पुढचेही धुरीण पाहावे. (२–७–१८९९)

(१७) रानड्यांचे भाषण (डिसेंबर १८९९) प्रथम शेणव्याच्या ठाकुर-द्वारी मुंबईत ज्ञानेश्वरीवर झाले. ते मराठा हायस्कूलच्या चालकांच्या मार्फत करविण्यात आले. (रानड्यांचा मृत्यूलेख, २०–१–१९०१)

## (११) दीनबंधू

हे जोतिबा फुल्यांनी सुरू केलेले सत्यशोधक समाजाचे मुखपत्र. फुल्यांच्या मृत्यूनंतर ते कै. लोखंडे यांनी मुंबईस चालविलेले. नंतर ते कोल्हापुरास जाऊन अजिबात बंद पडले. या साप्ताहिकात शास्त्रीबुवांचे पुष्कळ लेख आले आहेत. त्यातल्या त्यात 'ऐतिहासिक गंजिफा' म्हणून त्यांची लेख-माला येत असे, ती फार प्रसिद्ध व मनोरंजक होती. दीनबंधूचे लेख काळाच्या भक्ष्यस्थानी पडले आहेत. फक्त काही गंजिफा डॉ. नवले यांनी नव्या दीन-बंधूत पुनर्मुद्रित केल्या. त्यांची यादी खाली दिल्याप्रमाणे आहे.

(१) क्षत्रियांचे अस्तित्व (गंजिफ नं. १; ९-६-१९०४).

(२) चित्पावन व कऱ्हाडे (गंजिफ नं. २; ५-७-१९०५).
(३) हिंदू व हिंदूधर्म (गंजिफ ३; १९०५; २२-६-१९०६).
(४) ब्राह्मण म्हणविणाराचा पिंड (गंजिफ नं. ४. २७-६-१९०५).
(५) श्रावणी (गंजिफ नं. ७; ३-८-१९०५).
(६) लग्न व विवाह (गंजिफ नं. १०).
(७) महाभारत (गंजिफ नं. ११).
(८) वैश्यवर्ण (११-९-१९०६).

शास्त्रीबोवांचे 'दीनबंधूबरोबर प्रत्यक्ष संबंध फुल्यांच्या मृत्यूनंतर झालेला दिसतो. बाबा पदमजींचा व शास्त्रीबोवांचा जसा स्नेह होता तसा फुल्यांबरोबर कधीच नव्हता. ओळखही बेताचीच असावी. या बाबतीत 'सुधारका 'च्या व त्यांच्या संबंधाचे विलक्षण साम्य आहे. सत्यशोधक समाजाने शास्त्रीबोवांचा कोल्हापूरच्या वेदोक्त चळवळीत (१९००) साली पुष्कळ फायदा करून घेतला. त्यावरच शिवरामपंत परांजपे यांनी हल्ला चढविला आहे. वि. का. राजवाडे यांनीसुद्धा त्या बाबतीत त्यांना टोमणा मारला आहे. (ग्रंथमाला १९०८, डिसेंबर, फादर स्तेफेन्स याचे खिस्तपुराण) डॉ. केतकरांनी शास्त्रीबोवांच्या वेदोक्त चळवळीविषयी राजवाड्यांचीच री आपल्या 'संकीर्ण निबंधांत ओढली आहे.' पुढे मात्र त्यांचा सत्यशोधकांशी काही संबंध आलेला नाही. एवढेच नव्हे तर मराठे व इतर जाती यांच्या बद्दलचे त्यांचे कार्य त्यांनी 'मराठा परिषदेमार्फत' चालू केले. त्या साठी त्यांनी १९०७ साली वऱ्हाडात दौरा काढला होता.

## (१२) सुधारक

सुधारकात शास्त्रीबोवांचे पुढील लेख आले आहेत. आगरकरांच्या मृत्यूनंतर हा संबंध आला. ह्या दोघांचा परिचय होता असे वाटत नाही. मी शोध केला पण पत्ता लागला नाही.

(१) शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धान्त (३०-७-१९०२).
(२) शंकराचार्यांचा वेदान्त (१८-८-१९०२)
(३) जिन्सीवाले व भागवत (१९-५-१९०२).
(४) विवाह व लग्न (८-६-१९०३).

(५) राजा कालस्य कारणम् (२२-६-१९०३).
(६) शाळातून धर्मशिक्षण (२९-६-१९०३).
(७) बौद्धधर्म काळोखच (३-७-१९०३).
(८) बौद्धधर्म व ब्राह्मणी धर्म (१३-७-१९०३).
(९) मानवगृह्यसूत्र विवाहाचे पुच्छ (१० व १७-८-१९०३).
(१०) धर्म आणि अधर्म (१४-८-१९०३).
(११) आपली संध्या (१५-१२-१९०३).
(१२) मानवगृह्यसूत्र व मनुस्मृति २८-१२-१९०३).
(१३) समुदाय व व्यक्ति (३१-३-१९०४).
(१४) जुने हवे की नको, नवे हवे की नको (२५-४-१९०४)
(१५) इतिहास व नीति (१४-६-१९०४).

### (१३) ज्ञानप्रकाश

ज्ञानप्रकाशात शास्त्रीबोवांचे काही लेख व त्यांच्यावर टीका पण येत· पण मला जुन्या फायली पाहायला मिळाल्या नाहीत. पुढे दिलेले उल्लेख तेवढे माहित आहेत.

(१) श्री शिवाजी महाराजांचे चरित्र (८-५-१९०५).
(२) विधवाविवाह (१८-५-१९०५).

### (१४) पुणे वैभव

मोरोपंतांच्या नलोपाख्यानाचे विवेचन, १८९३. हे लेख पाहायला मिळाले नाहीत. ऐकून माहिती झाले.

### (१५) विविधज्ञानविस्तार

विविधज्ञानविस्तार हे महाराष्ट्राचे चिरायु व श्रेष्ठ दर्जाचे आणि सार्थ नावाचे मासिक. कोल्हापूरच्या ग्रंथमालेने ह्याचा 'पुराण व पूज्य मासिक' म्हणून गौरव केलेला आहे. या मासिकानेच शास्त्रीबोवांना लेखक म्हणून पुढे आणले. टीकेच्या वावटळी त्यांच्या भोवती उठत असता त्यांना वेळोवेळी आधार दिला. या मासिकाची दीर्घकालीन चालक मंडळी स्वतः जाति-भेदातीत असल्याने शास्त्रीबोवांच्या लेखामागची कळकळ त्यांस समजे. आणि त्यामुळेच शास्त्रीबोवांच्या विरोधकांच्या टीकांना त्यांनी उदार मनाने ह्या

मासिकात जागा दिली, तरी शास्त्रीबोवांच्या उत्तरांना तितकीच मोकळीक ठेवली. शास्त्रीबोवांनीही वीस वर्षांवर आपली लेखणी अव्याहत या मासिका-करिता झिजवली. काही काही वेळा तर मासिकाचे कित्येक अंक केवळ त्यांच्याच लेखांनी भरलेले दिसतात. शास्त्रीबोवांनी अत्यंत विपत्कालात ह्या मासिकाला सर्वांत तत्परतेने हात दिला. त्यांच्या मृत्यूचा उल्लेख करताना ' विस्ताराने ' मराठी भाषेचा निःसीम भक्त, संस्कृत भाषेचा प्रोफेसर, कर्ता सुधारक, जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले, मराठामंडळाचा कैवारी, विविधज्ञानविस्ताराचा पस्तीस वर्षांचा अकृत्रिम स्नेही ' असे उद्गार काढले आहेत. (जानेवारी १९०८).

शास्त्रीबोवांच्या प्रतिभेच्या सर्व अवस्था, त्यांच्या जिज्ञासेच्या सगळ्या कक्षा या मासिकात जशा दिसून येतात, तशा इतर ठिकाणी दिसून येत नाहीत. या मासिकातले त्यांचे लिखाण इतके विविध प्रकारचे आहे की त्याने मन खरोखरीच थक्क होऊन जाते. विद्वता ही शास्त्रीबोवांनी सहज पेलून धरलेली वस्तू आहे, ती त्यांच्या आयुष्याचा एक भागच आहे हे या लेखांवरून स्पष्ट दिसून येते. प्रतिस्पर्ध्यास आव्हानात हार न जाणारी त्यांची मर्द लेखणी येथे किती आवेशाने आणि तितक्याच धीमेपणाने चालते, हे पाहावयास मजा वाटते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ' कैवारी तो सकल विविधज्ञान-विस्तारकांचा ' हे कै. हरि महादेव पंडित यांना उद्देशून रे. टिळकांनी काढलेले उद्गार शास्त्रीबोवांस तंतोतंत लागू पडतात. शास्त्रीबोवांनी ' विस्तारात ' १८७४ फेब्रुवारीपासून ' संक्षिप्त भारतवर्षीय दर्शन ' ही लेखमाला संस्कृत ' सर्वदर्शनसंग्रहाच्या ' आधारे लिहावयास सुरुवात केली. त्या वेळी त्याचे वय २३ वर्षांचे होते. १९०७ साली ऑक्टोबर महिन्यात त्यांचा ' देव आणि असुर ' हा शेवटला ' विस्तारातला ' लेख. एवढे मोठे निबंध वाङमय निर्माण करणारे शास्त्रीबोवा लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक, आगरकर यांच्या खास तोलाचे लेखक होते यात संशय नाही.

विस्ताराच्या काही अंकांत शास्त्रीबोवांचे लेख अजिबात आलेले दिसत नाहीत. उदाहरणार्थ अनुक्रमे ९ (१८७७), १० (१८७८) ११ (१८७९) १२ (१८८०), १३ (१८८१), १४ (१८८२) आणि ३१ (१९००), ३२ (१९०१), ३३ (१९०२) व ३३ (१९०३), ह्या साली त्यांनी

' विस्तारात ' लेखन केलेले दिसत नाही. पहिल्या पाच वर्षांच्या ह्या अवधीत त्यांनी काहीच लिहिले की नाही व का लिहिले नाही ते कळत नाही. लेखनाच्या दृष्टीने त्याच्या आयुष्यातला हा अज्ञात काळ आहे. कारण ' स्वयंवर ' ही कादंबरी व ' हर्षचरित ', फार काय, पण ' गोंडी भाषा ' ही लेखमालादेखील त्यांना अर्धवटच सोडली आहे. ती फिरून कधीच त्यांनी हाती धरली नाही. त्यानंतर त्यांनी ' मराठेशाही ' व ' विचारमाधुकरी ' ह्या दोन मोठ्या लेखमाला १८८३ पासून अनुक्रमे ' एक मराठा ' व ' एक भगद्वभक्त ' या टोपण नावांनी सुरू केल्या. त्यांवर झालेला जाहीर पत्रव्यवहार मात्र ते आपल्या खऱ्या नावाने चालवीत. टोपणनाव हे खरे नाव गुलदस्तात ठेवून लेखणी स्वैर चालविण्याचे साधन म्हणून त्यांनी वापरले नाही तर टोपणनावामुळे त्या त्या विषयावरील स्वतःची मनोवृत्ती प्रगट व्हावी व ती भक्तिपर वृत्ती विनम्रपणेच प्रगट व्हावी असा त्यांचा हेतू दिसतो. तेव्हा लेखामुळे होणाऱ्या टीकांना त्यांना सर्वदा बेडरपणे तोंड दिले, दिले, ते जाहीर न्यायासनासमोर आरोपी प्रगट होऊन स्वतःवरचे दोषारोप जसा उघडपणे पदरी घेण्यास तयार असूनही स्वतःची कैफियत साद्यंतलोकांपुढे ठेवतो, त्याच रीतीने भाषांतरे, टाचणे, संशोधन, इतिहासकथन, चर्चा, वाङ्मयविवेचन इत्यादि तऱ्हेतऱ्हेचे विषय त्यांनी अगदी स्वतंत्र बाण्याने ' विस्तारां 'त दिले आहेत. ' विस्तारां 'तले शास्त्रीबोवांचे सगळेच लेख थोडे दोष वगळले, तर मननीय आहेत. ' गोंडी भाषा ' ' ज्ञानेश्वरी महासागरांतील बुड्या,' ' आमचा देश, आमचे देशी लोक, आमची देशी भाषा ' हृया लेखमाला तर मराठी भाषेतली अमोलिक रत्नेच समजली जावीत अशा योग्यतेच्या आहेत. त्यांच्या खालोखाल, ' विचारमाधुकरी,' ' मऱ्हाठेशाही,' ' मऱ्हाठ्यांसंबंधाने चार उद्‌गार ' हृया लेखमाला विविधतेने परिपूर्ण अशा आहेत. ' विचारमाधुकरी 'बद्दल ' विस्तारा 'च्या संपादकांनी पुढील उद्‌गार काढले आहेत. ' विचारमाधुकरीच्या संबंधाने आम्हास इतकेच सुचविणे आहे की यातील विषय फार गंभीर व फार खोल विचाराचे आहेत, व चांगले मनन व परिशीलन केल्याविना सहज समजण्याजोगे नाहीत. हे विषय लिहिणाराला किती मनन, किती ग्रंथावलोकन, व किती शोध करावा लागला असेल व किती बुद्धी व विद्वत्ता खर्ची घालावी लागली

असेल, व किती श्रम व घस सोसावी लागली असेल या गोष्टींचा विचार करून व विषय समजून घेऊन नंतर ज्यास या विषयावर प्रतिकूल लेख लिहावयाचे असतील त्यांनी लिहावे. पण त्या योगे त्यांचेच पाणी जोखले जाते, ही गोष्ट मात्र तशा मंडळीने विसरू नये. (पुस्तक २२, पृ, १०; जानेवारी–फेब्रुवारी १८९०). Indian antiquary च्या धर्तीवर मराठीत पूर्ण स्वतंत्र विचारांनी भरलेली अशी ही प्रचंड लेखमाला शास्त्रीबोवांनी पहिल्यानेच सुरू केली असे त्यांचे पहिले चरित्रकार श्री. देव यांनी म्हटले आहे. टीकेच्या रूपाने का होईना पण मराठीवाचकांच्या मनात त्यांनी या गहन विषयांबद्दल कुतूहल उत्पन्न केले. महाराष्ट्राच्या बुद्धीला व विचारांना जोराची चालना दिली. आज त्यांचे हे लिखाण कालाच्या महिम्याप्रमाणे जरी सदोष ठरले, तरी अशा तऱ्हेचे तडफदार, व्यासंगपूर्ण आणि ज्ञानाच्या तळमळीने भरलेले स्वयंपूर्ण वाङमय कोणत्याही काळी कोणत्याही काळी कोणत्याही भाषेला भूषण आहे. खाली दिलेली सूची ‘ विस्तारा ’च्या सूचीच्या आधारे पण सनवारीप्रमाणे बदल करून तयार केली आहे.

## (१) तत्त्वज्ञान

(१) १८७४–१८७६; संक्षिप्तभारतवर्षीय दर्शन; (१) चार्वाकदर्शन (पुस्तक ६, पृ. २५); (२) बौद्धदर्शन (पृ. ४१), (३) अर्हत् किंवा जैनदर्शन (पृ. ८१; १०१); (४) रामानुजदर्शन (पृ. ८१ १०१); (६) निंबार्कदर्शन (पृ. १०६); (८) पाशुपतदर्शन (पृ. १२१); (९) तांत्रिक शैवदर्शन (पृ. १४१); (१०) प्रत्यभिज्ञादर्शन (पृ. १६१).

(२) १९०६; भगवद्गीतेतील बुडचा (रा. रा. भा. यांच्या मूळ इंग्रजीवरून बा. ना. देव यांनी केलेले भाषांतर, पुस्तक २६, पृ. ३८५).

## (२) कविता

(३) १८७५–१८७६; प्राचीनभरतखंडस्थिति (पुस्तक ७, पृ. ५९; पुस्तक ८, पृ. ३)

## (३) कथा

(४) १८७५–१८७६; कृत्रिमपणाचा व सरळपणाचा परिणाम (पुस्तक ७, पृ. २०६)

(५) हर्षचरित (भाषांतर; पुस्तक ७, पृ. १६३; १८५; २१४ पुस्तक ८, ३५, ६६ अपूर्ण.) हे पुढे श्री. ल. रा. वैद्य यांनी चालू केले पण तेही अपूर्ण राहिले.

(६) स्वयंवर (स्कॉटच्या टॅलिसमनचे भाषांतर; पुस्तक ७ पृ. २२१; पु. ८, पृ. ५; २८; ४९ अपूर्ण)

(४) **पुस्तक परीक्षण**

(७) १८७४; शांकरदिग्विजयनाटक (पुस्तक ६, पृ. १२१; पुस्तक ७, पृ. २७; ४९ १८९५.)

(८) लक्ष्मीबाई झांशीकरीण १९०५;

(९) अलंकारशास्त्र (पुस्तक ३६; पृ. ४८१)

(१०) ऋग्वेदाचे मराठी भाषांतर (पुस्तक ३६, पृ. ४८५)

(११) १९०७ मोडी लिपीची सुधारणा (पुस्तक ३८, पृ. १९४)

(५) **वैद्यक व आरोग्य**

(१२) १८७६; अन्न (पुस्तक ८, पृ. २१)

(६) **पदार्थविज्ञान**

(१३) १८७६; अस्मानी पाणी (पुस्तक ८, पृ. ४४)

(७) **भाषाशास्त्र**

(१४) गोंडी भाषा (पुस्तक ८, पृ. १, ४१ अपूर्ण)

(१५) १८८८ मराठी भाषेचे व्याकरण (पुस्तक २० पृ. ६६)

(१६) १८८९; १८९० 'दामोदर,' 'पोहरा' ह्यांच्या व्युत्पत्तीबद्दल गुंजीकरांचा लेख. (पुस्तक २१, पृ. १९२). त्याला उत्तर म्हणून भागवतांचा लेख. 'पोहरा' या शब्दाची व्युत्पत्ति गुंजीकरांच्या मते 'पयोधर' या शब्दापासून आहे, तर भागवतांच्या मते ती 'अपीहर' पासून आहे (पु. २२, पृ. ४४, २८६).

(१७) मराठी भाषा व वाङमय; १८९१, १८९२, १८९३.

ज्ञानेश्वरी महासागरातील बुडचा, (पुस्तक २३, पृ. ९५ ११९, १६८; पुस्तक २४ पृ. २३, ७२, १६८)

(१८) मोरोपंती भारत, मोरोपंती उतारे व संस्कृत मूळ (पुस्तक २४, पृ. २१४; पुस्तक, २५, पृ. ४४).

(१९) १९०५, १९०६ मोडी लिपी (पुस्तक ३६, पृ. ४३३; पुस्तक ३७, पृ. ३९ श्री. बा. आ. गुप्ते यांचे पत्र व त्याला उत्तर (पुस्तक ३७, अंक ८ कव्हर, अंक ९ कव्हर).

(२०) साहित्यशास्त्र;

१८९२, काव्यमीमांसा, प्रकरण पहिले, अलंकारमीमांसा, अर्थालंकार व शब्दालंकार (पुस्तक २४, पृ. २५; ४९; ७३; ११०; १९३.

(८) प्राचीन संस्कृतीसंशोधन इतिहास व समाजशास्त्र

(२१) १८८३; १८८४; १८८५; १८८७; १८८८; १८९१.

**विचारमाधुकरी**

(१) शककालविचार (पुस्तक १५, पृ. २५; ७३; पुस्तक १६, पृ. ६३; ६७).

(२) वैष्णवमतविचार (पुस्तक १५, पृ. ९७, १९३).

(३) त्रिमूर्तिविचार (पुस्तक १५ पृ. २४१).

(४) दशावतार (पुस्तक १६, पृ. १५, ७६).

(५) यदुक्षेत्र कोणते, त्यात ब्राह्मण आले केव्हा ( पुस्तक १६ पृ ९७; १२१; १८७; २५९; पुस्तक १७, पृ. १४१; १८०; २०५; २२५; २४९).

(६) पंचजनविचार (पुस्तक १८, पृ. १, २५; ५९; २२५; २५५; पुस्तक १९, पृ. ८९; १५७; २१७).

(७) यज्ञविद्येचे विशकलन (पुस्तक २०, पृ. ९७; २१३; पुस्तके २३, पृ. १५४; १७७; १९३, २२४)..

'विचारमाधुकरी'चे पहिले चार विचार आल्यानंतर संपादकांनी पुढील वर्षाच्या निबंधासंबंधाने असे जाहीर केले की या वर्षी चार विचार येऊन गेले आहेत, पुढील विचार येत्या सालच्या अंकात येतील. या निबंधात क्वचित् वादग्रस्त मते येण्याचा संभव आहे. अशा मतांबद्दल योग्य चर्चा होणें रास्त आहे. या करिता त्या संबंधाने कोणी काही शंका लिहून कळवल्यास त्यांचा नीट विचार केला जाईल असे आम्ही 'भगवद्भक्ताच्या' वतीने कळवितो. (अंक ११–१२; १८८३) यानंतर वेगवेगळ्या विषयांवर झालेली चर्चा अधून मधून दिसून येते. त्यापैकी 'एक शोधक' व शास्त्री-

बोवा यांच्यामध्ये झालेली चर्चा फार मार्मिक असून शास्त्रीबोवांची उत्तरे समर्पक आहेत. एका साप्ताहिकात आलेल्या ‘ स्पष्टवक्ता अभियोगी ’ यांच्या टीकेलाही शास्त्रीबोवांनी उत्तर दिले आहे. मूळच्या टीकेत दूरान्वयी मुद्दे अधून मधून आहेत. त्यामुळे उत्तरांतही विसंगती आलेली आहे. मात्र शास्त्रीबोवांनी आपली मते पटवून देण्याची शिकस्त केली आहे. (पुस्तक १७, पृ. २१; इतर टीका व उत्तरे पृ. २९; ३३; ३६; ७८)

२२) १८९०–१८९३; **आमचा देश, आमचे देशी लोक व आमची देशी भाषा–**

**१ आमचा देश–**

(१) आमच्या देशाची चतु:सीमा (पुस्तक २२, पृ. ८१)

(२) आमचा देश आर्यावर्ताच्या बाहेर आहे (पुस्तक २२ पृ. ८१)

(३) आमच्या देशाचे इलाखे व जिल्हे (पुस्तक २२ पृ. ९८)

(४) आमच्या देशाचा राज्येतिहास (पुस्तक २३, पृ. २५).

**२ आमचे देशी लोक–**

(१) प्राक्शालिवाहनी काळातील वसाहती (पुस्तक २३, पृ. १९०).

आमचा देश, आमचे देशी लोक व आमची देशी भाषा. भाग दुसरा– –आमचे देशी लोक; विविधज्ञान विस्तार, पुस्तक २३, अंक ५, पृ. १०१– ११२; मे, १८९१.

महार या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल बॉंबे गार्डियनमध्ये एक इंग्रजी लेख आला होता त्यावरून ‘ मुंबई इलाख्यातले महारलोक ’ म्हणून सुबोध- पत्रिकेत एक सुंदर लेख आला आहे. त्यातला मुख्य उल्लेख असा: ‘ महार हा शब्द केव्हा व कोणत्या अर्थी प्रचारात आला आहे हे ठरविण्यास ऐतिहासिक पुरावा नाही. त्याच्या व्युत्पत्तीबद्दल पुष्कळांनी तर्क लढवले आहेत. कोणी महाराष्ट्र या शब्दाशी त्याचा संबंध जोडतात.’ (७–५– १९०५) हया बाबतीत डॉ. केतकरांच्या ‘ शातवाहन पर्व ’ या महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास भाग १ (पृ. २३–३१) हयांत फार मार्मिक विवेचन आहे.

शास्त्रीबोवांच्या नंतर महाराष्ट्रातील वसाहतीबद्दल व्युत्पत्तीच्या आधारे कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी 'राममाधवविलासचंपू'च्या व 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', भाग ६ च्या प्रस्तावनेत बरीच चर्चा केली आहे. त्याशिवाय 'महाराष्ट्राच्या वसाहत कालीन इतिहासाचा शोध ह्या लेखमालेत त्यांनी खानदेशी गांवाच्या नावावरून कित्येक अनुमाने बसवली आहेत.

'महाराचे राष्ट्र म्हणजेच महाराष्ट्र' असे महाराष्ट्र या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दलचे विधान शास्त्रीबोवांचे असल्याबद्दल त्यांस ओळखणाऱ्या कित्येक माहीतगार वृद्धांनी मला सांगितले. या लेखावरून व नाग लोक म्हणजेच महार या शास्त्रीबोवांच्या विधानावरून (जे विधान पुढे राजवाडे व डॉ. केतकर यांनी उचलून धरल्यामुळे सिद्धान्तरूप झाले आहे) जरी महारांच्या महाराष्ट्रातील महत्त्वाला पुष्टी मिळाली तरी पहिले सूत्ररूप वाक्य शास्त्रीबोवांचे नाही. ते शास्त्रीबोवांच्या लेखनात कुठेच उल्लेखिलेले नाही. त्याचे जनकतत्व लोकहितवादीकडे जाते. 'निबंधसंग्रहात' (पृ. ७२५) 'महाराष्ट्र भाषा' या लेखात असे वाक्य आहे 'मराठी भाषेची व्यवस्था मुळापासून पाहिली तर असे दिसते की महार लोकांचे मूळचे हे राष्ट्र होते व त्यासाठी त्यास महाराष्ट्र असे नाव आहे. व हल्लीचे उच्चारातमधील र चा लोप होत असतो.' (इंदूप्रकाश, ता. ४, १२, १८६४) डॉ. केतकरांच्या ग्रंथात हा महत्त्वाचा उल्लेख सुटलेला आहे.

(२) शालिवाहन काळातील वसाहती (पुस्तक २३; पृ. १२१)

(३) शालिवाहन काळाच्या पुढच्या वसाहती (पुस्तक २३ पृ. १२२)

(४) कोकण मंडळातील लेखणीचे विविध अधिकारी (पुस्तक २३, पृ. २१७; २४१; २६६)

(५) देशावरील लेखणीचे विविध अधिकारी (पुस्तक २५ पृ. १६७; २०८)

(६) आमच्या मंडळातील हत्याराचे व शेतकीचे विविध अधिकारी (पुस्तक २५, पृ. २१६)

(७) आमच्या मंडळातील व्यापाराचे विविध अधिकारी (पुस्तक २५, पृ. २१६)

(८) धर्म, गावगन्ना, व्यवस्था व राजसत्ता (पुस्तक २५, पृ. २१७ २५९; अपूर्ण)

**प्रश्नोत्तरे**:– (१) 'जुना ओळखी'ने घेतलेले आक्षेप. यात तात्विक वादापेक्षा भागवतांवर वैयक्तिक हल्लाच जास्ती चढविलेला आहे. त्यांत गुंजीकरांच्या 'सरस्वती मंडळा'चे पडसाद स्पष्ट उमटलेले आहेत. त्यावर शास्त्रीबोवांनी 'जुन्या ओळखी व भागवत' म्हणून उत्तर देऊन त्यात ऐतिहासिक बाबींचा खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. यात वैयक्तिक उल्लेख किंवा अपशब्द मुळीच नाहीत. विवेचन मुद्द्यांना धरून व फार मोठे आहे. त्यात प्रतिपक्षाने मुद्दे अधिक द्यावे म्हणून सूचना केली आहे (पुस्तक २२, पृ. ६९ ). त्यावर 'जुना ओळखी'ने भागवतांनी 'सरासरी मुद्दे' काढून नुसती उडवाउडवी केली आहे, व फिरून वैयक्तिक हल्ला चढविला आहे. 'अनाद्यंत चऱ्हाट वळून ते उकलीत बसा म्हणून लोकांपुढे मांडावयाचे' असा टोमणा शेवटी मारला आहे. (पृ. ११२).

(२३) **मराठेशाही**–'मराठेशाही'बद्दल १८८३ सालअखेर ह्या सदरात, संपादकांनी असे म्हटले आहे की 'हल्ली उपलब्ध झालेल्या मराठ्यांच्या संबंधाच्या ऐतिहासिक लेखावरून विलायतेतील प्रसिद्ध 'रिव्ह्यू'चे धर्तीवर 'मऱ्हाठेशाही' या सदराखाली छत्रपति शिवाजी महाराजांचे चरित्र सादर करावयाचे आहे.

१८८४; १८८५; १८८७; १८८८; १८८९.

(१) शिवाजी (पुस्तक १६ पृ. १; ३६; १५४; १९३; २२६, २४१; २६६)

(२) संभाजी (पुस्तक १७ पृ. २५; ८२; १६३, १९३)

(३) राजाराम (पुस्तक १९, पृ. २४३)

(४) शिवाजी– दुसरा (पुस्तक १९ पृ. २४३)

(५) उपसंहार पुस्तक २० पृ. ११२; १९३; २२५; पुस्तक २१ पृ. ४२; ७३; १४५)

(२४) मऱ्हाठ्यांच्या संबंधाने चार उद्गार (पुस्तक १८ पृ. १; २५; ९२; अपूर्ण. पुढे पुस्तकात हे पूर्ण झाले).

**पत्रोत्तरे**: मऱ्हाठेशाही व मऱ्हाठ्यांसंबंधाने चार उद्गार या दोन्हींवर

मिळून कडाक्याचा वादविवाद झाला. तो थोडक्यात असा–

(१) यादवाडकर व भागवत, हा सर्व पत्रव्यवहार फार मनोरंजक आहे. त्यात यादवाडकर पटवर्धन पेशव्यांचे अभिमानी असल्यामुळे त्यांच्यावरचे. आक्षेप पटवर्धनांना सहन झाले नाहीत. (पुस्तक २१, पृ. ३११; पुस्तक २२; पृ ११३; २५४)

(२) कालगावकर व भागवत वाद; हा वाद कायस्थ प्रभूंच्या व्युत्पत्ती-बद्दल असून चांगला आहे (पुस्तक ६१ पृ. २५९, २६३; पुस्तक २३, पृ .१३०; पुस्तक २४, पृ. ४२)

(३) तु अ.– व भागवत (पुस्तक २१ पृ. १६; पृ १४३)

(२५) कोंकणच्या संबंधाने चार शब्द (पुस्तक २१. पृ १; २५; ९२)

**पत्रोत्तरे**:– (१) जुना ओळखी :– फिरून 'सरस्वती-मंडळाचा' प्रतिध्वनी. (पुस्तक २१, पृ. १८६; ह्याला भागवतांनी उत्तर दिले नाही त्यांचे एक पत्र पुढे पुस्तक २४, पृ. ४१ वर आले आहे)

(२) पी. आणि भागवत (पुस्तक २१, पृ, ६९, १४३)

(२६) १८९० १८९१; १८९३; १८९४; नादिरशहाची बखर (अस्सल फारसी ग्रंथाच्या फ्रेंच भाषेतील तर्जुम्याचा आमच्या देशी भाषेत तर्जुमा; पुस्तक २२, पृ. १३२; १५२; २११, २८२; पुस्तक २३, पृ. ८५; २५०; २७२; पुस्तक २४, पृ ९. १७६; २०६; २३५; पुस्तक २५, पृ. २८ अपूर्ण).

(२७) १८९७; १८९८ फिरंग्यांची इकडील हकीगत (डान्वर्सच्या इंग्रजी ग्रंथाच्या आधारे; पुस्तक २९, पृ. २३; ७४; पुस्तक ३०, पृ. १५; ७३; १४५; ३०९ अपूर्ण).

(९) **ज्योतिष**:

(२८) १८९४; १८९६ जुनाट ज्योतिष श्रुतीतले (पुस्तक २६; पृ. ४९; ९७; १४५; पुस्तक २८; पृ. १९६ अपूर्ण).

(२९) १९०४; ब्राह्मणी व रोमी वर्ष (हा लेख प्रथम बॉंबे गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला तो इंग्रजीतून. पुढे सयाजीराव गायकवाडांच्या आश्रयाखाली स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. त्याचे मराठी भाषांतर कै. हरी बल्लाळ परचुरे यांनी केले. पुस्तक ३५; पृ. १७६).

**(१०) वैदिक व पौराणिक चर्चा**

(३०) १८९४; १८९६;

वेदार्थयत्नकारांचे स्मारक (पुस्तक २६, पृ. १९३; २४१; पुस्तक २७, पृ. १; ४९; ९७; १४५; १९३: २४१; पुस्तक २८, पृ. ११; ६०; ९७; १४५)

(३१) १९०७; देव आणि असुर (पुस्तक ३८, पृ. ३२५)

**(११) धर्म व समाजशास्त्र**

(३२) १८९५; न मांसभक्षणे दोषः (पुस्तक २७, पृ, २२८)
(३३) १८९७; स्त्रियांचा पुनरुद्वाह (पुस्तक २९; पृ. ८४)
(३४) १८९७; चातुर्वर्ण्य (पुस्तक २९, पृ. १५६; १६७; २०१)
(३५) १८९७; वपन व क्षत्रिय वैश्य ( पुस्तक २९;, पृ. ३१६; ३३५; ३६१)
(०६) १८९८; ब्राह्मणांचा स्वधर्म (पुस्तक ३०, पृ. ६८; ११८)
(३७) १९०७ क्षत्रिय व ब्राह्मण (पुस्तक ३८, पृ. १८५, २१३)

**(१२) पुस्तक परीक्षणे**

(१) रत्नाकरपंत आपा, अहिल्याबाई होळकरीण, सिधोजी निपाणकर. पुस्तक चांगले पण भाषा वाईट (पुस्तक २२ पृ. ५८)

(२) शिवछत्रपतीच्या चरित्रातील कित्येक मुद्दे (स. देऊसकर) शास्त्रीबोवांस पाठिंबा (पुस्तक ६५ पृ. २५.)

(३) भगवद्‌गीतेचे ग्रंथदृष्टया परीक्षण (चिं. वि. वैद्य) ही एक प्रखर पण मार्मिक टीका आहे. ' भगवतद्‌गीतेतील बुडयांवर ' हा साधार आक्षेप आहे. (पुस्तक ३८ पृ. १५) तरी पण ह्या टीकेत वैद्य स्वतः परंपरेचे निःसीम भोक्ते असल्यामुळे पक्षपातीपणाचा भास वारंवार होतो.

**(१६) ग्रंथमाला**

ग्रंथमालेत संस्कृतभाषेची विचिकित्सा व प्राकृत भाषेची विचिकित्सा ह्या दोन लेखमाला सन १९०० पूर्वी प्रसिद्ध झाल्या. पण मला जुन्या फायली मिळाल्या नाहीत; त्यामुळे जास्ती खल करता येत नाही.

## (१७) धर्म

'धर्म' साप्ताहिक कै. काशिनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले यांनी संपादिलेले एक साप्ताहिक वाईस निघत असे (१९०३–१९१०) शास्त्रीबोवा आणि भाऊशास्त्री यांची मते किती परस्पर विरोधी होती याबद्दल थोडी माहिती मागे आलेलीच आहे. 'धर्मात' तीन उल्लेख शास्त्रीबोवांच्या बाबतीत मला आढळले ते असे:–

(१) ५–१०–१९०५ रोजी 'ज्ञानोदय' पत्रांत प्रार्थना समाजात सर्व जातींच्या स्पृश्यास्पृश्य मंडळींच्या प्रीतिभोजनाची हकीगत आलेली असून त्यांत भोजनात भाग घेणारांची नावे मुद्दाम जाहीर केली होती. राजारामशास्त्री भागवतांनी 'प्रार्थनासमाज व महार' मथळ्याखाली ज्ञानोदयकर्त्यांचे अभिनंदन केले. हा मजकूर धर्मामध्ये असा आहे की– रा. रा. भा. म्हणतात 'आपला आजचा अंक पाहून फार फार आनंद झाला. धाकटे भांडारकर, चंदावरकर, धाकटे माडगांवकर, भाजेकर वकील, पंडित, गुप्ते. वगैरे प्रार्थनासामाजिकांनी महारांच्या पंगतीस बसून त्यांस जाहीर पावन केल्याचे वाचताच या सर्वांची तारिफ केल्याशिवाय राहवेना. मंडळी जी निरुपायाने नव्हती ती सगळी पुढच्या प्रीतिभोजनाचे प्रसंगी जमेल व यंदाप्रमाणे महारांस जाहीर पावन करून घेण्यात पीछेहाट करणार नाही अशी आशा करितो. यंदाच्या प्रीतिभोजनात मुसलमान गृहस्थ सय्यद अबदुल होतेच...जातिभेदाची नांगी साफ मोडेल, तेव्हा ख्रिस्त्यांशी व मुसलमानांशी जाहीर दळणवळण शक्य होईल, राष्ट्रपणा येईल, 'राष्ट्रीय' सभा नाव सार्थक होईल.' रा. रा. भा यांचे हे शब्द वाचून आम्हालाही त्याचे अभिनंदन 'केल्याशिवाय राहवेना.'

यानंतर धर्मकार भविष्यपुराणातील 'शूद्र ब्राह्मणाप्रमाणे आचरण करू लागतील व ब्राह्मण शूद्रांप्रमाणे वागू लागतील' या वचनाचा अनुभव सांप्रत कसा येत आहे ते सांगून भाऊशास्त्री म्हणतात, 'सोडावाटर, ब्रॅन्डी, इराण्याच्या दुकानांतील चहा, बिस्किटें, फ्रूटसाल्ट, कोको, चायना ग्रास (रेनेट), अंडी इत्यादि पदार्थांना पोटात घेणारे ब्रह्मकुलोत्पन्न सांप्रत जिकडे तिकडे पसरले आहेत. आणि श्रावण्या करणारे शूद्रकुलोत्पन्न ठिकठिकाणी फडकण्याच्या बेतात अ,हेत.' )कलियुगविचार, १९–१०–१९०५)

(२) कोल्हापूरच्या 'वेदोक्त' प्रकरणात मराठ्यांना क्षत्रिय लेखून त्यांच्या मुंजी करण्यास शाहूमहाराजांच्या इच्छेप्रमाणे काशिनाथपंत ब्रह्मनाळकरांनी आरंभ केला. त्यावेळी करवीर व संकेश्वर या दोन्ही ठिकाणच्या जगद्गुरूंनी ब्रह्मनाळकरांचा जाहीर निषेध केला. त्याला उद्देशून धर्मकार लिहितात– 'काशिनाथपंत ब्रह्मनाळकरांना जगद्गुरूंचे आज्ञापत्र प्रसिद्ध झाल्याप्रमाणे, जरी सांप्रत सर्वांनी सोडले आहे, तरी काशीकर कृष्णानंद त्यांचे पाठीराखे असून मुंबईतील राजारामपंत भागवतांचीही त्यांना कुमक होण्याचा संभव आहे. सांप्रत हे रा. रा. भा. मुंबईहून निघून बेळगांव मुक्कामी मराठ्यांच्या मुंजी लावण्याकरिता गेले असून द्विजेतर रा. आबाजी रामचंद्र सावंत ह्यांच्या घरी उतरले आहेत व ह्यांचा भोजनादि व्यवहारही मराठ्यांच्या घरीच होत असतो असे कळते. रा. रा. भा सारख्यांची कुमक काशिनाथपंतांना झाल्यास फार उत्तम होईल, ह्यास्तव, जरी सर्वांनी सोडिले आहे, तरी रा. रा. भा. व कृष्णानंद या उभयता पाठिराख्यांच्या मदतीने ब्रह्मनाळकरांचे दिवस सुखाने निघण्यास आता हरकत येणार नाही. (पतित ब्रह्मनाळकर व कृष्णानंद, १७–५–१९०६)

(३) 'नन्दान्तं क्षत्रियकुलं' इत्यादी वचने 'कृपणांनी' पुराणात घुसडून दिली आहेत, असे राजारामशास्त्र्यांनी 'मऱ्हाठ्यांसंबंधी चार उद्गार' या पुस्तकात म्हटले आहे. मराठे क्षत्रिय आहेत यात संशय नाही हे शास्त्रीबोवांचे म्हणणे 'वेडेपणाचे होय' असे धर्मकार म्हणतात. नंदानंतर क्षत्रिय मुळी उरलेच नाहीत, ते शूद्रात मिळून गेले असे भाऊशास्त्र्यांचे म्हणणे आहे. गागाभट्टाने शिवाजीस गायत्री मंत्र दिला. शिवाजी जाधव म्हणजे यादव वंशांतला होता, या यादव वंशांतल्या रामचंद्र यादवाचा 'यदुवंशविलास' असा उल्लेख ज्ञानेश्वरांनी केला आहे; त्यावरून राजारामशास्त्र्यांनी जाधव वगैरे मराठ्यांस क्षत्रिय असे संबोधून त्यांना गायत्रीचा अधिकार आहे असे सांगितले. ('क्षत्रियांची मूळची पायरी' या लेखांत). त्यावर भाऊशास्त्र्यांनी शिवाजी क्षत्रियेतर म्हणजे शूद्र होता असे प्रतिपादन करून मराठे हे त्यांच्या आडनांवाची जंत्री पाहिल्यास त्यांच्या देवकावरून शूद्रच आहेत असे म्हटले आहे.

(मराठे हे क्षत्रिय आहेत काय ? २८–६–१९०६.)

भाऊशास्त्र्यांच्या शास्त्रीबोवांबद्दलच्या आक्षेपास ब्राह्मणेतरांनी प्रत्यक्ष कृतीने कसे उत्तर दिले त्याचा वृत्तान्त श्री. बा. भु. पाटील यांच्या आठवणीत आलेला आहेच.

कोल्हापुरातल्या वेदोक्त प्रकरणात शास्त्रीबोवांनी जे कार्य केले त्याचे वर्णन, श्री. बा. भु, पाटील बी. ए. एल्. एल्. बी; वकील, सांगली, यांनी 'कै राजारामशास्त्री भागवत व कोल्हापुरांतील एक प्रसंग' या आपल्या आठवणीत दिले आहे ती अशी–

'१९०३।१९०४ च्या सुमाराची गोष्ट. कदाचित् साल १९०४–१९०५ ही असावे. प्रस्तुत लेखक त्यावेळी कोल्हापूर येथील राजाराम हायस्कुलातील विद्यार्थी होता. कोल्हापुरात ब्राह्मण ब्राह्मणेतरवाद थैमान घालीत होता. सामान्य मराठ्यांचेच काय पण छत्रपतींच्या राजवाड्यातीलही धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने न करण्याच्या दुराग्रहाला कोल्हापूरचे राजोपाध्ये पडले होते, व उलट वेदोक्त पद्धतीनेच धार्मिक विधि करून घ्यावयाचा हा तर कै. शाहू छत्रपतींचा निश्चय होता.

कोल्हापुरास मराठा जातीच्या विद्यार्थ्यांकरिता एक विद्यार्थि-वसतिगृह आहे. तेथील विद्यार्थ्यांना गायत्री मंत्र शिकवावा असे त्या संस्थेच्या चालकानी ठरविले. ठरले. पण हा मंत्र शिकवणारा ब्राह्मण कसा मिळणार? कै. राजारामशास्त्री भागवत यांचे या मंत्राबद्दलचे मत सर्वांनाच कळून चुकले होते. मराठा–विद्यार्थि–वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना हा मंत्र सांगण्यासाठी शास्त्रीबुवांना कोल्हापुरास येण्याबद्दल निमंत्रण गेले. कोल्हापूर येथील जुन्या राजवाड्यांतील श्रीभवानी देवीच्या मंडपात सभा झाली. शास्त्रीबुवा व्याख्याते होते. विषयाचे नाव नक्की आठवत नाही. एवढा मोठा सभामंडप पण तो श्रोत्यानी चिकार भरून गेला होता. हिंदू पुराणातील भाकडकथावर अर्धा पाऊण तास शास्त्रीबोवांनी झोड उठवली. सभेस हजर असलेल्या सनातन्यांत– विशेषतः ब्राह्मणात– चुळबुळ सुरू झाली. पण सभेत उघड विरोध करण्याची कोणाची छाती झाली नाही. द्वारका नगरीचे क्षेत्र, यादवांची संख्या, प्रत्येक यादवाच्या देहाची उंची व रूंदी याबद्दल शास्त्रीबोवांनी पुराणांतील उतारे देऊन असे दाखविले, की इतक्या यादवांना द्वारकानगरीच्या क्षेत्रात एकमेकास बिलगुन उभे राहता येणे अशक्य. मग

राहण्या झोपण्याची गोष्ट दूरच. शास्त्रीबोवा श्रीभवानीसमोर उभे राहून व्याख्यान देत होते. सभामंडपाच्या उत्तरभागांत एक उतारवयाचे ब्राह्मण हे व्याख्यान ऐकत होते. या पुराणांतरी वर्णिलेल्या कथा भाकडकथा आहेत, त्या असत्य आहेत, विश्वासाला पात्र नाहीत. सबब त्यावर विश्वास ठेवू नका इत्यादी भाषण ऐकून या उतार वयाच्या ब्राह्मणाच्या पोटात मळमळू लागले. तो देहभान विसरला. स्वारी आपले उपरणे सावरीत सावरीत उठली. मी आपल्या इतर स्नेह्यांसमवेत या स्वारीच्या मागे उभा राहूनच भाषण ऐकत होतो. मला वाटले स्वारी विरोध करणार ! सभेत गलबला होऊन मोठी मौजच येणार ! परंतु माझी इतरांबरोबर निराशा झाली. स्वारी उठली व 'माझे नशीब ! नशीब! ! ! म्हणून कपाळावर त्रिवार हात मारून आपल्या जागी बसली. सभागृहात थोडा हशा पिकला व शास्त्रीबोवांचे व्याख्यान पुरे झाले.

या प्रसंगी मराठा विद्यार्थ्यांना गायत्रीमंत्र शिकविला, ब्राह्मण व हिंदुधर्मीय पुराणे यांच्यावर हल्ला चढवून अंधभक्तांच्या डोळ्यात चरचरीत अंजन घातले, ब्राह्मणेतरात माणुसकीची जागृती केली. आपणास जे जे ठावे होते ते ते इतरांना सांगून कोल्हापुरास रामराम केला. त्या सभाप्रसंगी पाहिलेली शास्त्रीबोवांची देहयष्टी व नशिबाला बोल लावून कपाळाला त्रिवार हात लावणारा ब्राह्मण यांची चित्रे अद्याप दृष्टीआड झालेली नाहीत.' (महाराष्ट्र–साहित्यपत्रिका, एप्रिल, १९४०)

**राजारामशास्त्री भागवतांवरील चरित्रात्मक वाङमय**

(१) कै. राजारामशास्त्री भागवत :– कै. बाळकृष्ण नारायण देव;
विविधज्ञानविस्तार, १९०९.

(२) कै. राजारामशास्त्री भागवत, श्री. माधव हणमंत घोरपडे.
ज्ञानप्रकाश १९०८

(३) Prof. R. R. Bhagvat V. V. Nowrange,
(Indian Social Reformer) १९०९

(४) राजारामशास्त्री भागवत ( व्यक्तिचित्र व वाङमयविवेचन )
दुर्गा भागवत, स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई ४; १९४८

(५) कै. राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक लेख,
सं. दुर्गा भागवत, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९५०.

(६) धनुर्धारी साप्ताहिक, राजारामशास्त्री भागवत खास अंक,
जानेवारी १९४९

(७) साधना साप्ताहिक, धर्ममूर्ती राजारामशास्त्री भागवत,
लेखक,–साने गुरुजी; ३–१–१९४९

(८) गं. दे. खानोलकर: अर्वाचीन मराठी साहित्य सेवक, भाग
५, मुंबई, १९६५

## मृत्युलेखांची नोंद

टाइम्स ऑफ इंडिया; ६–१–१९०८
इंडियन सोशल रिफॉर्मर; जानेवारी १९०८
हिंदी पंच; ८–३–१९०८
सेंट झेविअर कॉलेज मॅगझिन्;
सुबोधपत्रिका; ५–१–१९०८
केसरी; ७–१–१९०८
इंदुप्रकाश; ४–१–१९०८
काव्यसंग्रह; फेब्रुवारी १९०७
मराठामित्र; फेब्रुवारी.
दीनबंधू, ११–१–१९०८
सुधारक; ६–१–१९०८
बाळबोध; फेब्रुवारी १९०८
ज्ञानप्रकाश; ६–१–१९०८
विविधज्ञानविस्तार; जानेवारी, १९०८

**शास्त्रीबोवांची जन्मतारीख:– ११ नोव्हेंबर १८५१**

## दुय्यम संदर्भ साहित्य

मागे दिलेल्या शास्त्रीबोवांच्या व इतर साहित्याखेरीज व लेखसंग्रह तयार करण्यास पुढील साहित्य उपयोगी पडले.

(१) विष्णु कृष्ण चिपळुणकर यांचे चरित्र,

लेखक, लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर, (पुणे १८९४)
(२) निबंधमाला, २ री आवृत्ती (चित्रशाळा, पुणे १९१९)
(३) गोपाळ गणेश आगरकर याचे चरित्र,
लेखक, माधव दामोदर आळतेकर, (मुंबई १९३०)
(४) संपूर्ण आगरकर, भाग १, २;
संपादक, माधव दामोदर आळतेकर, (पुणे, १९३७, १९३८)
(५) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे चरित्र, भाग, १, २, ३;
लेखक, नरसिंह चिंतामण केळकर, (पुणे १९२३, १९२८)
(६) लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग १ व २, पुणे
(७) शिवराम महादेव परांजपे यांचे काळातील निवडक निबंध, भाग १–८ (पुणे १९४६–४७)
(८) रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख, भाग १ ( मुंबई १९४२)
(९) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र,
लेखक, नरहर रघुनाथ फाटक (मुंबई, १९२४)
(१०) इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे चरित्र,
लेखक, भास्कर वामन भट, (धुळे १९४७)
(११) इतिहासाचार्य राजवाडे, लेखक, साने गुरुजी ( पुणे १९४७ )
(१२) वि. का. राजवाडे यांच्या ऐतिहासिक प्रस्तावना, भाग १, ( पुणे १९२८ )
(१३) महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी,
लेखक, गंगाधर बाळकृष्ण सरदार, (पुणे १९४१)
(१४) अर्वाचीन मराठी वाङमय सेवक, भाग १, २, ३;
लेखक, गंगाधर देवराव खानोलकर, ( मुंबई, १९३०, १९३८, १९४९ )
(१५) मराठी गद्याचा इंग्रजी अवतार,
लेखक, दत्तो वामन पोतदार, (पुणे, १९२२.)
(१६) आत्मवृत्त, धोंडो केशव कर्वे (पुणे, १९२८)
(१७) श्रीधर गणेश जिनसीवाले यांचे चरित्र,

लेखक, नारायण कृष्ण गद्रे ( मुंबई, शके १८२५)

(१८) महाराष्ट्रीय ज्ञानकोश,
संपादक, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ( पुणे १९१६-१९२९)

(१९) महाराष्टीय शब्दकोश भाग १–७
संपादक, यशवंत रामचंद्र दाते व चिंतामण गणेश कर्वे
( पुणे १९२८–३७ )

(२०) निबंधसंग्रह, लेखक, लोकहितवादी ( इंदुप्रकाश मुंबई, १८८४ )

निबंध
२२६९८
२०५८

REFBK-0022698

## राजारामशास्त्री भागवत - निवडक साहित्य

राजारामशास्त्री भागवत (जन्म १८५१, मृत्यू १९०८) हे गेल्या शतकातील विचारवंत व समाजसुधारक 'विविध ज्ञानविस्तार' या नावाजलेल्या मासिकात ते सतत तेहतीस वर्षे लिहित होते. त्या काळात त्यांच्या विचारांनी व लेखांनी वादळे उठवली होती. त्यांचे अनेक संशोधनात्मक लेख विविध ज्ञानविस्तारातच पडून राहिले. पुस्तकरुपाने ते लेख आज जवळ जवळ शंभर वर्षांनी प्रथमच संकलित होत आहेत.

शास्त्रीबोवांच्या निवडक साहित्याचा सहा खंडांचा हा संच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात किती महत्वाचा आहे हे खालील व्यक्तींच्या उद्गारावरून कळून येईल.

**डॉ. मुकुंदराव जयकर :** राजारामशास्त्री भागवत म्हणजे संशोधनात निमग्न झालला गाढा विद्वान ! दलितांचा दक्ष कैवारी !

**डॉ. भीमराव आंबेडकर :** राजारामशास्त्री भागवत आपले हितचिंतक आहेत; याची अस्पृश्यांना जाणीव होती. त्यांचे सर्व लिखाण संकलित करून प्रसिद्ध झाले पाहिजे.

**सानेगुरुजी :** जुन्याकडे नव्या दृष्टीने पाहणे व पुराणातील भाकडकथांचे अवगुंठन काढून त्यातील सत्य संशोधणे हा राजारामशास्त्री भागवतांचे काम होते.

**रँग्लर परांजपे :** महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात शास्त्रीबोवाना अवश्य स्थान मिळेल.

**गोविंदाग्रज (गडकरी) :** 'भागवतांची धराच हिंमत'

राजारामशास्त्री भागवतांनी दिलेला हा सांस्कृतिक ठेवा पुढील सहा खंडात महाराष्ट्राला सादर करीत आहोत.

खंड १ : मऱ्हाठ्यासंबंधाने चार उद्गार
खंड २ : विचारमाधुकरी १
खंड ३ : विचारमाधुकरी २
खंड ४ : लेखसंग्रह १
खंड ५ : लेखसंग्रह २ (या खंडात प्राकृत भाषेची 'विचिकित्सा' हे प्रसिद्ध पुस्तक समाविष्ट आहे)
खंड ६ : प्रस्तावनाखंड लेखिका—दुर्गा भागवत

वरदा बुक्स 'सेनापती बापट मार्ग, पुणे १६'